# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# १९ व्या शतकातील भारताचा आर्थिक इतिहास

## (Economic History of 19th Century India)

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**एम. ए. भाग-२**

**इतिहास**

Elective Group E : Paper 320

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१९
एम. ए. भाग - २ करिता (१९ व्या शतकातील भारताचा आर्थिक इतिहास)
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-34-2

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**अभ्यासमंडळ : इतिहास**

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. तसेच यंदाच्या वर्षापासून म्हणजे २०१८-१९ पासून अभ्यासक्रम बदललेला आहे, सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने, एम. ए. भाग-२ इतिहास या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ''१९ व्या शतकातील भारताचा आर्थिक इतिहास'' या विषयाचे स्वयंःअध्ययनासाठी हे पुस्तक सन २०१९-२० या वर्षात लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंःअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

१९ व्या शतकातील भारताचा आर्थिक इतिहास या स्वयंअध्ययन साहित्यामध्ये प्रास्ताविक, कृषीविषयक व्यवस्था आणि त्याचे परिणाम, उद्योग, व्यापार इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.


**■ संपादक ■**

**डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**(१९ व्या शतकातील भारताचा आर्थिक इतिहास)**
**एम. ए. भाग–२ : इतिहास पेपर ३२०**

## अभ्यास घटकांचे लेखक



| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. अवनिश पाटील**<br>इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **डॉ. अभय पाटील**<br>सौ. एम. आर. जगताप महिला महाविद्यालय, उंब्रज, कराड | २ |
| **डॉ. सुरेश वसंत शिखरे**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर | ३ |
| **प्रा. संदीप जाधव**<br>विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | ४ |

■ संपादक ■

**डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रास्ताविक | १ |
| २. | कृषीविषयक व्यवस्था आणि त्याचे परिणाम | २८ |
| ३. | उद्योग | ५० |
| ४. | व्यापार | ९७ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक क्र. १

# प्रास्ताविक

---

**अनुक्रमणिका**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ भारतीय आर्थिक इतिहासातील प्रश्न

१.२.२ भारतीय आर्थिक इतिहास अभ्यासण्याचे विविध दृष्टिकोन

१.२.३ मध्य १८व्या शतकातील भारतीय अर्थव्यवस्था; १८ व्या शतकासंबंधीचा वाद

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी प्रश्न

१.७ संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासाची उद्दिष्टे

* ब्रिटीशांच्या आगमनापूर्वीच्या भारतीय अर्थव्यवस्थेचा परिचय करून देणे.
* भारताच्या आर्थिक इतिहासाच्या अभ्यासातील वेगवेगळ्या दृष्टीकोनांचा अभ्यास करणे.
* १८ व्या शतकासंबंधीत वादाची माहिती घेणे.
* विद्यार्थ्यांमध्ये भारताचा आर्थिक इतिहास अभ्यासण्यासाठी ऐतिहासिक व चिकित्सक दृष्टीकोन निर्माण करणे.

## १.१ प्रास्ताविक :

एकोणिसावे शतक हे भारतीय इतिहासाच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचे शतक होते. कारण या शतकात भारतावर ब्रिटीशांची सत्ता प्रस्थापित झाली. त्याचा भारतीय समाजावर दूरगामी परिणाम झाला. भारतीय समाज पूर्णपणे बदलून गेला. भारतातील ब्रिटिशांच्या सत्ता स्थापनेमुळे भारतीय राजकीय व्यवस्था बदललीच पण

अर्थव्यवस्थेतही बदल झाला. ब्रिटिशांनी भारतातील पारंपारिक व्यवस्थेमध्ये बदल करून आपल्या व्यापारी हितसंबंधांना पुरेशी भारतीय समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था व अर्थव्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला. ज्यामुळे भारतीय बाजारपेठ आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडली गेली. याचा भारताला फायदा होण्याऐवजी तोटाच जास्त झाला. कारण भारतीय अर्थव्यवस्था ही एका त्रयस्त शक्तीद्वारे नियंत्रित केली जात होती. त्यामध्ये भारतीयांच्या हिताऐवजी ब्रिटिशांचे हित महत्त्वाचे मानल्यामुळे ती जागतिक बाजारपेठेशी दुय्यम अवस्थेत जोडली गेली.

ज्याला 'ब्रिटिश राजमुकुटावरील हिरा' असे संबोधले जात होते. त्या भारताचा विकास ब्रिटिश राजवटीमध्ये झाला नाही. ब्रिटिश आगमनापूर्वी समृद्ध असणारा देश ब्रिटिश राजवटीत दरिद्री बनला.

१९व्या शतकातील आर्थिक इतिहासाची मिमांसा साम्राज्यवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी, सबाल्टर्नवादी इ. दृष्टीकोनातून अनेक विचारवंतांनी केली. ज्यामुळे या शतकातील आर्थिक इतिहासाचे बारकावे समोर आले.

### १.२.१. भारतीय आर्थिक इतिहासातील प्रश्न :

#### १९ व्या शतकातील भारताचा आर्थिक इतिहास

भारत हा ब्रिटीश साम्राज्याचा एक महत्त्वाचा भाग होता. भारताला ब्रिटीश साम्राज्याचे तेजस्वी रत्न (brightest jewel) असे संबोधले जात असे. असे असले तरी भारत हा जगातील सर्वात गरीब देशांमधील एक देश होता. १९व्या शतकामध्ये हा विरोधाभास निर्माण झाला. ब्रिटीश साम्राज्याचा एक महत्त्वाचा घटक असतानाही भारत देश हा जगातील गरीब देशांमधील एक देश म्हणून गणला जाऊ लागला. हा विरोधाभास का निर्माण झाला हे समजणे हाच १९व्या शतकाचा आर्थिक इतिहास अभ्यासण्याचा प्रमुख उद्देश आहे.

वरील विरोधाभासाची कारणे काय होती? ब्रिटीशांची वसाहत झाल्यानंतर भारताचा विकास अत्यंत हळुवार गतीने का झाला? ब्रिटीश वसाहती राजवटीने भारताच्या अर्थव्यवस्थेची वाढ मर्यादित करण्यात व त्यामध्ये गतिशीलता आणण्यात कोणती भूमिका पार पाडली? भारताच्या व्यापाराच्या दिशेत काय बदल घडून आले? ब्रिटीश राजवटीतील बदलांमुळे भारतातील व्यापारी व उद्योजकांवर काय परिणाम झाला? ब्रिटीश राजवटीत भारताची अर्थव्यवस्था आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी कशा प्रकारे जोडली गेली व या परिवर्तनास भारतीय व्यापाऱ्यांनी व उद्योजकांनी कसा प्रतिसाद दिला? ह्या व अशा अनेक इतर प्रश्नांची उत्तरे आर्थिक इतिहासकार शोधत असतात.

### आर्थिक इतिहास म्हणजे काय?

आर्थिक इतिहासाच्या आपल्याला अनेक छोट्या व्याख्या करता येतील. आपण असे म्हणू शकतो की आर्थिक इतिहास हा गत काळातील समाजांच्या आर्थिक बाबींचा अभ्यास आहे. आर्थिक इतिहास साधनसामग्रीचा उदा. जमीन, श्रमिक आणि भांडवल इत्यादींचा इतिहास मांडतो. आर्थिक इतिहास भूतकाळातील अर्थव्यवस्थेच्या परिस्थितीचा अभ्यास करतो.

आर्थिक इतिहासकार ऐतिहासिक साधनांना आर्थिक प्रश्न विचारतो. बहुतांश वेळा आर्थिक इतिहासकाराचे प्रश्न खालील विषयांसंबंधी असतात: १) वस्तू आणि सेवा यांची मागणी आणि पुरवठा २) उत्पादनाची किंमत ३) लोकांच्या उत्पन्नाची पातळी ४) संपत्तीचे वितरण ५) देशामधील गुंतवणूकीचा आकार आणि दिशा ६)

अंतर्गत अथवा परराष्ट्रीय व्यापाराची रचना इत्यादी.

आर्थिक इतिहास हा 'संख्येशी' संबंधित असतो. त्यामुळे आर्थिक इतिहासकार एखाद्या व्यक्तिचा अभ्यास करत नाही. आर्थिक इतिहास अर्थशास्त्राच्या आणि इतिहासाच्या पद्धतींचा उपयोग करतो. या दोन्ही विषयांची तंत्रे वापरल्या शिवाय आर्थिक इतिहास लेखनाची प्रगती होत नाही.

काही देश श्रीमंत का झाले व काही गरीब का राहिले? आर्थिक विकास कशामुळे होतो? आर्थिक विकास कशामुळे खुंटतो? अर्थशास्त्र आणि आर्थिक इतिहास हे दोन्ही विषय वरील मूलभूत प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न करतात. पण त्यांच्या पद्धती वेगवेगळ्या असल्यामुळे अर्थशास्त्र आणि आर्थिक इतिहास हे वेगळे विषय बनतात. ह्या दोन्ही विषयाच्या पद्धतीमध्ये काही मूलभूत फरक खालील प्रमाणे आहेत.

१) आर्थिक विकास हा एका कारणामुळे होत नसून अनेक कारणामुळे होत असतो. उदा. कर आकारण्याचे नवीन धोरण. अशा कारणांचा अर्थव्यवस्थेवरही जलद परिणाम होत असतो. काही इतर कारणे अर्थव्यवस्थेवर हळुवारपणे परिणाम करत असतात. उदा. लोकसंख्येतील वाढ, कायदा व सांस्कृतिक बदल. अशा कारणांचा अभ्यास इतिहासकार करतात. अशा कारणांचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम दूरगामी स्वरूपाचा असतो. थोडक्यात, अर्थतज्ज्ञ हे भाव वाढीचे परिणाम, नवीन करांचे परिणाम, सरकारी धोरणाचे परिणाम इत्यादी गोष्टींचा अभ्यास करतात. या उलट आर्थिक इतिहासकार हे वरील उल्लेख केलेल्या हळुवारपणे परिणाम करणाऱ्या कारणांचा अभ्यास करत असतो.

२) अर्थशास्त्रीय सिद्धांतामध्ये व्यापारी कर किंवा बाजारपेठेचे अस्तित्व हे निश्चित समजले जाते. या उलट आर्थिक इतिहासामध्ये बाजारपेठांच्या निर्मितीची कारणे व त्यांच्या प्रक्रिया अभ्यासल्या जातात. आर्थिक इतिहासकार बाजारपेठांमध्ये होणारे व्यवहार आणि बाजारपेठांच्या स्वरूपातील परिवर्तनाचा अभ्यास करतात.

आर्थिक इतिहास हा काही ठरावीक प्रभावशाली घटनांना आणि व्यक्तींना महत्त्व देतो. अर्थशास्त्रीय अभ्यासात असे करणे अवघड असते. १९२९ सालची महामंदी किंवा पहिले अथवा दुसरे महायुद्ध अशा मोठ्या घटनांचे अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होत असतात. आर्थिक इतिहासकार ह्या परिणामांचा अभ्यास करतात.

३) आर्थिक इतिहास हा विषय अर्थशास्त्र आणि इतिहास या दोन्ही विद्याशाखा संबंधित असल्यामुळे तो अंतर-विद्याशाखीय स्वरूपाचा असतो. व्यक्तीच्या आर्थिक कृत्यांवर सांस्कृतिक व सामाजिक रूढी व रीतिरिवाज परिणाम करत असतात. उदा. लोकसंख्या वाढीची कारणमीमांसा करत असताना नुसते मोठ्या कुटुंबाचे आर्थिक फायदे व तोटे अभ्यासणे गरजेचे नाही तर समाजामध्ये स्त्रीच्या स्थानामध्ये कसे काय बद्दल होत गेले हे अभ्यासणे देखील गरजेचे असते. आर्थिक इतिहासामध्ये आर्थिक स्वरूप नसलेली कारणे देखील महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात. हे विशेषत: लोकसंख्यावाढी संदर्भातील वर दिलेल्या उदाहरणावरून स्पष्ट होते . या शिवाय शेतीतील उत्पादन अथवा औद्योगिक उत्पादनाच्या निर्मितीमध्ये समाज रचनेचा प्रभाव नेहमीच आढळतो. आर्थिक इतिहासकार अशा गैरआर्थिक कारणांचा अभ्यास करतात.

भारताच्या संदर्भात ब्रिटीश राजवट प्रस्थापित होणे ही एक फार मोठी घटना होती. ह्या घटनेमुळे झालेले बदल हे फक्त राजकीय नसून त्यांना सामाजिक आणि आर्थिक स्वरूप होते. ब्रिटीश हे परकीय तर होतेच पण ते

व्यापारी देखील होते. ब्रिटनमध्ये १७ व्या व १८ व्या शतकात औद्योगिक क्रांतीची सुरुवात झाली होती. परकीय व व्यापारी असल्यामुळे ब्रिटीशांनी भारतामध्ये नवीन प्रकारची आर्थिक धोरणे व प्रशासकीय तत्त्वे अमलात आणली. यामुळे भारतातील प्रस्थापित पारंपारिक समाज मोडकळीस आला. १८ व्या शतकातील युरोप हा विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये अभूतपूर्व प्रगती करत होता. युरोपमध्ये याच काळात राजकीय संघटनात व आर्थिक उलाढालीत मूलभूत परिवर्तन घडून येत होते. युरोपियन लोकांकडे लष्करी सत्ता देखील होती. या सर्वांचा उपयोग करून ब्रिटीशांनी भारतामध्ये एक केंद्रित राज्य (centralised state) निर्माण केले. ब्रिटीश येण्यापूर्वी अशा प्रकारचे सत्तेचे केंद्रीकरण भारतामध्ये पूर्वी कधीच अस्तित्वात आले नव्हते. भारतामधील ब्रिटीशांच्या धोरणामुळे भारत हा जागतिक बाजारपेठेशी जोडला गेला. ब्रिटिशांनी त्यांचे उद्योग आणि व्यापाराचे प्रगत ज्ञान भारतामध्ये अवलंबले. या सर्व गोष्टींमुळे भारतातील प्रस्थापित पारंपारिक व्यवस्थेत बदल घडून आला. भारतामध्ये आधुनिक प्रकारची वर्ग रचना, आधुनिक राज्यसंस्था आणि आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारलेले उद्योग अस्तित्वात आले. हे सर्व बदल भारताचा ब्रिटीश वसाहतवादी सत्तेशी आलेल्या संबंधांमुळे घडून आले होते.

मात्र ह्या परिवर्तनामुळे भारतीतील सामान्य लोकांच्या राहणीमानात सुधारणा झाली नाही. इ.स. १८५० पर्यंत जपान व भारत या दोन देशामधील लोकांचे राहणीमान हे जवळ-जवळ सारखेच होते. जपानने पुढील काही दशकांमध्ये आपल्या लोकांचे राहणीमान दुप्पटीने सुधारले आणि तो एक प्रगत देश बनला. मात्र भारतामध्ये असे काही झाले नाही. याचे प्रमुख कारण १९व्या शतकात भारतामध्ये अस्तित्वात असलेली वसाहतवादी ब्रिटीश राजवट हे होते. यामुळे भारताचा संबंध ब्रिटीशांच्या बरोबर आल्यामुळे भारताचा विकास झाला असे म्हणता येईल का हा प्रश्नच आहे. जपानच्या तुलनेत भारताची प्रगती अत्यल्प प्रमाणात झाली. भारताच्या विकासातील गतिहिनतेला (stagnation) ब्रिटीश राजवट जबाबदार होती की ब्रिटीश राजवट स्थापन होण्याच्या पूर्वी अस्तित्वात असलेल्या परिस्थितीमुळे हे घडले? अशा प्रकारचे मूलभूत प्रश्न आधुनिक भारताच्या आर्थिक इतिहासकारांना भेडसावत असतात.

आधुनिक भारताचे आर्थिक इतिहासकारांनी अनेक विषयांचा अभ्यास केला आहे. त्यापैकी काही महत्त्वाचे विषय खालील प्रमाणे आहेत.

१) ब्रिटीश-पूर्व काळातील अर्थव्यवस्था व ब्रिटीश काळातील अर्थव्यवस्था यांची तुलना

२) ब्रिटीश काळातील भारतामधील भांडवलदारी प्रणालीची सुरुवात

३) ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीचे व्यापारी धोरण व कंपनीने बंगाल प्रांतामध्ये केलेले आर्थिक बदल, विशेषतः कंपनीचे महसूल धोरण

४) ब्रिटीशांनी भारतामध्ये अस्तित्वात आणलेली नवीन उत्पादनाची साधने (means of production), नवीन उद्योग व त्यांचा पारंपारिक भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला परिणाम.

५) भारतातील पारंपारिक हस्तकला उद्योगावर ब्रिटीश राजवटीचा परिणाम

६) ब्रिटीशांचे व्यापारी धोरण व त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवरील परिणाम

७) ब्रिटिशांनी सुरू केलेली चलन पद्धती

८) ब्रिटीशांचे कर विषयक धोरण व त्याचे परिणाम

१९व्या शतकाच्या आर्थिक इतिहासातील एक महत्त्वाचा वाद 'शेती क्षेत्राच्या वाढी' संबंधित होता. भारतीय अर्थव्यवस्थेसाठी शेती अत्यंत महत्त्वाची होती. त्यामुळे अनेक भारतीय आर्थिक इतिहासकारांनी आपले लक्ष शेतीच्या प्रश्नावर केंद्रित केले आहे. १९व्या शतकात भारत हा शेतीप्रधान देश असल्यामुळे गरिबी, हस्तकला उद्योगांचा नाश ह्या सर्व गोष्टी शेतीच्या परिस्थितीवर अवलंबून होत्या. यामुळेच १९व्या शतकातील शेती व्यवस्थेचा अभ्यास करणे आर्थिक इतिहासकारांना गरजेचे ठरले आहे. ब्रिटीश वसाहती राजवटीमध्ये झालेल्या लोकसंख्यावाढीच्या तुलनेत शेती उत्पादन वाढले का कमी झाले? शेतीचे व्यापारीकरण (commercialization of agriculture) झाले का? बाजारपेठेत उत्पादन विकण्यासाठी लागवड केलेल्या नगदी पिकांमुळे भारतातील अन्नधान्य उत्पादनावर काय परिणाम झाला? भारत हा मध्ययुगीन काळामध्ये वस्तूंची निर्यात करणारा देश होता. मात्र ब्रिटीश अमलामध्ये भारत हा कच्चा माल निर्यात करणारा देश बनला. असे का झाले? ब्रिटिशांनी भारतामध्ये कोणत्या प्रकारचे कृषी धोरण अवलंबले? ह्या धोरणाचा भारतीय शेतकऱ्यांवर काय परिणाम झाला? ब्रिटीश अमलात पारंपारिक कृषी व्यवस्थेत कोणते बदल झाले?

कृषी धोरण हे अर्थव्यवस्थेचा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. त्यामध्ये जमीन महसूल धोरण, शेत जमिनीची मोजणी आणि मापणी, शेतजमिनीच्या मालकीचे प्रकार, वहिवाटीचा प्रकार इत्यादी गोष्टी समाविष्ट होतात. कृषी धोरणाचा परिणाम खाली नमूद केलेल्या गोष्टींवर मोठ्या प्रमाणात होत असतो:

**१) राजकारण :** ग्रामीण भागामध्ये सत्ता व अधिकार कशा प्रकारे वापरले जातात; राज्यसंस्था ग्रामीण भागातील लोकांचा पाठिंबा कशा प्रकारे मिळवते; राज्यसंस्था ग्रामीण भागातील कोणत्या लोकांचे हितसंबंध सांभाळते?

**२) शासन :** शासनाचे हेतू काय आहेत? शासनाची मिळकत काय आहे? शासन कोणत्या प्रकारे आपली संपत्ती खर्च करते? ह्या गोष्टी आपल्याला शेतीधोरण अभ्यासल्यावर कळतात.

**३) अर्थव्यवस्था :** अन्नधान्याचे उत्पादन कोणत्या पद्धतीने केले जाते? शेती उत्पादनाचा विनिमय कशा प्रकारे केला जातो? अर्थव्यवस्थेतील शेतीचे महत्त्व किती आहे? एखाद्या प्रदेशात कोणते पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते?

**४) सामान्य लोकांची सुस्थिती :** सामान्य व गरीब जनतेची भौतिक परिस्थिती शासनाने राबवलेल्या शेती धोरणावर अवलंबून असते.

**५) सांस्कृतिक परिणाम :** शासनाच्या शेती धोरणाचे परिणाम देशाच्या संस्कृतीवर होत असतात. लोकांच्या खाजगी मालमत्ता, रोजगार, कुटुंब व वारसा हक्क व शेती उत्पादनाच्या संबंधित असलेल्या संकल्पना व मूल्ये हे शासनाच्या शेती धोरणाने प्रभावित होत असतात.

### १.२.२. भारतीय आर्थिक इतिहास अभ्यासण्याचे विविध दृष्टिकोन

गेल्या १५० वर्षांमध्ये भारताचा आर्थिक इतिहास अभ्यासण्यासाठी तीन महत्त्वाचे दृष्टिकोन अस्तित्वात आले.

१) पहिला दृष्टिकोन न्यायमूर्ती रानडे आणि रोमेशचंद्र दत्त यांनी अवलंबलेला राष्ट्रवादी दृष्टिकोन होता.

भारतातील ह्या विचारवंतांना एक 'भारतीय अर्थशास्त्र' निर्माण करायचे होते. असे करण्यामागे त्यांचा प्रमुख विचार होता की हे अर्थशास्त्र भारतीय अर्थव्यवस्थेच्या खास वैशिष्ट्यांवर आधारलेले असले पाहिजे. अशा प्रकारचे 'भारतीय अर्थशास्त्र' निर्माण करण्यासाठी ऐतिहासिक दृष्टिकोन घेणे जरुरीचे होते. अनेक भारतीय अभ्यासकांनी प्राचीन आणि मध्ययुगीन भारतीय अर्थव्यवस्थेवर लिखाण केले. पण १९३० शीच्या दशकापासून अर्थशास्त्र ह्या विषयामधल्या ऐतिहासिक दृष्टिकोनाची लोकप्रियता हळूहळू कमी होऊ लागली. यामुळे अनेक वर्षांसाठी शैक्षणिक संस्थांमधील अर्थशास्त्र विषयाच्या संशोधनात आणि शिकवण्यात 'आर्थिक इतिहासाचे' स्थान हे दुय्यमच राहिले.

२) भारताच्या आर्थिक इतिहास लेखनाचे दुसरे पर्व हे १९५० च्या दशकात सुरू झाले. ह्या काळात मार्क्सवादी विचारांचा प्रभाव अर्थशास्त्रज्ञ आणि इतिहासकार यांच्यावर निर्माण झाला होता.

३) भारताच्या इतिहासलेखनाचे तिसरे पर्व १९६० च्या दशकात सुरू झाले. दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेतील अभ्यासकांनी मोठ्या प्रमाणात भारताच्या आर्थिक इतिहासावर लिखाण करण्यास सुरुवात केली.

भारतीय राष्ट्रवादी अर्थशास्त्राचे दोन प्रमुख हेतू होते. पहिला हेतू होता ब्रिटीश राजवटीच्या भारतावर झालेल्या आर्थिक परिणामांची उकल करणे.दुसरा हेतू हा होता की आर्थिक सिद्धांताची सर्व व्यापकता नाकारणे. पाश्चात्य अर्थशास्त्रज्ञ हे त्यांनी मांडलेले सिद्धांत हे सर्व जगातील राष्ट्रांना लागू होतात असा दावा करत होते. मात्र भारतातील राष्ट्रवादी विचारवंताना हे मान्य नव्हते. त्यांना हे माहीत होते की भारताची अर्थव्यवस्था वसाहतवादी असल्यामुळे ह्या व्यवस्थेची काही खास वैशिष्ट्य होती. भारतातील विचारवंताना भारतीय अर्थव्यवस्थेची खास वैशिष्ट्ये अंतर्भूत करणारी चौकट उभी करायची होती. पाश्चिमात्य राष्ट्रांना लागू होणारे आर्थिक सिद्धांत व नियम भारतीय अर्थव्यवस्थेला लागू पडत नाहीत असा त्यांचा विश्वास होता.

महादेव गोविंद रानडे यांनी १८९२ साली पुण्याच्या डेक्कन कॉलेज येथे 'भारताची राजकीय अर्थव्यवस्था' (Indian Political Economy) या विषयावर भाषण केले. या भाषणामध्ये त्यांनी मांडले की भारताची राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक. नैतिक (ethical) व आर्थिक परिस्थिती पाश्चात्य देशांच्या पेक्षा वेगळी असल्यामुळे त्यांच्या अर्थव्यवस्थेच्या बाबतीत लागू पडणारे सिद्धांत व नियम भारताच्या अर्थव्यवस्थेला लागू पडतीलच असे नाही.

रोमेशचंद्र दत्त यांनी 'भारताचा आर्थिक इतिहास' (Economic History of India) दोन खंडात लिहिला. हा इतिहास राष्ट्रवादी इतिहास लेखन परंपरेचा उत्तम नमुना आहे. रोमेशचंद्र दत्त हे 'भारतीय सनदी सेवे' (Indian Civil Service) मध्ये कार्यरत होते. मात्र २६ वर्ष सेवा केल्यावर त्यांनी आपल्या नोकरीचा राजीनामा दिला आणि आपले नंतरचे जीवन राजकारण व लिखाणाला अर्पण केले. ते भारतीय राष्ट्र सभेचे सदस्य होते. दत्त यांनी आपल्या पुस्तकामध्ये इंग्रजी लोकांनी केलेल्या आर्थिक शोषणाची पुरावे देऊन उकल केली. त्यांनी लिहिलेल्या द्विखंडीय आर्थिक इतिहासाने भारताच्या राष्ट्रवादी आर्थिक इतिहासलेखनाला एक मजबूत चौकट पुरवली. दत्त यांनी लिहिलेल्या आर्थिक इतिहासाला अनेक अभ्यासक भारतीय राष्ट्रवादी आर्थिक इतिहासलेखनाच्या परंपरेचा मूलभूत ग्रंथ मानतात.

भारतीय राष्ट्रवादी आर्थिक इतिहासकारांनी केलेल्या ब्रिटीश राजवटी वरील टिकेला ब्रिटीश आर्थिक विचारवंतांनी आव्हान दिले. असे करणाऱ्या ब्रिटीश अभ्यासकांमध्ये डब्लू. एच. मोरलँड हे प्रमुख होते. मोरलँड हे एक ब्रिटीश सनदी सेवेतील अधिकारी होते. त्यांनी भारताचा आर्थिक इतिहास अभ्यासला. मोरलँड यांनी आपले लक्ष मोगल काळातील अर्थव्यवस्थेचा सखोल अभ्यास करण्यावर केंद्रित केले. त्याची दोन प्रमुख पुस्तके म्हणजे 'इंडिया अॅट द डेथ ऑफ अकबर' आणि 'फ्रॉम अकबर टू औरंगजेब'. मोरलँड यांनी केलेल्या मोगल अर्थव्यवस्थेच्या विश्लेषणात भारतातील कमी प्रतीचे राहणीमान, सर्वव्यापक गरिबी, ब्रिटीश भारतातील प्रश्न, हे भारतीय राजकीय अर्थव्यवस्थेची दीर्घकाळापासून अस्तित्वात असलेली वैशिष्ट्ये होती असे मत मांडले. थोडक्यात वसाहती विचारवंतांनी अशी भूमिका घेतली की भारतातील आर्थिक प्रश्नांसाठी ब्रिटीश राजवट जबाबदार नसून भारतीय परंपरा, समाज, संस्कृती इत्यादींमधील दोष जबाबदार होते. वसाहती विचारवंतांमध्ये सर्वात प्रभावी मांडणी ही वेरा अॅनट्चे यांनी केली. वेरा अॅनट्चे ह्या लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ह्या संस्थेतील प्राध्यापक होत्या.

**मार्क्सवादी आर्थिक इतिहासलेखन**

१९४० व १९५०च्या दशकात मार्क्सवादी विचारप्रणालीने भारतातील इतिहासकारांना आर्थिक इतिहास लिहिण्यासाठी प्रोत्साहित केले. विसाव्या शतकाच्या सुरुवातीपासूनच अर्जुन अप्पादुराय सारख्या इतिहासकारांनी आर्थिक प्रश्न हाताळणे सुरू केले होते. अप्पादुराय यांनी दोन खंडांत ई.स. १००० ते १५०० या कालखंडासाठी दक्षिण भारताचा आर्थिक इतिहास अभ्यासला. १९५०च्या दशकात एन. के. सिंना यांनी बंगालचा आर्थिक इतिहास तीन खंडात लिहिला. बहुतांश इतिहासकार हे राजकीय इतिहासच लिहित होते. १९४० आणि १९५०च्या दशकांमध्ये जगातील अनेक इतिहासकार मार्क्सवादी विचारप्रणालीने प्रेरित होऊन आर्थिक प्रश्नांवर लिखाण करू लागले होते. इंग्लंड मधील 'पास्ट अॅण्ड प्रेझेन्ट' या नियतकालिकातून हिल, हॉब्सबॉम आणि थॅमसन यांच्या सारखे इतिहासकार लिहिण्याच्या नवीन मार्गाचा अवलंब करू लागले होते. ह्या इतिहासकारांच्या लिखाणाचा भारतीय इतिहासकारांवर मोठा प्रभाव पडला.

भारतातील इतिहास लेखनावर मार्क्सवादाचा प्रभाव पडल्यामुळे अनेक नवीन शक्यता निर्माण झाल्या. मार्क्सवादी विचारप्रणाली मध्ये आर्थिक बाबींना खूप महत्त्व असल्यामुळे अनेक अभ्यासक आर्थिक इतिहास लिहिण्याकडे वळले. १९६०च्या दशकामध्ये भारतातील नामवंत विद्यापीठांच्या इतिहास विभागात भारतीय आर्थिक इतिहास मोठ्या प्रमाणात लिहिला जाऊ लागला. भारतीय आर्थिक इतिहासातील संशोधन सामाजिक इतिहासाशी जोडले गेले. मार्क्सवादी विचारांनी आर्थिक इतिहास व सामाजिक इतिहास यांना जवळ आणले.

मार्क्सवादी विचारांचा परिणाम प्राचीन भारताच्या इतिहासलेखनात प्रभावी होता. डी. डी. कोसंबी यांनी प्राचीन भारताच्या इतिहास लेखनात क्रांती घडवून आणली. कोसंबी यांच्या लेखनाने घडवून आणलेल्या ह्या परिवर्तनाला नामवंत इतिहासकार रोमिला थापर यांनी विचारव्यूह दिशाबदल' (Paradigm Shift) असे संबोधले आहे.

मार्क्सवादाचा प्रभाव मध्ययुगीन भारताच्या इतिहास लेखनावर देखील झाला. विशेषतः मोगल भारताच्या इतिहासलेखनावर लक्षणीय परिणाम झाल्याचा आढळतो. पारंपारिक इतिहासकारांनी मोगल सम्राटांच्या कारकिर्दीच्या अभ्यासावर जास्त लक्ष केंद्रित केले होते. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती, व्यापार, तंत्रज्ञान, पतपेढी व्यवहार, सरंजामशाहीचे स्वरूप आणि भांडवलशाहीच्या उदयाची शक्यता अशा अनेक आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयांवर

इतिहासकारांनी लिखाण सुरू केले. प्रा. इरफान हबीब यांनी मार्क्सवादी परिप्रेक्ष्यातून मध्ययुगीन मोगल भारताचा इतिहास लिहिला. १९६३ साली त्यांचा नावाजलेला ग्रंथ 'ॲग्रेरीयन सिस्टिम ऑफ मुघल इंडिया' प्रसिद्ध झाला. हबीब यांनी मोगल साम्राज्याच्या आर्थिक आणि सामाजिक संरचनांचा अभ्यास केला आणि त्यातील वर्गसंघर्ष दाखवला. वर्ग संघर्षामुळे मोगल साम्राज्यात अरिष्ट निर्माण झाले आणि त्याचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली असे मत त्यांनी सर्वप्रथम आपल्या ग्रंथात मांडले. इरफान हबीबांचा ग्रंथ प्रकाशित होईपर्यंत पारंपरिक इतिहासलेखन मोगल साम्राज्याच्या ऱ्हासाला फक्त राजकीय कारणे जबाबदार होती असे मांडत असे. मात्र, हबीबांनी आपल्या ग्रंथात आर्थिक व सामाजिक कारणांवरही भर दिला आणि दाखवून दिले की मोगल साम्राज्याचा ऱ्हास होण्यासाठी प्रामुख्याने आर्थिक कारणेच जबाबदार होती. ह्या ग्रंथामुळे इतिहासकारांच्यामध्ये वैचारिक मंथन घडून आले व अनेकांना आर्थिक इतिहास लिहिण्याचे महत्त्व समजले.

**अर्थशास्त्रज्ञांची इतिहासलेखनातील रुची**

१९५०चा दशकात जेव्हा मार्क्सवादी अभ्यासक इतिहासाची पुनर्मांडणी करू लागले होते, त्याच काळात दिल्ली स्कूल ऑफ इकोनॉमिक्स या संस्थेच्या अर्थशास्त्रज्ञांनी ऐतिहासिक विषयांमध्ये संशोधन सुरू केले होते. १९६३ साली तपन रेचौधरी आणि धर्मा कुमार यांनी इंडियन इकोनोमिक आणि सोशल हिस्टरी रिव्ह्यू हे नियतकालिक सुरू केले. ह्या नियतकालिकात आर्थिक विषयांच्या बरोबर सामाजिक आणि राजकीय महत्त्व असलेल्या विषयांवर लेख प्रसिद्ध होऊ लागले. कालांतराने सांस्कृतिक विषयांवरील लेखांना देखील प्रसिद्ध केले जाऊ लागले. नियतकालिकाच्या संपादकांनी एक व्यापक भूमिका घेतली. तपन रेचौधरी आणि धर्मा कुमार यांनी परत एकत्रित येऊन केंब्रिज इकोनोमिक हिस्टरी ऑफ इंडिया हे नावाजलेले पुस्तक लिहिले.

१९६०च्या दशकात दिल्ली स्कूलच्या ओम प्रकाश, ओमकार गोस्वामी, संजय सुब्रमण्यम यासारख्या अनेक नामवंत आर्थिक इतिहासकारांनी लिखाण केले. ह्या अभ्यासकांनी आपल्या लिखाणात हाताळलेले प्रश्न हे आर्थिक प्रश्नांपर्यंत सीमित नव्हते, त्यांना एक व्यापक स्वरूप होते. आर्थिक प्रश्नांची कारणे शोधतांना ह्या अभ्यासकांनी सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक घटकांना महत्त्व दिले. दिल्ली स्कूलच्या काही अभ्यासकांनी आर्थिक इतिहासातील प्रश्नांचा सांख्यिकी अभ्यास देखील केला. एस. सुब्रमण्यम यांनी राष्ट्रीय उत्पन्नाचा (National Income) उत्कृष्ट सांख्यिकी अभ्यास केला.

**१९६७ सालचा वाद**

१९६३ साली प्रा. मोरीस डी. मोरीस यांनी 'Towards a Reinterpretation of Nineteenth Century Indian Economic History' हा लेख 'Journal of Economic History' ह्या नियतकालिकात प्रसिद्ध केला. ह्या लेखामुळे १९व्या शतकातील भारतीय आर्थिक इतिहासावर मोठ्या प्रमाणात चर्चा घडून आली. ह्या लेखाने आर्थिक इतिहासकारांमध्ये तीव्र भावना जागृत झाल्या. मात्र भारतातील व परदेशातील आर्थिक इतिहासकारांनी प्रा. मोरीस यांच्या विचारांवर चर्चा केली नाही. १९६८ साली Indian Economic and Social History Review या आंतरविद्याशाखीय (interdiciplinary) संशोधन पत्रिकेच्या विशेष अंकामध्ये मोरीस यांच्या विचारांवर टिप्पणी करणारे अनेक लेख छापून आले. बिपीन चंद्र , तोरो मत्सुइ व टी.रेचौधरी यांनी मोरीस यांच्या मांडणीवर आपले म्हणणे मांडले. १९व्या शतकातील भारताच्या आर्थिक इतिहासाबाबत

इतिहासकारांमध्ये असलेले मतभेद या निमित्ताने पुढे आले. या वादाच्या निमित्ताने आर्थिक इतिहासकारांना भेडसावत असलेल्या अनेक प्रश्नांचा अभ्यासपूर्ण ऊहापोह झाला. संशोधन पत्रिकेच्या संपादकांनी मोरीस यांचा मूळ लेख व अभ्यासकांनी त्यात मांडलेले आपले म्हणणे  पुस्तक रुपात प्रसिद्ध केले.

खरंतर १९ व्या शतकातील भारताचा आर्थिक इतिहास हा नेहमीच वादग्रस्त राहिला आहे. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या पूर्वार्धात अर्थतज्ञ व आर्थिक इतिहासकारांमध्ये या संबंधित वाद सुरू झाला होता. साम्राज्यवादी गट व साम्राज्यवाद-विरोधी गट असे दोन वेगवेगळे विचारप्रवाह असलेले अभ्यासकांचे गट निर्माण झाले होते. साम्राज्यवादी विचार प्रवाहाचे समर्थक मांडत होते की ब्रिटीश राजवटीच्या काळात भारताची  समृद्धी वाढली होती. त्यांच्या मते यासाठी जबाबदार असलेली प्रमुख कारणे म्हणजे ब्रिटिशांनी भारतामध्ये निर्माण केलेला एकछत्री अंमल, कायदा व सुव्यवस्था, कार्यक्षम नोकरशाही, रेल्वेचा विकास, वाढता अंतर्गत व परदेशी व्यापार, आणि लागवडीखाली असलेल्या जमिनीच्या प्रमाणात झालेली प्रचंड वाढ. साम्राज्यवादी गटाच्या अभ्यासकांनी ब्रिटीश शासनाच्या 'निरंकुश अर्थव्यवहार धोरणाचे' (Laissez faire policy) समर्थन केले होते. अशा प्रकारची ब्रिटीश साम्राज्याच्या बाजूची मांडणी स्ट्रचे बंधू , जनरल चेसने आणि लॉर्ड कर्झन व अनेक ब्रिटीश नोकरशहांनी केलेली आढळते. नंतरच्या काळात असाच अर्थ असलेली मांडणी  टी. मोनसन,  जी. एफ. शिर्रास, एल. सी. ए. क्नोल्स आणि वेरा ॲनस्ट्चे यांच्यासारख्या अभ्यासकांनी केली.

साम्राज्यवादी मांडणीला विरोध करणारे दुसऱ्या गटातील अभ्यासक हे मांडत होते की ब्रिटीश राजवटीमुळे भारतामध्ये कोणत्याही प्रकारची औद्योगिक प्रगती किंवा औद्योगिक क्रांती अथवा आर्थिक विकास किंवा सामान्य लोकांची आर्थिक सुधारणा झाली नव्हती. त्यांच्या मते ब्रिटीश शासनाने नुसते आर्थिक बदल घडवून आणले, मात्र यामुळे कोणत्याही प्रकारचा आर्थिक विकास झाला नाही. उलट ब्रिटिशांनी निर्माण केलेल्या वसाहती व्यवस्थेमुळे भारताच्या आर्थिक विकासाला खीळ बसली. दुसऱ्या गटातील अभ्यासकांच्या मते ब्रिटीश राजवट ही भारताच्या आर्थिक प्रगतीमध्ये अडथळा निर्माण करणारी राजवट होती. जर भारताचे आधुनिकीकरण व आर्थिक विकास साधायचा असेल तर भारतावर प्रभुत्व असलेल्या ब्रिटीश राजवटीला नष्ट करणे जरुरीचे झाले होते. साम्राज्यवादी मांडणीला विरोध करणारे अनेक अभ्यासक हे राष्ट्रवादी चळवळीशी संबंधित होते. दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ती रानडे , लोकमान्य टिळक, आर. सी. दत्त, आर. पी. दत्त व इतर अनेक अभ्यासकांनी आपल्या लिखाणात साम्राज्यवादी मांडणीला विरोध केल्याचे आढळते.

मोरीस यांनी आपल्या लेखात १९व्या शतकातील भारताच्या आर्थिक इतिहासाबाबत कोणत्याही प्रकारचा नवीन अर्थाविष्कार केला नाही. त्यांनी २०व्या शतकाच्या सुरवातीला साम्राज्यवादी गटाच्या अभ्यासकांनी केलेल्या मांडणीला नवीन आर्थिक परिभाषा वापरून नवे रूप प्राप्त करून दिले. साम्राज्यवादी गटाच्या अभ्यासकांप्रमाणे मोरीस यांची मांडणी देखील ब्रिटिशांच्या 'अनिर्बंध अर्थव्यवस्था' निर्माण करण्याच्या उपक्रमाच्या चौकटीने समावृत्त केलेली आढळते.

मोरीस यांनी आपल्या लेखात १९व्या शतकात भारताच्या आर्थिक विकासासाठी जबाबदार असलेल्या घटकांचे वर्णन केले आहे. त्यांच्या मते १९व्या शतकात भारताच्या लोकसंख्या वाढीचा दर फार कमी होता. त्यांच्या मते आर्थिक विकास घडून येण्यासाठी लोकसंख्या जास्त प्रमाणात वाढणे गरजेचे होते. थोडक्यात, मोरीस

यांच्या मते १९व्या शतकात भारतातील लोकसंख्या अल्पदराने वाढल्यामुळे आर्थिक विकास घडून आला नाही.

मोरीस यांनी आपल्या लेखात राजकीय घटकाला महत्त्व दिले आहे. त्यांनी असे मत मांडले आहे की १९व्या शतकात ब्रिटीश राजवटीने भारतामध्ये एक उदारमतवादी राष्ट्र-राज्य (liberal nation-state) स्थापन केले. ह्या उदारमतवादी राष्ट्र-राज्याने भारतामध्ये कायदा-सुव्यवस्था स्थापन केली, एक कार्यक्षम प्रशासन अस्तित्वात आणले. यामुळे आर्थिक विकासाला हातभार लागला. ब्रिटिशांनी कर प्रणालीचे व व्यापाराच्या नियमांचे योग्य नियोजन केले आणि रस्ते व रेल्वेचा विकास केला. आकडेवारीच्या आधारे मोरीस हे मत मांडतात की भारतातील शेती मधील दर एकरी सरासरी उत्पादन (average agricultural output per acre) आणि दर व्यक्ती सरासरी शेतकी उत्पादन (average agricultural output per person) हे १९व्या शतकात वाढले होते. त्यांच्या मते १९व्या शतकात घडलेल्या शेतीच्या व्यापारीकरणाच्या प्रक्रियेमुळे दर एकरी शेती उत्पादन वाढले होते.

मोरीस यांच्या मांडणीतील सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा भारतातील हस्तकला उद्योगांच्या ऱ्हासासंबंधित होता. आपल्या लेखनात मोरीस यांनी हे मत मांडले की जरी ब्रिटनवरून आयात केलेल्या ब्रिटीश कापडाने भारतातील हातमाग कापडाबरोबर स्पर्धा केली असली तरी ब्रिटनमध्ये यंत्रावर तयार केलेला धागा वापरल्यामुळे हातमाग विणकरांची स्पर्धा करण्याची क्षमता वाढली होती.

मोरीस यांच्या लेखावर बिपिन चंद्र यांच्यासारख्या अनेक नामवंत इतिहासकारांनी टीका केली. टीकाकारांनी प्रामुख्याने हे मत मांडले की ब्रिटीश राजवटीला भारताचा आर्थिक विकास करण्यात अपयश आले होते. ब्रिटिशांनी आर्थिक परिवर्तन घडवून आणले, मात्र यामुळे आर्थिक विकास घडून आला नाही. कालांतराने ब्रिटीश राजवट ही भारताच्या औद्योगिक व कृषी विकासासाठी एक अडथळा बनली कारण ब्रिटिशांच्या उपाय-योजनांमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेला एक 'वसाहती' स्वरूप प्राप्त झाले व शेतीव्यवस्था ही 'अर्ध-सरंजामी' (semi-feudal) स्वरूपाची झाली होती. ब्रिटीश राजवटीने भारतात लागू केलेल्या सर्व आर्थिक धोरणांचा हेतू भारताची 'वसाहती अर्थव्यवस्था' टिकवणे आणि दृढ करणे हा होता.

थोडक्यात, मोरीस यांच्या विचारांना विरोध करणाऱ्या अभ्यासकांनी हे मत मांडले की भारताच्या आर्थिक न्यूनविकासासाठी (underdevelopment) ब्रिटिशांनी निर्माण केलेली 'वसाहती अर्थव्यवस्थाच' जबाबदार होती. ब्रिटीश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्थेचा न्यूनविकास हा नुसता अविकास नव्हता तर विकासाचे विकृतीकरण होते (The underdevelopment of India under British colonialism was not non-development but a distortion of development).

**साम्राज्यवादी / वसाहतवादी विचारांचे अलीकडील काळातील पुनरुत्थान**

१९व्या शतकापासूनच ब्रिटीश अभ्यासक व अधिकारी यांनी वसाहती राजवटीचे समर्थन करणारे विचार मांडायला सुरुवात केली होती. ब्रिटीश राजवटीमुळे भारतामध्ये कायदा व सुव्यवस्था स्थापन झाली, दळणवळणाच्या साधनांमध्ये वाढ झाली, जागतिक बाजारपेठेशी जोडले गेल्यामुळे परराष्ट्रीय व्यवहारामध्ये वाढ झाली, परराष्ट्रीय गुंतवणूक वाढली, शेतीमधील जमीन हक्कामध्ये बदल घडून आले, आणि सिंचन व्यवस्था सुधारली. या सर्व गोष्टींमुळे भारतामध्ये आर्थिक विकास घडून आला. ह्या अभ्यासकांनी भारतामधून होणारा संपत्तीचा निस्सार

(drain of wealth) नाकारला. ह्या विचारवंतांच्या मते भारताच्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण करणारे घटक म्हणजे मोठी लोकसंख्या, भांडवलाचा तुटवडा, सामाजिक चालीरीती, सामाजिक संस्था, भारतीय लोकांची मूल्ये व सवयी, लोकांमधील महत्त्वाकांक्षेचा अभाव, विवाहांत केलेला प्रचंड खर्च, भारताच्या भौगोलिक स्थितीतील दोष व हवामानाची परिस्थिती हे होते.

अलीकडील काळात तीर्थंकर रॉय यांनी 'The Economic History of India' ह्या ग्रंथामध्ये हा दृष्टिकोन नवीन प्रकारे मांडला आहे. त्यांनी ही भूमिका घेतली आहे की १९व्या शतकात भारतामध्ये सकारात्मक आर्थिक विकास घडून आला. त्याचे प्रमुख कारण म्हणजे भारत हा एका वाढत्या जागतिक बाजारपेठेशी जोडला गेला. ब्रिटीशांनी एक प्रबळ राज्य स्थापन केले व आधुनिक दळणवळण साधनांना चालना दिली. त्यांच्या राजवटीत उद्योग व सेवांमधील (services) वास्तव उत्पन्न (real income) वाढलेले आढळते.

तीर्थंकर रॉय यांच्या मते १९व्या शतकातील भारताच्या आर्थिक विकासाच्या अल्प दराची कारणमीमांसा ही स्थानिक लक्षणे व वैशिष्ट्ये अभ्यासून केली पाहिजे. त्यांच्या मते भारताच्या आर्थिक विकासातील गतिहीनतेला ब्रिटिशांची राजवट जबाबदार न पकडता भारतामधील परिस्थितीचे विश्लेषण केले पाहिजे. उदा. १) भारतामधील पाण्याचा तुटवडा २) भारताची वाढती लोकसंख्या ३) जाति व्यवस्था – ज्यामुळे बाजारपेठेमध्ये अनेक उणीवा निर्माण झाल्या ४) भारतीय लोकांचा सोने व चांदी या द्रव्यांसाठीचा लोभीपणा ५) भारतीय लोकांची विवाहकार्यावर मोठा खर्च करण्याची वाईट सवय ६) शेतीचे हवामानावर परावलंबित्व ७) बँक व विमा क्षेत्राचा अत्यल्प विकास. रॉय यांच्या मते १९व्या शतकातील भारताचा मागासलेपणा हा वरील परिस्थितीमुळे होता.

तीर्थंकर रॉय यांच्या विचारांना भारतातील अनेक अभ्यासकांनी विरोध केला आहे. आदित्य मुखर्जी यांनी हे मत मांडले की वसाहती भारताच्या आर्थिक इतिहासाला वसाहतवादाने आकार दिला होता. त्यामुळे ब्रिटीश राजवटीच्या काळातील आर्थिक इतिहासाचा अभ्यास म्हणजे वसाहतवादाचाच अभ्यास करणे होय. थोडक्यात, ब्रिटीश राजवटीची सत्ता प्रचंड होती. ब्रिटिशांनी भारतीय अर्थव्यवस्थेला 'वसाहती' स्वरूप देण्यासाठी अनेक धोरणे अवलंबली. त्यामुळे १९व्या शतकातील भारताचा आर्थिक इतिहास अभ्यासायचा असेल तर लक्ष ब्रिटिशांच्या वसाहतवादावर केंद्रित केले पाहिजे. ब्रिटीश राजवट भारताच्या अविकासाला कशा प्रकारे जबाबदार होती हे अभ्यासणे १९व्या शतकातील आर्थिक इतिहासाचा प्रमुख प्रश्न आहे.

काही लोक अजूनही ब्रिटीश राजवटीमुळे भारताला फायदा झाला व त्यांनीच भारताला आधुनिक विकासाच्या मार्गाने नेले हा विचार बाळगतात. मात्र ह्या विचारावर खूप टीका झाली आहे. राष्ट्रवादी-मार्क्सवादी इतिहासकारांनी हे स्पष्ट केले आहे की ब्रिटीश राजवट भारताच्या मागासलेल्या अर्थव्यवस्थेसाठी जबाबदार होती. मार्क्सवादी इतिहासकारांनी हे दाखवले आहे की भारतामधून लुटलेल्या संपत्तीने युरोपमध्ये भांडवलशाहीच्या विस्ताराला चालना दिली. आदित्य मुखर्जींनी त्यांच्या लेखनात हे मत मांडले आहे की भारताला नुसतीच ब्रिटीश मालासाठी बंदिस्त बाजारपेठ म्हणून पाहणे चुकीचे होईल. ब्रिटिशांनी भारतामधील वरकड उत्पन्नाचे (surplus income) अनेक मार्गांनी शोषण केले. त्यांनी भारतामधून स्वस्त कामगार व कच्चा माल नेला हे देखील लक्षात ठेवले पाहिजे.

### १.२.३. मध्य १८ व्या शतकातील भारतीय अर्थव्यवस्था

ब्रिटीश राजवटीचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाला हे समजून घ्यायचे असेल तर १८व्या शतकात भारतीय अर्थव्यवस्थेची काय परिस्थिती होती हे माहित असले पाहिजे. १८व्या शतकात भारतामध्ये दोन महत्त्वाची स्थित्यंतरे घडली यामुळे सत्तेची रचना पालटली व मूलभूत सामाजिक आणि आर्थिक बदल घडून आले. ही दोन स्थित्यंतरे खालील प्रमाणे होती:

१) मोगल साम्राज्याच्या राजकीय-अर्थव्यवस्थेचा ऱ्हास झाला आणि प्रादेशिक राज्ये निर्माण झाली.

२) ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या वाढत्या प्रभावामुळे भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये मूलभूत परिवर्तन घडून आले.

१८व्या शतकात मोगल साम्राज्याला उतरती कळा लागली. नादीरशहा (१७३९) आणि अहमदशहा अब्दाली (१७४८-१७६७) यांच्या सारख्या अफगाणी राज्यकर्त्यांनी मोगल साम्राज्यावर हल्ले केले. भारतातील मराठे, जाट, रोहिला व शीख लोकांनी मोगलांच्या विरुद्ध उठाव केला. मोगल साम्राज्याची अर्थव्यवस्था कोलमडली. मोगल सम्राट कर्जबाजारी झाला. त्याची प्रशासनावरील पकड जवळजवळ नष्ट झाली. भारताच्या राजकीय परिस्थितीतील हा बदल अत्यंत जलद गतीने झाला. १७०० साली मोगल सम्राट औरंगजेबाने आपल्या सत्तेचा उच्चांक गाठला होता. मात्र १७३० साला पर्यंत मोगल साम्राज्यामध्ये प्रादेशिक राज्यकर्त्यांच्या प्रभाव निर्माण झाला होता. अवध व बंगाल ही राज्ये जवळजवळ स्वतंत्र असलेल्या राज्यकर्त्यांकडे गेली होती. मराठे व जाट सरदारांनी आपली स्वतंत्र राज्ये स्थापन केली होती. १७६० साला पर्यंत ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीने जवळपास सर्व पूर्व भारत आपल्या अधिपत्याखाली आणला होता व भारतीय वस्तूंच्या बाजारपेठेवर मक्तेदारी निर्माण करायला सुरुवात केली होती.

१८व्या शतकातील ह्या स्थित्यंतरांचा सखोल अभ्यास इतिहासकारांनी केला आहे. ह्या स्थित्यंतरांनी भारतीय अर्थव्यवस्थेवर केलेल्या परिणामाच्या संदर्भात अनेक नामवंत आर्थिक इतिहासकारांमध्ये एक सजीव वाद देखील निर्माण झाला. भारताच्या इतिहासलेखन शास्त्रात या वादाला '१८ व्या शतका संबंधीचा वाद' (Eighteenth Century Debate) असे म्हणतात.

१८व्या शतकाबद्दल इतिहासकारांनी दोन वेगवेगळे अन्वयार्थ मांडले आहेत. काही इतिहासकार हे मत मांडतात की मोगल साम्राज्याच्या ऱ्हासामुळे भारतामध्ये गोंधळ व अराजकता (chaos and anarchy) माजली. अर्थव्यवस्था पूर्णपणे मोडली. ह्या पारंपारिक मांडणीला अलीकडील काळात इतिहासकारांनी आव्हान दिले आहे. इतिहासाचे पुनर्लेखन करणारे इतिहासकार हे मांडतात की, जरी मोगल साम्राज्याचे पतन झाले असले तरी भारतात 'गोंधळ व अराजकता' माजली नाही. प्रादेशिक राज्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली काही प्रदेशांमध्ये सामाजिक व आर्थिक भरभराट घडून आली. अनेक राजकीय प्रश्न असूनही भारतीय अर्थव्यवस्थेचा विस्तार सुरूच राहिला.

१८ व्या शतकात मोगल साम्राज्याचा ऱ्हास झाल्यामुळे राजकीय अस्थिरता निर्माण झाली. लष्करी संघर्ष सुरू झाले. या परिस्थितीचा परिणाम काही क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेवर नक्कीच झाला. उदा. मोगल केंद्रीय सत्ता क्षीण झाल्यावर व अफगाणी सरदारांची अनेक आक्रमणे झाल्यामुळे दिल्ली शहराचा ऱ्हास साहजिकच झाला. दिल्लीमधील

कारागीर वर्ग इतर शहरांकडे स्थलांतरित झाल्याचे पुरावे मिळतात. शीख लोकांनी उठाव केल्यामुळे लाहोर शहराकडे जाणाऱ्या व्यापारी मार्गावर अडथळे निर्माण झाले. याचा फटका आग्रा शहराला बसला. १७१२ नंतर आग्रा शहराला उतरती कळा लागली. १८व्या शतकाच्या मध्यापर्यंत उत्तर भारतातील अनेक शहरांची अर्थव्यवस्था खुंटली होती. बंगाल, बिहार व ओरिसा मध्ये मराठ्यांच्या आक्रमणाचे परिणाम झाले. ह्या परिसरात अन्नधान्याचा तुटवडा निर्माण झाला आणि अंतर्गत व परदेशी व्यापार खुंटला. पश्चिम बंगाल मधील सुती व रेशमी कापडाच्या विणकरांनी पूर्व बंगालकडे स्थलांतर केले. १८व्या शतकात पश्चिम भारतातील 'मोगल साम्राज्याचे बंदर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सुरत शहराचा जलद ऱ्हास होण्यास सुरुवात झाली. याचे प्रमुख कारण सुरतच्या व्यापाऱ्यांनी 'पर्शियन बाजारपेठ' गमावली हे होते. गुजरात मधील मराठ्यांच्या आक्रमणामुळे तेथील रेशीम कापड उद्योगाला तडाखा बसला. दक्षिण भारतातही काही क्षेत्रामध्ये उद्योग व व्यापार खुंटल्याचे चित्र आढळते. दक्षिणेतील 'आरकोट' राज्याच्या नवाबाने जमीन महसूल 'मक्ता' पद्धतीने गोळा करण्यासाठी द्यायला सुरुवात केली होती. महसूल गोळा करणारे एजंट शेतकऱ्यांच्या कडून डोईजड महसूल गोळा करू लागले होते.

राजकीय अस्थिरतेचा परिणाम काही प्रदेशांच्या अर्थव्यवस्थेवर झाला असला तरी भारताच्या बहुतेक प्रदेशांची आर्थिक परिस्थिती चांगली होती. १७१२ सालानंतर उतरती कळा लागलेले आग्रा शहर १७८७ सालापर्यंत पूर्वस्थितीला आले होते. दिल्ली शहरातील श्रीमंत लोकांनी आग्रा शहराकडे स्थलांतर केले होते. जाट आणि मराठा सरदारांनी आग्रा शहराच्या अर्थव्यवस्थेला चालना दिली. आर्थिक इतिहासकारांना असे आढळून आले आहे की उत्तर भारतातील पश्चिमेस असलेल्या शहरांचा ऱ्हास झाला असला तरी पूर्वेच्या दिशेला असलेल्या शहरांना भरभराट आली होती. मराठा आक्रमणांनी व अलीवर्दी खानाच्या जाचक राजवटीमुळे बंगालच्या अर्थव्यवस्थेवर थोडाच परिणाम झाला होता. बंगालच्या अर्थव्यवस्थेचा लक्षणीय ऱ्हास १८५७ नंतर ब्रिटीश राजवटीमध्ये झाला. १७५० साली कासीमबाजार येथील रेशीम कापड उद्योगाला भरभराट आलेली आढळते. बंगालमधील सुती कापड व साखर उद्योग देखील मोठ्या प्रमाणात विस्तारीत झाला होता. बंगालमध्ये १८व्या शतकाच्या मध्यापर्यंत जवळजवळ १० लाख विणकर अस्तित्वात होते असा अंदाज इतिहासकारांनी केला आहे. थोडक्यात जरी राजकीय अस्थिरता व लढायांनी काही क्षेत्राच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम झाला असला तरी सर्व भारताची अर्थव्यवस्था मोडकळीस आली होती असे समजणे चुकीचे होईल.

राजकीय अस्थिरता व लढायांनी सर्व प्रदेशातील व्यापारावर परिणाम केला असे नाही. पटना व बनारस शहरांच्या पश्चिम भारताबरोबरच्या व्यापारावर राजकीय परिस्थितीचा फार परिणाम झाल्याचे आढळत नाही. सुरत शहराच्या व्यापाराचे १८व्या शतकाच्या उत्तरार्धात पुनरूज्जीवन झाल्याचे आढळते.

मोगल साम्राज्याच्या ऱ्हासानंतर अस्तित्वात आलेली नवीन प्रादेशिक राज्ये ही व्यापाराची केंद्रे बनली होती. अवध राज्याचे फैजाबाद शहर हे समृद्ध परिस्थितीत होते. दख्खन मधील असफ झा निजामाच्या राज्याची आर्थिक परिस्थिती बळकट होती.

आर्थिक इतिहासकारांच्या मते १८व्या शतकात एखाद्या प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होऊन नुकसान झाले असले तरी यामुळे इतर प्रदेशांच्या अर्थव्यवस्थेला त्याचा फायदा होत होता. उदा. सुरत शहराचा व्यापार खुंटल्याचा फायदा बंगालला झाला.

ब्रिटीश राजवट स्थापन होण्याच्या पूर्वसंध्येला भारतीय अर्थव्यवस्थेचा एकसमान ऱ्हास झाला होता असे आपल्याला म्हणता येणार नाही. भारतातील अनेक प्रदेशात अर्थव्यवस्था प्रबळ परिस्थितीत असल्याचे आढळते. भारतातील बहुतेक लोकांची आर्थिक परिस्थिती पूर्वीच्या काळापेक्षा फार वेगळी होती असे आपल्याला म्हणता येणार नाही. भारतीय उपखंडात कोणत्याही प्रकारचा एकसमान आर्थिक ऱ्हास (uniform economic decline) झाल्याचे चिन्ह दिसत नाही. पुरावा पाहिला तर बहुतांश सर्वसाधारण लोकांची आधीच्या काळात असलेल्या परिस्थितीपेक्षा १८व्या शतकात फार वेगळी परिस्थिती नव्हती.

**ब्रिटीश पूर्व काळातील पारंपारिक ग्रामीण अर्थव्यवस्था**

'जजमानी पद्धती' ही भारतातील पारंपारिक ग्रामीण अर्थव्यवस्थेचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. ह्या पद्धतीला महाराष्ट्रामध्ये बलुतेदारी अलुतेदारी पद्धत म्हणून ओळखले जात होते. ग्रामीण भागातील प्रभावशाली शेतकरी जाती आणि कारागीर जातींच्या मध्ये एकमेकांना परस्परपूरक संबंध जजमानी पद्धतीच्या माध्यमातून निर्माण होत असत. जात ही आर्थिक संघटन ठरवणारा महत्त्वाचा घटक होती. उत्पादनात जातीचे महत्त्व असल्यामुळे उच्च कोटीचे विशेषीकरण निर्माण झाले होते. उदा. उत्तर भारतातील दिगंबर जातीचे लोक तूप आणि उसाचा रस ठेवण्यासाठी चामड्याच्या पिशव्या तयार करत असत. चांभार जातीचे कारागीर चामड्यापासून पादत्राणे व दोऱ्या तयार करत असत.

कापड उत्पादन सोडल्यास शेतकऱ्याला लागणाऱ्या सर्व वस्तू जजमानी पद्धतीच्या माध्यमातून गावातील कारागीर वर्ग त्याला पुरवत असे. वस्तूंच्या मोबदल्यात कारागिरांना शेती उत्पादनातील परंपरेने ठरवलेला हिस्सा मिळत असे. गावातील कारागीर बाजारपेठेसाठी सुद्धा उत्पादन करू लागले होते. बंगाल मधील कुंभार छोट्या व्यापाऱ्यांच्या साठी वस्तू तयार करू लागले होते. महाराष्ट्र आणि तामिळनाडूतील कुंभार वीट व घर बांधकाम उद्योग करून जास्त पैसे मिळवू लागले होते. थोडक्यात पारंपारिक जजमानी पद्धतीने आपले अस्तित्व टिकवून ठेवले असले तरी तिच्यावर बाजारपेठेचा प्रभाव पडू लागला होता.

शेती हे बहुतेक लोकांच्या उपजीविकेचे साधन होते. भारतामध्ये दोन प्रकारचे शेतकरी स्पष्टपणे आढळतात. १) जमिनीवर मालकी हक्क व वारसा हक्क असलेला शेतकरी वर्ग, ज्यांना जमीनदार, रयत, मुकादम, मालक असे म्हटले जात असे २) असा शेतकऱ्यांचा वर्ग ज्याला जमिनीवर कोणत्याही प्रकारचा मालकी अथवा वारसा हक्क नव्हता. अशा शेतकऱ्यांना फारसी कागदपत्रांमध्ये माजारा, असामी किंवा राया असे म्हंटले आहे. हे शेतकरी जमिनीच्या मालकांना खंड भरत असत. त्यांचे वहिवाटीचे हक्क पक्के नव्हते.

ब्रिटीश-पूर्व काळात उत्तर भारताच्या कृषी अर्थव्यवस्थेत जहागिरदार व जमीनदार यांची महत्त्वाची भूमिका होती. १८व्या शतकाच्या मध्यापर्यंत जमीनदार 'महसूल गोळा करण्याच्या यंत्रणेमध्ये महत्त्वाचे झाले होते. जामीनदाराची व्याख्या a person possessing heridatily on the condition of obedience to the ordinances of the government a tract of land subject to the payment of land revenue अशी केली जात होती. थोडक्यात जमीनदाराच्या ताब्यात जमिनीचा एक पट्टा होता जो त्याच्या घराण्यात वंशपरंपरेने वारसा हक्काने मिळत असे. जमीन महसूल भरणे व सरकारच्या आदेशांचे पालन करणे ह्या अटींवर त्याला जमिनीच्या पट्ट्यावर ताबा मिळत असे. मोगल साम्राज्यात जमीनदारी पद्धत सर्वत्र पसरली होती. मात्र

वेगवेगळ्या प्रदेशात ह्या पद्धतीमध्ये छोटे-मोठे फरक आढळतात.

सामान्य शेतकऱ्यांवर जमीन महसुलाचा बोजा खूप होता. पूर्वी मोगल साम्राज्यात समाविष्ट असलेल्या प्रदेशात उत्पादनाच्या १/३ ते १/२ भाग महसूल म्हणून गोळा केला जात असे. पण कमी सुपीकता असलेल्या जमिनींवर उत्पादनाच्या १/९ भाग इतका कमी जमीन महसूल आकारलेला आढळतो. मैसूर इलाख्यात हैदर अलीची राजवट स्थापन होण्याच्या आधीच्या काळात बागायती जमिनीच्या उत्पन्नातून २/३ भाग जमीन महसूल आकारल्याचे पुरावे मिळतात.

खेडेगावात शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्यामध्ये 'सावकार' अथवा 'महाजन' हे महत्त्वाची भूमिका पार पाडत असत. पण सावकारांवर अनेक पारंपारिक निर्बंध असल्यामुळे ते शेतकऱ्यांचे शोषण करू शकत नव्हते. उदा. पश्चिम भारतातील दामदुप्पट परंपरा कर्जावरील सर्व व्याज मूळ कर्जाच्या रक्कमेपर्यंत सीमित करत असे. म्हणजे सावकार किंवा वाणी कर्जाच्या मूळ रक्कमे इतकेच व्याज गोळा करू शकत असे. नंतर मूळ कर्जावरील व्याज वाढायचे थांबत असे. वाणी हा गावातच रहात असे. शेतकऱ्याचे शोषण केल्यास शेतकरीवर्ग त्याच्यावर बहिष्कार घालत असे. त्याला राज्य-संस्था मदत करत नसे. गावची पंचायत शेतकरी वर्गाच्या ताब्यात असल्यामुळे ती नेहमीच शेतकऱ्याच्या बाजूने निर्णय देत असे. सावकाराला दिलेल्या कर्जाची मूळ रक्कम परत मिळवण्यासाठी शेतकऱ्याच्या घरासमोर 'सत्याग्रह' करावा लागल्याची आपल्याला समकालीन कागदपत्रात अनेक उदाहरणे सापडतात.

मध्य १८व्या शतकापर्यंत भारतीय कृषीव्यवस्थेवर बाजारपेठेचा प्रभाव वाढला होता. अनेक प्रदेशांमध्ये शेतकऱ्यांनी बाजारपेठेसाठी उत्पादन सुरू केले होते. व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांना लागवडीसाठी आगाऊ रक्कम देण्याची पद्धत अस्तित्वात आलेली होती. नगदी पिकांची लागवड मोठ्या प्रमाणात वाढली होती. नीळ, तुती, अफू व ऊस ही पिके मोठ्या प्रमाणात घेतली जाऊ लागली होती. मोगल राजांनी फळांच्या लागवडीला प्रोत्साहन दिले होते. पोर्तुगीज लोकांनी आणलेली तंबाखू व मका या सारखी नवीन पिके सर्वत्र माहिती झाली होती.

मात्र भारतामध्ये वापरले जाणारे शेती तंत्रज्ञान युरोप, जपान व चीनच्या तुलनेत मागासलेले होते. मोगल काळात उद्यान विज्ञानातील (horticulture) बदल सोडले तर अनेक वर्षे भारताच्या शेती तंत्रज्ञानात कोणताही बदल घडून आला नव्हता. सर्व भारतामध्ये शेतकऱ्यांनी वापरलेली अवजारे ही निकृष्ट दर्जाची होती. बहुतेक सामान्य शेतकरी लाकडी नांगराचा उपयोग करीत असत. भारतामधील लोखंडी नांगरांचे प्रमाण अतिशय अल्प होते. भारतातील बहुतेक शेतकरी वर्ग गरीब असल्यामुळे त्यांनी वापरलेली अवजारे देखील मागासलेली होती. मात्र, असे असले तरी भारताचे दर एकरी शेतकी उत्पादन हे ब्रिटन आणि अमेरिकेमधील उत्पादनाच्या समान होते. म्हणजे भारतातील शेतकरी मागासलेली अवजारे वापरूनही शेती तंत्रज्ञानात पुढारलेल्या देशातील शेतकऱ्यांच्या इतके उत्पादन करत असे. याचे कारण हे होते की ब्रिटीश पूर्व काळात भारताची लोकसंख्या कमी होती. यामुळे शेतकरी वर्गाला फक्त सुपीक जमिनींवर, विशेषतः नदी काठी असलेल्या जमिनींवर लागवड करणे शक्य होते. सुपीक जमिनीवर मागासलेली अवजारे वापरून भारतीय शेतकरी चांगले उत्पादन मिळवू शकत होता.

ग्रामीण भागातील लोक त्यांच्या बहुतेक गरजा पूर्ण करण्यासाठी स्थानिक उत्पादनावर अवलंबून होते. लोकांना लागणाऱ्या वस्तू त्यांना जजमानी पद्धतीच्या माध्यमातून गावातील कारागीर वर्ग तयार करून देत असे.

वस्तू विनिमय फार मोठ्या प्रमाणात होत नसे. पण शेतकरी वर्ग देखील वस्तू उत्पादन प्रक्रियेत सहभागी होत असत, याचे पुरावे आपल्याला सापडतात. काही शेतकरी सूत कताई करत असत. मैसुर, महाराष्ट्र, पंजाब आणि उत्तर बंगाल येथील शेतकरी स्वतःच्या वापरासाठी जाडेभरडे कापड तयार करत असत. बंगाल आणि उत्तर भारतातील शेतकरी रेशीम, नीळ, साखर आणि तेल देखील तयार करत असत. मीठ, सोरामठ (salt-petre) (Bihar) व लोखंड उत्पादनात शेतकरी जाती गुंतल्याचे आढळते. बिहारमध्ये शेतकरी वर्षाचे पाच महिने लोखंड तयार करण्यामध्ये गुंतलेला असे.

ब्रिटीश पूर्व काळात बहुतेक वस्तू उत्पादन ग्रामीण भागातच होत असे. असे असले तरी शहरी व ग्रामीण भागांमध्ये वस्तू उत्पादनाची स्थानिक केंद्रे (localised centers of manufactures) अस्तित्वात आली होती. काही शहरे आणि खेडेगावांमध्ये एकादी वस्तू तयार करणारे कारागीर एकत्रित राहू लागले होते. बंगालमधील गावांमध्ये कापड विणकरांच्या मोठमोठ्या वस्त्या अस्तित्वात आल्या होत्या. ह्या वस्त्यांना 'औरंग' असे म्हटले जात असे. मध्य १८व्या शतकात व्यापारी मोठ्या प्रमाणात सुती आणि तलम कापड गावातील ह्या 'औरंग' मधूनच विकत घेत असत.

शेती प्रमाणेच मागासलेले तंत्रज्ञान आणि अवजारे हे भारतातील उद्योगव्यवस्थेचे वैशिष्ट्य होते. मध्य १८व्या शतकापर्यंत युरोप आणि चीन हे धातुशास्त्र, छापखाना यंत्रणेत व अवजार आणि उपकरणांच्या तंत्रज्ञानात भारतापेक्षा जास्त प्रगत होते. मात्र मागासलेली अवजारे आणि उपकरणे असली तरी भारतीय कारागीर आपल्या प्रतिभेचा, कौशल्य आणि क्षमतेचा उपयोग करून उत्तम गुणवत्तेच्या वस्तूंचे उत्पादन करत होता. थोडक्यात भारतीय वस्तूंची गुणवत्ता ही विज्ञान – तंत्रज्ञानाच्या विकासामुळे नव्हती तर कारागीरांच्या कला कौशल्यामुळे निर्माण झालेली होती. भारतामधील कापड विणकर आपल्या अविकसित हातमागावर कौशल्याच्या जोरावर युरोप मधील कापडापेक्षा उत्तम नक्षीकामयुक्त कापड करू शकत असे.

तांत्रिकदृष्ट्या भारतीय उद्योग मागासलेला होता. भारतातील लोक बीड (cast iron), काच (glass) तयार करू शकले नाहीत. भारतामध्ये खनिज कोळशाचा मोठा साठा होता. मात्र लोकांनी त्याचा वापर उद्योगात केला नाही. ह्या काळातील भारतीय तंत्रज्ञानाच्या दोन प्रमुख उपलब्धी होत्या – १) सुरत येथील जहाज बांधणी उद्योगाने युरोपीय जहाजांशी तुलना होऊ शकेल अशी जहाजे निर्माण केली होती २) भारतीय कारागीरांनी लोखंडी तोफा तयार केल्या. मात्र ह्या तोफा युरोपियन तोफांच्या तुलनेत कमी प्रतीच्या होत्या.

मध्य १८व्या शतकापर्यंत व्यापाऱ्यांचे वस्तू उत्पादन करणाऱ्या कारागीर वर्गावरचे नियंत्रण वाढले होते. याची प्रचिती आपल्याला भारतातील काही ठिकाणी अस्तित्वात असलेल्या 'ददन' किंवा दाद्नी ' पद्धतीतून येते. ह्या पद्धतीमध्ये व्यापारी कारागीरांना आगाऊ (advance) रक्कम किंवा त्यांना लागणारा कच्चा माल देत असे. कारागीराने वस्तू तयार केल्यावर त्या ज्या व्यापाऱ्याकडून आगाऊ रक्कम मिळाली आहे त्यालाच विकणे बंधनकारक असे. दद्नी पद्धतीमुळे व्यापाऱ्यांचे कारागीरांवरील नियंत्रण वाढले. ही पद्धत बंगाल मध्ये सुरू झाली आणि लवकरच देशाच्या इतर भागांमध्ये पसरली. १६७० च्या दशकात काशी विरांना नावाच्या एका व्यापाऱ्याने भारताच्या पूर्वी समुद्र किनाऱ्यावरील हजारो गावातील विणकरांना दद्नी पद्धतीच्या माध्यमातून आगाऊ रक्कम दिली होती. ह्या सर्व गावांना 'विरांनाची गावे' असे ओळखले जात होते. दद्नी पद्धतीचा उपयोग करून देशी व परदेशी

व्यापारी बायना इलाख्यातील नील, बंगाल व कॉरोमोनडल इलाख्यातील कापड, काश्मीरमधील शाल इत्यादी वस्तू व्यापार करण्यासाठी विकत घेत असत.

वस्तू उत्पादनाच्या संघटनावर बाजारपेठेचा देखील प्रभाव पडला. कापडापासून जहाज बांधणी उद्योगातील कारागीरांना दररोजचा पगार मिळायला सुरुवात झाली. काही वेळेला ते व्यापाऱ्यांच्या थेट देखरेखीखाली काम करत असत. १६७० च्या दशकात मद्रास येथील इस्ट इंडिया कंपनीला कापड पुरवणाऱ्या विणकरांच्या दररोजच्या पगाराचा (daily wages) उल्लेख आढळतो. मध्य १८व्या शतकापर्यंत आर्मेनियन व्यापाऱ्यांनी रेशीम धागा गुंडाळणारे कारागीर पगारावर ठेवले होते. जहाज बांधणी उद्योगातील पारसी मास्तरच्या (Parsee Master Builder) हाताखाली दररोज पगार दिले जाणारे कारागीर काम करत असत.

सर्वच कारागीर दद्नी पद्धतीवर अथवा व्यापाऱ्यांच्या पगारावर अवलंबून होते असे नाही. मध्य १८व्या शतकात बंगालमध्ये असे श्रीमंत विणकर अस्तित्वात होते ज्यांनी आपल्या उद्योगामध्ये स्वतःचे भांडवल गुंतवले होते. अशा प्रकारचे विणकर तयार केलेले कापड स्वतःच बाजारपेठेमध्ये विकत असत. लखनौ शहरातील अशा विणकरांनी उद्योगामध्ये ५०० कारागीरांना नोकरीला ठेवल्याचे उल्लेख सापडतात. काश्मीर मधील काही 'उस्ताद' शाल तयार करण्याचा कारखाना चालवत होते. ह्या कारखान्यात शाल विणण्यासाठी जवळजवळ ३०० हातमाग होते. थोडक्यात ब्रिटीश पूर्व काळात भारतातील उद्योग क्षेत्रात 'भांडवलदारी' वृत्ती अस्तित्वात नव्हती असे आपल्याला म्हणता येणार नाही.

ब्रिटीश-पूर्व काळातील उद्योगव्यवसायात थोडीफार भांडवलदारी वृत्ती असली तरी त्यांनी उद्योगव्यवस्थेचे अधिष्ठान असलेल्या 'जातिव्यवस्थेवर' कोणताही परिणाम केला नव्हता. उदा. १) विणकरांची प्रत्येक उपजाती वेगळ्या प्रकारचे कापड तयार करत असल्यामूळे कापड उद्योगात विशेषीकरण निर्माण झाले होते. २) कारागीरांच्या 'श्रेण्या' जातीवर आधारलेल्या होत्या. श्रेणीचा प्रमुख उत्पादनाच्या पारंपारिक पद्धती व गुणवत्ता टिकवून ठेवत असे. ३) कधी कधी व्यापाऱ्यांच्या अखंड श्रेणीचे कारागीरांच्या श्रेणी वर नियंत्रण असे. अशा प्रकारचे उद्धरण आपल्याला गुजरातमधील अगेट खनिजाच्या उद्योगात सापडते.

ब्रिटीशपूर्व काळात सागरी व्यापारामध्ये तेजी आली होती. युरोपियन व्यापारी कंपन्यांनी आशियाई व पूर्व आफ्रिकेतील देशांबरोबरचा भारताचा व्यापार जास्त समृद्ध केला होता. १६व्या शतकात पोर्तुगीज लोकांनी सागरी व्यापारावर मक्तेदारी निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता. ह्यामुळे भारतीय व्यापारी आशियाई देशांबरोबरच्या व्यापारातून दूर झाले होते. मात्र मध्य १८व्या शतकापर्यंत भारतीय व्यापाऱ्यांचा सहभाग पुन्हा वाढल्याचे आढळते.

भारतातील तीन प्रदेश मोठ्या प्रमाणात वस्तूंची निर्यात करत होते:

१) गुजरात - आशियाई आणि आफ्रिकेतील देशांना जाड्याभरड्या कापडाची निर्यात

२) कोरोमंडल किनारा - तलम कापडाची निर्यात

३) बंगाल - तलम कापडाची निर्यात

१८व्या शतकात ह्या तिन्ही प्रदेशात मोठमोठे व्यापारी आणि सावकार अस्तित्वात होते. सुरत मधील अब्दुल गफूर खान, बंगाल मधील जगत शेठ घराणे व आर्मेनियन व्यापारी खोजा सहाद आणि खोजा वाजीद , आणि कोरोमंडल किनाऱ्यावरील सुकर रामा शेट्टी हे जगप्रसिद्ध व्यापारी होते.

भारताच्या सागरी व्यापारामध्ये युरोपीय कंपन्यांची भूमिका महत्त्वाची असली तरी सागरी व्यापारावर इतर घटकांनी परिणाम केला. मध्य १८व्या शतकातील सागरी व्यापारावर परिणाम करणारे घटक खालील प्रमाणे होते:

१) भारताच्या सागरी व्यापारातील गुजरात प्रदेशाचे महत्त्व कमी झाले आणि बंगाल प्रदेशाचे महत्त्व वाढले.

२) इराणमधील सफाविद साम्राज्याचा ऱ्हास झाल्यामुळे गुजराती व्यापाऱ्यांनी एक महत्त्वाची बाजारपेठ गमावली. गुजरातमधील मुसलमान व्यापारी हे भारताच्या परदेशी व्यापारातील महत्त्वाचे घटक होते. त्यांना ह्या घटनेमुळे मोठा तडाखा बसला. गुजराती व्यापाऱ्यांचा ऱ्हास झाल्यामुळे भारतीय सागरी व्यापारात युरोपीय व्यापाऱ्यांचे महत्त्व वाढले.

भारतातील व्यापाऱ्यांच्यामध्ये विशेषीकरण घडून आल्याचे आढळते. ठरावीक प्रदेशाच्या व्यापारावर एखाद्या विशिष्ट समूह अथवा जातीतील व्यापाऱ्यांचे प्रभुत्व प्रस्थापित झालेले दिसते. प्रदेश आणि त्यांच्या व्यापारात प्रभुत्व असलेल्या जाती /समूह खालील प्रमाणे होत्या:

१) दक्षिण कोरोमंडल किनारा - शेट्टी व्यापारी

२) उत्तर कोरोमंडल किनारा - कोमती आणि मुसलमान व्यापारी

३) सूरत - वेगवेगळ्या ठिकाणांहून आलेले मुसलमान व्यापारी आणि बनिया व्यापारी

४) उत्तर बंगाल आणि बिहार - पठाण व्यापारी

५) दक्षिण बंगाल - बंगाली हिंदू व्यापारी

६) मलबार किनारा - कोकणी आणि अरब व्यापारी

७) पश्चिम भारत - सिंधी व्यापारी

८) आर्मेनियन व्यापारी सर्वत्र पसरलेले होते पण ते जास्त संख्येत बंगाल आणि कोरोमंडल किनाऱ्यावर होते.

९) मारवाड प्रदेशातील सावकार सर्व भारतभर पसरण्याची प्रक्रिया सुरू झाली होती.

**अठराव्या शतकासंबंधीचा वाद** (18th Century Debate) :

इतिहास हे गतकाळाचे आकलन करून देणारे सामाजिक शास्त्र आहे. व्यक्ती, समाज व राष्ट्राला आत्मभान, आत्मविश्वास देण्यासाठी, सदसदविवेकबुद्धी विकसित करण्यासाठी इतिहासाचा अभ्यास महत्वाचा असतो. त्यामुळेच भारताचा विशेषतः वसाहतपूर्व भारताच्या इतिहासाचे आकलन करून घेताना इतिहासातील १८व्या शतकाबाबतचा विवाद समजून घेणे आवश्यक ठरतो. १८ वे शतक जगभर विशेषत: युरोपामध्ये हे सर्वांगीण परिवर्तनाचे शतक होते. भारतात याकाळात मोगल व इतर प्रादेशिक एतद्देशीय सत्तांचा ऱ्हास झाला व ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीची सुरुवात झाली. हा राजकीय स्वरूपाचा बदल व त्यानुषंगाने झालेल्या आर्थिक,

सामाजिक व सांस्कृतिक बदलाबाबत इतिहासकारांनी परस्परविरोधी स्वरूपाची मांडणी केली आहे. साम्राज्यवादी वा वसाहतवादी व केम्ब्रिज विचारधारेच्या इतिहासकारांनी १८व्या शतकाला स्थितप्रज्ञतेचा काळ (Age of Stagnation) वा काळा कालखंड (Dark Age) म्हटले आहे. तर अलीकडे काही इतिहासकारांनी हा दावा सप्रमाण खोडून काढला आहे. यातूनच १८व्या शतकाबाबतच्या विवादाचा उगम झाला. त्यामुळे १८ व्या शतकाचे नेमके स्वरूप समजून घेण्यासाठी १८व्या शतकाबाबतचा विवाद समजून घेणे आवश्यक आहे.

**अ. राजकीय अराजकता, आर्थिक व सांस्कृतिक स्थितीशिलतेचे शतक :**

१८व्या शतकाबाबतच्या इतिहासाचे लेखन प्रथम वसाहतवादी इतिहासकारांनी केले. हे शतक राजकीय अराजकतेचे व स्थितीशिलतेचे होते अशी मांडणी या इतिहासकारांनी केली. अशी मांडणी प्रथम जेम्स मिल याने आपल्या History of India (१८१७) या ग्रंथात केली. या दाव्याला पूरक असे इतिहास लेखन उपयुक्ततावादी विचारधारा व केम्ब्रिज स्कूलच्या इतिहासकारांनी केले. भारतातील राष्ट्रवादी इतिहासकारांनी वसाहतवादी/साम्राज्यवादी इतिहासकारांनी लिहिलेला इतिहास कसा एकांगी व चुकीचा आहे हे सांगण्यासाठी इतिहासलेखन केले. त्यांची भूमिका वसाहवादी इतिहास लेखनाच्या विरोधातील होती. असे असले तरी राष्ट्रवादी विचारधारेच्या इतिहासकारांनी १८ व्या शतकाबाबत वसाहतवादी इतिहासकारांची मांडणी खोडून काढली नाही. त्यांनीही १८ व्या शतकाला राजकीय अस्थिरतेचा व अराजकतेचा काळ असे म्हटले. साम्राज्यवादी इतिहासकारांनी १८ व्या शतकाबाबत काय व का विवेचन केले आहे हे प्रथम समजून घेणं संयुक्तिक ठरेल.

**१. राजकीय अराजकतेचा काळ :**

१८व्या शतकात भारताच्या राजकीय क्षेत्रात दोन महत्वाच्या घटना घडल्या. पहिली घटना होती, १७०७ साली बादशहा औरंगजेबाचा मृत्यू होऊन मोगल साम्राज्याचा ऱ्हास सुरु झाला व दुसरी घटना म्हणजे, १८५७च्या प्लासीच्या लढाईने भारतात ब्रिटीश सत्तेची मुहूर्तमेढ रोवली गेली. औरंगजेब बादशाचा मृत्यूनंतर त्याच्या वारसांना मोगल साम्राज्य सांभाळता आले नाही. त्यांचा आपसात सत्तासंघर्ष सुरु झाला. त्यातच बादशहाच्या सरदारांनी स्वतंत्ररित्या राज्यकारभार पाहायला सुरुवात केली. मोगलांच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन देशाच्या विविध भागात प्रादेशिक राज्यांचा उदय झाला. या प्रादेशिक सत्तांचा उदयाने मोगल साम्राज्याचे वेगाने ऱ्हास घडून आला.

याबाबत वसाहतवादी किंवा साम्राज्यवादी इतिहासकारांनी असे लिहले केले की, संपूर्ण भारतवर वर्चस्व असलेल्या मोगल सत्तेचा ऱ्हास झाला. त्यामुळे भारतात राजकीय अस्थिरता व त्यातून अराजकता निर्माण झाली. तसेच मोगल सत्तेच्या ऱ्हासानंतर उदयास आलेल्या प्रादेशिक सत्ता आपापसात सतत संघर्ष करत असल्याने राजकीय अस्थिरतेत भर पडली. मात्र ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीच्या सत्ता स्थापनेमुळे ही अराजकता संपुष्टात आली व राजकीय स्थैर्य निर्माण झाले. अशीच भूमिका केम्ब्रिज स्कूलच्या इतिहासकारांनीही घेतली आहे.

राष्ट्रवादी इतिहासकारांनी ब्रिटीश वसाहतवादी इतिहासकारांच्या १८व्या शतकाबाबतच्या या भूमिकेला विरोध केला नाही. त्यांनीही राजकीय अराजकता असल्याचे मान्य केले. तसेच ही राजकीय अराजकता ज्या मोगल सत्तेच्या ऱ्हासामुळे आली होती तिची सखोल कारणमीमांसा केली. सर जदुनाथ सरकार यांनी मोगल सत्तेच्या ऱ्हासाला औरंगजेबाच्या कडव्या धार्मिक धोरणांना जबाबदार धरले. औरंगजेबाच्या कट्टर धार्मिक

धोरणामुळे हिंदू व शिख धर्मिय दुखावले गेले व त्यांनी उठाव केले. ज्यामुळे मोगल साम्राजाचा ऱ्हास झाला असे प्रतिपादन केले आहे.

मात्र मार्क्सवादी व आर्थिक इतिहासकारांनी मोगल साम्राज्याच्या ऱ्हासाची भौतिकवादी दृष्टीकोनातून कारणमीमांसा केली आहे. मार्क्सवादी इतिहासकार इरफान हबीब यांनी मोगल सत्ता ही तिच्या विरोधात झालेल्या विविध बंडांमुळे ऱ्हास पावली असे म्हटले आहे. मात्र ही बंडे राष्ट्रवादी इतिहासकार म्हणतात तशी औरंगजेबाच्या कट्टर धार्मिक धोरणामुळे झाली नाहीत तर मोगल राज्यकर्त्यांनी जमीन महसूलाचा दर वाढवल्याने झालीत. डोईजड महासुलामुळे शेतकरी वर्गात असंतोष निर्माण झाला, त्याची परिणीती जाट, सतनामी, शिखांनी बंड केले. त्यातून मोगली सत्तेचा ऱ्हास झाला.

आर्थिक इतिहासकार अथर अली यांनी औरंगजेबाच्या धार्मिक धोरणाऐवजी जहागीरदारी संकटास मोगल सत्तेच्या ऱ्हासाला कारणीभूत धरले आहे. औरंगजेबाच्या काळात मोगल सत्तेचा दक्षिण भारतात विस्तार झाला. दक्षिण भारतातील सरदारांना सत्तेत सामावून घेण्यासाठी जहागीरदाऱ्या वाटाव्या लागल्या. दक्षिण भारताचा औरंजेबाने जिंकलेला भाग तितकासा सुपीक नसल्याने उत्तर भारतातील जहागिरी वाटाव्या लागल्या. त्यामुळे जहागिरी देण्यासाठी जमिनी कमी पडल्या. त्यामुळे प्रशासकिय अडचणी व त्यातून आर्थिक संकट निर्माण झाले. त्याची परिणीती मोगल सत्तेच्या ऱ्हासात झाली.

एकूणच १८ व्या शतकाच्या सुरुवातीलाच मोगल सत्तेचा ऱ्हास झाला. त्यामुळे भारतात राजकीय अराजकता निर्माण झाली आणि इस्ट इंडिया कंपनीची सत्ता भारतात स्थापन झाल्याने हे राजकीय अस्थैर्य संपले अशी मांडणी साम्राज्यवादी ब्रिटीश इतिहासकारांनी केली आहे. राष्ट्रवादी इतिहासकारांनी त्याला अप्रत्यक्ष सहमती दिली आहे.

**२. आर्थिक व सांस्कृतिक स्थितीशिलता :**

मोगल सत्तेच्या ऱ्हासामुळे भारतातील राजकीय स्थैर्य संपुष्टात आले. त्यामुळे राजकीय अराजकता निर्माण झाली त्याचा फटका अर्थव्यवस्थेला बसला. त्यातून १८ व्या शतकात आर्थिक व सांस्कृतिक स्थितीशिलता आली. असा दावा साम्राज्यवादी इतिहासकारांनी केला. मोगल सत्तेच्या ऱ्हासानंतर शहरीकरण व व्यापार मंदावला. मोगलांच्या शहरीकरणाचा व व्यापाराचा आधार ग्रामीण भागातून येणारा शेतसारा होता. मात्र शेतकऱ्यांच्या उठावामुळे ग्रामीण भागातून येणारा शेतसारा खंडित झाला. त्याचा परिणाम व्यापार व शहरीकरण यावर होऊन त्यांची गती मंदावली. म्हणून मोगल साम्राज्याच्या ऱ्हासानंतर भारतात आर्थिक स्थितीशिलता आली.

तसेच मोगल सत्तेच्या आश्रयामुळे भारतात कला, साहित्य, स्थापत्य, चित्रकला, संगीत असा विविधांगी सांस्कृतिक विकास झाला होता. मात्र मोगली सत्तेच्या ऱ्हासामुळे राजकीय आश्रयाआधारे विकसित झालेल्या कला, साहित्य, संगीत, स्थापत्य यांची गती मंदावली. राजकीय व आर्थिक स्थितीशिलतेचा परिणाम सांस्कृतिक स्थितीशिलतेवर झाला व सांस्कृतिक विकासाची गती खुंटली. एकूणच, १८ व्या शतकात मोगल साम्राज्याचा ऱ्हास झाल्याने आर्थिक व सांस्कृतिक स्थितीशिलता आली.

ब्रिटीश साम्राज्यवादी विचारधारेच्या इतिहासलेखनानुसार १८ वे शतक हे राजकीय अराजकता, आर्थिक व सांस्कृतिक स्थितीशिलतेचे शतक होते. म्हणूनच ते भारताची इतिहासातील काळा कालखंड (Black Era) होता. मात्र १८व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीची सत्ता स्थापन झाली. त्यामुळे भारतातील परिस्थिती बदलली. १७५७ची प्लासीची लढाई व १७६३ची बक्सारची लढाईने ब्रिटिशांनी बंगाल जिंकला. १७९९ला टिपूचा पराभव करून म्हैसूरचे राज्य जिंकले, १८१८ साली मराठ्यांचे राज्य जिंकले, १८४८ला शिखांचे राज्य जिंकले, तैनाती फौज पद्धती वापरून भारतीय राज्ये आपल्या अंकित बनवली. यातून १७५७ ते १८५७ या काळात ब्रिटिशांनी संपूर्ण भारतावर आपला अंमल बसवला. साम्राज्यवादी इतिहासकारांनी केलेल्या दाव्यानुसार ब्रिटिशांनी भारतात सत्ता स्थापन केल्यामुळे भारतातील राजकीय अराजकता संपुष्टात आली. राजकीय सत्ताप्राप्त करत असताना ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीने भारताच्या अर्थव्यवस्थेत बदल केले. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली गेली. मध्ययुगीन भारतीय अर्थव्यवस्थेची वाटचाल आधुनिक भांडवलशाही अर्थव्यवस्थेकडे सुरु झाली. एकंदर वसाहतवादी इतिहासकारांच्या इतिहासलेखनानुसार ब्रिटीश राजवट भारतात आल्याने भारतातील राजकीय अराजकता, आर्थिक व सांस्कृतिक जडपणा संपला. मात्र पुढील काळात १८ व्या शतकाबाबत जे सखोल व आंतरविद्याशाखीय संशोधन झाले. त्यातून वेगळे चित्र समोर येते.

### ब. राजकीय स्थिरता, आर्थिक सुबत्ता व सांकृतिक विकासाचा काळ :

१८वे शतक अराजकता व स्थितीशिलतेचे शतक होते, या दाव्याला छेद देणारी मांडणी प्रथम १९७०च्या दशकात एरिक स्टोक्स (The First century of British Colonial Rule या निबंधात) यांनी केली. असेच लेखन १९८०च्या दशकात ख्रोस्तोपर बेली यांनीही केले, त्यात १८वे शतक हे राजकीय अराजकतेचे शतक असल्याने ब्रिटीशांची सत्तास्थापना कशी योग्य होती हा वसाहतवादी इतिहासकारांचा दावा सप्रमाण खोडून काढला. स्टोक्स व बेली यांच्या लेखनामुळे १८व्या शतकाच्या इतिहासाबाबतच्या विवादास सुरुवात झाली. त्यातच वसाहतपूर्व दक्षिण भारतावर डेव्हिड वॉशब्रूक यांनी, मराठ्यांच्या व्यापारावर फ्रांक पर्लीन, सुमित गुहा यांनी, मराठा इतिहासावर आंद्रेविंक, स्तुअर्ट गॉर्डन यांनी, अवध सुभ्यावर मुजफ्फर आलम यांनी, हैद्राबादवर लिओनार्ड यांनी, बंगालवर अब्दुल करीम, पी. जे. मार्शल, ओम प्रकाश यांनी, पंजाबवर चेतनसिंग, याशिवाय प्रादेशिक इतिहासावर अशीनदास गुप्ता, बी. आर. ग्रोवर, करन लिओबार्ड, रिचर्ड बार्नेट यांनी इतिहासलेखन केले. या इतिहासलेखनात प्रादेशिक इतिहास लेखनाला प्राधान्य दिले. तसेच युरोपियन भाषातील वा फारशी भाषेतील साधनाऐवजी मराठी, बंगाली, पंजाबी अशा प्रादेशिक भाषातील साधनांचा वापर या इतिहासकारांनी केला. यातून १८व्या शतकाबाबत एक नवी मांडणी समोर आली जी जुन्या वसाहतवादी इतिहासलेखनाला नाकारणारी होती.

#### १. राजकीय अराजकतेचा नव्हे, राजकीय स्थिरतेचा काळ :

मोगल सत्तेचा ऱ्हास होऊन भारतात राजकीय अराजकता निर्माण झाली. हा दावा अर्धसत्य आहे कारण मोगल सत्तेच्या ऱ्हासाने निर्माण झालेली राजकीय पोकळी प्रादेशिक सत्तांच्या उदयाने भरून निघाली. महाराष्ट्रात मराठा साम्राज्य, दक्षिणेत निजाम, पंजाबमध्ये शिख, म्हैसूरमध्ये हैदर अली, बंगालमध्ये नवाब मुर्शिदकुलीखान, अवधमध्ये नवाब सादतखान, इ. प्रादेशिक सत्ता देशाच्या विविध भागात अस्तित्वात आल्या. यातील काही राज्ये

मोगल सरदारांची होती, तर काही स्वतंत्र सत्ताधीशांची होती. या प्रादेशिक राज्यांनी आपापल्या राज्यात प्रशासकीय रचना व महसूल व्यवस्था निर्माण केली. आपल्या राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. सोबत व्यापार वाढीला प्रोत्साहन दिले. त्यांच्या धोरणामुळे आर्थिक विकास होण्यास मदत झाली. एकूणच भारतात ब्रिटीश इस्ट इंडिया कंपनीची सत्ता स्थापन होण्यापूर्वीच प्रादेशिक सत्तांच्या उदयामुळे राजकीय स्थिरता निर्माण झाली होती. वसाहतवादी इतिहासकारांनी १८व्या शतकाबाबतची राजकीय अराजकता असल्याचे इतिहासलेखन एकांगी स्वरूपाचे आहे. हे नव्या इतिहासलेखनातून समोर आले.

**२. आर्थिक व सांस्कृतिक स्थितीशीलता नव्हे, तर सुबत्ता व विकासाचा काळ :**

मोगल साम्राज्याचा ऱ्हास झाल्यावर या साम्राज्याच्या आधारे जी अर्थव्यवस्था विकसित झाली होती तिचा आधार संपला. हे जरी सत्य असले तरी याच काळात नव्याने उदयास आलेल्या प्रादेशिक सत्तांनी भारतीय अर्थव्यवस्थेला आधार दिला. त्यामुळे १८व्या शतकात भारतभर लागवडीखालील क्षेत्रात वाढ झाली. त्यातून शेतीचे उत्पन्न वाढले. सोबत प्रादेशिक सत्तांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे हस्तकलेचा विकास झाला. या काळात कापड उद्योगाची प्रगती झाली. ढाका, अहमदाबाद, मच्छलीपट्टणम, येथील सुती कापड, मुर्शिदाबाद, आग्रा, लाहोर व गुजरात मधील रेशमी कापड, काश्मीर, लाहोर, आग्रा येथील शाली यांची मागणी वाढली. गालिचे, दागिने, भांडी, ढाली यांचीही मागणी वाढली. यातून अंतर्गत व बाह्य व्यापारात वाढ झाली. आशिया व युरोपशी व्यापार वाढला. व्यापार वाढीने भारतातील अर्थव्यवस्थेचा विस्तार होण्यास मदत झाली. १८व्या शतकात विशेषत: १७४० नंतर मराठा प्रदेशात व्यापारात वाढ झाल्याचे सुमित गुहा यांनी सिद्ध केले. अवध प्रांतातही व्यापारात वाढ झाली त्यातून आर्थिक संपन्नता आली असा निष्कर्ष मुझफ्फर आलम यांनी काढला आहे. बंगालमध्ये कापड व्यापाराने भरारी घेतली त्यामुळे युरोपातून मोठ्या प्रमाणात चलनाचा ओघ बंगालकडे सुरु झाला. आणि ब्रिटीश सत्ता येईपर्यंत तो चालू राहिल्याची निरीक्षण प्रादेशिक इतिहासकारांनी नोंदवले आहे. एकूणच १८ व्या शतकाबाबत आर्थिक ऱ्हासाची जुनी मांडणी नव्या संशोधनामुळे मागे पडली आणि आर्थिक समृद्धीचे शतक असा नवा इतिहास समोर आला.

या शतकातील व्यापाराची भरभराट झाल्याने सावकार, व्यापारी व जमीनदार या भांडवलदार वर्गाच्या उदयास पोषक वातावरण निर्माण झाले. तसेच प्रादेशिक सत्ता स्थानिक पातळीवरील अर्थव्यवस्थेशी संबंधित विविध गटांचा पाठींबा मिळवण्यात मोगलांपेक्षा यशस्वी झाल्या. या काळात भारतभर श्रीमंत व्यापारी, सावकार व जमीनदार यांनी नव्या राजकीय व्यवस्थेला आधार दिला. उदा. १८व्या शतकात मराठयांच्या राज्यात सावकारांनी महसूल व्यवस्था व सैन्याच्या खर्चासाठी पतपुरवठा करण्यात महत्वाची भूमिका बजावली. याच काळात हुंडी पद्धतीचे प्रचलन वाढले ज्यामुळे दूरवरच्या ठिकाणी पैश्याची देवाणघेवाण करणे अधिक सुलभ व निर्धोक बनले. या सर्व प्रादेशिक सत्तांना जसा सावकार व व्यापारी वर्गाची मदत झाली तशी सावकार, जमीनदार व व्यापारी वर्गाला या नव्या राजकीय बदलाचा आर्थिक फायदा झाला. यातून त्याच्या श्रीमंतीत भर पडली. उ. भारतात जगतसेठ, नगरसेठ, द. भारतात शेट्टी या सावकारांचा उदय झाला. बंगालच्या नवाबाचे सावकार जगतसेठ सावकार बँक ऑफ इंग्लंडएवढे श्रीमंत होते. बंगाली व्यापाऱ्यांचे शासनाच्या टांकसाळी वर नियंत्रण होते. एकूणच या सर्वातून १८ व्या शतकातील आर्थिक समृद्धी असल्याची साक्ष पटते.

प्रादेशिक सत्तांनी आर्थिक विकासाबरोबरच सांस्कृतिक विकासास प्रोत्साहन दिले. हैद्राबाद, लखनौ, जयपूर, मुर्शिदाबाद या प्रादेशिक राज्याच्या राजधान्या सांस्कृतिक विकासाची केंद्रे बनल्या. मोगल साम्राज्याच्या ऱ्हासामुळे आश्रयहीन झालेल्या दरबारातील कलाकारांना या प्रादेशिक राज्यांनी आश्रय दिला. १७८४ साली अवधचा नवाब असउद्दौलाने लखनौमध्ये इमामवाडा ही प्रसिद्ध इमारत बांधली. सवाई जयसिंह या राजाने १७८६ साली जयपूर, दिल्ली, काशी, येथे पाच वेधशाळा बांधल्या. शिखांचा राजा रणजीतसिंह याने अमृतसर येथील सुवर्ण मंदिरास संगमरवर लावले, त्याच्या कळसाला सोन्याचा पत्रा लावला. सुरजमल जाट याने अग्रयासारख्या इमारती बांधण्याचा प्रयत्न केल्या. यातून लक्षात येते की, सांकृतिक विकास खुंटला नव्हता.

यातून १८व्या शतकाबाबत नवे आकलन सामोरे येते ज्यातून राजकीय स्थिरता, आर्थिक सुबत्ता व सांकृतिक विकास असल्याचे चित्र समोर येते.

अशा प्रकारे दोन परस्परविरोधी स्वरूपाच्या इतिहास लेखनातून १८व्या शतकाबाबत विवाद समोर येतो. एका बाजूला १८ वे शतक हे राजकीय अराजकता, आर्थिक व सांस्कृतिक स्थितीशिलतेचे शतक होते. किंबहुना ते अंधकार युग होते. आणि ब्रिटीश सत्तेची भारतात स्थापना झाल्यामुळे भारतात राजकीय स्थिरता आली व आर्थिक विकासाला सुरुवात झाली अशी इतिहासाची मांडणी वसाहतवादी वा साम्राज्यवादी इतिहासकारांनी केली. तर दुसऱ्या बाजूला १८ व्या शतकात भारतात राजकीय स्थिरता व आर्थिक सुबत्ता होती, तसेच सांकृतिक विकासालाही गती होती अशी इतिहासाची नव्याने मांडणी केली आहे.

या दोन्ही मांडणीच्या अभ्यासांती आपण या निष्कर्षाप्रत येतो की, १८वे शतक राजकीय स्थैर्य, आर्थिक सुबत्ता व सांस्कृतिक विकासाचे होते ही मांडणी ऐतिहासिक सत्य वाटते. साम्राज्यवादी वा वसाहतवादी इतिहासकारांनी केलेले इतिहासलेखन हे ब्रिटीश सत्तेची भारतात स्थापना कशी योग्य आहे. अशा दृष्टीने केली आहे. यातून ब्रिटीश सत्ताधीशांनी भारतातील आपल्या सत्तेला इतिहास लेखनाच्या माध्यमातून लोकमान्यता मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे. ब्रिटीश भारतात आल्यावर भारताला राजकीय ऐक्य लाभले, भारतीय अर्थव्यवस्था जगाच्या अर्थकारणाशी जोडली गेली एकूणच भारतात आधुनिकता यायला सुरुवात झाली. हे जरी खरे असले तरी भारत पारतंत्र्यात गेला. भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वतंत्र अस्तित्व संपून ती ब्रिटनला उपकारक ठरणारी अर्थव्यवस्थेला वसाहतवादी अर्थव्यवस्था बनली. त्यामुळे आर्थिक बदलांचा फायदा इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेला झाला भारताच्या नाही. ब्रिटीश राजवटीत भारताच्या अमर्याद शोषणाची सुरुवात झाली. भारत अधिक दरिद्री बनला. शेती मागास राहिली. उद्योगांचा विकास झाला नाही. त्यामुळे १८व्या शतकाला काळा कालखंड म्हणण्यापेक्षा भारतातील ब्रिटीश सत्तेचा काळ हाच खऱ्या अर्थाने अंधकार युग (An Era of Darkness) होते असे म्हणणेच योग्य ठरेल.

**१.३. पारिभाषिक शब्द, शब्दार्थ**

centralised state : केंद्रित राज्य

stagnation : गतिरहितता

laissez faire policy : निरंकुश अर्थव्यवहार धोरण

underdevelopment : न्यूनविकास

eighteenth century debate : १८व्या शतका संबंधीचा वाद'

localised centers of manufactures: उत्पादनाची स्थानिक केंद्रे

**१.४. स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे**

**१. अ) खालील प्रश्नांची उत्तरे योग्य पर्यायापुढे (✓) खुण करून पूर्ण करावीत**

१) आर. पी. दत्त हे ...........इतिहासकार होते.

अ) सबाल्टर्न ब) मार्क्सवादी क) साम्राज्यवादी ड) केंब्रीज

२) ददनी पद्धती....................._ शी संबंधित होती.

अ) उत्पादन ब) पतपुरवठा क) कर ड) चलन

३) जगात सेठ घराण्याचा........................_क्षेत्रावर प्रभाव होता.

अ) पतपेढी ब) उद्योग क) लष्कर ड) व्यापार

४) शेट्टी हे व्यापार करणारे लोक ....................येथील होते.

अ) गुजराथ ब) केरळ क) आंध्रप्रदेश ड) बिहार

५) ....................मध्ये सोरामठ तयार होत असे.

अ) महाराष्ट्र ब) राजस्थान क) बिहार ड) तामिळनाडू

**२. एका वाक्यात उत्तरे लिहा**

१) औरंग काय होते?

२) वीरअन्ना खेडी काय होती?

३) अनौद्योगीकरणाच्या सिद्धांताला कोणी विरोध केला आहे?

**३. स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

**१. अ) खालील प्रश्नांची उत्तरे योग्य पर्यायापुढे (✓) खुण करून पूर्ण करावीत**

१. ब) मार्क्सवादी २. ब) पतपुरवठा ३. अ) पतपेढी ४. ब) केरळ ५. क) बिहार

**२. एका वाक्यात उत्तरे लिहा**

१. कापड उत्तपदाची स्थानिक केंद्रे

२. १६७० च्या दशकात काशी विरांना नावाच्या एका व्यापाऱ्याने भारताच्या पूर्वी समुद्र किनाऱ्यावरील हजारो गावातील विणकरांना दद्नी पद्धतीच्या माध्यमातून आगाऊ रक्कम दिली होती. ह्या सर्व गावांना 'विरांनाची गावे' असे ओळखले जात होते.

३. मोरीस डी. मोरीस

## १.५. सारांश

ब्रिटीश साम्राज्याचा एक महत्त्वाचा घटक असतानाही भारत देश हा जगातील गरीब देशांमधील एक देश म्हणून गणला जाऊ लागला. हा विरोधाभास का निर्माण झाला हे समजणे हाच १९व्या शतकाचा आर्थिक इतिहास अभ्यासण्याचा प्रमुख उद्देश आहे. आर्थिक इतिहासाच्या आपल्याला अनेक छोट्या व्याख्या करता येतील. आपण असे म्हणू शकतो की आर्थिक इतिहास हा गत काळातील समाजांच्या आर्थिक बाबींचा अभ्यास आहे. आर्थिक इतिहास साधनसामग्रीचा उदा. जमीन, श्रमिक आणि भांडवल इत्यादींचा इतिहास मांडतो. आर्थिक इतिहास भूतकाळातील अर्थव्यवस्थेच्या परिस्थितीचा अभ्यास करतो. गेल्या १५० वर्षांमध्ये भारताचा आर्थिक इतिहास अभ्यासण्यासाठी तीन महत्त्वाचे दृष्टिकोन अस्तित्वात आले. १) पहिला दृष्टिकोन न्यायमूर्ती रानडे आणि रोमेशचंद्र दत्त यांनी अवलंबलेला राष्ट्रवादी दृष्टिकोन होता. २) भारताच्या आर्थिक इतिहास लेखनाचे दुसरे पर्व हे १९५०च्या दशकात सुरू झाले. ह्या काळात मार्क्सवादी विचारांचा प्रभाव अर्थशास्त्रज्ञ आणि इतिहासकार यांच्यावर निर्माण झाला होता. ३) भारताच्या इतिहास लेखनाचे तिसरे पर्व १९६०च्या दशकात सुरू झाले. दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या संस्थेतील अभ्यासकांनी मोठ्या प्रमाणात भारताच्या आर्थिक इतिहासावर लिखाण करण्यास सुरुवात केली.

१९६३ साली प्रा. मोरीस डी. मोरीस यांनी 'Towards a Reinterpretation of Nineteenth Century Indian Economic History' हा लेख 'Journal of Economic History' ह्या नियतकालिकात प्रसिद्ध केला. ह्या लेखामुळे १९व्या शतकातील भारतीय आर्थिक इतिहासावर मोठ्या प्रमाणात चर्चा घडून आली. ह्या लेखाने आर्थिक इतिहासकारांमध्ये तीव्र भावना जागृत झाल्या. मात्र भारतातील व परदेशातील आर्थिक इतिहासकारांनी प्रा. मोरीस यांच्या विचारांवर चर्चा केली नाही. १९६८ साली Indian Economic and Social History Review या आंतरविद्याशाखीय (interdiciplinary) संशोधन पत्रिकेच्या विशेष अंकामध्ये मोरीस यांच्या विचारांवर टिप्पणी करणारे अनेक लेख छापून आले.

ब्रिटीश राजवटीचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाला हे समजून घ्यायचे असेल तर १८व्या शतकात भारतीय अर्थव्यवस्थेची काय परिस्थिती होती हे माहित असले पाहिजे. १८व्या शतकाबद्दल इतिहासकारांनी दोन वेगवेगळे अन्वयार्थ मांडले आहेत. काही इतिहासकार हे मत मांडतात की मोगल साम्राज्याच्या ऱ्हासामुळे भारतामध्ये गोंधळ व अराजकता (chaos and anarchy) माजली. अर्थव्यवस्था पूर्णपणे मोडली. ह्या पारंपारिक मांडणीला अलीकडील काळात इतिहासकारांनी आव्हान दिले आहे. इतिहासाचे पुनर्लेखन करणारे इतिहासकार हे मांडतात की जरी मोगल साम्राज्याचे पतन झाले असले तरी भारतात 'गोंधळ व अराजकता' माजली नाही. प्रादेशिक राज्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली काही प्रदेशांमध्ये सामाजिक व आर्थिक भरभराट घडून आली. अनेक राजकीय प्रश्न असूनही भारतीय अर्थव्यवस्थेचा विस्तार सुरूच राहिला.

**१.६. सरावासाठी प्रश्न**

**१. टिपा लिहा**

१) ब्रिटीश पूर्व काळातील पारंपारिक ग्रामीण अर्थव्यवस्था

२) वसाहतवादी विचारांचे अलीकडील काळातील पुनरुत्थान

**२. सविस्तरपणे उत्तरे लिहा**

१. १८ व्या शतकासंबंधित वादाची सटीक चर्चा करा.

२. भारतीय आर्थिक इतिहास अभ्यासण्याचे विविध दृष्टीकोनांची चर्चा करा.

३. मध्य १८ व्या शतकातील भारतीय अर्थव्यवस्थेच्या परिस्तितीचे समीक्षण करा.

४. भारतीय आर्थिक इतिहासलेखनाच्या विकासाची चर्चा करा.

**१.७. संदर्भ ग्रंथ**


1. Chandra, Bipan. Karl Marx, His Theories of Asian Societies, and Colonial Rule. Review (Fernand Braudel Center) 5, no. 1 (July 1, 1981): 13-91.
2. Choudhuri, B.B. Mughal Decline and India’s Economy: An Inconclusive Debate, n.d.
3. Clingingsmith, David, and Jeffrey G. Williamson. India’s Deindustrialization in the 18th and 19th Centuries. Cambridge: Harvard University, 2005.
4. Dharma Kumar (ed.), The Cambridge Economic History of India, Volume 2, c.1757 -2003, Orient Longman, Hyderabad, 1983 , (Expanded Edition 2005)
5. Habib, Irfan. Note Towards a Marxist Perception of Indian History. The Marxist, XXVI, no. 4 (December 2010).
6. Morris, D. Morris, Toru Matsu, Bipan Chandra, and T. Raychoudhuri. Indian Economy in the Nineteenth Century: A Symposium. Delhi: Indian Economic and Social History Association, Delhi School of Economics, 1969.
7. Mukherjee, Aditya. Empire: How Colonial India Made Modern Britain. Economic and Political Weekly 45, no. 50 (2010): 11.
8. The Return of the Colonial in Indian Economic History:The Last Phase of Colonialism in India. Indian History Congess Sixty-Eighth Session (2007).

9. Parthasarathi, Prasannan. The History of Indian Economic History, May 2012.

Roy, Tirthankar. Economic History and Modern India: Redefining the Link. The Journal of Economic Perspectives 16, no. 3 (2002): 109-30.

10. India in the World Economy: From Antiquity to the Present. Vol. 10. Cambridge University Press, 2012

11. The Economic History of India 1857-1947. 2nd edition. Oxford: OUP India, 2006.

✻✻✻

# घटक - २

# कृषीविषयक व्यवस्था आणि त्याचे परिणाम

**उद्दिष्टे :**

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

- २.२.१ १९ व्या शतकातील कृषी व्यवस्था
- २.२.२ कायमधारा पध्दत - बंगाल
- २.२.३ रयतवारी पध्दत - दक्षिण भारत
- २.२.४ महालवारी पध्दत - मध्य भारत
- २.२.५ कृषीचे व्यापारीकरण
- २.२.६ कृषीक्षेत्रावर झालेले परिणाम

२.३. पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ.

२.४. स्वयं अध्ययन-प्रश्नांची उत्तरे.

२.५ सारांश

२.६ सरावासाठी प्रश्न

२.७ संदर्भग्रंथ यादी

## २.१ उद्दिष्टे :

या प्रकरणाच्या अभ्यासानंतर विद्यार्थी मित्रांनो आपणास.....

- ✻ भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान होती. याची आपणास जाणीव होईल.
- ✻ ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा शेती हा होता. याची तुम्हांस नोंद घ्यावी लागेल.
- ✻ बंगाल मधील ब्रिटीश कंपनीने कृषी विषयक स्वीकारलेले धोरण तुमच्या लक्षात येईल.
- ✻ रयतवारी पध्दत कशी होती याची माहिती तुम्हांस घेता घेईल.

लॉर्ड विल्यम बेंटिकने महालवारी पध्दत कृषी उत्पन्न वाढावे या आपेक्षेने अंमलात आणली त्याची माहिती तुम्हास द्यावी लागेल.

✻ कंपनीने केलेल्या या जमीन महसुल पध्दतीच्या गुण-दोषांची चर्चा करावी लागेल. व त्याचे परिणाम भारतीय शेतकऱ्यावर काय झाले याची नोंद ठेवावी लागेल.

✻ भारतीय शेतीच्या व्यापारीकरणास कोणते घटक कारणीभुत ठरले याची माहिती तुम्हास द्यावी लागेल.

**२.१ प्रास्ताविक :**

प्राचीन काळापासून भारतात शेती पंरपरागत चालत आलेला प्रमुख व्यवसाय आहे. शेती प्रधान भारताचे भविष्य घडविण्यात प्राचीन, मध्ययुगीन, व अर्वाचीन शेतकऱ्याचे मोठे योगदान आहे. शेतकरी या शब्दाला फार मोठा अर्थ आहे. कष्ट करणारा, झगडणारा, व तत्कालीन समाजात परिवर्तन घडवून आणणारा असा तो शेतकरी, जो माणुस अथवा व्यक्ती स्वतःच्या ताकदीवर, कौशल्यावर जमीन कसण्याचे काम करतो, त्यात तो स्वतःची अवजारे वापरतो, व त्या कामात त्याला घरचे व गावचे लोक उपयोगी पडतात. तो भारतीय शेतकरी होय. सर्व साधारणपणे भारतात श्रीमंत, मध्यम, व गरीब शेतकरी अशी आर्थिक विभागणी केली जाते. शेतीची मशागत करून विपुल प्रमाणात उत्पादन घेतो तो शेतकरी अशी भारतात सर्वसाधारण धारणा आहे. भारतात आर्य बोलन खिंडीतुन आले. त्यांचे आगमन हळू हळू व क्रमशः होते. ते गंगा, रावी, चिनाब, झेलम, यमुना, सरस्वती व सिंधु या नद्या खोऱ्यात येऊन स्थिरावले व त्यानी तेथे शेती करण्यास सुरवात केली. प्रथम लाकडी नंतर धातुची अवजारे वापरून शेती केली. तेथूनच भारतीय शेतीचा विकास होऊ लागला. उत्पादन वाढु लागले. मोठ्या समाज निर्मीतीला वातावरण मिळत गेले. उत्पादन वितरणासाठी संघ, श्रेंण्या, गण, या सारख्या लहानसंघटना उदयास आल्या. प्रथम वस्तुविनीमय व नंतर धातुचे चित्रविचीत्र आकाराचे तुकडे चलन म्हणुन वापरले गेले. शेतमालाची देव घेव सुरू झाली. छोटे रस्ते निर्माण झाले. नागरी संस्कृती निर्माण झाली. त्यामुळे कांही नगरे व्यापाराची केंद्रे बनली. तत्कालीन नगर प्रमुखांनी शेती सुधारण्याकडे लक्ष दिले. शेतीमुळे समाजाला स्थैर्य मिळाले. शेती व पशु संख्येवरून प्रतिष्ठा समजण्यास सुरूवात झाली. मोठी समाजनिर्मीती राजा व मंत्रीगण परिषदेच्या स्थिरतेनंतर खाजगी मालमत्ता या संकल्पनेचा उदय झाला. त्यातून विविध सामाजीक गटाचा उदय झाला. राजा व मंत्रीगण यांना भेटवस्तु आणि नजराणे मिळू लागले. महाजनपदाच्या निर्मीती नंतर महसुलाची कल्पना उदयास आली असे मानले जाते. प्राचीन भारतीय काळात शेतीत अनेक बदल झाले.

मध्ययुगीन काळात अनेक स्थित्यंतरे झाली. उत्पादन व शेती पध्दत यात बदल झाले. खते, बि-बीयाणे, पाणी पुरवठा यामुळे शेती उत्पादन वाढले. रेशीम, तंबाखू, मका व तेल बियाच्या उत्पादनामुळे नकदी पिकाचे मोठ्या प्रमाणावर उत्पन्न वाढले. उत्तर भारतात फळे मोठ्या प्रमाणावर घेतली गेली. शेतात जास्तीजास्त पिके घेण्यास लोक तयार झाले. पिकांचे फेरपालट, बदल पध्दत स्वीकारली. शेतीसाठी लोखंडी अवजारे वापरण्यास सुरूवात झाली. शेतीसाठी पाणीपुरवठा हा नदी, हौद, विहीर, व तलाव या मधुन सुरू झाला. सुलतान काळात जमीनदारी पध्दतीचा उदय झाला. तर मुघलकाळात जमीनदारांना महत्वाचे स्थान मिळाले. मध्ययुगीन काळापासुन जमिनीवर विविध प्रकारचे कर बसविण्यात आले. व ही पध्दत रूढ झाली. प्रत्यक्ष जमीन पाहुन व मोजणी करून

कर वसुली सक्तीने करण्यात आली. खंडकरी, कुळकरी, वाटेकरी शेतकऱ्याचा उदय याच काळात झाला. जमीनदार हे या शेतकऱ्यावर अन्यायकरीत पीक व कर वसुलीसाठी जुलूम जबरदस्ती होत असे. शेतकऱ्यावर कर्जाचा बोजा वाढत असे. मध्ययुगीन काळातील शेतकऱ्यांनी विविध कारणांकरिता उठाव केल्याचे संदर्भ मिळतात.

तत्कालीन भारतातील ८०% लोक शेतीवर अवलंबून होते. शेती हा ग्रामीण समाजव्यवस्थेचा कणा होता. ग्राम, खेड्यातील लोक शेती, पशुपालन, व्यवसाय करीत. बलुते पध्दत रूढ होती. त्या काळात गरजा कमी असत. त्यामुळे गरजा खेड्यात पूर्ण केल्या जात असत. मनापासून शेतीवर माया करणे, शेतीमध्ये कष्ट करणे. सरकारी कर, महसुल भरणे, जमीनदार, सरदार लोकांचे अत्याचार, अन्याय सहन करणे ही भारतीय शेतकऱ्याची खास वैशिष्टे होती. कंपनीच्या एकसंघ राजकीय सत्ता स्थापनेनंतर ग्रामीण भागाची स्वयंपूर्णता हळू हळू नष्ट झाली. व ग्रामीण अर्थव्यवस्था बदलत गेली. तिचे स्वरूप व्यापारी अर्थव्यवस्थेकडे झुकू लागले. कंपनीने भारतातील उघोग, हस्त-कला व्यवसाय, बऱ्यापैकी लघुउघोग नष्ट केले. परिणामी शेतीवर अतिरिक्त बोजा पडू लागला. बेकार झालेल्या लोकांना उदरनिर्वाहासाठी शेतीकडे वळावे लागले. या जमिनी कसण्यासाठी शेतकऱ्याकडे दिलेल्या होत्या. मोठ्या जमीनदारांनी आपल्या जमिनी छोट्या शेतकऱ्याकडे दिल्या होत्या. ते शेतकरी ही जमीन स्वत:च्या मालकीच्या समजत. कंपनीच्या काळात जमिनदारांना शेतसाऱ्यात वाढ करण्याचा अधिकार नव्हता.

कंपनीच्या काळात महसुल ही बाब राज्याचे उत्पन्न मानले. त्यामुळे जादा महसुल वसुल करण्यासाठी कायमधारा, रयतवारी व महालवारी अशा वेगवेगळ्या महसुल पध्दतीचा वापर केला. महसुल कर वाढल्यामुळे भारतीय शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला. खते, बि-बीयाणे, कृषी साधनाचा अभाव, ओले व कोरडे दुकाळ व सक्तीची महसुल पध्दती यामुळे शेतकरी कर्जबाजारी बनला. सावकारांना जमिनी विकून महसुल भरावा लागला. कर्ज थकल्यास जमिनींचे लिलाव झाले. पारंपारिक शेती पध्दतीतून भरघोस उत्पादन होत नसे व कर्ज फेडता न आल्याने शेतकरी दरिद्री बनला.

कंपनीच्या काळात येथील शेती पावसावर अवलंबून होती. कंपनी सरकारने शेतीकडे लक्ष दिले नाही. शेतकऱ्यांना कोणत्याही सोई-सुविधा दिल्या नाहीत. इंग्रजानी भारतात राबविलेल्या जमीन महसुलपध्दती शेतकऱ्यांसाठी हिताच्या नव्हत्या. शेतीच्या क्षेत्रात इंग्रजानी आर्थिक साम्राज्यवाद चालू केला. शेतीचे व्यापारीकरण केले. युरोपियन बाजारपेठेत कापूस, चहा, निळ, कॉफी, विविध मसाल्याच्या वस्तू यांना प्रचंड मागणी होती. ही मागणी पूर्ण करण्याकरिता भारतीय शेतकऱ्यावर सदर पिकांचेच उत्पादन द्यावे याची सक्ती केली. हा व्यापार व मिळणारा महसुल प्रचंड होता. तरी सुध्दा इंग्रजांनी भारतीय शेतीसाठी कोणत्याही सुधारणा केल्या नाहीत. परिणामी भारतीय शेती मागास राहिली. शेती उत्पन्नात वाढ नसताना सुध्दा इंग्रजानी शेतसारा वाढवत नेला. सरकार, सावकार, जमिनदार व इंग्रज व्यापारी यांनी भारतीय शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक शोषण केले.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ १९ व्या शतकातील कृषी व्यवस्था :

भारतीय शेती पध्दती पांरपरिक होती. या काळातील शेतीची साधने जुनाट, पांरपरिक पध्दतीची होती. त्यामुळे मर्यादित कृषी उत्पन्न मिळत असे. इंग्रजानी भारतात सत्ता स्थापन केल्या नंतर इंग्लंड मधील कारखान्यांना

लागणारा कच्चा माल पुरवठा करण्यासाठी कापूस, ताग, चहा, कॉफी, निळ, मसाले पदार्थ इ. शेतमाल उत्पादीत करण्याकरिता भारतीय शेतकऱ्यांवर सक्ती केली. इंग्रजानी आपल्या फायद्यासाठी भारतीय शेतीचे व्यापारीकरण केले. त्यामुळे ग्रामीण स्वयंपूर्णता नष्ट झाली. नवीन महसुल पध्दतीमुळे भारतातून मोठ्या प्रमाणावर संपत्ती इंग्लडंला नेणे शक्य झाले.भारतीय शेतकरी हा अडाणी, अंधश्रध्दाळू, नवीन मार्ग न स्वीकारणारा, दारिद्र व कर्जाच्या कात्रीत अडकलेला, सरकारने कोणतीही मदत न केल्याने  दरिद्री नारायण म्हणून ओळखला जाई. जमीन मालकी, न्यायदान व जमीन महसुल पध्दती एवढ्यापुरते सरकार शेती संबधी कामकाज करीत असे.

**कृषी खात्याची गरज :**

१९ व्या शतकात भारतात अनेक वेळा दुकाळ पडले. सन १८६४ ते १८६५ या काळात आसाम, बंगाल, व बिहार या प्रातांत भिषण दुष्काळ पडले. दुष्काळावर मात करण्यासाठी सरकारला खास प्रयत्न करावे लागले. उत्पादन वाढावे तोटा होऊ नये म्हणून इंग्रज सरकारने शेती कडे लक्ष दिले. सरकारच्या दुष्काळ निवारण समितीने खास दष्काळावर मात करण्यासाठी स्वतंत्र कृषी खाते स्थापन करण्याची शिफारस केली. परंतु सरकारने या शिफारसीकडे लक्ष दिले नाही. इंग्लंड मधील कारखानदारांनी इंग्लंड शासनावर लांब धाग्याा कापूस उत्पादित करावा असे दडपण आणल्यावर सन १८६८ मध्ये भारतात इंग्रज सरकारने लांब कापूस व त्याच्या धाग्यासाठी प्रथम प्रयत्न  केले. या नंतर इंग्लड मधील मॅचेस्टर कॉटन ऑर्गनायझेशन भारतात कापसाची शेती सुधारण्यासाठी स्वंतत्र कृषीखाते स्थापन करावे अशी मागणी केली होती.

या मागणी नंतर १८७१ मध्ये इंग्रज सरकारने कृषी, महसुल आणि वाणिज्य असे एक स्वतंत्र खाते निर्माण केले. व ते प्रत्येक प्रातांत लागू केले.पण या खात्यास शेती सुधारणा करता आल्या नाहीत. कृषीविषयक आकडेवारी, शेती परीषदा, आयोग स्थापण्या पलिकडे काही केले नाही. पुढे सन १८८१ मध्ये कृषी खात्याचे पुर्न:जीवन करण्यात आले. व शेती उत्पादन वाढविण्यासाठी अनेक योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्राचे मुख्य खाते हे प्रांतीय खात्यांना मार्गदर्शन करणार होते.तर प्रांतीय खाती ही शेती संशोधन प्रयोग आणि विकास पहाणार होती. या कालखंडात सिंध, वायव्यप्रांत, बंगाल, मुंबई, मध्यप्रदेश व मद्रास प्रांतात कृषी खातीनिर्माण करण्यात आली. सरकारने या काळात लांब धाग्याचा कापूस, तेलबिया, फळे, बटाटे या पिकावर संशोधन केले. तरी भारतीय शेतीचा प्रगतीचा वेग गतीहिन होता.कारण इंग्रज सरकारचे धोरण ठाम व कार्यक्षम नव्हते. पुढील काळात सन १८८९ मध्ये व्हॉएलकर अहवाल, लॉर्ड कर्झन याने स्वीकारून इम्पीरिअल ॲग्रिकल्चर रिसर्च इन्स्टिट्यूट स्थापन करून शेती संशोधन कार्यास प्रांरभ केला. तर रॉयल कमिशनने भारतीय शेती संबंधी सरकारला महत्वपूर्ण शिफारशी केल्या. या कालखंडात जी काही प्रगती झाली त्यात मुखत्वेकरून सुधारित जातीच्या पिकांची लागवड व जलसिंचन योजना महत्वाच्या होत्या. इंग्रजांनी भारतात जमीनमहसुलाच्या पध्दती आणल्या व त्या येथे सक्तीने राबविल्या त्याचा आढावा या प्रकारे घेता येईल. ब्रिटिशांना बक्सारच्या युद्धाने बंगालमध्ये दिवाणी आधिकार मिळाले. या आधिकाराने महसूलाच्या उत्पन्नावर कंपनीचे वर्चस्व मिळाले. त्यांनी राजकीय सत्ता मिळविली तरी येथील कृषी व्यवस्थेची माहीती कंपनीला नव्हती. तसेच महसूल वसूली यंत्रणा राबविण्याची क्षमता कंपनीजवळ नव्हती. त्यामुळेच रॉबर्ट क्लाइव्हने महसूल वसुलीचे काम भारतीय लोकांना प्रथम दिले. या लोकांनी आपल्या परंपरागत पध्दतीवर हा महसूल गोळा करावा व तो कंपनीकडे द्यावा अशी व्यवस्था

सर्वात पहिल्यांदा करण्यात आली. त्यानंतर वॉरन हेस्टिंग्ज याने परंपरागत पध्दतीत बदल केला. जमिनदारी पध्दत यामुळे रूढ झाली. त्यांचे भयावह परिणाम शेतकरी वर्गावर पडले. वॉरन हेस्टिंग्जने स्वीकारलेल्या पध्दतीमुळे जमीनदार पध्दत मोडून पडली. ठेकेदार निर्माण झाले. उदा. शेती व्यवसायाशी निगडीत नसलेल्या बनिया, व्यापारी व सावकार या नव्या जमीनदार वर्गाचा उदय बंगालच्या प्रातांत झाला. या वर्गाने बंगालमध्ये महसूल लुटीचा धडाका चालू केला. या लुटारू धोरणाचे परिणाम लगेच दिसून येवू लागले. याबाबत रोमेश दत्त लिहतात. " The country grounds were put under the economic tyranny, the revenue failed once more. the system was introduced not to a meliorate the economic condition of the rural people rather to squeeze out the last drop which left the trail of misery insurrections and famines in Bengal. Benaras and Oudh"

ब्रिटिशांनी बंगाल, बनारस, व अवध या प्रदेशात प्रचलित केलेल्या जमीनदारी पध्दतीचे पुढील काळात भारतीय शेतकरी समाजावर दिर्घकालीन परिणाम झाले. इंग्रजानी पुढील काळात भारतीय शेतकरी जनतेसाठी कायमधारा, रयतवारी, महालवारी महसूल पध्दती लागू केल्या.

### २.२.२ कायमधारा पध्दत – (बंगाल)

अगदी प्राचीन काळापासुन जमीन महसूल ही बाब त्या त्या प्रदेशाचा अर्थिक कणा होता. भारतातील ग्रामीण भाग हा याचा महत्वाचा घटक होता. यातील दोन घटक म्हणजे शेती कसणारे व लहान व्यावसायिक होत. त्या काळातील जमिनीवर वैयक्तिक मालकी, सामुदायिक मालकी, व राज्य सरकारी मालकी असे जमीन मालकी हक्काचे तीन प्रकार रूढ होते.शेतीवर आधारीत असे विविध व्यवसाय, उघोग सुरू झाले होते. परिणामी ग्रामीण भागात स्थानिक पातळीवर जमीनदार, मोठे शेतकरी यांचे सामाजिक, आर्थिक महत्व वाढले. त्यामुळे स्थानिक प्रशासनावर त्याचा प्रभाव वाढला. हे लोक सरकारला मोठा कर देत असल्याने त्याचा नैतीक दबाव रहात असे. जमीन कसणाऱ्या लोकांना कर रूपाने सरकारला कांही भाग द्यावा लागे यालाच महसूल असे म्हंटले जाई. भारतात कालओघात जमीन महसूल कर वाढत गेला.जमिनधारणे बाबत खाजगी मालकी हक्क मान्य झाला. मध्ययुगीन काळापासून जमिनप्रतवारी ठरवून महसूल आकारला जाई. ईस्ट इंडिया कंपनीने बंगाल काबीज केल्यानंतर नबाबाकडून दिवाणी अधिकार मिळविले व पुढील काळात वेगवेगळ्या महसूल पध्दती राबविल्या.

सन १७६५ च्या अलाहाबाद तहाने बंगाल नबाबाकडून कंपनीने बंगाल, बिहार व ओरिसा या प्रातांचे दिवाणी हक्क मिळविले. बंगाल मधील महसूल गोळा करण्यासाठी सिताबरॉय व मोहंमद रजाखान यांना नायब दिवाण म्हणून नेमले. बंगाली जनता दुहेरी सत्तेच्या वसूलीत अडकली.एका बाजूला नबाब तर दुसरीकडे कंपनी. दोन्ही सत्तेचे वसूली अधिकारी जनतेवर अन्याय अत्याचार करीत. तसेच हे वसूली अधिकारी मोठा भ्रष्टाचार करीत. त्यामुळे कंपनीला कोणताही फायदा झाला नाही. परिणामी पुढील काळात वॉरन हेस्टिंगने महसूल गोळा करण्याची ही दुहेरी पध्दत बंद केली. त्याने मध्यस्थ पध्दत बंद करून, महसूल गोळा करण्याचे प्रत्यक्ष कामकाज कंपनीच्या वतीने सुरू केले. प्रत्येक जिल्ह्यात कलेक्टर ची नियुक्ती केली. पाच वर्षाचा महसूल निश्चीत केला. व दरवर्षी पिकांची पहाणी करून महसूल वसूल करण्याची पध्दत स्वीकारली. महसूल वसूलीसाठी ठेका पध्दतीचा अवलंब करण्यात आला. स्वतंत्र महसूल खाते देखरेखीसाठी महसूल मंडळ हे उच्चाधिकार मंडळ स्थापन केले यात शेतकरी

हित कोणतेच नव्हते. कंपनी महसूल अवस्था वाईट होती. भारतात पुढील काळात लॉर्ड कॉर्नवालिस आला. त्याने येथील कृषी व्यवस्थेचा अभ्यास केला. शेतकऱ्यांना महसूलाची निश्चीत माहिती असणे, जमीन कोणी कसावी, सरकारी महसूल जास्त कसा जमा होईल यावर विचार केला. महसूलाची कायमची व्यवस्था झाली नाही तर शेतकरी जमीन कसणार नाहीत त्याचा परिणाम कंपनीचा महसूल बुडेल. दरम्यान याच काळात पीट इंडिया ॲक्टने जमीन विषयक नियम करावेत अशा सुचना भारत सरकारला केल्या होत्या. लार्डकॉर्नवालिसने जमीन महसूलाबाबत या क्षेत्रात कामकाज करणारे जॉन शोअर, जोनाथन, डंकन, आणि चार्ल्स ग्रँट याची नेमणूक केली. या तिघांपुढे दोन प्रश्न होते ते म्हणजे शासनाने जमीन महसूलाचा करार शेतकऱ्याशी करावा की मोठ्या जमीनदारांशी करावा. बंगाल मध्ये जमीन महसूल कायम स्वरूपी द्यावा का? या प्रश्नांवर सखोल चर्चा झाली. जॉन शोअर व कॉर्नवालिस यांच्यात मतभेद होते. कॉर्नवालिसच्या मते जमीनदारांशी करार करावेत. कारण ते मोठ्या जमिनीचे मालक आहेत. तर जॉन शोअरच्या मते शेतकरी खरे मालक आहेत. त्यामुळे त्यांच्याशी करार करावेत. जॉन शोअरने यासंदर्भात एक योजना मांडली. जमिनदारांनी आपली जमीन कसणारे कुळाची नावे व त्यांना द्यावा लागणारा महसूल याची नोंद ठेवावी, आपल्या कुळांना त्यांनी पट्टे द्यावेत, कुळाच्या हक्कात ढवळाढवळ झाल्यास कुळांना न्यायालयात जाणेची परवानगी असावी.

जॉन शोअरच्या या योजनेला लॉर्ड कॉर्नवालिसने मंजुरी दिली. यामुळे प्रत्यक्षात जमीन कसणारे कुळे याच्या हक्काचे रक्षण झाले. ही योजना इंग्लडला पाठविण्यात आली. तत्कालीन इंग्लडचा पंतप्रधान विल्यम पीट यांनी या योजनेला अंतिम मान्यता दिली. या पध्दतीला कायमधारा पध्दती असे म्हणतात. ही पध्दत २२ मार्च १७९३ पासून प्रथम बंगाल, बिहार व नंतर ओरिसा मध्ये लागू करण्यात आली.

**अ) कायमधारा पध्दतीचे स्वरूप आणि तरतुदी :**

सन १७६५ च्या अलाहाबाद तहाने बंगाल नबाबाकडून कंपनीने बंगाल, बिहार, व ओरिसा या प्रातांचे दिवाणी अधिकार मिळविले. शेती व्यवसायातून मिळणारे उत्पन्न निश्चीत स्वरूपाचे नव्हते. कंपनीचा प्रशासनावरील खर्च वाढत होता. म्हणून लॉर्ड कॉर्नवालिस यांनी सदर प्रातांतून ईस्टइंडिया कंपनीला निश्चीत स्वरूपाचा महसूल (शेतसारा) मिळावा म्हणून कायमधारा पध्दत सुरू केली. या पध्दतीनुसार जमिनदाराना, शेतजमिनीचे मालक करण्यात आले. मोठ्या जमिनदारांना शेतकऱ्याकडून कंपनीने ठरवून दिलेला महसूल वसूल करण्याचे अधिकार दिले. तो वसूल करून सरकारमध्ये जमा करणे, शिल्लक राहिल्यास तो स्वत: घेणे. शेतकऱ्यावर नैसर्गिक आपत्ती उदा. दुष्काळ, पूर, टोळधाड, रोगराई, आल्यास कंपनी जमिनदार व शेतकऱ्यांना नुकसान भरपाईसाठी जबाबदार नव्हती. या पध्दतीमूळे गरीब शेतकऱ्याची जमिनीवरील मालकी नष्ट झाली. जमिनदारावर छोटे शेतकरी व त्याचे जीवन अवलंबून राहिले. कायमधारा पध्दतीत १० ते ११ टक्के शेतसारा ठरवून देण्यात आला. जमीनदाराने ठरवून दिलेला शेतसारा सरकारी विभागात जमा न केल्यास त्या जमिनदाराची जमीन विक्री करण्याचे अधिकार कंपनीला मिळाले.

**कायमधारा जमिनमहसूल पध्दतीच्या तरतुदी पुढीलप्रमाणे.**

१. बंगाल, बिहार व ओरिसा प्रातांतील जमीनदार, छोटे शेतकरी, इतर जमीन मालक यांच्या जमिनीची मोजणी करून कायम स्वरूपी महसूल ठरवून दिला.

२. ठरवून दिलेल्या महसूलात बदल करता येणार नाही.

३. कंपनी सरकारने जमीनदारा बरोबर करार केले. त्यांना महसूल वसूलीचे अधिकार दिले. जमीन मालकी जमीनदाराकडे ठेवली, हे जमीनदार आपल्या कुळाकडून महसूल वसूल करू लागले, ठरवून दिलेला महसूल सरकारात भरणे व शिल्लक राहिल्यास तो स्वत:जवळ ठेवणे हे अधिकार जमीनदाराना मिळाले.

४. कुळानी जमीनदारानां कमी महसूल दिल्यास, जमीनदाराने ठरवून दिलेलाच महसूल भरावा यात कोणतीहि सुट मिळणार नाही. पूर्वी जमीनदाराकडे असलेले शांतता-सुव्यवस्था ठेवण्याचे काम काढून घेतले. जमीनविक्री चे अधिकार कंपनीने मान्य केले.

५. भारतीय जमीनदार, शेतकरी यांना जो वारसा हक्क कर भरावा लागत होता तो कंपनीने बंद केला. जो पर्यंत जमीनदार, शेतकरी जमीन महसूल नियमीत भरतील तो पर्यंत त्याचे जमीन हक्क आबाधीत राहतील हे स्पट करण्यात आले.

६. जमीनदारानां कुळे पट्ट्याद्वारे महसूल कर देतील. तसेच कुळाकडील महसूल वाढविण्यासाठी सरकारी अथवा न्यायालयाची परवानगी घेणेचे बंधन जमीनदारावर घालण्यात आले.

कंपनी सरकारने बंगालमधील जमिनीचे सर्वेक्षण करून तेथील जमिनीचे श्रेठ, मध्यम व कनिष्ठ अशी वर्गवारी केली. व त्याप्रमाणे महसूल कर कायमचा आकारला त्यासाठी मागील महसूल जमाबंदीचा आधार घेतला. बंगाल मधून कायम महसूल मिळत जावा याची कंपनीने सोय केली ही पध्दत भारतात दिडशेवर्ष चालू होती. मार्शमन यांच्यामते, Permanent settlement as a brave and wise measure. रोमेशदत्त लिहतात राष्ट्राच्या प्रगती व सुस्थितीचा विचार केल्यास कायमधारा पध्दती एक विचारी व यशस्वी उपायोजना होती. बेव्हेरिज यांच्यामते 'Permanent settlement is a great blunder and a gross injustice' अशी मते आढळतात.

**ब) कायमधारा पध्दतीचे फायदे (गुण) :**

लॉर्ड कॉर्नवालिसच्या कायमधारा पध्दतीचे फायदे भारतीय शेतकऱ्यांना कोणते झाले ते आपणास खालील प्रमाणे सांगता येतील.

१. कायमधारा पध्दतीमुळे मोठे जमीनदार, शेतकरी यांचे जमिनविषयक हक्क कायमचे दृढ: झाले. जमीनदार, शेतकरी यांचेवरील जाचक बंधने नष्ट झाली. त्यामुळे त्याचे समाजातील स्थान भक्कम होण्यास मदत झाली.

२. जमीन महसूलाची रक्कम कायमची निश्चीत झाल्याने भारतीय शेतकरी कृषी क्षेत्राकडे आकर्षित झाला. मोठ्या प्रमाणावर शेतीचे क्षेत्र लागवडी खाली आले. याचा परिणाम जमिनीची खरेदी विक्री मोठ्या प्रमाणावर होऊ लागली.

३. भारतातील जमीनदार, मोठे शेतकरी यांची या पध्दतीमुळे जमीन मालकी निश्चीत झाली. त्यामुळे हा वर्ग स्थिरावला. त्यामुळे हा वर्ग इंग्रजाचा निष्ठावान बनला.

४. कायमधारा पध्दतीमुळे कंपनीचे उत्पन्न निश्चीत झाले.कंपनीला आपले अंदाजपत्रक तयार करता आले. महसूल पध्दतीतील भ्रष्टाचार नष्ट करता आला. या पध्दतीमुळे कंपनीच्या आर्थिक उत्पन्नात भरघोस वाढ झाली.

५. जमीनदारानां कुळे पट्ट्याद्वारे महसूल कर देतील. तसेच कुळाकडील महसूल वाढविण्यासाठी सरकारी अथवा न्यायालयाची परवानगी घेणेचे बंधन जमीनदारावर घालण्यात आले. त्यात पुन्हा हस्तक्षेप करण्याचा प्रश्नच शिल्लक ठेवला नाही.

६. कायमधारा पध्दतीमुळे बंगालमधील कृषीचे उत्पन्न वाढले. जमीनदार धनिकवर्गाने व्यापारावर आपले लक्ष केंद्रीत केले. तेथे लोकसंख्या वाढ झाली. मध्यम शेतकरी वर्गाने पुढील काळात सामाजीक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात मोठे योगदान केले. तर कंपनीला दरवर्षी निश्चीत स्वरूपात महसूल मिळू लागला. त्यामुळे कंपनीच्या उत्पन्नास स्थैर्य मिळाले. कायमधारा पध्दतीमुळे जमीनदार श्रीमंत झाले. त्याची प्रतिष्ठा वाढली. बंगालमधील हा वर्ग कंपनीचा समर्थक वर्ग म्हणून उदयास आला. प्रा. ताराचंद लिहितात, वॉरन हेस्टिंग्जच्या काळात बगालमध्ये गोंधळाला ऊत आला, बंगालात दु:ख, द्रारिद्र, दुष्काळ, आणि बंडाळीचे सावट पसरले. या परिस्थितीत लॉर्ड कॉर्नवालिसने सुधारणा केली. कंपनीचे हितसंबध जोपासने, भारतीय शेतकऱ्याचे जीवनमान उंचावणे, जमीनदाराना सुरक्षितता देणे ही कामे कायमधारा पध्दतीने केली. या पध्दतीमुळे जमीनदार, शेतकरी, सर्वसाधारण रयत यांचे समाजातील स्थान निश्चीत केले. एकंदर जमिनीच्या उत्पन्नापैकी ८९ टक्के उत्पन्न कंपनी सरकारला मिळण्याची व्यवस्था त्याने केली. खिस्तोफर बेली याच्या मते कंपनीचा हेतु बंगालमध्ये समता निर्माण करण्याचा नव्हता. त्यांना तेथे स्थिरता निर्माण करावयाची होती. कायमधारा पध्दतीचा मुख्य हेतु जमीन महसूलाची निश्चीती होती. कॉर्नवालिसचा हेतु राजकीय व लष्करी हेतुनीं प्रेरित होता. बंगाल मधील विविध समाजावर वेगळ्या मार्गानी नियंत्रण मिळविणे हा होता.

**क) कायमधारा पध्दतीचे तोटे (दोष) :**

१. लॉर्ड कॉर्नवालिसला कायमधारा पध्दत राबविताना महसूल व शेतीची निश्चीत आकडेवारी मिळाली नाही. त्यामुळे खोट्या आकडेवारीवर ही पध्दत राबवावी लागली. त्यामुळे कंपनीला सरकारी उत्पन्न मर्यादित मिळाले. या पध्दतीमुळे अनेक जमिनदाराच्या जमीनी करमुक्त राहिल्या, त्यामुळे अनेक जमीनदार श्रीमंत झाले. कंपनीचा फार तोटा झाला.

२. कायमधारा पध्दतीत दिलेल्या दिवशीच महसूल भरावा लागे. त्या दिवशी महसूल भरला नाही तर सरकार जमिनीचे लिलाव करीत असे. त्यामुळे शेतकऱ्याच्या जमिनीची कवडीमोल किमंतीने विक्री होई.

३. या चुकीच्या पध्दतीमुळे बंगाल व बिहार प्रातांत सन १७९४ ते १८०७ या काळात ४१ टक्के शेतकरी लोकांना आपल्या जमीनी विकाव्या लागल्या. तर सन १८०४ ते १८१८ या काळात ओरिसा प्रातांत ५१.१ टक्के जमीन लिलाव पध्दतीने विकण्यात आली.

४. महसूल अधिकाऱ्याच्या चुकीच्या माहितीमुळे जमिनीचे खरे मालक बाजूला राहिले. या शेतकऱ्यांना आपल्या न्याय हक्कासाठी झगडावे लागले.

५. जमीनदारानी कुळावर अन्याय-अत्याचार सुरू केले. त्यामुळे शेतीचा विकास झाला नाही. कुळाचे शोषण भयावह झाले. कायमधारा सुधारणामुळे बंगालमध्ये श्रीमंत शेतकऱ्याचा एक वर्ग उदयास आला. या वर्गाला जोतेदार म्हंटले गेले. ग्रामीण बंगालची सत्ता या जोतेदाराच्या हातात गेली. चित्त पंड्या यांनी लिहिले आहे प. बंगालमध्ये जमीनदाराचा ऱ्हास झाला व तेथे जोतेदाराचा उदय झाला. त्याच्याकडे जमीन खरेदी-विक्री, पतपुरवठा, व्यापारी व्यवस्था हस्तांतरित झाली. जमीनदार ऱ्हास पावले तर जोतेदाराचा विकास झाला.

६. कायमधारा पध्दतीमुळे बंगाल, बिहार व ओरिसात कुळकरी, वहिवाटदार, वाटेकरी, खंडकरी निर्माण झाले. परिणामी शेतीचे तुकडे पडले. या तीन प्रांतात कंपनीच्या आकडेवारी नुसार १ लाख १० हजार ४५६ इतकी पोटजमीनदाराची संख्या केवळ २० वर्षात निर्माण झाली. प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या शेतकऱ्याचा, वरील घटकांचा विचार झाला नाही. कुळकरी, वहिवाटदार, वाटेकरी व खंडकरी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडण्यात आले. सर चार्ल्स मेटकाफ व एडवर्ड कोलब्रुक यांनी सामान्य शेतकऱ्याचा बळी देऊन श्रीमंत जमीनदारवर्गाचे हित कंपनीने जोपासण्याची व्यवस्था करण्यात आली. असे मत व्यक्त केलेले आहे.

७. स्वत: जमीनदार आपल्या जमीन क्षेत्रात न राहता मोठ्या शहरात रहात आणि आपले धन व वेळ ऐश्वर्यात व्यतित करीत अशा प्रकारे ग्रामीण भागातील पैसा शोधून शहरामध्ये उधळणारे जमीनदार शोषकाचे काम करीत.

(Thus, the zamindars become a sort of distant suction pump's sucking the wealth of the rural areas and wasting it the cities.)

८. या शिवाय सरकार व शेतकऱ्यामध्ये खूप मध्यस्थ अस्तित्वात आले. की जे आपला वाटा हस्तगत करीत व हा सर्व भार शेतकऱ्यावर पडत असल्याने ते पूर्णत: निर्धन बनले. कार्वर म्हणतो ग्रामीण जनतेसाठी युध्द, दुष्काळ, महामारीनंतर अनुपस्थित जमीनदारी होती जी अती त्रासदायक होती.

(Next to war famine and pestilence the worst thing that can happen to a rural community is absentee landlordism.)

कायमधारा पध्दतीच्या गुण-दोषावरून कंपनी सरकारची आर्थिक निती स्पट होते. कंपनी सरकारला निश्चीत जमीन महसूल उत्पन्न मिळणेची व्यवस्था करणे महत्वाचे होते. ते त्यांनी केले पण याचा शेतीवर कोणता परिणाम होईल याचा विचार केला नाही. परिणामी शेतीचे विघटन झाले. उत्पन्न घटले शेतकरी जनतेचे शोषण झाले.

डॉ. एस. गोपाल लिहतात "By vesting the zamindars with all residuary rights of property, the government exalted their status and ensured a continous improvement in their position. On the other hand, the rights of the ryots were exposed to damage. The practical security given by custom was shattered. In its place, were substituted the shadowy protection of the courts and vague promise of succour in the future. By thus undermining the protection of the ryots and giving a new bias to the interest

of te Zamindars, the permanent settlement altered the balance of rural society in Bengal"

**स्वंय अध्ययन प्रश्न क्र.–१**

**अ) अचूक पर्याय निवडा.**

१. प्राचीन काळापासुन भारतात ..................हा पंरपरागत चालत आलेला प्रमुख उद्योग-व्यवसाय आहे.

अ) शेती ब) कुटीर उद्योग क) लद्यु उद्योग ड) मिश्र उद्योग

२. शेती सुधारण्याकडे ..............याने लक्ष दिले.

अ) वॉरन हेस्टिंग ब)चार्ल्स मेटकाफ क) कॉर्नवालिस ड) विल्सन

३. शेतीमुळे.................. समाजाला स्थैर्य मिळाले.

अ) जमीनदार ब) गरीब क) व्यापारी ड) कुळकरी

४. ............ संख्येवरून प्रतिष्ठा मोजण्यात आली.

अ) शेती व पशुधन ब) गरीबी व श्रीमंती क) व्यापार व व्यवसाय ड) कुळकरी व खंडकरी

५. कायमधारा पध्दतीत ............... टक्के शेतसारा ठरवून देण्यात आला.

अ) १० ते ११ ब) १२ ते १३ क) १४ ते १५ ड)१६ ते १८

**२.२.३ रयतवारी पध्दत – दक्षिणभारत**

कंपनी सरकार स्वंत:च्या राज्यहक्कासाठी जागरूक होते. त्याच्या राज्याचे भवितव्य भारतातील जमीन महसूलावर होते. या पासून मिळणाऱ्या उत्पन्नावर कंपनीचे प्रशासन, नव्या प्रदेशातील स्थिरता, कायदा व सुव्यवस्था अवलंबून होती. भारतातील जमीन महसूलावर भर दिला तरच भारत, आपली प्रचंड आर्थिक फायदा करून देणारी वसाहत ठरेल, हे धूर्त इंग्रजानी ओळखले होते. भारतामध्ये गोऱ्याच्या अर्थशास्त्राप्रमाणे करविषयक सुधारणा करणारा पहिला इंग्रज अधिकारी कॉर्नवालिस होय. त्याने लागू केलेली कायमधारा पध्दती अयशस्वी ठरली होती तरी सुधा कॅ.अलेक्झांडर रीड व थॉमस मन्रो यांनी ती मद्रास प्रातांत सन. १८२० मध्ये लागू केली. सन. १८१८ ला पेशवाई नष्ट केल्यावर रयतवारी पध्दत महाराष्ट्रात लागू केली. ही पध्दत लागू करण्याचा मान लॉर्ड मांऊट स्टुअर्ट एल्फिन्स्टन कडे जातो.

**अ) रयतवारी पध्दतीचे स्वरूप आणि तरतुदी :**

या काळात कंपनीच्या भारतातील मक्तेदारीला खूप विरोध होत होता. तत्कालीन इंग्लड मधील जनता जमीनदारीच्या विरोधात होती.जमीनदाराचे वर्तन, विषेशहक्क या विरोधात त्यांनी चळवळी सुरू केल्या होत्या. त्याचे पडसाद भारतात पडू नयेत म्हणुन येथील कंपनी प्रशासनाने जमीनदारानां आळा घालण्यासाठी रयतवारी पध्दती दक्षिण भारतात लागू केली.

सन. १८०९ च्या सिलेक्ट कमिटी ने कायमधारा पध्दतीवर ताशेरे ओढले होते. या पध्दती मध्य शेतकरी कायम असुरक्षित असतो, त्याच्यावर सरकार व जमीनदाराचे दडपण असते. त्याला मुक्त करावयाचे असेल तर रयतवारी पध्दतीचा अवलंब करा असा दम सिलेक्ट कमिटीने भरला. जेम्स मिल ने या काळात भारतात शेती व्यवसायात सुधारणा होण्यासाठी जमीन कसणाऱ्या शेतकरी वर्गास जमीन मालकी हक्क दिला पाहिजे, असे स्पट मत मांडले. या बरोबर थॉमस माथल्स, डेव्हिड रिकार्डो, जंरोमी बेन्थॅम, विल्यम थॅकरे, इ. कंपनीचे वरिष्ठ अधिकारी रयतवारी पध्दतीचे पुरस्कर्ते होते. या सर्वाच्या प्रयत्नामुळे रयतवारी पध्दत दक्षिण भारतात लागू करण्यात आली.

जमीनधारणेच्या प्रकारामध्ये सरकार,जमीन कसणारी रयत यांच्यात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झालेला असतो. अशा जमीन धारणेच्या प्रकाराला रयतवारी पध्दती असे म्हणतात. रयतेकडून महसूल गोळा करून मध्यस्थाशिवाय सरकारी खजिन्यात भरला जातो. रयतवारी मध्ये जमिनीची मोजणी केली जाते. त्यानंतर जमिनीची प्रतवारी ठरविली जाते. आणि पुढे प्रतवारीनुसार महसूल आकारला जातो. महसूल ठरवताना शेतकऱ्याचे मत विचारात घेतले जाई. भारतात इंग्रजाचे उत्पन्नाचे साधन मुखत्वेकरून महसूल असल्याने त्यांनी येथे विविध भागात, प्रदेशात वेगवेगळ्या महसूल पध्दती सुरू केल्या.

दक्षिण भारतात विर्स्तीर्ण सपाट शेत जमीन नव्हती. त्यामुळे मोठे जमीनदार नव्हते. दक्षिणेकडे शेतीच्या पांरपारिक पध्दती बऱ्यापैकी होत्या. त्यात सुधारणा करूनच ही नवीन पध्दत सुरू केली. जेम्स मन्रो याच्या मतानुसार नवीन महसूल पध्दतीमुळे शेतीविषयक उद्योगधंदे उभे करता येतील. शेती उत्पन्न वाढेल. सरकारचा प्रत्यक्ष शेतकरी जनतेशी संबंध निर्माण होईल. यामुळे कंपनी सरकारच्या योजना सुलभपणे गरीब शेतकऱ्यापर्यंत जातील. शेतमालावर शेतकरी समुहाचे वर्चस्व राहील. व त्यांना मोठा लाभ मिळेल. सन. १७९२ कंपनीने कर्नाटक आपल्या वर्चस्वाखाली आणले. पुढील काळात दक्षिणेवर कंपनीने आपले वर्चस्व निर्माण केले. सन. १८२० मध्ये कंपनीने बारामहालावर रयतवारी पध्दत लागू केली. (मद्रास, बारामहाल, सालम, कडाप्पा, कर्नूल, बेल्लारी इ.)

पेशवाई अस्तानंतर ही पध्दत महाराट्रात लागू केली. रयतवारी पध्दतीची वैशिष्ट्ये या प्रमाणे सांगता येतील.

रयतवारी पध्दतीत कंपनी सरकार व शेतकरी याचा प्रत्यक्ष संबंध येई. महसूल गोळा करण्यासाठी मध्यस्थ नव्हता. जमिनीची मोजणी करून, प्रतवारी ठरवून महसूल ठरवला जाई. प्रत्यक्ष जमीन कसणारे यांचे बरोबर करार केले जात. कुळाशी संबंध येत नसे. जमीन जी व्यक्ती कसत असे तिला जमीनीचा मालकीहक्कमिळतअसे. कांही कालावधीनंतर महसूलाचे पुन:मूल्यांकन होत असे.

१. कंपनी सरकारने जमीन प्रतवारी, खोली, आर्द्रता क्षमता, जमिनीचा कस याचा विचार करून जमिनीची वर्गवारी केली.

२. उत्तम जमीन, मध्यम जमीन व कनिष्ठ जमीन असे तीन वर्ग केले.

३. हवामान, मशागत या नुसार जमिनीची प्रतवारी ठरविली.

४. पूर्वीच्या जमाबंदीचा विचार केला.

५. जमीन कसणारा जमिनीचा मालक होऊन महसूलासाठी त्याला जबाबदार धरले.

६. जमीन महसूल कायम न ठेवता त्यात बदल करण्याचे अधिकार सरकारने स्वत:कडे राखून ठेवले.

७. जमीन महसूलाचा दर उत्पन्नाच्या ४५ ते ५५ टक्के ठरविला.

८. या पध्दतीमुळे सरकार व शेतकरी यांचा प्रत्यक्ष संबंध प्रस्तापित झाला.

**ब) रयतवारी पध्दतीचे फायदे (गुण) :**

१. जमीन कसणारा व शासन यांच्यात थेट संबंध निर्माण झाले. त्यामुळे जमीनदार व इतर मध्यस्थ यांचे महत्व संपले.

२. शेतकरी लोकांकडे जमीन मालकी गेल्याने उत्पादन क्षमता वाढली.

३. शेतीचा विकास घडवून आणणे शक्य झाले.शेती पूरक उद्योग,धंदे उभे होण्यास मदत झाली. लोकांना कामधंदा मिळून बेरोजगाराची समस्या सुटण्यास मदत झाली.

४. भारतीय शेतीमध्ये नवीन प्रयोग सुंरू झाले. सरकारने नगदी पिकासाठी धोरणे आखली. त्याचा फायदा शेतकरी जनतेला झाला.

५. जमीन स्वत:च्या मालकीची आहे या भावणेने शेतकऱ्यानी अधिकाधिक जमीन लागवडी खाली आणली परिणामी शेतीचा दर्जा सुधारला.

६. जमिनीचे मोजमाप, प्रतवारी, जमिनीच्या सरहद्दी निश्चिती करून नकाशे तयार करण्याचे कामकाज सुरू झाले. त्याचा उपयोग शेत जमीन मालकांना झाला.

प्रा. ताराचंद लिहितात, रयतवारीने शेतकऱ्याची परिस्थिती बदलली. शेतमजूर, शेतकरी, जमिनदाराची स्वतंत्र ओळख निर्माण झाली. ही पद्धत जमीन कसणारा व सरकार दोघांना उपयुक्त ठरली.

**क) रयतवारी पध्दतीचे तोटे (दोष):**

या पध्दतीत फायदे होते तसे दोष व तोटे देखील होते.त्याचा आढावा आपणास या प्रमाणे घेता येईल.

१. थॉमस मन्रो व अलेक्झांडर रीड या अधिकाऱ्यांनी भारतीय शेतीचा अभ्यास करून विचारपूर्वक ही रयतवारी पध्दत अमलात आणली होती. कायमधारा पध्दती पेक्षा ही पध्दत चांगली होती पण ही पध्दत राबविताना सरकार कडून त्यात दोष निर्माण झाले.

२. रयतवारी पध्दतीत जमीन महसूल ठरविताना सर्व अधिकार कंपनी सरकारने राखून ठेवले होते. शासनाने या अधिकाराचा दुरूपयोग केला. व जमीन महसूलाची जास्त आकारणी केली.

३. एखाद्या शेतकऱ्याकडून महसूल आकारणी जास्त, अवास्तव केली गेली. असेल तर त्या शेतकऱ्यास सरकारविरोधात दाद मागणे मुश्किल झाले. त्यास कोणत्याही प्रकारे वाटाघाटी करता आल्या नाहीत.

४. शेतसारा वसूल करण्याची जबाबदारी सरकारची होती. शेतसारा जर एकाद्या शेतकऱ्याने भरला नाही. तर त्याची जमीन जप्त होत असे.

५. सरकारी जप्ती पासून वाचण्यासाठी शेतकऱ्यांनी सावकारापासून कर्ज काढले. सावकारी व्याज मोठे असल्याने त्या कर्जाची परत फेड शेतकऱ्यांकडून होत नसे. परिणामी सावकार शेतकऱ्याच्या जमिनी ताब्यात घेत असे. त्यामुळे द.भारतात एक नवीन भूमीहिन शेतकऱ्याचा एक वर्ग उदयास आला. सावकार जमीनदार बनले. त्यामुळे शेतकरी, सरकार यांचे संबंध रयतवारी पध्दतीत चांगले राहिले नाहीत.

६. रयतवारी पध्दतीत शेतकऱ्यानी जमीन कसावी अशी अपेक्षा होती. परंतु अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी आपल्या जमीनी खंडकरी लोकांना कसण्यास दिल्या. व ते निवांत राहू लागले परिणामी शेती उत्पन्नावर मोठा परिणाम झाला.

७. दक्षिण भारतीय ग्रामीण प्रदेशात कलह, असुरक्षितता, गैरसमज व दुषीत वातावरण निर्माण झाले. परिणामी शेतकरी ऐक्य लयाला गेले.

८. रयतवारी पध्दतीत देशमुख, पाटील, कुलकर्णी व चौगुले यांचे ग्रामीण समाजातील स्थान घसरले. या परंपरागत मध्यस्थांची गरज उरली नाही. परिणामी शेतकरी वर्गाला न्याय मिळवून देणारा दुवा निखळला त्याचा परिणाम शेती पध्दतीवर झाला.

९. ही पध्दत लागू झाल्यावर महसूल अधिकारी वर्गास महसूल गोळा करण्याशिवाय पोलिसी अधिकार मिळाले. याचा गैरफायदा अधिकारी वर्गाने घेतला. महसूलासाठी जुलूम, जबरदस्ती, अत्याचार वाढून भ्रष्टाचार वाढत गेला.

१०. द.भारतात शेतकरी कर्ज बाजारी झाला. कर्जातून बाहेर पडण्यासाठी जमीनी विकल्या जाऊ लागल्या. दक्षिणेकडील शेतकरी भूमीहिन मजुर बनला. शेतीचे असंख्य तुकडे पडले. या नव्या पध्दतीत शेतकरी हा सरकारी, जमीनदारी आणि सावकारी पाशात अडकला.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

**अ) अचूक पर्याय निवडा.**

१) सन ............ मध्ये कंपनीने बारा महालावर रयतवारी पध्दत लागू केली.

अ) १८२० ब) १८२१ क) १८२२ ड) १८२३

२) रयतवारी पध्दतीत जमीन महसूलाचा दर उत्पन्नाच्या ............. टक्के ठरविला.

अ) ४५ ते ५५ ब) ५० ते ५५ क) ५५ ते ६० ड) ६० ते ६५

३) भारतामध्ये गोऱ्याच्या अर्थशास्त्राप्रमाणे करविषयक सुधारणा करणारा............हा पहिला इंग्रज अधिकारी होय.

अ) कॉर्नवालिस ब) डलहौसी क) बेटिंग ड) मेयो

४) सन १८१८ ला पेशवाई नष्ट केल्यावर .................. महाराष्ट्रात लागू केली.

अ) रयतवारी पध्दती ब) महालवारी पध्दती क) कायमधारा पध्दती ड) मालगुजारी पध्दती

५) रयतवारी पध्दतीत ................ व शेतकरी याचा प्रत्यक्ष संबंध येई.

अ. कंपनी सरकार ब. भारत सरकार क. ब्रिटिश सरकार ड. फ्रेंच सरकार.

### २.२.४ महालवारी पध्दत – मध्य भारत

**स्वरूप आणि तरतुदी :**

कायमधारा व रयतवारी नंतरची ही तिसरी जमीन महसूल पध्दती होय .कंपनीच्या काळात भारतीय शेतकरी जनतेच्या सुख व दु:खाचा विचार कधीच झाला नव्हता. महालवारी पध्दतीमध्ये प्रथमच ग्रामीण समाजा बरोबर नाळ जुळविण्याचा प्रयत्न कंपनी सरकारने केला. गंगा व तिच्या उपनद्याचे खोरे, वायव्य सरहद्दहिंदप्रांत, पंजाब, व मध्य प्रदेश कंपनीने वर्चस्वाखाली आणल्यानंतर व्होल्ट मॅकेन्झी याच्या अभ्यास व सल्ल्यानुसार लॉर्ड विल्यम बेंटिग याने सन १८३३ मध्ये जी जमीन महसूल व्यवस्था अंमलात आणली. तिला महालवारी पध्दत असे म्हणतात.

या पध्दतीत जमिनीची मोजणी ही प्रत्येक शेतकऱ्याकडून केली जात असे. त्याची प्रतवारी ठरवून महसूल ठरवला जाई. हा महसूल खेड्यातील शेतकरी जनतेशी चर्चा करून ठरविला जाई. तालुकाप्रमूखा मार्फत करार केला जाई. शेती कसणाऱ्यांनी खंड द्यावा. त्या प्रमाणे महसूल आकारणी व्हावी. आणि शेतकऱ्यांचे हक्क दयावेत.

या पध्दतीत खेडे, वाडी, पाडीवरील शेतकरी जनतेशी करार करण्यात आले. शेतकऱ्यांना मालकीहक्क दिले तर शेतीचे उत्पन्न वाढेल. ही त्यापाठीमागील कंपनी सरकारची भुमिका होती. महालवारी पध्दतीत कंपनी सरकारने या प्रमाणे तरतुदी केल्या.

१. या पध्दतीत गांव ते वाडी पर्यंत आणि संपुर्ण महाल याचा एकदम शेतसारा ठरविला जाईल.

२. प्रत्येक महाल, खेडे याचा महसूल वेगळा ठरविला जाईल.

३. शेतसारा गांव प्रमुख, अथवा गांवकरी मिळून ठरवावा.

४. शेतसारा जमा करण्याची जबाबदारी वैयक्तीक व सामुदायिक जबाबदारी ही गांवकऱ्याची असेल.

५. महसूल वसूल करण्याची व तो सरकार जमा करण्याची जबाबदारी नंबरदार या नवीन अधिकाऱ्यावर सोपविण्यात आली. महसूला बाबत स्थानिक अधिकार कंपनी सरकारने त्यास दिले.

६. शेतकऱ्यानां जमीनी विकणे अथवा गहान ठेवण्याचे अधिकार राहतील.

७. शेतसारा २० ते ३० वर्षासाठी निश्चीत असेल.

या पध्दतीत उत्पन्नाचा अंदाज घेऊन महसूल रक्कम ठरविली जात असे. महसूल वसूल करण्याची व तो सरकार जमा करण्याची जबाबदारी नंबरदार या नवीन अधिकाऱ्यावर सोपविण्यात आली. महसूला बाबत स्थानिक अधिकार कंपनी सरकारने त्यास दिले. एखाद्या शेतकऱ्याने महसूल भरला नाही तर सामुदायिक तत्व असल्याने ते गाव अथवा शेतकरी गट जबाबदार मानला जाई. जो पर्यंत शेतकरी व्यवस्थित महसूल भरत नाही. तो पर्यंत त्याची जमीन मालकी हक्क अबाधित रहात नसत. त्याची जमीन दुसऱ्यांकडे कसण्यासाठी दिली जात असे.

महालवारी पध्दतीत उत्पन्नाचे प्रमाण लक्षात घेऊन एकूण महसूलाची रक्कम ठरविली जाई. या पध्दतीत शेतसाऱ्याचे प्रमाण जास्त असल्याने ही व्यवस्था सुध्दा फारसी यशस्वी ठरली नाही. या जमीन महसूल पध्दतीत शेतकरी व सरकार याचा संबंध येत नसे. गावप्रमुख, नंबरदार, हे सामुहिक रितीने महसूल गोळा करीत असत. त्यामुळे शेतकरी जनतेची पिळवणूक होत असे. तसेच कंपनी सरकारने महसूलविषयक केलेले अंदाज हे अपुऱ्या माहितीवर असत. त्यामुळे महसूला बाबत गोंधळ उडत असत. कंपनीचे उत्पन्न वाढविणे हा मुख्य हेतु असल्याने महसूल हा नेहमी जादा आकारला जाई. त्यामुळे तो भरणे शेतकरी जनतेला अवघड होई. परिणामी शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा वाढत गेला. महालवारी पध्दतीत जमीन ही खाजगी मालमत्ता आहे हे ठरविण्यात आले. त्यामुळे जमीन गहान टाकणे. किंवा विकणे शक्य झाले. जमीन मालकी हक्क फेरफार करणेचे अधिकार सरकारने स्वत:कडे राखून ठेवले. जमिनीवरील खाजगी मालकी मान्य करण्यामागे शेतकरी शेतात कष्ट करेल, उत्पन्न वाढेल अशी अपेक्षा सरकारची होती. पण या पध्दतीत सरकारने जास्त महसूल वसूल केल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी झाले. जमीन गहान टाकण्याचे प्रमाण वाढत गेले. परिणामी शेतमालकी हक्कांचे हस्तांतर वाढले.खरा शेतमालक मजूर बनला. व मजूराचा एक वर्ग उदयास आला. यामुळे भारतातील ग्रामीण जीवनातील शेती व्यवस्थेत असलेले स्थैर्य लोप पावले. कृषी व्यवस्थेत असणारे निश्चीत उत्पन्न ऱ्हास पावले. परिणामी भारतीय ग्रामीण शेतीच्या पारंपारीक समाज व्यवस्थेवर याचे भयानक परिणाम झाले. शेतकरी जनतेत संघर्ष सुरू झाले. जमा झालेला महसूल, अन्यायकारक वसूली पध्दत, दडपशाहीच्या मार्गाने श्रमजिवी वर्गाची मोठ्या प्रमाणावर आर्थिक लुट झाली.

**स्वयं अध्यनन प्रश्न क्रं. ३**

**अ) अचूक पर्याय निवडा.**

१. ..............याने सन.१८३३ मध्ये महालवारी जमीन महसूल व्यवस्था अंमलात आणली.

अ) लॉर्ड बेंटिग ब) लॉर्ड मेयो क) कॅ. नील ड) कॅ. अलेक्झांडर

२. .............याने महालवारी पध्दतीचा मोठा अभ्यास केला.

अ) व्होल्टमॅकेन्झी ब) लॉर्ड मेयो क) कॅ. नील ड) कॅ. अलेक्झांडर

३. महसूल वसूल करण्याची व तो सरकार जमा करण्याची जबाबदारी ........... या नवीन अधिकाऱ्यावर सोपविण्यात आली.

अ) पोलिस पाटील ब) नंबरदार क) कुलकर्णी ड) मुलकी पाटील

४. ..............या पध्दतीत शेतकाऱ्यांना जमीनी विकण्याचे अधिकार दिले.

अ) रयतवारी ब) कायमधारा क) महालवारी ड) मालगुजारी

५. महालवारी पध्दतीत ............. ही खाजगी मालमत्ता आहे हे ठरविण्यात आले .

अ) शेती अवजारे ब) घर क) पशु ड) जमीन

### २.२.५ कृषी व्यापारीकरण :

कंपनी सरकारच्या सुरवातीच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया हा दोन महत्वाच्या घटकावर होता तो म्हणजे ग्रामीण जीवनव शेती होय. शेतीप्रधान अर्थ व्यवस्थेमुळे ९० टक्के जनता शेतीवर अवलंबून होती. प्रो. अब्राहम व सबनीस यानी भारतीय खेडयाची वैशिट्ये सांगितली आहेत ते म्हणतात, खेडयाची स्वंयपूर्णता अनुवांशिक गुणकर्मावर अवलंबून नव्हती. भौगोलिकदृष्टया खेडी अलग होती. वाहतुक व दळणवळणाची साधने अपुरी होती. त्यामुंळे ग्रामीण लोक परावलंबी बनले. श्रम व काम याची विभागणी योग्य न झाल्याने कामाच्या पध्दतीत एकसारखेपणा आला. परिणामी वस्तुविनिमय रूढ झाला. व हे चक्र वर्षानुवर्षे चालू राहिले व तिच रूढ बनली.

खेडेगावतील लोकांची विभागणी ही गाव प्रमुख, वतनदारवर्ग, किरकोळ व्यापारी, आणि शेतकरी अशी झाली. त्यावेळी शेतीकडे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून बघितले गेले. तत्कालीन शेतकरी जनतेने शेतीकडे अर्थाजनाचे साधन म्हणून पाहिले नाही. कंपनी सरकारच्या नव्या राजवटीत हळूहळू ही स्थिती बदलली गेली. व भारतीय शेतीचे व्यापारीकरण झाले. उत्पादनात वाढ झाली. पैसा शेतकरी जनतेच्या हातात येऊ लागला. छोटे, मोठे उघोग वाढू लागले. भारतीय शेतीच्या व्यापारीकरणाची प्रमूख कारणे आपणास या प्रमाणे सांगता येतील.

#### १. वस्तुविनिमय बंद आणि पैशाचा वापर :

भारतात बलुतं पध्दतीमुळे अनेक वर्षे वस्तुविनिमय चालत आलेला होता. शेतकरी जनतेला पैशाची आवश्कता भासत नव्हती. स्वंतःच्या कुंटूंबाला वर्षभर पुरेल एवढया धान्याचे उत्पादन घेतले जाई. बलुतं पध्दतीमुळे पैशाची गरज नसे . एक वस्तु दिल्यास दुसरी वस्तु मिळत असे. कंपनी सरकार आल्यानंतर बलुतेपध्दती कमी होत गेली. व पैशाचा जास्तीजास्त वापर सुरू झाला.

#### २. वाहतुक व दळणवळण व्यवस्था :

कंपनी सरकारने सन १८३६-३७ पासून भारतात वाहतूक व दळणवळण क्षेत्रात सुधारणा करण्यास सुरवात केली. १८३६ ला कलकत्ता ते दिल्ली, १८४२ ला मुंबई ते कलकत्ता, १८४६ ला मुंबई ते आग्रा, हे महामार्ग तर १८५३ ला मुंबई ते ठाणे हा पहिला रेल्वे मार्ग व पुढे १८६२ ला ठाणे ते पुणे रेल्वे मार्ग तयार करण्यात आले. पुढील काळात तीस हजार, पाचशे पंच्याहत्तर लांबीचे रेल्वे मार्ग तयार करण्यात आले. कंपनीच्या या वाहतुक व दळणवळण सुधारणेमुळे जलद सैन्य हालचाल, मालाची आयात-निर्यात करणे सोपे झाले. कच्चा माल विपुल प्रमाणात इंग्लडला पाठविणे शक्य झाले.

#### ३. अमेरिकन यादवी आणि भारतात नगदी पिकांना सुरवात :

१२ एप्रिल १८६१ मध्ये अमेरिकेत अतंर्गत यादवी सुरू झाली. उत्तरेकडील २५ राज्ये व दक्षिणेतील ११ राज्ये यादवीत सहभागी झाली. इंग्लंड, अमेरिकन वसाहती मधून मोठ्या प्रमाणावर कापूस नेत असे. याादवीमुळे हा कापूस मिळणे दुरापास्त झाले. तेथील गिरण्या बंद पडण्याची भित्ती निर्माण झाली. त्यामुळे इंग्लडने भारतीय कापूस खरेदी करण्यास सुरवात केली. १८६२ ते १८६६ पर्यंत प्रचंड प्रमाणावर भारतातून कापूस इंग्लडला निर्यात झाला. परिणामी भारतीय शेतकरी जनतेने कापूस, निळ, ताग, ऊस या नगदी पिकांचे प्रंचड प्रमाणावर उत्पादन घेण्यास सुरवात केली त्यातून शेतीचे व्यापारीकरण सुरू झाले.

### ४. सुएझ कालवा निर्मीती :

सन १८६९ मध्ये सुएझ कालवा सागरी वाहतूकीसाठी खुला झाल्यानंतर युरोप ते अतिपूर्वेकडील देश याच्यातील सागरी प्रवास अंतर दुपटीने कमी झाले. वाहतुकीचा खर्च अर्ध्यावर आला. भारतीय व आशियायी देशांना ही बाब फायद्याची ठरली. नगदी पिके घेण्याकडे भारतीय शेतकऱ्याचा कल वाढू लागला.त्यामुळे शेतीचे व्यापारीकरण हळूहळू वाढू लागले. भारतीय शेती माल युरोपिय बाजारपेठेत दाखल होऊ लागला.

### ५. विविध पाणीपुरवठा सोई :

भारतीय शेती ही निसर्गावर अवलंबून होती. कंपनी सरकारच्या नव्या राजवटीत तलाव, धरणे, पाझरतलाव, कालवे, इ. बांधण्यात आले. त्यामुळे बागायती क्षेत्र वाढले. सिंचन क्षेत्र वाढले. पूर्वी भारतीय शेती निसर्गावर अवलंबून होती. कंपनी सरकार आल्यानंतर त्यानी अनेक ठिकाणी शेतीसाठी पाणी पुरवठा योजना कार्यान्वींत केल्या. त्यामुळे बागायती क्षेत्र वाढले. नगदी पिकांचे उत्पादन वाढत गेले.

### ६. वस्तुविनिमय बंद आणि पैशाची गरज :

भारतात परंपरांगत वस्तुविनिमय रूढ होता. कंपनीच्या आगमनाने ही पध्दत बंद पडली. महसूल, कर्ज, इतर कर भरण्यासाठी शेतकऱ्यानां पैशाची आवश्कता भासू लागली. अन्न-धान्ये व इतर शेतीमाल विकून आवश्यक तो पैसा जवळ असणे गरजेचे झाले. शेतीशिवाय दुसरा कोणताही पर्याय शेतकऱ्यांपुढे नव्हता. त्यामुळे बऱ्यापैकी आर्थीक स्थिती असणाऱ्या शेतकऱ्यानी नगदी पिके घेतली व आपली पैश्याची गरज पूर्ण केली.

### ७. युरोपातील औद्योगिक क्रांती :

१८ व्या शतकात युरोपात औद्योगिक क्रांती झाली तर १९ व्या शतकात तिचा विकासाचा वेग दुप्पटीने वाढला. युरोपियन कारखान्यासाठी कच्चामाल आवश्यक होता. इंग्रजानी भारतातून मोठ्या प्रमाणावर हा कच्चा माल विपूल प्रमाणात आयात केला. निळ, कापूस, ताग, ऊस व मसालापिके या नगदी पिकांचे उत्पादन भारतीय शेतकऱ्यांनी घेण्यास सुरवात केली.

### ८. मोठ्या शेतकऱ्याची भूमिका :

भारतातील लहान शेतकरी जनतेचे हाल पाहून मोठे शेतकरी सावध झाले. त्यानी रोख पैसे देणारी पिके घेण्यास सुरवात केली. त्यामुळे त्याच्याकडे पैसा येऊ लागला. त्यातील थोडा पैसा त्यानी कर्ज रूपाने छोटया शेतकऱ्यांना दिला. व्याजाचे पैसे येऊ लागले त्याची गुतंवणूक त्यानी शेतीत केली. नगदी पिके घेण्यास सुरवात केली.

### ९. पत पुरवठा :

भारतात परंपरागत सावकारी चालत आली होती. कंपनी सरकार आल्यानंतर ही सावकारी कमी होत गेली. इंग्रज लोकांनी बॅकिंग व्यवसाय चालू केला. शेतकऱ्यांनी कर्ज घेऊन तो पैसा नगदी पिकांसाठी वापरला. कापूस, चहा, ताग, ऊस, तंबाखू, निळ इ. पिकांचे उत्पादन सुरू केले. आणि त्या मधूनच शेतीचे व्यापारीकरण झाले.

**९. कंपनी सरकारचे धोरण :**

भारतात कंपनी सरकारने सन. १८३५ ते १८५० या काळात या ठिकाणच्या कृषी क्षेत्रात बदल केले. अमेरिकन यादवी नंतर कापूस व इतर पिकांसाठी अमेरिकेवर अवलंबून राहणे अव्यवहार्य आहे. हे लक्षात येताच कृषी उत्पादनाला कंपनी सरकारने भारतात चालणा दिली. परिणामी शेतीचे व्यापारीकरण घडून आले.

इंग्रजाच्या आर्थिक धोरणाने भारतात झालेला बदल म्हणजे शेतीचे व्यापारीकरण होय. कंपनी सरकारच्या आगमणाने भारतातील स्वयंपूर्ण शेती समूळ नट झाली. कालखंड जसजसा पुढे जाऊ लागला तसतसा शेतीवर व्यापारी प्रभाव पडू लागला. पूर्वी सारखी परंपरागत पिके, उत्पादने बंद झाली. निर्यात व्यापारी धोरण डोळयासमोर ठेऊन कृषी उत्पादने घेण्यास सुरूवात झाली. कापूस, ताग, निळ, ऊस, तबांखू, अफू, फळे इ. प्रकारच्या उत्पादनासाठी शेतीचा व्यापारी दृष्टीकोनातून उपयोग होऊ लागला.

शेतीचे व्यापारीकरण ही बाब भारतीय शेतीस घातक होती. परंतू तत्कालीन परिस्थीतीमुळे ही बाब अपरिहार्य ठरली. शेतमालाच्या किमंती वर खाली होऊ लागल्या. त्याचा भारतीय शेतीवर मोठा परिणाम होऊ लागला. आर्थीक मंदीचा मोठा फटका भारतीय शेतकऱ्यानां बसू लागला. महसूल व इतर कराच्या बोजामुळे शेतकरी भरडला गेला. ओल्या व कोरडया दुष्काळात फेमिन कोड सबबी खाली कोणतीही मदत मिळाली नाही. परिणामी भारतीय शेतकरी व शेतीचे प्रंचड नुकसान झाले. व्यापारीकरणाचा फायदा शेतकऱ्यानां मिळाला नाही.

### २.२.६ कृषीक्षेत्रावर झालेले परिणाम- (शेतीच्या व्यापारीकरणाचे परिणाम) :

भारतात कंपनी सरकारने स्वीकारलेल्या धोरणामुळे भारतीय . कृषी व्यवस्थेवर खोलवर परिणाम झाले. इंग्रजाच्या आर्थिक धोरणाने भारतात झालेला बदल म्हणजे शेतीचे व्यापारीकरण होय. कंपनी सरकारच्या आगमणाने भारतातील स्वयंपूर्ण शेती समूळ नष्ट झाली. कालखंड जसजसा पुढे जाऊ लागला तसतसा शेतीवर व्यापारी प्रभाव पडू लागला. पूर्वी सारखी परंपरागत पिके, उत्पादने बंद झाली. निर्यात व्यापारी धोरण डोळयासमोर ठेऊन कृषी उत्पादने घेण्यास सुरूवात झाली. कापूस, ताग, निळ, ऊस, तबांखू, अफू,फळे इ. प्रकारच्या उत्पादनासाठी शेतीचा व्यापारी दृष्टीकोनातून उपयोग होऊ लागला. शेतीचे व्यापारीकरण ही बाब भारतीय शेतीस घातक होती. परंतू तत्कालीन परिस्थितीमुळे ही बाब अपरिहार्य ठरली. शेतमालाच्या किमंती वर खाली होऊ लागल्या. त्याचा भारतीय शेतीवर मोठा परिणाम होऊ लागला. आर्थीकमंदीचा मोठा फटका भारतीय शेतकऱ्यानां बसू लागला. महसूल व इतर कराच्या बोजामुळे शेतकरी भरडला गेला. ओल्या व कोरडया दुष्काळात फेमिन कोड सबबी खाली कोणतीही मदत मिळाली नाही. परिणामी भारतीय शेतकरी व शेतीचे प्रंचड नुकसान झाले. व्यापारीकरणाचा फायदा शेतकऱ्यानां मिळाला नाही.

**१. कंपनी सरकारचा मोठा फायदा :**

कंपनी सरकारच्या धोरणामुळे इंग्लडमधील श्रीमंत लोकानी भारतीय कृषीव्यवस्थेत मोठी गुतंवणूक केली. भारतात युरोपियन मळेवाले तयार झाले. त्यानी या ठिकाणी चहा, निळ, अफू, सागवान लाकूड व मसाले पदार्थ याचे प्रंचड उत्पादन घेतले. याची मोठी निर्यात केली. याचा इंग्लडला खूप फायदा झाला.

**२. विविध प्रकारची पिके वाढली :**

पूर्वी सारखी परंपरागत पिके, उत्पादने बंद झाली. निर्यात व्यापारी धोरण डोळयासमोर ठेऊन कृषी उत्पादने घेण्यास सुरूवात झाली. कापूस, ताग, निळ, ऊस, तबांखू, अफू, फळे इ. प्रकारच्या उत्पादनासाठी शेतीचा व्यापारी दृष्टीकोनातून वापर सुरू झाला. विविध प्रकारची पिके वाढली.

**३. मोठया प्रमाणावर जमीन खरेदी-विक्री :**

शेतीच्या व्यापारीकरणामुळे जमीन ही खरेदी व विक्रीची वस्तू आहे हे समजले गेले. परिणामी मोठया प्रमाणावर खरेदी व विक्री होऊ लागली. तसेच ज्यानां कसण्याची माहिती नाही अशा लोकांनी जमीनी खरेदी केल्या त्यामुळे जमीनी पडीक बनल्या शेती सुधारण्याकडे लक्ष दिले गेले नाही. परिणामी भारतीय शेतीचे प्रचंड नुकसान झाले.

**४. विभागवार पिके निश्चीत झाली :**

कंपनी सरकारच्या धोरणामुळे भारतात विभागवार पिके निश्चीत झाली. विशिष्ट असे पिकांचे उत्पादन घेतले गेले. उदा. बंगाल-ताग, पंजाब-गहू, महाराष्ट्र व गुजरात-कापूस, कोकण-मसाले व सागवान, आसाम-चहा. यामुळे पिकांचे विशेषीकरण घडून आले. नाईलाजास्तव अशी पिके शेतकऱ्यांना घ्यावी लागत.

**५. जमीनदार व सावकाराचा मोठा फायदा :**

शेतीच्या व्यापारीकरणामुळे जमीनदार, सावकार आणि शेती कसणारे शेतकरी यांच्यात मोठी आर्थिक तफावत निर्माण झाली. बी-बियाणे, अवजारे, खते या बाबीवर शेती कसणाऱ्या शेतकरी लोकांचा हक्क वा अधिकार नव्हता. नगदी पिके घेण्यसाठी सरकार पासून सर्वाचा दबाब शेतकऱ्यावर येत असे. या लोकांच्या मता नुसार पिके घेतली जात. त्याचा फायदा सावकार, जमीनदार यांना होत असे.

**६. मजुर-कष्टकरी लोकांची वाढ आणि त्यांचे स्थलांतर :**

शेतीच्या व्यापारीकरणामुळे व नगदी पिकांमुळे शेतीवर जास्त बोजा पडू लागला. कमी जमीन असलेल्या शेतकऱ्यानी कर, महसूल भरण्यासाठी आपल्या जमीनी विकल्या व ते शेतमजूर बनले. भूमीहिन मजूराची संख्या वाढली. कामधंदा शोधण्यासाठी त्यांचे स्थलांतर सुरू झाले.ही परिस्थिती पुढील काळात गंभीर बनली.

**७. ग्रामव्यवस्थेवर परिणाम :**

भारतीय शेतीच्या व्यापारीकरणामुळे ग्रामीण स्वयंपूर्ण समाजव्यवस्था नष्ट झाली. बलुतेदारी व अलुतेदारी पध्दत नष्ट झाली. पारंपारिक उद्योग, हस्तकलाचा ऱ्हास झाला. प्रंचड नागरीकरण घडून आले. बेकारीत वाढ झाली. अन्नधान्य पिके दुर्लक्षित झाली. असे गंभीर परिणाम शेतीच्या व्यापारीकरणाचे झाले.

## २.३. पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ :

**जमीन महसूल :** जमीन कसणारे, कुळे किंवा शेतीची मशागत करणारे शेतकरी कर रूपाने सरकारला उत्पन्नातील कांही भाग देतात त्यास जमीन महसूल म्हणतात. जमीन महसूलासाठी शेतसारा हा प्रतिशब्द वापरला जातो.

**जहागिरदार :** सरदारानां लकरी पदाबरोबर सरकार किंवा राजा कडून जहागिरीच्या स्वरूपात प्रदेश तोडून दिले जात असत, त्या प्रदेशातुन जहागिरदार लोक महसूल गोळा करीत असत .

**कायमधारा पध्दत :** या पध्दती मध्ये शेतकरी अडचणीत येऊ नये व सरकारचे उत्पन्न बुडू नये म्हणून दरसालचा ठराविक महसूलाची अगोदरच निश्चिती केली.

**रयतवारी पध्दती :** या पध्दती मध्ये जमीनीचा कर जात असे. कर गोळा करण्यासाठी सरकार व रयत याचा प्रत्यक्ष संबंध येत असे.

**महालवारी पध्दती :** या पध्दती मध्ये जमीन महसूलाची वसूली संपूर्ण खेडे किंवा परगण्याचा एक भाग म्हणजे महाल, एक घटक गृहीत धरला जाई .

**नगदी पिके :** रोख रक्कम मिळवून देणारी पिके त्याना नगदी पिके म्हणतात.

## २.४. स्वयं अध्ययन-प्रश्नांची उत्तरे.

**✲ स्वयं अध्ययन प्रश्न क्रं. १)**

उत्तरे :- १) अ २) क ३) अ ४)अ ५)अ

**✲ स्वयं अध्ययन प्रश्न क्रं.-२)**

उत्तरे :- १) अ २) अ ३) अ ४)अ ५)अ

**✲ स्वयं अध्ययन प्रश्न क्रं.-३)**

उत्तरे :- १) अ २) अ ३) ब ४)क ५)ड

## २.५ सारांश

भारतातील ८०% लोक शेतीवर अवलंबून होते. शेती हा ग्रामीण समाजव्यवस्थेचा कणा होता. ग्राम, खेडयातील लोक शेती, पशुपालन, व्यवसाय करीत. बलुते पध्दत रूढ होती. त्या काळात गरजा कमी असत. त्यामुळे गरजा खेडयात पूर्ण केल्या जात असत. मनापासुन शेतीवर माया करणे, शेतीमध्ये कष्ट करणे. सरकारी कर, महसुल भरणे, जमीनदार, सरदार लोकांचे अत्याचार, अन्याय सहन करणे ही भारतीय शेतकऱ्याची खास वैशिष्टे होती. कंपनीच्या एकसंघ राजकीय सत्ता स्थापनेनंतर ग्रामीण भागाची स्वयंपूर्णता हळू हळू नष्ट झाली. व ग्रामीण अर्थव्यवस्था बदलत गेली. तिचे स्वरूप व्यापारी अर्थव्यवस्थेकडे झुकू लागले. कंपनीने भारतातील उघोग, हस्त-कला व्यवसाय, बऱ्यापैकी लघुउघोग नष्ट केले. परिणामी शेतीवर अतिरिक्त बोजा पडू लागला. बेकार झालेले लोक उदरनिर्वाहासाठी शेतीकडे वळू लागले. या जमीनी कसण्यासाठी शेतकऱ्याकडे दिलेल्या होत्या. मोठया जमीनदारानी आपल्या जमीनी छोटया शेतकऱ्याकडे दिल्या होत्या. ते शेतकरी ही जमीन स्वत:च्या मालकीच्या समजत. कंपनीच्या काळात जमिनदाराना शेतसाराऱ्यात वाढ करण्याचा अधिकार नव्हता.

कंपनीच्या काळात महसुल ही बाब राज्याचे उत्पन्न मानले. त्यामुळे जादा महसुल वसुल करण्यासाठी कायमधारा, रयतवारी, व महालवारी अशा वेगवेगळया महसुल पध्दतीचा वापर केला. महसुल कर वाढल्यामुळे भारतीय शेतकरी मोठया अडचणीत सापडला. खते, बि-बीयाणे, कृषी साधनाचा अभाव, ओले व कोरडे दुष्काळ, व सक्तीची महसुल पध्दती यामुळे शेतकरी कर्जबाजारी बनला. सावकारांना जमीनी विकून महसुल भरावा लागला. कर्ज थकल्यास जमीनींचे लिलाव झाले. पारंपारिक शेती पध्दतीतुन भरघोस उत्पादन होत नसे व कर्ज फेडता न आल्याने शेतकरी दरिद्री बनला.

कंपनीच्या काळात येथील शेती पावसावर अवलंबून होती. कंपनी सरकारने शेतीकडे लक्ष दिले नाही. शेतकऱ्यानां कोणत्याही सोई-सुविधा दिल्या नाहीत. इंग्रजानी भारतात राबविलेल्या जमीन महसुल पध्दती शेतकऱ्यांसाठी हिताच्या नव्हत्या. शेतीच्या क्षेत्रात इंग्रजानी आर्थीक साम्राज्यवाद चालू केला. शेतीचे व्यापारीकरण केले. युरापीयन बाजारपेठेत कापूस, चहा, निळ, कॉफी, विविध मसाल्याच्या वस्तु यांना प्रंचड मागणी होती. ही मागणी पूर्ण करण्याकरिता भारतीय शेतकऱ्यावर सदर पिकांचेच उत्पादन घ्यावे याची सक्ती केली. हा व्यापार व मिळणारा महसुल प्रंचड होता. तरी सुध्दा इंग्रजांनी भारतीय शेतीसाठी कोणत्याही सुधारणा केल्या नाहीत. परिणामी भारतीय शेती मागास राहिली. शेती उत्पन्नात वाढ नसताना सुध्दा इंग्रजानी शेतसारा वाढवत नेला. सरकार, सावकार, जमीनदार, व इंग्रज व्यापारी यांनी भारतीय शेतकऱ्यांचे प्रंचड आर्थीक शोषण केले.

**२.६ सरावासाठी प्रश्न :**

१. कायमधारा पध्दती विषयी थोडक्यात माहिती द्या.

२. दक्षिण भारतात कंपनी सरकारने सुरू केलेल्या जमीन महसूल पध्दतीचा आढावा घ्या.

३. भारतीय शेतीच्या व्यापारीकरणाची कारणे सविस्तर स्पष्ट करा.

४. शेतीच्या व्यापारीकरणाचे परिणाम लिहा.

**टीपा लिहा.**

१. कायमधारा पध्दत

२. रयतवारी पध्दत

३. महालवारी पध्दत

४. शेतीचे व्यापारीकरण

## २.७ संदर्भ ग्रंथ यादी

१. आचार्य जावडेकर शं. द. : आधुनिक भारत, पुणे-१९५३.

२. लोहार र. म. : आधुनिक भारताचा इतिहास, हर्षद प्रकाशन, सातारा.

३. डॉ. सरदेसाई बी. एन. आणि डॉ. नलावडे व्ही. एन. : आधुनिक भारताचा इतिहास. (१७५० ते १९५०) फडके प्रकाशन, कोल्हापूर -२००४.

४. डॉ. ग्रोवर बी. एल. (लेखक) व डॉ. बेल्हेकर एन. के. (अनुवादक) : आधुनिक भारताचा इतिहास, एस. चंद आणि कंपनी. प्रा. लि. रामनगर, नवी दिल्ली.-११००५५.

5. P. S. Joshi, S.V. Gholkar : History of Modern India.1800 to 19 S.Chand & Co.,New Delhi 1983.

६. डॉ. कायदे पाटील ग. वि. कृषी अर्थशास्त्र, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक.

7. Krishna K.L., Sundaram K., Dua Pami, Editors: 'Perspectives on Economic Development and Policy in India, ISSN. 2198-0012 Published by Springer Nature .189121.

8. Monica Roy: 'Economic Impact of the British Rule in India, & Economy of India under Company Rule,.

9. Pandit Sunderlal: 'British Rule in India, ISBN: 978-93-528-0803-8 SAGE Publication India Pvt. Ltd. New Delhi. 110044

10. Pramila Suri, Indira Zaidi ; Impact of British Rule On Indian Economic.

11. B. L. Groover : A New Look On Modern Indian History

***

# घटक क्र. ३
# उद्योग
# (Industry)

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्टे

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन

३.२.१ औद्योगिक ऱ्हास/अनुद्योगिकीकरण

३.२.२ अवजड उद्योगाचा उदय - कापड, ज्यूट/ताग, रेल्वे

३.२.३ कामगार चळवळीचा उदय

३.२.४ वसाहतिक राज्य आणि औद्योगिक विकास

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके

## ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला-

- अनुद्योगिकरण म्हणजे काय ते सांगता येईल.
- अनुद्योगिकरणाची कारणमिमांसा करता येईल.
- अनुद्योगिकरणाचे परिणाम सांगता येतील व चिकित्सा करता येईल.
- १९ व्या शतकातील कापड उद्योग कसा उदयास आला ते स्पष्ट करता येईल.
- भारतातील ज्यूट/ताग उद्योगाचे महत्त्व स्पष्ट करता येईल.

* भारतीय रेल्वेचा विकास व विस्तार समजण्यास मदत होईल.
* भारतीय रेल्वेचा अर्थव्यवस्थेवरील परिणाम स्पष्ट करता येईल.
* भारतात कामगार संघटना कशी उदयास आली यावर प्रकाश पडेल.
* १९व्या शतकात भारतात औद्योगिक विकास झाला काय? याची मांडणी करता येईल.
* १९व्या शतकातील ब्रिटिशांचे औद्योगिक धोरण स्पष्ट करता येईल.

## ३.१ प्रस्तावना

भारतामध्ये ईस्ट इंडिया कंपनी एक व्यापारी कंपनी म्हणून आली. व्यापाराच्या माध्यमातून अधिका-अधिक फायदा मिळवणे हा कंपनीचा मूळ उद्देश होता. मुघल पातशाहाकडून मिळवलेल्या सवलतीचा फायदा घेत कंपनीने आपले व्यापारी जाळे निर्माण केले. भारतातील अंतर्गत राजकीय संघर्ष व कंपनीला या काळात झालेला आर्थिक फायदा हे दोन्ही घटक आपले व्यापारी व राजकीय सत्ताकेंद्र स्थापन करण्यास पोषक घटक ठरले. १८ व्या शतकात भारतातील केंद्रीय सत्ता दुबळी झाली त्याचा फायदा घेत ब्रिटिशानी प्रादेशिक सत्तावर वर्चस्व निर्माण करण्यास प्रारंभ केला. बंगालमध्ये सत्ता स्थापन केल्यानंतर संपूर्ण भारतात राजकीय व व्यापारी विस्तार करण्यास सुरुवात केली. अनेकविध अनैतिक मार्गांचा अवलंब करून आर्थिक पिळवणुकीचे धोरण स्विकारले, ब्रिटिशांच्या व्यापारी धोरणामुळे भारतातील अनेक उद्योगाना आव्हान निर्माण झाले. याच काळात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाल्याने या उद्योगातून प्रचंड प्रमाणात पक्क्या मालाची निर्मिती होवू लागलेली होती. तयार झालेल्या पक्क्या मालाला हक्काची बाजारपेठ व पक्का माल तयार करण्यासाठी कच्चा माल पुरविणारी शेतकी व्यवस्था या नात्याने त्यांनी भारताच्या बाबतचे आर्थिक धोरण स्विकारले. सन १८१३ नंतर ईस्ट इंडिया कंपनीची भारतातील व्यापारी मक्तेदारी संपुष्ठात आली व भारताबाबत खुल्या व्यापाराचे धोरण स्विकारले. खुल्या व्यापाराच्या शर्यतीत भारतातील पारंपारीक हस्तउद्योग तग धरू शकले नाहीत, त्यातून त्यांचा ऱ्हास घडून आला. भारतातील उद्योगधंद्याचा ऱ्हासाच्या प्रकियेत खूप मोठ्या प्रमाणात बेकारांची संख्या वाढत गेली व त्याचा बोजा शेती अथवा कृषी व्यवस्थेवर पडत गेला. भारतातील पारंपारीक कृषी व्यवस्था हा बोजा सहन करू शकली नाही. ब्रिटिशांच्या नवीन महसूली धोरणामुळे भारतीय शेती व्यवस्थेत नगदी पिकांना मागणी वाढली. त्यामुळे भारतात अन्नधान्याची टंचाई निर्माण होण्यास सुरुवात झाली. शिवाय गरीबीतही वाढ होण्यास सुरुवात झाली. १८ व्या शतकाच्या मध्यानंतर भारतीय भांडवलदारांनी नवीन उद्योगधंदे स्थापन करण्यास सुरुवात केली. यामध्ये कापड, ज्यूट, लोह-पोलाद, पोलाद इ.चा समावेश होता. ब्रिटिशांनी याकाळात व्यापारीवादी धोरणाला अनुसरून आधुनिक दळणवळण साधनांचा विकास करण्यास सुरुवात केलेली होती. यामध्ये पोस्ट, रेल्वे, तार, इ. समावेश होता. ब्रिटिशांनी भारतात त्यांच्या फायद्यासाठी सुरू केलेली रेल्वे मात्र भारतीय उद्योगधंद्याच्या वाढीस पुरक घटक ठरलेली दिसते. खेडोपाड्यातील बेकार वर्ग हा या उद्योगासाठी स्वस्तातील कामगार होता. त्याचा फायदा उद्योगांच्या विकासाला झाला. परंतु पुढे यातून कामगारवर्गाचा उदय झाला. व कामगार चळवळ निर्माण झाली. प्रस्तुत प्रकरणात १९ व्या शतकातील अर्थव्यवस्थेच्या दृष्टीकोणातून भारतात घडून आलेला औद्योगिक ऱ्हास, व नव्याने उदयास आलेले कापड, ज्यूट, रेल्वे उद्योगाचा अभ्यास करावयाचा आहे. शिवाय या नविन उद्योगाच्या माध्यमातून उदयास

आलेली कामगार चळवळीचा अभ्यास करावयाचा आहे.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ भारतातील उद्योगधंद्याचा ऱ्हास/अनुद्योगिकरण

प्राचीन काळापासून ते आधुनिक काळातर्यंत भारतात देशी उद्योगधंदे व हस्तकलेची प्रदीर्घ परंपरा पहावयास मिळते. भारतीय अर्थव्यवस्थेत या उद्योगाचे स्थान अतिशय महत्त्वाचे होते. भारतातील असंख्य खेड्यात व लहान-मोठ्या शहरात विविध प्रकारचे हस्तकौशल्याचे उद्योग चांगले भरभराटीस आले होते. भारतात तयार होणाऱ्या या वस्तूनी जगातील बहुतांश बाजारपेठा व्यापलेल्या होत्या. औद्योगिक क्रांतीच्या अगोदर युरोपमधील अनेक देश मागासलेले होते तेव्हा भारत हा जगातील अव्वल दर्जाचा औद्योगिकदृष्ट्या प्रगत देश मानला जात होता. ढाक्याची मलमल तर सर्वदूर विख्यात होती. या मलमलीला 'शबनम' असे म्हटले जात असे. 'शबनम म्हणजे दवबिंदू' अशी उपमा युरोपीय लोक देत असत. भारतातील कापड उद्योगासंबंधी पायरड याने असे म्हटले आहे की, ''भारतातील प्रमुख वैभवी वस्तू या सूती व रेशमी कापडाच्या होत्या आणि जगातील केप ऑफ गुड होफ ते चीनपर्यंतच्या देशातील सर्व स्त्री व पुरुष सर्व अंगभर ही वस्त्रे वापरत असत.'' भारतातील उद्योगधंद्या संदर्भात फ्रेंच प्रवासी बर्नियर याने केलेली नोंद महत्त्वाची वाटते ती अशी की, ''जगात एकही असा भारतासारखा देश नाही की जेथे इतक्या विविध प्रकारच्या वस्तू पाहावयास मिळतात. फ्रान्समधील व्यापारी भारतीय विणकरांना आगाऊ पैसे देऊन त्यांच्याकडील वस्त्रे खरेदी करीत व युरोपभर विकत असत. भारतातून त्यावेळी सुती तलम कापड, रेशमी कापड, मलमली मऊमऊ गालीचे.... सोने-चांदीचे अलंकार, नक्षीकाम व शोभेच्या वस्तू... जगभर खपत असत.'' यावरून भारताचे उद्योगधंद्यातील वर्चस्व दिसून येते व हे वर्चस्व १८ व्या शतकापर्यंत टिकून होते. १८ व्या शतकापर्यंत भारत हे जगाचे सर्वात मोठे व्यापारी केंद्र होते. भारतामध्ये ब्रिटिश सत्तेचा विस्तार झाल्यानंतर या व्यापारी केंद्राचा ऱ्हास होण्यास प्रारंभ झाला. इंग्लंडच्या व्यापारी व औद्योगिक हितसंबंधाच्या रक्षणासाठी भारतातील पारंपारिक उद्योगधंद्याचा बळी देण्यास सुरुवात केली. ब्रिटिशानी भारताच्या बाबतीत राबवलेली आर्थिक धोरणे व आर्थिक पिळवणुकीचे विविध मार्ग, कसबी कारागिरीसाठी प्रसिद्ध असलेल्या गावांना व शहरांना उजाड बनवत गेले. खेड्यातील कुटिरउद्योगाचा व स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचाही ऱ्हास झाला. यासंबंधी अनेक पाश्चात्त्य विचारवंतानी असे मत व्यक्त केले आहे की, कुटिरोद्योगांचा ऱ्हास एक जागतिक प्रक्रिया होती आणि औद्योगिक क्रांतीचा तो एक स्वाभाविक परिणाम होता. पण त्या बाबतीत भारत व युरोपमध्ये एक मूलभूत फरक आढळून येतो. युरोपमध्ये कुटिरोद्योगांचा ऱ्हास तेथील वाढत्या कारखान्यामुळे व वाढत्या उत्पादनामुळे झाला. तर भारतातील कुटिरोद्योगांचा ऱ्हास हा ब्रिटिश सत्तेचा परिणाम होता. डॉ. धनंजय गाडगीळ हे या संबंधी असे म्हणतात की, ''भारतातील हस्तोद्योगांचा ऱ्हासही भारताच्या आर्थिक परिवर्तनातील अत्यंत नाट्यमय घडामोड होती''. त्याच्या मते हा ऱ्हास वेगाने व पूर्णांशाने घडून आला. १८ व्या शतकाच्या अखेरीपासून सुरू झालेली उद्योगधंद्याच्या ऱ्हासाची ही प्रक्रिया १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत अखंडपणे सुरू होती. भारतातील उद्योगधंद्याचा ऱ्हास घडून येण्यास ब्रिटिश सत्ता ज्याप्रमाणे कारणीभूत होती त्याप्रमाणे इतरही काही कारणे याला कारणीभूत होती ती खालीलप्रमाणे-

### अ) उद्योगधंद्याच्या ऱ्हासाची कारणे

### १) संस्थानी/राजे-महाराजे यांचा राजाश्रय राहिला नाही

भारतातील बऱ्याच हस्तकौशल्यांच्या उद्योगांची भरभराट ही येथील राजे-महाराजानी उद्योगांना दिलेल्या राजाश्रयामुळे झाली होती. शिवाय हे राजे-रजवाडे, नवाब, सरदार व दरबारातील लोक या मालाचे गिऱ्हाईक होते. परंतु ब्रिटिश सत्तेने भारतात एकछत्री अंमल सुरू केला व या राजाचे वर्चस्व संपुष्ठात आणले. भारतातील अनेक संस्थाने एकापाठोपाठ एक गिळंकृत केली व काहीना आपल्या नियंत्रणाखाली आणले. भारतातील संस्थाने खालसा केल्यामुळे अथवा जिंकल्यामुळे लोप पावत गेली तस-तसा भारतीय हस्तउद्योगाचा ऱ्हास सुरू झाला. हे जरी खरे असले तरी हा ऱ्हास दीर्घकाळ चालू राहीला कारण संस्थाने जरी नष्ट झाली असली तरी सवयी दीर्घकाळ बदलल्या नाहीत. त्यामुळे हे हस्तउद्योगही एकदम नाहीसे झाले नाहीत. मूल्यवान वस्तुंना असणारी एकूण मागणी घटल्याने उच्च दर्जाच्या हस्तकलांच्या वस्तूचे उत्पादन थांबले आणि सामान्य वस्तूची मागणीदेखील फार काळ टिकाव धरू शकली नाही. अशा रीतीने भारतीय राजवटीचा लोप हे भारतीय हस्तउद्योगांच्या ऱ्हासाचे पहिले महत्त्वाचे कारण होते.

### २) ब्रिटिशांचे स्वार्थी व जुलमी धोरण :

ब्रिटिशांचे व्यापारवादी स्वार्थी धोरण हेही भारतीय उद्योगधंद्याच्या ऱ्हासाचे कारण होते. कंपनीचे व्यापारी कंपनीच्या व्यापाराबरोबर खाजगी व्यापारही करत होते. यातून भारतीय कारागीराचा छळ करण्यात आला. भारतीय हस्तकौशल्याच्या वस्तूंना जगात अनेक ठिकाणी मागणी होती. हा व्यापार फायदेशीर होता म्हणून युरोपीय व्यापाऱ्यांनी भारताच्या परराष्ट्रीय व्यापारावर अधिकाधिक वर्चस्व प्रस्थापित केले. आपला माल परदेशी बाजारपेठेत विकावयाचा तर या व्यापाऱ्याच्या मार्फतच विकला पाहिजे, अशी स्थिती भारतीय कारागीराच्या बाबतीत निर्माण झाली. युरोपीय व्यापारी व त्यांचे दलाल भारतीय कारागिरांचा माल कमी भावात मागत. शिवाय भारतीय माल स्वस्तात खरेदी करण्यासाठी एकत्र येत. व्यापाराची मक्तेदारी कंपनीच्या ताब्यात ठेवण्यासाठी कंपनीचे प्रतिनिधी भारतीय कारागीरांचा अनेक प्रकारे छळ व जुलूम जबरदस्ती करीत. या शोषणाला कंटाळून अनेक कारागिरांनी आपले व्यवसाय बंद केले.

### ३) पक्षपाती जकात धोरण :

भारत हा हस्तोद्योगातील मालाचा, विशेषतः कापडाचा प्रमुख निर्यातदार देश होता. परंतु इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीनंतर प्रचंड प्रमाणात तयार होवू लागलेल्या वस्तूंना व उद्योगांना संरक्षण देण्यासाठी संरक्षक जकातीचे धोरण स्वीकारले. ते धोरण पक्षपाती स्वरूपाचे होते. भारतातील सुती व रेशमी कापडावर अनुक्रमे सन १७०० व १७२० मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने कायदा करून बंदी घातली. जे लोक भारतीय कापड वापरतील त्यांना २०० पौंड दंडाची शिक्षा ठेवण्यात आली. या कायद्याचा परिणाम न होता भारतीय कापडाची लोकप्रियता कायम राहिली. तेव्हा भारतीय कापडाच्या इंग्लंडमधील आयातीवर मोठी जकात बसविण्यात आली. तर ब्रिटिश मालाच्या भारतातील निर्यातीवर सन १७८३ नंतर १०-१५% पर्यंत आर्थिक मदत जाहीर करण्यात आली. भारतीय कापड इंग्लंडमध्ये महाग वाटावे व भारतात ब्रिटिश कापड स्वस्त वाटावे अशा प्रकारचे हे धोरण होते.

या दोन्हीचा परिणाम स्वरूप भारतीय कापडउद्योगाची दोन्ही ठिकाणची बाजारपेठ गेली. भारतीय उद्योगाच्या ऱ्हासाला ब्रिटिशांचे पक्षपाती धोरणच कारणीभूत होते. ब्रिटिशांच्या पक्षपाती जकातीच्या धोरणामुळे भारत केवळ एक आयातदार देश बनला होता. या संबंधी अमिया बागची असे म्हणतात की, ''सन १९१३ पर्यंत जवळजवळ ७५ वर्षे इंग्लंडच्या सूती कापडाचा प्रमुख आयातदार देश म्हणजे भारतच होता. इंग्लंडची ४०% पेक्षा अधिक सूती कापडाची निर्यात एकट्या भारतात होत होती.''

### ४) वसाहतवादी धोरण :

इंग्लंडने भारताला आपली वसाहत बनविल्यानंतर त्यांनी भारतावरील आपली पकड अधिक घट्ट बसविली. इंग्लंडच्या भांडवलवादी अर्थव्यवस्थेची वसाहत या दृष्टीकोणातून भारतीय सरंजामशाही अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्था उखडून टाकणे क्रमप्राप्त होते. स्वतःच्या फायद्यासाठी भारताची जेवढी म्हणून पिळवणूक करता येईल तेवढी करण्याचे धोरण ब्रिटिशांनी स्विकारले. औद्योगिक क्रांतीने तयार झालेला पक्का माल भारतीय बाजारपेठेत स्वस्तात विकावा यासाठी खुल्या व्यापाराचे धोरण स्विकारले. यामुळे भारतीय उद्योगधंद्यांचा ऱ्हास घडून आला. भारतीय उद्योगाबरोबर शिक्षण, सामाजिक संस्था, शेती, प्रशासन इत्यादी क्षेत्रात नविन धोरणे स्वीकारण्यात आली ती एका दृष्टीकोनातून अनुकूल होती. परंतु अर्थव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून प्रतिकूल स्वरूपाची होती व वसाहतवादाला पुरक होती. त्यामुळे भारतातील अनेक हस्तकौशल्याचे उद्योग बंद पडले.

### ५) खुल्या व्यापाराचे धोरण :

सन १८१३ पर्यंत भारतात ईस्ट इंडिया कंपनीकडे भारताच्या संपूर्ण व्यापाराची मक्तेदारी होती. परंतु सन १८१३ च्या कायद्याने इंग्लंडच्या सरकारने ईस्ट इंडिया कंपनीची व्यापारी मक्तेदारी संपुष्ठात आणली. सन १८१३ च्या अगोदर ईस्ट इंडिया कंपनी भारतातील वस्तू विकत घेवून त्या युरोपमध्ये विकत असे. मात्र सन १८१३ च्या भारत कायद्यानंतर इंग्लंडमधील व्यापारीसुद्धा भारतात आले व त्यांचा माल विकण्यासाठी मोकळे झाले. ह्याच कायद्याने विशेषतः लॅकेशायरमध्ये तयार झालेल्या कापडासाठी भारताची बाजारपेठ खुली झाली. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था उध्वस्त झाली. सन १८१३ पूर्वीच ब्रिटिशांनी भारतातील जमीन महसूलाच्या माध्यमातून आर्थिक निःसारण केल्यामुळे भारताच्या पारंपारिक अर्थव्यवस्थेतील रोजगाराला तडा गेला होता. ब्रिटिशांनी भारतीय संस्थाने खालसा केल्यामुळे अगोदरच हस्तउद्योगांचा ऱ्हास होण्यास सुरुवात झाली होती. त्यातच खुल्या व्यापाराच्या धोरणाने भारतीय माल जागतिक बाजारपेठेत ब्रिटिशांच्या जकातीच्या धोरणामुळे टिकू शकला नाही.

### ६) युरोपीय मालाशी स्पर्धा :

भारतीय उद्योगधंद्याच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरलेली घटना म्हणजे इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती. युरोपीय कारखान्यातून तयार झालेल्या पक्क्या मालाची भारतात मोठ्या प्रमाणात आयात होऊ लागली. यंत्राच्या साहाय्याने उत्तम प्रतीचा, स्वस्त दरातील व प्रचंड प्रमाणावरील पक्का माल तयार होऊ लागला. हाताने काम करणाऱ्या भारतीय कारागीरांना यंत्राच्या वेगाशी स्पर्धा करता येईना. यंत्रोत्पादित माल हस्तोद्योगातील मालापेक्षा अधिक स्वस्तही मिळू शकत असे. दर्जाच्या बाबतीत भारतीय नागरी विणकर केव्हाही सरस ठरला असता. कारण ढाक्याच्या मलमलीने मँचेस्टर व लॅकेशायरमधील कापड उत्पादकांना हैराण करून सोडले होते. परंतु किंमतीच्या

बाबतीत यंत्रोत्पादीत युरोपीय कापड भारतीय कापडापेक्षा कितीतरी स्वस्त होते. यासंबंधी रजनी पाम दत्त असे नमूद करतात की, ''इंग्लंडमधील यंत्रनिर्मित कापडमालामुळे विणकर बेकार झाले तर यंत्रनिर्मित सुतामुळे सूत कातणारे बेकार झाले. १८१८ ते १८३६ या काळात इंग्लंडमधून भारतात होणाऱ्या सुताच्या निर्यातीत ५२०० पटीनी वाढ झाली. हीच प्रक्रिया रेशमी व लोकरी माल, लोखंड, भांडी, काच व कागद यांच्या बाबतीत दिसून येते.

**७) भारतीय उद्योगातील मूलभूत दोष :**

भारतीय हस्तकौशल्याच्या उद्योगात काही मूलभूत दोष होते. त्यामुळेही काही उद्योगाचा ऱ्हास घडून आला. भारतातील बहुतांश हस्तकौशल्याचा उद्योगात तयार होणारा माल हा उच्चवर्गीय लोकात अधिक पसंत होता व तोच वर्ग प्रामुख्याने यांचे गिऱ्हाईक होते खास करून परकीय लोक. भारतीय मालाला भारतापेक्षा परदेशात अधिक मागणी होती. परंतु या कारागिरांनी असा कधीही विचार केला नाही की, जर आपल्या मालाला परदेशातून मागणी कमी झाली तर आपल्या मालाचे काय किंवा किंमतीचे काय. शिवाय युरोपीयन ग्राहकांना भारतीय वस्तूत युरोपीय संकेत, युरोपीय आकृतिबंध आणि युरोपीय कलात्मकता हवीशी वाटत होती. या काळातील व्यापार हा बराचसा युरोपीयांच्या हाती असल्याने या व्यापाऱ्यांनी युरोपीय नमुने आणि आकृतिबंध भारतीय कारागिरांच्या माथी मारण्यास सुरुवात केली. परिणामी भारतीय वस्तू ह्या युरोपीय कला-वस्तूच्या भ्रष्ट नकला होऊ लागल्या त्यामुळे भारतीय अस्सल कलावस्तू लोप पावल्या. याशिवाय भारतीय सुखवस्तू ग्राहकांची जागा नवशिक्षित वर्गाने घेतली या वर्गाकडून भारतीय हस्तकला कौशल्याच्या वस्तूना मागणी राहीली नाही. नव्याने श्रीमंत झालेल्या सुशिक्षित भारतीयांनी १९ व्या शतकाच्या शेवटी युरोपीय राहणीमान आत्मसात केले. भारतीय हस्तकलाच्यावर यांचा विशेष प्रभाव पडला. भारतीय मालाची मागणी घटून त्याचा मोठा आघात या उद्योगावर झाला. कारण भारतीय हस्तउद्योग काळाच्या अनुरूप बदलू शकले नाहीत.

भारतातील हस्तउद्योग हे संघटित स्वरूपाचे नव्हते, त्याचे स्वरूप विस्कळित स्वरूपाचे होते. त्यामुळे ब्रिटिशांनी ज्यावेळी खुल्या व्यापारी धोरणाचा स्विकार केला त्यावेळी हे त्यांचा सामना करू शकले नाहीत, हा भारतीय उद्योगातील प्रमुख दोष होता. याच्या उलट युरोपीय देशात व्यापारी लोकांचे संघटन होते व त्याचे स्वरूप 'गिल्ड'सारखे होते. सभासद कारागिरांचे कल्याण आणि मालाचा दर्जा यांची काळजी या संघटना घेत असत असे भारतात घडले नाही.

थोडक्यात भारतातील उद्योगधंद्याच्या ऱ्हासासाठी ब्रिटिशांनी खालील गोष्टीचा अवलंब केला.

१) भारतीय मालावर इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणात जकात लावली.

२) भारतातील व्यापाराच्या बाबत त्यांनी खुल्या व्यापाराचे धारण स्विकारले.

३) भारतातून प्रचंड प्रमाणात कच्चा मालाची निर्यात इंग्लंडमध्ये केली.

४) अंतर्गत जकाती व अबकारी कर लावले.

५) भारतातील ब्रिटिश व्यापाऱ्यांना खास सवलती बहाल केल्या.

६) भारतीय कारागीरांना सक्तीने माल विकण्यास भाग पाडले.

७) भारतीय संस्थाने खालसा करून हस्तउद्योगाचा राजाश्रय काढून घेतला.

८) इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीतून तयार झालेला पक्का माल भारतात सक्तीने खपविण्याचा प्रयत्न केला.

## ब) औद्योगिक ऱ्हासाचे परिणाम

भारतामध्ये १८ व्या व १९ व्या शतकामध्ये घडून आलेल्या औद्योगिक ऱ्हासाचे अनेक परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर घडून आले ते खालीलप्रमाणे-

### १) औद्योगिक शहर व नगराचा ऱ्हास घडून आला

भारतामध्ये प्राचीन काळापासून अनेक शहरे व नगरे विविध हस्तउद्योगासाठी प्रसिद्धीस आलेली होती. यामध्ये बंगालमधील ढाका, बुर्शिदाबाद, बिहारमधील पाटणा, उत्तर प्रदेशामधील जौनपूर, वाराणसी, लखनौ व आग्रा, पंजाबमधील मुलतान व लाहोर, गुजरातमधील अहमदाबाद व सुरत, मध्यप्रदेशमधील चंदेरी, बऱ्हाणपूर, आंध्रप्रदेशमधील मच्छलीपट्टणम, विशाखापट्टणम इ. अनेक शहरे होती. ढाका, मुर्शिदाबाद व सुरत इ. गर्दीच्या व प्रचंड भरभराटीच्या शहरांना अवकळा प्राप्त झाली. ढाक्याचे वर्णन तर 'भारताचे मँचेस्टर' असे केले जात होते. या शहरामध्ये ज्या गतीने औद्योगिक ऱ्हास घडून आला त्यासंबंधी आर. पी. दत्त असे म्हणतात की, ''ढाका, मुर्शिदाबाद, सुरत व त्यासारखी उद्योगप्रधान शहरे ब्रिटिशांच्या शासनामुळे अल्पावधीत महाभयंकर युद्धाच्या विध्वंसाने किंवा परकीय आक्रमणाने झाली नसती इतकी पूर्णपणे उद्‌ध्वस्त झाली.''

### २) भारतीय अर्थव्यवस्थेचे ग्रामीणीकरण

भारतातील औद्योगिक ऱ्हासामुळे भारतीय अर्थव्यवस्था शेतीवर आधारीत झाली व शेतीवर प्रचंड भार पडू लागला. भारतातील उद्योगप्रधान शहरे झपाट्याने रिकामी झाली. या शहरातील उद्योगांचा ऱ्हास घडून येत असताना या उद्योगातील मजूर व कारागीर इ. बेकार झालेला वर्ग खेड्याकडे पर्यायाने शेतीकडे वळला. त्यामुळे यांचा अधिकचा भार शेतीवर झाला. शेतीपासून जास्तीत जास्त कच्चा मालाचे उत्पादन घेण्यास सुरुवात झाली. या काळातील ब्रिटिशांची आर्थिक धारणा भारताच्या बाबतीत अशा प्रकारची होती की, भारत एक केवळ इंग्लंडसाठी कच्चा माल पुरवणारा देश अशी राहील. उद्योगप्रधान इंग्लंडसाठी भारतातील कृषी साधनांच्या विकासाची आवश्यकता वाटत होती. पण त्यातील एक महत्त्वाचा अडसर म्हणजे भारतातील कच्चा माल दुय्यम प्रतीचा होता. यावर उपाय म्हणून सन १८३३ च्या चॉटर ॲक्टने युरोपीय लोकांना भारतात राहण्याची व संपत्ती विकसित करण्याची परवानगी दिली. यातून भारतात नगदी पिकांच्या उत्पादनास सुरुवात झाली. शेतीवरील अधिकचा भार व ब्रिटिश सरकारने युरोपीय मळेवाल्याना दिलेले संरक्षण यामुळे भारतीय अर्थव्यवस्था अधिकच बिघडली. शेतीवर आधारीत लोकसंख्या वाढल्याने उत्पादनात वाढ झाली नाही मात्र बेकारीत वाढ झाली. या काळात शेतकी उत्पादन स्थिर राहिले परंतु लोकसंख्या वाढत गेली त्यामुळे शेतीचे आधुनिकीकरण झाले नाही.

### ३) बेकारी वाढली

औद्योगिक ऱ्हासाचा अतिशय मोठा परिणाम हस्तकलामध्ये प्रवीण असलेल्या शेकडो कारागीरांवर विशेषतः सूतकताई करणारे व विणकर यांच्यावर झाला. उद्योग बंद पडल्याने त्यांच्या हाताला काम राहिले नाही व त्यानेच अनेक शेतकऱ्यांचे जोडधंदेही बंद पडले. यावर कोणताही पर्याय तत्कालिन अर्थव्यवस्थेमध्ये निघाला नाही. कारण जुन्या उद्योगधंद्यांचा ऱ्हास होत असताना नवीन उद्योगधंदे मात्र सुरू झाले नाहीत. त्यामुळे यातून खूप मोठ्या प्रमाणात कामगार बाहेर फेकले गेले व बेकारी वाढली. या वाढलेल्या बेकारीचा ताण शेतीवर पडलेला दिसतो. शेतीचे स्वरूप पारंपारिक असल्याने या अधिकच्या बोज्याला शेतीव्यवसाय पेलू शकला नाही. त्यामुळे या काळात गरिबीत मोठी वाढ झालेली दिसते.

**४) स्वयंपूर्ण ग्रामीण जीवनाचा ऱ्हास घडून आला**

भारतात शेती व उद्योग हे परस्पर पूरक स्वरूपाचे होते. परंतु ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणाच्या परिणाम स्वरूप ग्रामजीवनातील ही परस्परपूरकता नष्ट झाली व छोट्या-छोट्या उद्योगांचा ऱ्हास झाला. गावच्या गरजा गावात पूर्ण होत होत्या परंतु नव्या साम्राज्यवादी व्यवस्थेत संपूर्ण ग्रामीण जीवनच बदलल्याने मूळची स्वयंपूर्ण खेडी अनेक बाबतीत परावलंबी झाली. आधुनिक दळणवळणाच्या साह्याने परदेशी माल खेड्यापर्यंत पोहोचू लागला आणि खेड्यामधील कच्चा माल परदेशात सहज जावू लागला. या संपूर्ण प्रक्रियेवर ब्रिटिशाची मजबूत पकड असल्याने भारताचे या व्यवस्थेमध्ये दुहेरी शोषण झाले. भारत ही निव्वळ एक ब्रिटिशांची शेतकी वसाहत बनून राहीला. शिवाय या संपूर्ण प्रक्रियेत ग्रामीण जीवनाचा हळूहळू ऱ्हास घडून आला.

**५) भारतीय शेतीचे व्यापारीकरण**

१९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत घडून आलेल्या औद्योगिक ऱ्हासाच्या प्रक्रियेमुळे भारतातील छोटे-मोठे उद्योग लोप पावले व बेकार झालेले मजूर व कारागीर शेतीकडे वळले. शेतीवर यांचा अतिरिक्त ताण जरी पडलेला असला तरी ब्रिटिशांची या काळातील आर्थिक धोरणे अशाप्रकारची होती की, भारतीय शेतकऱ्यांनी पारंपारीक शेतीऐवजी नगदी पिके घेण्यास सुरुवात केली. यामध्ये ताग, निळ, रबर, चहा, कापूस, कॉफी इ. नगदी पिकाच्या उत्पादनास प्रोत्साहन व विशेष प्रयत्न केले. उद्योगधंद्यातून बेकार झालेले मजूर स्वस्तात या कामासाठी मिळत असल्याने शेतीसाठी आवश्यक मनुष्यबळ या काळात प्राप्त झाल्याने आधुनिक व्यापारी पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. यातून भारतीय शेतीचे पारंपारीक स्वरूप नष्ट झाले व शेतीचे व्यापारीकरण झाले.

**६) राष्ट्रीय अर्थव्यवस्था व नविन उद्योगाचा उदय**

औद्योगिक ऱ्हासामुळे असंतोष निर्माण झालेला असला अथवा पारंपरिक ग्रामजीवनाची स्वयंपूर्णता नष्ट झालेली असली तरी दुसरीकडे ग्रामजीवनात बंदिस्त असलेल्यांचा संबंध बाह्य जगाशी आला. भारतीय खेडी परदेशी बाजारपेठाशी जोडली गेली, यातून नवीन उद्योगधंद्याचा उदय झाला. ब्रिटिशांनी आर्थिक धोरणाच्या माध्यमातून जरी लुटण्याचा अथवा औद्योगिक ऱ्हास घडवून आणण्याचा प्रयत्न चालवलेला असला तरी आधुनिक शोषणाचे माध्यम म्हणून ज्या दळणवळणाच्या सोयी भारतात उभ्या केल्या. त्याच सोयी सुविधा भारतात आधुनिक उद्योगधंदे उदयास येण्यास सहाय्यभूत ठरल्या. याच्या माध्यमातून पुढे नविन उद्योगधंदे उदयास आले.

**क) औद्योगिक ऱ्हासाची चिकित्सा :**

भारतातील उद्योगधंदे १८ व्या शतकापर्यंत संपूर्ण युरोपमध्ये नव्हे तर जगामध्ये प्रसिद्ध होते. विशेषतः हस्तकौशल्याच्या वस्तू. ब्रिटिश सत्ता भारतात स्थिरस्थावर झाल्यानंतर ब्रिटिशांनी भारतात जी आर्थिक धोरणे राबविली त्याच्या परिणामस्वरूप या काळात भारतीय उद्योगांचा ऱ्हास घडून आला. पाश्चिमात्त्य देशात औद्योगिकरणाची प्रक्रिया चालू असताना भारतात मात्र अनुद्योगिकरण चालू होते यासंबंधी अनेक संशोधक व विचारवंतानी यांची विविध अंगानी चिकित्सा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आर. सी. दत्त, चि. व्ही. जोशी, बी. डी. बसू, डॉ. डी. आर. गाडगीळ, रजनीपामदत्त इत्यादी विचारवंतानी व अभ्यासकांनी ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणाच्या परिणामस्वरूप कशा प्रकारे औद्योगिक ऱ्हास घडून आला याचे सविस्तर विवेचन केलेले आहे.

परंतु अमेरिकन अभ्यासक मॉरिस-डी-मॉरिस "Towards a reinterpetation of 19th Century Indian economic history" या लेखामध्ये असे म्हणतात की, भारताचे अनुद्योगीकरण ही एक कल्पित गोष्ठ होती. अनुद्योगीकरणाच्या सिद्धांताला पुरेसा सांख्यिकी आधार नव्हता असे मत ते मांडतात. त्याशिवाय या लेखात ते असेही म्हणतात की, ''ब्रिटनमधून भारतात आयात केलेल्या कापडाने भारतातील हातमागावर तयार कापडाशी स्पर्धा केली असली तरी इंग्लंडमध्ये कारखान्यात तयार झालेल्या सूती धाग्यामुळे भारतातील विणकरांची स्पर्धा करण्याची क्षमता बळावली.''

मॉरीस-डी-मॉरिस यांच्या म्हणण्याला भारतीय इतिहासकारांनी आक्षेप घेतलेला आहे. त्यांच्या मते ब्रिटनमधील आयात कापडाच्या तुलनेत हा धागा अल्प प्रमाणात होता व मॉरिस-डी-मॉरिसच्या म्हणण्यानुसार धाग्याच्या आयातीमुळे कापडाच्या आयातीने केलेले नुकसान भरून निघाले हे चूक आहे.

वास्तवात भारतातील शेतकरी व गरीब मजूर वर्ग एवढा दरिद्री होता की त्याला जाडे-भरडे कापड खरेदी करण्याशिवाय पर्याय नव्हता. ब्रिटनमध्ये मशीनवर तयार केलेले कापड त्याला परवडत नसे. यामुळेच लॅकेशायरमधील कापडाला भारताच्या ग्रामीण भागात पोहचण्यासाठी वेळ लागला. मात्र भारतातील पारंपारीक पद्धतीने तयार केलेल्या तलम व मध्यम प्रतीच्या कापडाला मात्र ब्रिटनमधून येणाऱ्या कापडाच्या आयातीमुळे तडा बसला.

राष्ट्रवादी विचारसरणीच्या इतिहासकारांनी असे मत मांडले की, ब्रिटिश काळात शहरी भागातील हस्तकला उद्योगाचा ऱ्हास झाला. सूत कातण्याचा जो धंदा होता त्यावर वाईट परिणाम झाला. भारतातील पारंपारिक विणकर देखील इंग्लंडमधील आयात केलेला धागा वापरू लागला त्यामुळे ग्रामीण भागातील कारागीरावर ब्रिटिशांनी केलेल्या बदलांचा मोठा परिणाम झाला.

डॅनियल थॉर्नर यांच्या मते सन १८८१-१९३१ या काळातील जनगणनांचा भारतीय राष्ट्रवाद्यानी घेतलेला आधार पुरेसा शास्त्रीय नव्हता. W. H. Moreland व युरोपीय प्रवाशांचे वृत्तात व ब्रिटिश दप्तरे यांनीही भारताच्या अविकसितपणावर भर दिला होता. एकंदरीतच पाश्चिमात्त्य दृष्टीकोन असे मानत होता की, प्रगत ब्रिटिश शासन हे मागासलेल्या भारताला फायदेशीर ठरले. परंतु या विचाराला बी. डी. बसू आक्षेप घेतात. भारतातील हस्तकलांचा नाश करण्यासाठी इंग्लंड सरकारने आपल्या राजकीय सत्तेचा वापर केला व त्याचा वापर करून भारतीय उद्योगाचा ऱ्हास घडवून आणला असे ते म्हणतात. त्यासाठी ब्रिटिशांनी खालील मार्गाचा अवलंब केला. याकडे ते लक्ष वेधतात.

१) भारतावर मुक्त व्यापार पद्धती लादणे

२) भारतातील मालावर इंग्लंडमध्ये अधिक कर लावणे

३) भारतातून प्रचंड प्रमाणात कच्चा मालाची निर्यात

४) परकीय उद्योगांना विशेष सोई-सुविधा

५) रेल्वे मार्गाचा विकास इ.

भारतातील उद्योगधंद्याच्या ऱ्हासासंदर्भात परस्परविरोधी मते मांडलेली दिसतात. पाश्चिमात्त्य दृष्टीकोन हा साम्राज्यवादाचा एकांगी दृष्टीकोण होता. अमिया बागची यांनी केलेल्या अभ्यासावरून असे स्पष्ट झाले आहे की, भारतीय राष्ट्रवादी विचारवंताचे म्हणणे अगदीच चुकीचे नव्हते. ब्रिटिश काळात भारतात सर्वत्र सरसकट औद्योगिक ऱ्हास घडून आला असे मानणे चुकीचे आहे. वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या क्षेत्रात व वेगवेगळ्या उद्योगांचा ऱ्हास एकदम झालेला नाही. तो वेगवेगळ्या वेळी व कमी अधिक प्रमाणात झालेला आहे.

**✻ स्वयं अध्ययन प्रश्न-१**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. .............. या शहराचे वर्णन 'भारताचे मँचेस्टर' असे केले जाते.

२. .......... याच्या मते भारताचे अनुद्योगीकरण ही केवळ एक कल्पित गोष्ट आहे.

३. औद्योगिक क्रांतीची सुरुवात ............. देशात झाली.

४. भारतीय मलमल ............ नावाने प्रसिद्ध होती.

५. सन ............ च्या कायद्याने ईस्ट इंडिया कंपनीची भारतातील व्यापारी मक्तेदारी संपुष्टात आली.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. धनंजयराव गाडगीळ यांनी कोणता ग्रंथ लिहिला आहे.

२. इंग्लंडमध्ये जे लोक भारतीय कापड वापरतील त्यांना ब्रिटिश सरकारने किती दंड ठेवलेला होता?

३. कोणत्या वर्षापर्यंत भारताच्या व्यापाराची मक्तेदारी ईस्ट इंडिया कंपनीकडे होती.

४. इंग्लंडमधील कोणती दोन शहरे कापड उद्योगासाठी जगप्रसिद्ध होती.

५. कोणत्या कायद्याने युरोपीय लोकांना भारतात राहण्याची व संपत्ती विकसित करण्याची परवानगी दिली.

**३.२.२ कापड उद्योग**

भारताच्या आर्थिक इतिहासातील अतिशय महत्त्वाची घटना म्हणजे १८ व्या शतकाच्या मध्यापासून घडून आलेला भारतीय हस्तोद्योगांचा ऱ्हास व १९ व्या शतकापासून उदयास आलेले विविध उद्योगधंदे. १९ व्या शतकाच्या प्रारंभी काही आधुनिक स्वरूपाचे कारखाने सुरू करण्याचे काही प्रयत्न झालेले दिसतात. परंतु या काळात कोणताही मोठा उद्योग सुरू होवू शकला नाही. ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणामुळे भारतातील कापड

उद्योगाचा १८ व १९ व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत ऱ्हास घडून आला. शिवाय हा उद्योग हस्तउद्योग स्वरूपाचा असल्याने इंग्लंडमधील यंत्रावर तयार झालेल्या कापडाबरोबर स्पर्धा करू शकला नाही. भारतातील हस्तउद्योगाचा ऱ्हास झाल्यानंतर लगेचच नवीन भांडवली मोठे उद्योग मात्र सुरू झालेले दिसत नाहीत. त्यासाठी काही कारणे कारणीभूत होती ती खालीलप्रमाणे–

१) १९ व्या शतकाच्या प्रारंभी ब्रिटिश भांडवलदार भारतात भांडवल गुंतवण्यास फारसे तयार नव्हते.

२) भारतीय भांडवलदारवर्ग उद्योगापेक्षा व्यापार व शेतजमिनीत भांडवल गुंतवण्यास उत्सुक होते.

३) १९ व्या शतकाच्या प्रारंभी भारतात आधुनिक दळणवळण साधने अपुरी होती.

४) १९ व्या शतकात वित्तसंस्था व बँकांचा विकास झालेला नव्हता.

५) ईस्ट इंडिया कंपनीची आर्थिक धोरणे नव्या उद्योगधंद्याना पोषक नव्हती.

भारतामध्ये आधुनिक कापड उद्योगाचा उदय व विकास कशा प्रकारे झाला. कापड उद्योगाची स्थापना कशी व केव्हा झाली, कापड उद्योगाला कोण–कोणत्या अडचणीना सामोरे जावे लागले याचा अभ्यास करण्यापूर्वी भारतात १८ व्या शतकात कापड उद्योगाचे स्वरूप कशा प्रकारचे होते हे पाहणे महत्त्वाचे ठरते.

### अ) १८ व्या शतकातील कापड उद्योगाचे स्वरूप :

भारतामध्ये १८ व्या शतकापर्यंत प्रसिद्धीस पावलेला उद्योग म्हणजे कापड उद्योग. भारतातील कापडाला जागतिक बाजारपेठेत उच्च स्थान होते. खास करून भारतीय सूती कापड जगप्रसिद्ध होते. यामध्ये गुजरातमधील 'किनखाप' कापडाचा समावेश होतो. मुर्शिदाबाद, माल्डा, पुणे, येवले व बंगालमधील अनेक गावाचा यामध्ये समावेश होता. बंगालमधील रेशमी कापड खरेदी करण्यासाठी संपूर्ण आशिया खंडातील व्यापारी बंगालमध्ये येत असत, बंगालमध्ये या कापड केंद्राना 'गरा' असे म्हणत असत. भारतामधील मलमल, दुरिया, हमहम, चौतार, रफेरा, वंदन, बाफता, गिनी, जमदानी, आलबेली, जमावार इत्यादी कापडाचे प्रकार संपूर्ण जगभर प्रसिद्ध होते. १८ व्या शतकात या कापड कारागिरांना ब्रिटिशांच्या आर्थिक धोरणामुळे आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागले. यामधून या व्यावसायात 'दडणी पद्धती'चा उदय झाला. या प्रकारात दलाल मात्र कारागीरापेक्षा अधिक पैसा कमवत असत. अशातच ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापारविषयक धोरणामुळे भारतातील हा उद्योग फारच अडचणीत आला.

### ब) १९ व्या शतकातील कापड उद्योगाची सुरुवात :

भारतामध्ये १९ व्या शतकाच्या मध्यापासून जे प्रमुख उद्योग सुरू झाले अथवा ज्यांचा विकास झाला यामध्ये कापड उद्योग हा एक महत्त्वाचा होता. या उद्योगाच्या विकासाचे खालील महत्त्वाचे टप्पे आपणास पहावयास मिळतात ते खालीलप्रमाणे

१) प्रारंभिक विकास (१८५१–९५)

२) अडचणीचा काळ (१८९६–१९०५)

३) भरभराटीचा काळ (१९०५-१९२१)

४) मंदी व संरक्षण काळ (१९२२-१९३९)

५) दुसरे महायुद्ध व नंतरचा काळ (१९३९-१९४७)

प्रस्तुत उपघटकात आपणास वरीलपैकी फक्त दोन टप्प्यांचा अभ्यास म्हणजेच १९ व्या शतकातील कालखंडाचा अभ्यास करावयाचा आहे.

### १) प्रारंभिक विकासाचा काळ (१८५१-९५)

१९ व्या शतकातील भारतातील कापड उद्योगासंबंधी डॉ. आर. डी. चौक्सी यांनी 'बॉम्बे डेक्कन', डॉ. लक्ष्मीसुब्रमणियम यांनी 'इंडिजिनियस कॅपिटल ॲण्ड इम्पीरियल एक्सपान्शन'' व प्रा. अशिन दास गुप्ता यांच्या ''इंडियन मर्चन्ट ॲण्ड दि डिकलाइन्स ऑफ सूरत १७०७-१७४८'' या ग्रंथाच्या मधून भारतीय कापड उद्योगावर प्रकाश पडतो. भारताध्ये सन १८५० पूर्वी कापसाचे उत्पादन फार होत नव्हते व जे होत होते तेही काही मर्यादीत प्रदेशापुरतेच मर्यादीत होते. यामध्ये खानदेश, अहमदनगर, नाशिक इ. चा समावेश होता. मि. रॅन्डाल यांनी भारतात आणखी कोणकोणत्या प्रदेशात कापसाचे उत्पादन घेतले जावू शकते याचा अभ्यास करून सन १८१९ मध्ये ब्रिटिश सरकारला एक अहवाल दिलेला होता यामध्ये मलप्रभा, कृष्णा, घटप्रभा व वर्धा नद्यांच्या खोऱ्याचा समावेश होता. या अहवालानुसार ब्रिटिश सरकारने या भागात कापूस लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना सोन्याची साखळी भेट देण्याची योजना आखलेली होती. कर्नाटक प्रांतात कर्नाटकचे कलेक्टर विल्यम थॅकरे व वेबर यांनी कापूस लागवडीसाठी विशेष प्रयत्न केलेले दिसतात. शेतकऱ्यांना पतपुरवठा करून 'ब्युरबॉन' जातीचा कापूस उत्पादन करण्यास प्रोत्साहन दिले.

सन १८२९ मध्ये दापोली येथील कृषीशाळेचा प्रमुख डॉ. रश यांच्याकडे 'बॉम्बे डेक्कन' 'खानदेश' व 'धारवाड' प्रांतात कापूस उत्पादन करण्याचे काम सोपविले. शिवाय लश या संशोधकाने अमेरिकेतील कापसाच्या प्रजाती आणून त्याचा उत्पादनाचा प्रयत्न केला. सन १८३८ मध्ये ब्रिटिश सरकारने संचालकाच्या सल्ल्यानुसार कॅप्टन बेलीला अमेरिकेतून कापसाच्या बिया व तज्ञ लोक आणून अमेरिकन पद्धतीचा कापूस भारतात लागवडीचा प्रयन चालू केला. या तज्ञानी कुतुमल, गदग, नेगनहल या भागात अमेरिकन तज्ञ मर्सर, हॉवली, लॅनिंग यांच्या मदतीने 'न्यू ऑलिन्स', 'मिसीसिपी' इ. जातीच्या कापसाची लागवड केली. परिणामी सन १८५९-६० या काळात धारवाड प्रांतात कापूस लागवडीत खूप मोठ्या प्रमाणात वाढ झाली. भारतामध्ये कापूस उत्पादनास सुरुवात झाल्यानंतर याच कापडावर आधारीत कापड गिरण्याही स्थापण्याच्या हालचाली सुरू झाल्या.

सन १८५४ मध्ये सी.एन. दावर यांनी भारतातील पहिली कापड गिरणी मुंबई येथे 'दि बॉम्बे स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग कंपनी'' नावाने स्थापन केली व प्रत्यक्षात ती सन १८५६ मध्ये सुरू झाली. या गिरणीचे बहुतांश भागधारक फारसी होते व मुंबईमधील २० गुजराती व्यापाऱ्यांनी मिळून १/३ इतके भाग भांडवल या गिरणीमध्ये गुंतवलेले होते. दावर यांनी सुरू केलेल्या पहिल्या कापड गिरणीमध्ये पहिल्यांदा त्यांना अपेक्षित यश आले नाही. कारण या काळात कापड गिरण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रशिक्षित कामगारवर्गाची टंचाई होती. त्यामुळे कापड उतपादनांचा वेग मंदावलेला होता. शिवाय या गिरणीमधून तयार झालेल्या कपड्यास इंग्लंडमधील

आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत तयार झालेल्या कापड गिरण्यातील स्वस्त कापडाबरोबर स्पर्धा करावी लागत होती. यानंतर भारतात कापड गिरण्याची संख्या वाढत गेली. सन १८६१ मध्ये भारतातील दुसरी कापड गिरणी अहमदाबाद येथे स्थापन झाली. या गिरणीसाठी लागणारे सर्व तंत्रज्ञान इंग्लंडमधून आणलेले होते. भारतामध्ये सन १८६१ पर्यंत कापड गिरण्यांची संख्या १२ पर्यंत पोहचलेली होती. यातील बहुतांश कापड गिरण्या मुंबईच्या आसपास सुरू झालेल्या होत्या.

सन १८६१-७० हा कालखंड भारतातील कापड उद्योगासाठी फारसा अनुकूल अथवा विकासासाठी फारसा पूरक नव्हता. कारण या काळात अमेरिकन यादवी युद्ध सुरू झालेले होते. त्यामुळे सन १८६१-६५ या काळात कापसाच्या किंमती भरमसाठ वाढल्यामुळे सूतकताई व विणाई उद्योगावर याचा विपरीत परिणाम झाला. परंतु कापसाच्या वाढलेल्या भावाच्या तेजीमुळे निर्माण झालेल्या नफ्यातील काही भाग कापड उद्योगांना मिळत होता. त्यामुळे कापड उद्योगाच्या विस्तारासाठी अधिक भांडवल उपलब्ध झाले. सन १८६५ मध्ये अमेरिकन यादवी युद्ध संपुष्ठात आले. त्यामुळे कापसाच्या किंमतीही खाली आल्या, ही घसरण सोसण्याची क्षमता कापूस बाजारामध्ये नव्हती त्यामुळे कापूस मागणी ही संपली. परिणामी या काळात कापड उद्योग मंदावला. अमेरिकन यादवी युद्धामुळे वाढलेल्या कापसाच्या किंमती व सन १८६५ नंतर मुंबईमध्ये आलेली मंदीची लाट यांच्यामुळे सन १८७१ पर्यंत कापड उद्योगाची स्थिती फारसी सुधारली नाही.

सन १८७१ नंतर मात्र पुन्हा कापड उद्योगात तेजी दिसू लागली. त्यांचे कारण म्हणजे या काळात कापसाच्या किंमती एवढ्या घसरलेल्या होत्या की, भांडवलदार कापड उद्योगात गुंतवणूक करण्यास उत्सुक होते. त्यामुळे अल्पावधीत म्हणजे सन १८७३ मध्ये मुंबई इलाख्यात कापड गिरण्याची संख्या १९ झाली. सन १८७३ नंतर कापड उद्योगात एक प्रकारचा विश्वास निर्माण झाला व कापड गिरण्याची संख्याही झपाट्याने वाढत गेली. सन १८७५ मध्ये कापड गिरण्याची संख्या ३६ पर्यंत पोहचली तर १८७६ मध्ये ३९, १८७८ मध्ये ४२ व १८७९ पर्यंत गिरण्याची ही संख्या ५६ पर्यंत पोहचली. या गिरण्यामधील चकत्यांची संख्या १४,५३,००० इतकी झाली. याच काळात हातमागाची संख्या १३,००० इतकी होती व कापड उद्योगात काम करणाऱ्या कामगारांची संख्या ४३,००० इतकी होती. सन १८७१-१८७९ या काळात स्थापन झालेल्या गिरण्या मुंबई व्यतिरिक्त अहमदाबाद, सोलापूर व नागपूर इत्यादी अंतर्भागातील केंद्रातही या कापड गिरण्याचा विस्तार झालेला होता. सुरुवातीच्या काळात ज्या कापड गिरण्या अस्तित्वात आल्या त्याची काही ठळक वैशिष्ट्ये होती ती पुढीलप्रमाणे-

१) या काळात गिरणी उद्योगामध्ये व्यवस्थापक व तंत्रज्ञ म्हणून जरी अनेक युरोपीय व्यक्तीच्या नेमणुका करण्यात आलेल्या असल्यातरी प्रारंभापासूनच भारतातील हा कापड उद्योग देशी लोकांच्या नियंत्रणाखाली होता.

२) गिरणी उद्योगाला लागणारे भांडवल व साधन सामग्री ही प्रामुख्याने भारतीय लोकाकडूनच उभारण्यात आली होती.

३) या उद्योगात सूत विणाईपेक्षा सूत कताई गिरण्याचे प्राबल्य होते.

४) अनेक गिरण्या ह्या सूत कताईच्या होत्या. ह्या गिरण्या आपले सूत उत्पादन देशांतर्गत बाजारपेठेत करत व चीनी बाजारपेठेत विकत.

५) प्रारंभीच्या कापड गिरण्या मुंबई व अहमदाबाद या दोनच ठिकाणी प्रामुख्याने स्थापन झालेल्या होत्या. या काळातील व भारतातील संपूर्ण गिरण्यापैकी ७५% गिरण्या फक्त मुंबईमध्ये होत्या.

६) मुंबईमध्ये प्रचंड प्रमाणात कापड गिरण्याची स्थापना व विकास झाल्याने कामगारवर्गाचा उदयही याच शहरात झाला. पुढे यातूनच कामगार चळवळ उभारली गेली.

भारतामध्ये १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात म्हणजेच सन १८८०-१८९५ काळ कापड उद्योगाच्या विकासाला पूरक असाच होता आणि याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या काळात कापूस उत्पादनात प्रचंड वाढ झालेली होती. कच्चा माल व कामगार स्वस्त दरात उपलब्ध होत असल्याने भांडवलदार या उद्योगात भांडवल गुंतवणूक करण्यास सहजासहजी तयार होत होते. त्यामुळे या काळात भारतातील कापड गिरण्यांची संख्या ५६ वरून १४४ पर्यंत पोहचली. या पंधरा वर्षाच्या काळात कापड उद्योगाला थोड्याफार प्रमाणात स्थिरता आलेली होती. त्याचे कारण गिरणी तंत्रज्ञामध्ये झालेला बदल व स्वस्तातील कामगार, या काळात कामगारांची संख्या १,३९,५७८ इतकी होती. दुसरे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे या काळात भारतीय कापडाला मिळालेली आंतरराष्ट्रीय बाजारपेठ. या काळात भारतीय सूत व कापड चीन व जपानमध्ये निर्यात होत होते.

भारतामध्ये विकसित होत असलेला कापड उद्योग इंग्लंडमधील भांडवलदारांच्या दृष्टीकोणातून संकटाचा वाटत होता. त्यामुळे लॅकेशायर मधील गिरणी मालकांनी भारतीय कापड उद्योगाच्या व्यवस्थापनास व विस्ताराला विरोध करण्यास सुरुवात केली. याशिवाय लॅकेशायरमधील गिरणी मालकानी ब्रिटिश सरकारवर दबाव आणून लॅकेशायर मधून भारतात आयात केलेल्या कापडावर जकातकर रद्द करण्यास लावली व भारतात खुल्या व्यापाराच्या धोरणाचा स्वीकारण करण्यास भाग पाडले.

### २) अडचणीचा काळ (१९९५-१९०५)

भारतातील कापडउद्योगाच्या विकासाच्या दृष्टीकोणातून हा काळ अनेक अडचणी व समस्याचा होता. या काळात दोन प्रकारची अतिशय बिकट प्रकारची संकटे समोर आली ती दुष्काळ व प्लेग होय. या दुष्काळाचा परिणाम कापड उद्योगावर झाला. विणलेले कापड मुख्यत्वेकरून भारतीय बाजारपेठेसाठीच तयार केले जात असे. शिवाय भारतीय गिरण्यामध्ये तयार होणाऱ्या धाग्यांचा उपयोग देशी हातमागासाठी होत होता. हातमागावर तयार होणारे कापड जाडे भरडे असे व ते कापड खेड्यातील शेतकरी हे त्याचे प्रमुख गिऱ्हाईक होते. परंतु दुष्काळाच्या काळात कापडाची मागणी कमी झाली. सन १८९६ मध्ये मुंबईमध्ये प्लेगची साथ आली. प्लेगच्या साथीमुळे मोठ्या प्रमाणावर कामगार काम सोडून गेले. याच साथीत कामगार संघटनेचे नेते नारायण मेघानी लोखंडे यांचाही मृत्यू झाला. मोठ्या प्रमाणात कामगारांनी मुंबई सोडल्याने या काळात गिरणीमालकांना कामगार संकटाला सामोरे जावे लागले. त्यामुळे मजुरीचे दर वाढले व दुष्काळाच्या परिणामस्वरूप कापसाचे उत्पादन घटले. त्यामुळे कापसाचे दरही वाढलेले होते.

भारत सरकारला १९ व्या शतकाच्या शेवटी म्हणजे सन १८९६ नंतर पुन्हा एकदा भांडवली टंचाईला सामोरे जावे लागले. भारताचा महसूल वाढावा म्हणून पुन्हा एकदा १८९६ मध्ये आयात कापडावर जकात बसवण्यात आली. परंतु लॅकेशायरच्या कापडाच्या आणि भारतातील कापडाच्या किंमतीत समतोल साधण्यासाठी भारतात

उत्पादीत झालेल्या कापडावर तेवढ्याच प्रमाणात अबकारी कर लावण्यात आला. दुष्काळ, प्लेग, अमेरिकेतील बाजारपेठेत निर्माण झालेली सट्टेबाजी व चीनमधील बॉक्सर बंडामुळे भारताची चीनमधील कापडाची निर्यात घटली. या सर्वांचा परिणाम भारतीय कापड उद्योगाच्या विकासावर झाला. हे जरी खरे असले तरी या काळातही भारतीय कापड उद्योग टिकून राहीला.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये सोलापूर हे कापडगिरणी उद्योगाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून उदयास आले. टाटांनी नागपूर येथे सन १८८७ मध्ये कापड गिरणी सुरू केलेली पाहून सोलापूरमधील मोरारजी गोकुळदास यांनीही सोलापूरमध्ये पहिली कापड गिरणी सुरू केली. सोलापूर हे दक्षिणेतून कापसाची ने-आण करण्यासाठी महत्त्वाचे केंद्र होते. त्यामुळे कापडाची बाजारपेठ व वाहतूक केंद्र असलेले सोलापूर शहर कापड उद्योगाचे केंद्र म्हणून रुपांतरीत झाले. सोलापूरचे वैशिष्ट्य म्हणजे मोठ्या कापड गिरण्या व हातमाग विणकामाचे सहजीवन, आधुनिक व पारंपारिक उत्पादन पद्धती जरी असली तरी दोन्ही उद्योग वेगवेगळ्या प्रकारचे कापड उत्पादन करीत होते. भारतामध्ये मुंबई पाठोपाठ अहमदाबाद, मद्रास, मदुरा, कोईमतूर इ. ठिकाणीही आधुनिक पद्धतीच्या कापड गिरण्या स्थापन झालेल्या होत्या. खास करून मुंबई इलाख्यात, सोलापूर, भिवंडी, मालेगाव, कल्याण, विटा, इचलकरंजी, धुळे इ. ठिकाणी कापडगिरण्या व मोठ्या प्रमाणात हातमाग उद्योग विकसित झालेला होता. भारतामधील कापडउद्योग अडचणींचा सामना करीत टिकून होता. १९ व्या शतकाच्या शेवटी व २० व्या शतकाच्या सुरुवातीस म्हणजे सन १९०४-०५ मध्ये भारतामध्ये कापड गिरण्याची संख्या २०६ इतकी होती.

### २) ज्यूट उद्योग (ताग) (Jute Industry)

भारतातील कापड उद्योगानंतरचा महत्त्वाचा व मोठा उद्योग म्हणून ताग अथवा ज्यूट चा उल्लेख केला जातो. तागाची माहिती युरोपीयन लोकांना होण्याअगोदरपासून भारतात तागापासून सूत काढणे व हातमागावर तागाचे कापड, गोणपाट विणणे, सुतळी, दोरखंड, पट्टे, सतरंज्या, पिशव्या, कापड उत्पादनासाठी व कागद तयार करण्यासाठी याचा उपयोग होत होता. ताग उद्योगासाठी बंगाल जगप्रसिद्ध आहे. बंगालमध्ये हुगळी नदीच्या काठावरच बहुतांश तागाच्या गिरण्या स्थापन झालेल्या होत्या. तागाच्या उत्पादनाला अनूकूल हवामान व पर्जन्यमान बंगालमध्ये असल्याने जवळजवळ प्रत्येक बंगाली शेतकरी तागाचे उत्पादन घेत होता. तागापासून विविध वस्तू तयार करण्याचे काम घरोघरी चालत होते. तागाच्या या उद्योगाचे स्वरूप हस्तकलेचा उद्योग या स्वरूपाचे होते, सुरुवातीपासूनच ताग उद्योगाचे स्थानिकीकरण बंगालमध्ये झाल्याने येथील हा हस्तकलेचा उद्योग बंगाली लोकांच्या मक्तेदारीचाच एक भाग होता. तागाचा हा हस्तोउद्योग बंगालमधील संपूर्ण ग्रामीण भागात पसरलेला होता. भारतात १८ व्या शतकात खालील प्रकारची उत्पादने घेतली जात होती.

१) गून (जाड घट्ट विणीचे कापड)

२) मेकली (बारीक विणीचे कितनासारखे कापड)

३) गूनचाट/पोते/गोणी (शेतीमाल अथवा मोठ्या आकारमानाच्या वस्तूंच्या आवेष्टनासाठी लागणारे भरड व सैलविणीचे कापड)

हातमागावर विणलेल्या तागाच्या गोणी सन १७४६-१७५६ या काळात इंग्लंडला पाठविल्याचा उल्लेख

मिळतो. तसेच १८ व्या शतकात कच्चा तागाची व तागाच्या सूताची निर्यात इंग्लंड, पश्चिम युरोप आणि अमेरिकेत होत होती. हातमागावर विणलेल्या तागाच्या कापडाला व इतर मालाला युरोपीय देशात १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात एक बाजारपेठ निर्माण झालेली होती. परंतु ही मागणी फार काळ टिकली नाही. कारण भारतात तयार होणारा हा माल हातमागावर विणला जात असल्याने जाडा-भरडा स्वरूपाचा होता याशिवाय इतरही काही कारणे होती. कच्चा माल म्हणून तागाकडे पश्चिमी राष्ट्राचे विशेष लक्ष १९ व्या शतकात गेले, परंतु या मालाचा वापर सुरुवातीच्या काळात फारसा झाला नाही. याचे कारण तागाचा धागा निकृष्ठ प्रतीचा समजला जात असे आणि तो प्लॅक्स (अळशी) व हेंम्पच्या धाग्यात मिसळणे ही भेसळ समजली जात असे. परिणामी त्याच्या विशिष्ट अशा चांगल्या गुणधर्माकडे दुर्लक्ष केले गेले. १९ व्या शतकाच्या प्रारंभी दोऱ्या तयार करणे व होडया अथवा जहाजावरील शिडे (Saill) तयार करण्यासाठी व पोती (गोणी) तयार करण्यासाठी 'हेंम्प' नावाच्या वनस्पतीचा उपयोग केला जात होता. ही वनस्पती रशिया व बाल्टीक समुद्राच्या आजूबाजूच्या देशात मोठ्या प्रमाणात उत्पादीत होत होती. यामुळे हेंम्पचे कापड या प्रदेशातून सर्व युरोपमध्ये निर्यात होत होते. १९ व्या शतकाच्या प्रारंभी आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये खूप विस्तार झाला होता. मालाची ने-आण वाढल्याने हेंम्प कापडाची मागणी देखील वाढलेली होती. आंतरराष्ट्रीय व्यापारात अग्रेसर असलेल्या इंग्लंडला मात्र हेंम्स कापडासाठी रशिया व इतर देशावर अवलंबून रहावे लागत होते. यामुळे इंग्लंडमधील व्यापारी माल बांधणीसाठी एका पर्यायी कापडाच्या शोधात होते. त्यासाठी त्यांनी भारतामधील ज्यूट/तागाच्या कापडास पसंती दिली. भारतामध्ये ज्यूट उद्योग विकसीत होण्यासाठी दोन कारणे जबाबदार होती.

१) ईस्ट इंडिया कंपनीने हेम्प कापडाला पर्यायी कापड म्हणून ज्यूट वनस्पती पासून तयार केलेले कापड वापरण्यास सुरुवात केली. यामुळे जागतिक बाजारपेठेत ज्यूटच्या कापडाची मागणी वाढली होती.

२) १९ व्या शतकापासून ईस्ट इंडिया कंपनी भारतातून कच्चा माल प्रचंड संख्येने इंग्लंड व इतर युरोपीय देशात निर्यात करत होता. या कच्चा मालाची बांधणी करण्यासाठी ज्यूट कापडाची गरज होती. या दोन कारणांच्यामुळे भारतातील ज्यूट उद्योगाला चालना मिळाली. याचबरोबर तागापासून यांत्रिक पद्धतीने कापड तयार करण्याच्या तंत्राज्ञाने हा उद्योग अधिक विस्तारीत गेला.

सन १८३२ मध्ये स्कॉटलंडमध्ये डंडी येथे तागापासून सूत काढून त्यापासून यांत्रिक मागावर कापड विणण्याचा प्रयोग यशस्वी झाला. पश्चिम युरोपमध्ये प्रथमतः अशा प्रकारचा प्रयोग यशस्वी झालेला होता त्यामुळे त्याला विशेष महत्त्व होते. यानंतर सन १८३९ मध्ये नेदर्लंडस् सरकारने कॉफीच्या पिशव्यासाठी फ्लॅक्स ऐवजी तागाचा वापर करण्याचे ठरविल्याने ताग कापड उद्योगाला अधिक चालना मिळाली व डंडीच्या आसपास व युरोप खंडात व अमेरिकेत तागाच्या वस्तूचे उत्पादन सुरू झाले. या सर्वांचा सकारात्मक परिणाम भारतातील वस्तूच्या निर्यातीवर झाला. यानंतर कच्चा तागापासून यंत्राच्या साहाय्याने कापड तयार करण्याचे प्रयत्न कच्चा माल तयार होणाऱ्या प्रदेशातच होणे स्वाभाविकच होते. बंगालमध्ये तागाचे भरपूर पीक उत्पादन असल्यामुळे, तसेच कलकत्ता हे परदेशाला बोटीने माल पाठविण्यासाठी सोईचे बंदर असल्याकारणाने आणि या कारखान्याला लागणारा कोळसा व स्वस्त मजूर कलकत्त्याच्या आसपास मिळत असल्याने हुगळी नदीच्या काठावर सन १८५५ मध्ये स्कॉटलंडच्या जॉर्ज अॅक्लंड यांनी कलकत्त्यापासून २० कि.मी. सेरापूर जवळील रिश्रा येथे पहिली तागाची

गिरणी स्थापन केली. ही गिरणी स्कॉटलंडच्या तज्ज्ञ लोकांनी तेथील तंत्रज्ञानावर आधारीत उभारलेली होती. या गिरणीचे व्यवस्थापनही स्कॉटलंडमधील लोकांच्या हातातच होते. या गिरणीतून सन १८५९ पासून कापड उत्पादन सुरू झाले. सन १८५९ मध्ये कलकत्त्याजवळ बारानगर येथे पहिला स्वयंचलीत माग बसविण्यात आला आणि कापड विणणाऱ्या बाष्पशक्तीवर चालणाऱ्या पहिल्या गिरणीचा प्रारंभ झाला. जागतिक व्यापारात या काळात मोठी वाढ झालेली होती. त्यामुळे पॅकिंगसाठी गोणपाटाची (पोती) मागणी वाढलेली होती. तागाच्या गिरण्यामधून उत्पादीत तयार मालाला बाजारपेठ उपलब्ध होती परंतु भांडवल पुरवठा व यंत्रसामुग्री मिळविण्यातील अडचणीमुळे या उद्योगाचा जलद विकास व विस्तार होवू शकला नाही. त्यामुळे सन १८६०-१८७३ या काळात केवळ ५ गिरण्या स्थापन झालेल्या दिसतात तर १,२५० इतकी मागाची संख्या होती.

सन १८८० नंतरच्या काळात ताग गिरण्यामध्ये स्पर्धा वाढली. अशी स्पर्धा टाळण्यासाठी भारतातील ताग गिरणीमालकानी आपली एक संघटना स्थापन केली. सन १८८५ मध्ये तागाच्या ११ गिरण्या होत्या व यामध्ये ६,७०० इतके माग होते. त्यानंतर तागाच्या उद्योगाला भरभराटीचा काळ आला. भारतातील ताग गिरण्या तयार होणारा माल स्कॉटलंडमधील डंडी येथे तयार होणाऱ्या मालाशी स्पर्धा करू लागला. बंगालमध्ये भरपूर ताग पिकत होता व तेथे स्वस्त मजूरही उपलब्ध होते. त्यामुळे जागतिक बाजारपेठेत केवळ कच्चा तागच नव्हे तर तागाच्या यंत्रावर तयार झालेल्या वस्तूही निर्यात होऊ लागल्या. सन १८९४ मध्ये ताग गिरण्यांची परिस्थिती अधिक चांगली झाली व या दरम्यानच्या काळात आणखी ३,००० मागाची यामध्ये भर पडली. सन १८९८-९९ मध्ये कलकत्त्यामध्ये प्लेगची साथ आलेली होती. त्यामुळे या साथीचा थोडाफार परिणाम विकासावर झाला. परंतु ताग गिरण्याची प्रगती सुरूच राहीली. सन १९०० मध्ये मागाची संख्या १५ हजारवर गेली तर १९०९ ला ताग गिरण्यांची संख्या ३८ इतकी होती. भारतातील तगाच्या वस्तूना जस-जसी मागणी वाढत राहिली तस-तसी स्पर्धाही वाढली. यातून १९ व्या शतकातील ताग उद्योगाचा विकास व विस्तार झालेला दिसतो.

### ३) रेल्वे (Railways)

आर्थिक विकासाच्या दृष्टीकोणातून कोणताही देश अथवा प्रांतामध्ये वाहतुकीच्या साधनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. आर्थिक विकासाबरोबर लष्करी, प्रशासकीय, सांस्कृतिक व सामाजिक विकासाच्या दृष्टीकोणातूनही याचे तितकेच महत्त्व आहे. मूलतः भारत खंडप्राय देश आहे. भौगोलिक दृष्टीकोनातूनही भारताचा प्रदेश वाहतुकीच्या विकासासाठी तितकासा चांगला नाही. प्राचीन ते मध्ययुगीन काळाचा विचार केल्यास संपूर्ण भारतावर एकछत्री अंमल कधीच निर्माण झाल्याचे दिसत नाही व प्रांतातील विविध सत्ताधिशांच्या सत्ता संघर्षात वाहतुकीची साधने किंवा तत्सम गोष्टीच्या विकासाला फारसे प्राधान्य दिलेले दिसत नाही. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत भारतात वाहतुकीच्या अथवा दळणवळणांच्या साधनाचा फारसा विकास किंवा विस्तार झालेला नव्हता. कारण मध्ययुगीन काळापासून भारतात दळणवळणाच्या साधनाची कमतरता होती. मुघल सम्राटानी निर्माण केलेले महामार्गाचे जाळे उत्तर भारतापुरते मर्यादीत होते तेही अपुरे होते. पावसाळ्यात या मार्गाचा फारसा फायदा होत नव्हता. कारण हे रस्ते म्हणजे बैलगाडीच्या वाटेतून निर्माण झालेले रस्ते किंवा मार्ग देशांच्या अंतर्गत भागात कित्येक ठिकाणी ओझी वाहणाऱ्या जनावरांचे तांडे हाच एकमेव वाहतूक प्रकार होता आणि ही वाहतुकही सुरक्षित नव्हती. ठग आणि पेंढारी यांची भिती कायमच असे. परिणामी वाहतुकीच्या साधनांच्या

अभावी तत्कालीन नगरे व खेडी एका अर्थाने दूरावलेलीच होती. उत्तर भारतातील काही नद्यांच्या पात्रातून जल वाहतूक होत होती. उदा. गंगा, यमुना इ. परंतु दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणात डोंगराळ प्रदेश, उंच-सखल भागामुळे वाहतुकीची परिस्थिती फारच बिकट होती. लॉर्ड डलहौसीच्या काळात वाहतुकीच्या साधनाच्यामध्ये परिवर्तन होण्यास सुरुवात झाली. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीला आपल्या व्यापाराची अधिक काळजी असल्याने त्यांनी या दुर्लक्षित घटकाकडे अगदी जाणीवपूर्वक लक्ष केंद्रीत केले व वाहतूक व दळणवळणांच्या साधनांना चालना देण्यास सुरुवात केली. ब्रिटिशांनी जाणीवपूर्वक केलेल्या रेल्वे सुधारणामुळे भारतात १९ व्या शतकाच्या मध्यापासून पुढे रेल्वेचा विकास व विस्तार झाला व संपूर्ण भारतात लोहमार्गाचे एक जाळे निर्माण करण्यात त्यांना यश आले असे दिसते. हे जरी खरे असले तरी भारतीय रेल्वेची सुरुवात ही खालील घटकांनी प्रेरित झालेली होती.

**ब्रिटिशांनी भारतात रेल्वे का सुरू केली?**

भारतात आपल्या साम्राज्याच्या स्थिर स्वरूपासाठी व भारतीय प्रदेशाचे व्यापाराच्या माध्यमातून शोषण करण्याच्या उद्देशाने तसेच लष्करी साहित्याची व लष्कराची जलद हालचाल व्हावी या दृष्टीकोणातून ब्रिटिशानी भारतात रेल्वेची पायाभरणी करण्यास सुरुवात केलेली असली तरी याशिवायही इतर काही महत्त्वाचे उद्देश रेल्वे सुरू करण्यापाठीमागे होते. ते पुढीलप्रमाणे-

१) लॅकेशायरच्या कापडगिरण्यासाठी चांगला आणि स्वच्छ कापूस भारतातून प्राप्त करणे.

२) रेल्वेच्या माध्यमातून भारतातील अंतर्गत बाजारपेठ काबीज करणे.

३) लष्करी हालचाली जलद करणे.

४) रेल्वेच्या माध्यमातून ब्रिटिशांची सत्ता दृढ करणे

५) कच्चा मालाची स्वस्त व जलद ने-आण करणे.

वरील उद्देशांना अथवा कारणाना अनुषंगुण लॉर्ड हॉर्डिज यांनी आपल्या १८४६ च्या खलित्यात आणि लॉर्ड डलहौसी यांनी आपल्या १८५० व १८५६ च्या खलित्यात या गोष्टीवर अधिक भर दिलेला दिसतो.

**१) भारतीय रेल्वेची पार्श्वभूमी**

भारतातील पहिला रेल्वेमार्ग मुंबई ते ठाणे यांच्या दरम्यान १६ एप्रिल १८५३ रोजी सुरू झालेला असला तरी भारतात रेल्वेमार्गाची कल्पना सर्वप्रथम मद्रास इलाख्यात सन १८३१-३२ च्या सुमारास समोर आलेली होती. कावेरी नदीच्या किनाऱ्याने कावेरीपट्टम ते वरूर या दरम्यान रस्ता तयार करून त्या रस्त्यावर १५० मैलाचा रेल्वेमार्ग सुरू करावा आणि जनावरांच्या मदतीने रूळावरून गाडी ओढावी अशीही कल्पना होती. सन १८३२ मध्ये मद्रास ते बंगलोर हा रेल्वेमार्ग बांधण्याची कल्पना समोर आली परंतु याला फारसे यश आले नाही. सन १८५३ मध्ये मुंबई ते ठाणे-कल्याण हा रेल्वेमार्ग मुंबई सरकारांच्या अधिकाऱ्यांनी मांडला. याच काळात लॉर्ड डलहौसी १८४६ मध्ये गव्हर्नर जनरल म्हणून भारतात आल्यानंतर भारतीय रेल्वे मार्गाच्या योजनांना अधिक गती मिळाली. भारतातील रेल्वेचा इतिहास प्रामुख्याने खालील प्रमुख टप्प्यात विभागला जातो.

**१) १८४४-१८६९ (हमी पद्धती)**

२) १८६९-१८७९ (शासकीय बांधणी व व्यवस्थापन)

३) १८७९-१९०० (सरकार व खाजगी कंपन्यांची भागीदारी)

४) १९००-१९१४ (जलद विस्तार व विकास)

५) १९१४-१९२० (प्रथम युद्धकालीन स्थिती)

६) १९२१-१९३० (नवी दिशा व धोरणे)

७) १९३१-१९३९ (द्वितीय महायुद्धा पूर्वीचा काळ)

८) १९३९-१९४७ (द्वितीय महायुद्धादरम्यानचा काळ)

प्रस्तुत उपघटकामध्ये आपणास फक्त १९ व्या शतकातील रेल्वेचा विकास व विस्तारांचा अभ्यास करावयाचा आहे.

**२) सन १८४४-१८६९ (हमी पद्धती)**

भारतात रेल्वे मार्गाचा विकास व्हावा म्हणून ब्रिटिशानी भांडवलदारांच्या बाबतीत 'जूनी हमी पद्धती'चा स्वीकार केला. या हमी पद्धतीनुसार रेल्वे कंपन्यांना रेल्वे वाहतुकीतून होणारा फायदा त्यांच्या देशात नेण्यास परवानगी दिली. शिवाय रेल्वे मार्ग निर्माण करताना शासनाकडून अनेक सवलती देण्यात आल्या. ह्याला अनुसरून सन १८४९ मध्ये कलकत्ता व मुंबई येथे रेल्वे मार्ग निर्माण करण्यासाठी अनुक्रमे 'ईस्ट इंडियन रेल्वे कंपनी' व 'ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वे कंपनी' यांच्याशी करार करण्यात आले. भारतातील लोहमार्गाबाबत सन १८५३ मध्ये लॉर्ड डलहौसीने इंग्लंडमध्ये केलेल्या पत्रव्यवहारात भारतीय रेल्वेच्या विकासावर अधिक भर दिलेला दिसतो. लॉर्ड डलहौसीने या रेल्वेमुळे भारताला व इंग्लंडला कसा सामाजिक व आर्थिक फायदा होईल हे पटवून दिले. रेल्वेच्या विकासामुळे ब्रिटिशांना जलद लष्करी हालचाली करता येतील, भारतातील कच्चा माल बंदरापर्यंत पोहचवणे अधिक सुलभ होईल व हा माल इंग्लंडमध्ये अधिक गतीने जाईल यासाठी भारतीय रेल्वे विकासाला अधिक प्राधान्य दिले पाहिजे. यादृष्टीकोणातून विचार मांडलेले होते. वास्तविक पाहता ब्रिटिश साम्राज्याला अधिक बळकटी आणणे व भारतीय प्रदेशावर त्यांचे साम्राज्यवादी वर्चस्व निर्माण करून ब्रिटिश व्यापाराला अधिक बळकटी देणे हा स्वार्थी हेतू यामागे होता.

ईस्ट इंडिया कंपनीशी झालेल्या करारानुसार भारतातील रेल्वे बांधणीचा प्रारंभ 'ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वे कंपनीने सुरू केला (१८५०) व १६ एप्रिल १८५३ रोजी भारतातील पहिली गाडी मुंबई ते ठाणे या २१ मैल अंतराच्या मार्गावर धावू लागली. यानंतर सन १८५४ मध्ये हौरा ते पांडुआ हा ३८ मैलाचा मार्ग वाहतुकीला खुला झाला. सन १८५२ मध्ये मद्रास रेल्वे कंपनीने ईस्ट इंडिया कंपनीबरोबर करार केलेला होता. यानंतर लगेचच 'बॉम्बे बरोडा अँड सेंट्रल इंडिया रेल्वे' कंपनीची स्थापना झाली. सिंध रेल्वे कंपनी व ईस्ट इंडिया कंपनी याच्यामध्येही सन १८५५ मध्ये एक करार झाला व कराचीपासून उत्तरेकडे जाणारा रेल्वेमार्ग सुरू करण्याचे काम सुरू झाले. सन १८४४ ते १८६० या काळात ईस्ट इंडिया कंपनीने रेल्वे निर्मिती व बांधणीसाठी विविध बारा रेल्वे कंपन्यांशी करार

करून रेल्वेच्या विकासास व विस्तारास चालना देण्याचा प्रयत्न केला. ईस्ट इंडिया कंपनीने ज्या १२ कंपन्यांशी करार केलेला होता तो पुढीलप्रमाणे-

**कराराच्या अटी**

१) कराराची मुदत ९९ वर्षे राहील व या मुदतीत रेल्वे कंपनीने रेल्वेमार्गाच्या निर्मितीसाठी गुंतवलेल्या संपूर्ण भांडवलावर दरसाल ४.५ ते ५% व्याज देण्यात येईल यांची हमी ईस्ट इंडिया कंपनीने घेतलेली होती.

२) रेल्वेमार्ग व संबंधित अन्य बांधकामे यांसाठी लागणारी जमीन ईस्ट इंडिया कंपनीने मोफत द्यावी.

३) ब्रिटिश भागधारकांचे नुकसान होऊ नये म्हणून त्यांना मिळणाऱ्या रकमावर रुपयास १ शिलिंग १० पेन्स या दराने रुपांतरीत करून देण्यास भारत सरकार बांधलेले होते.

४) किमान हमीपेक्षा मिळणारा जादा नफा सरकार व रेल्वे कंपनी यांनी निम्मा-निम्मा वाटून घ्यावा.

५) कराराची मुदत संपल्यानंतर जमीन व अन्य स्थावर मालमत्ता सरकारी मालकीची राहील व डबे, वाघिणी इत्यादी जंगम मालमत्तेच्या पोटी वाजवी भावाने सरकारने नुकसान भरपाई द्यावी.

६) रेल्वेमार्गाच्या प्रशासनावर सरकारचे नियंत्रण राहावे आणि मार्ग व गेज इत्यादीसाठी सरकारची मंजूरी घेतली जावी.

याशिवाय या करारामध्ये आणखी एक महत्त्वपूर्ण अट अशी होती की, २५ अथवा ५० वर्षानी सरकारला वाटल्यास रेल्वेमार्ग सरकारला केव्हाही विकण्याची मूभा होती. रेल्वे कंपनीने इच्छा व्यक्त केल्यास मंजूर झालेला खर्च देऊन रेल्वेमार्ग व अन्य मालमत्ता विकत घेणे सरकारवर बंधनकारक होते.

लॉर्ड हॉर्डिज व लॉर्ड डलहौसी यांच्या आग्रही भूमिकेमुळे व ब्रिटिश व्यापाऱ्यांनी दाखवलेल्या उत्साहामुळे खास करून ई.आय. रेल्वेचे स्टीफन्सन व जी.आय.पी. कंपनीचे जॉन चॅपसन यांनी केलेल्या भांडवली गुंतवणुकीमुळे रेल्वेमार्गाची सुरुवात जोरात झाली. हे जरी खरे असले तरी जगाच्या पाठीवर जेथे जेथे रेल्वेचा विकास झालेला होता तेथे-तेथे भांडवलदारांनी स्वतःहून रेल्वेमार्गाची उभारणी केलेली होती. कारण औद्योगिक क्रांतीमुळे निर्माण झालेला माल अथवा कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल पुरवणे ही त्यांची प्राथमिक गरज होती. परंतु भारतामध्ये रेल्वेच्या माध्यमातून भांडवली गुंतवणुकदारांना नफा होईल की काय याबाबत शंका होती. याच काळात १८५७ चा उठाव घडून आला. भांडवली गुंतवणुकदारांच्या पेक्षा ईस्ट इंडिया कंपनीलाच या रेल्वेमार्गाची आवश्यकता वाटत होती.

### ३) हमी पद्धतीचे फलीत

भारतीय रेल्वेच्या विकासासाठी राबवलेली रेल्वे हमी पद्धती कमी अधिक प्रमाणात फायदेशीर ठरली असे दिसते. लॉर्ड डलहौसीच्या आग्रही भूमिकेमुळे भारतात मोठे रेल्वे मार्ग निर्मिती करण्यास सुरुवात झाली. परंतु भारतात तयार झालेला रेल्वे मार्ग अधिक गेजचा असल्यामुळे यावर अधिक प्रमाणात खर्च झाला. यामुळे डलहौसीच्या धोरणावर हल्ला झाला. कारण हमी पद्धतीने करार झाल्याने नुकसान भरपाईची जबाबदारी कंपनीची असल्याने रेल्वे कंपन्यांनी खूप मोठ्या प्रमाणात खर्च केला. रेल्वे मार्ग बांधणीचा खर्च दर मैलाला ९० हजार रुपये

येईल असा अंदाज होता परंतु सन १८६९ पर्यंतच्या काळात दर मैलाला तो खर्च २ लाख रुपये एवढा झाला. शिवाय जमीनी विकत घ्याव्या लागत होत्या व रेल्वे कंपन्यांना मोफत द्याव्या लागत होत्या त्यामुळे कंपनीचा याठिकाणी खूप मोठ्या प्रमाणात तोटा झालेला होता याचबरोबर गुंतवणूकदारांना ४.५ ते ५% पर्यंत व्याज द्यावे लागत असल्याने होणारी तूट भरून काढण्यासाठी कंपनीने भारतासारख्या गरीब देशातील जनतेवर कराचा बोजा वाढवला. सन १८६९ पर्यंत रेल्वेच्या अंदाजपत्रकात १७ करोड रुपयांची तूट आली. ब्रिटिशांनी सुरुवातीच्या काळात अवलंबीलेल्या हमी पद्धतीबद्दल अनेक विचारवंतांनी सडकून टिका केली. ना. दिनशा वाच्छा म्हणतात की, ''... भारतातील हे लक्षावधी लोक वर्षाला फक्त ३६ मैल प्रवास करतात, पण आगगाडीच्या वाहतुकीचा सर्वात मोठा - दर साल १३ कोटी रुपयांचा भार त्यांव्यावर पडतो.'' आर. सी. दत्तनीही हमी पद्धतीवर टिका केलेली आहे.

### ४) सन १८६९-१८७९ (शासकीय बांधणी व व्यवस्थापन)

ईस्ट इंडिया कंपनीने राबविलेल्या हमी पद्धतीत अनेक दोष होते आणि यावर खूप मोठ्या प्रमाणात पैशाची उधळपट्टी झालेली होती. त्यामुळे कंपनीवर चारीबाजूनी टिका व्हायला लागली. शिवाय खाजगी रेल्वे कंपन्या कार्यक्षमपणे रेल्वेचे व्यवस्थापन करण्यात अपयशी ठरत होत्या. या काळातील गव्हर्नर जनरल लॉर्ड लॉरेन्सलाही या सर्व बाबीची जाणीव होती. त्यामुळे सन १८६९ नंतर भारतमंत्र्यांनी सरकारच्या वतीने रेल्वेमार्गाची बांधणी करण्याची सूचना केली. या सूचनेपाठीमागे भारतात ब्रिटिश भांडवल उभे करणे हा उद्देश होता. यासाठी कंपनी सरकारने खालील महत्त्वपूर्ण निर्णय घेतले.

१) ग्रेट इंडियन पेनिन्शुला रेल्वे कंपनी (G.I.P.) बरोबर केलेल्या पूर्वीच्या करारात बदल करून कंपनीच्या नफ्यातील अर्धा वाटा कंपनी सरकारला देण्याची तरतूद केली.

२) ईस्ट इंडिया कंपनीने स्वतःच्या हिमतीवर भांडवल उभारून स्वतःच रेल्वेमार्गाची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला व सन १८६९ नंतर रेल्वेमार्गाच्या निर्मितीवर भांडवल गुंतवणूक करण्यास सुरुवात केली.

३) हमी पद्धतीत कंपनी सरकारचा तोटा झाल्याने नवीन खाजगी कंपन्याबरोबर रेल्वेमार्गाच्या निर्मिती व व्यवस्थापनाबाबत करार करणे बंद केले.

४) ईस्ट इंडिया कंपनीने प्रतिवर्षी २० लाख पौंडपर्यंत सार्वजनिक कर्ज उभारून सरकारी व्यवस्थापनाखालील लोहमार्गात गुंतवणूक करण्याचे धोरण स्विकारले व कमी खर्चाचे 'मीटर गेज' पद्धतीचे रेल्वेमार्ग तयार करण्याचे धोरण स्विकारले.

हमी पद्धतीमुळे कंपनी सरकारवर रेल्वे निर्मितीमुळे कर्जाचा बोजा वाढलेला होता. शिवाय प्रतिवर्षी तोटा होतच होता. त्यामुळे मिळणारे उत्पन्न व होणारा खर्च यांचा लेखाजोखा तपासण्यासाठी ब्रिटिश संसदेने एक समिती नेमली (१८७१) या समितीने सन १८७१-७४ या काळात भारतीय अर्थव्यवस्थेचा खास करून रेल्वे संबंधी अनेक बाबींचा सविस्तर अभ्यास करून आपला अहवाल भारतमंत्री लॉर्ड सॅलिसबरी यांना दिला. समितीच्या अहवालानुसार सन १८७४ मध्ये लॉर्ड सॅलिसबरी यांनी पुढील तीन महत्त्वपूर्ण निर्णय दिले.

१) घेतलेल्या कर्जावरील व्याज देता येईल इतका नफा मिळवून देणारी लोहमार्गाची कामे कर्जातून करावीत.

२) दुष्काळ प्रतिबंधक लोहमार्गासाठी लागणारा खर्च त्या-त्या वर्षाच्या महसुलातून करण्यात यावा व तो कमी पडला तरच कर्ज घ्यावे.

३) सार्वजनिक कामासाठी लागणारी सर्व कर्जे भारतातच उभारण्यात यावीत. रेल्वेमार्गासाठी करावयाच्या सार्वजनिक खर्चावर दरसाल २५ लाख पौंड इतकी कमाल मर्यादा ठेवावी.

लॉर्ड सॅलिबरीने भारतातील कंपनी सरकारच्या खर्चावर मर्यादा घातल्या, यातच लष्करी कारणामुळे पंजाब व सिंधमधील रेल्वेमार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रुपांतर करावे लागल्याने सरकारी तिजोरीवर अधिक ताण पडला. शिवाय सन १८६४-१८७८ या काळात भारतात सलग दुष्काळ पडल्याने उत्पादन घटले व सरकारी खर्चात वाढ झाली. भारतातील कंपनी सरकारच्या खर्चाच्या अडचणी संबंधी मार्ग काढण्यासाठी पुन्हा ब्रिटिश संसदेने एक समिती नेमली. या समितीने अगोदरच्या समितीच्या खर्चात फार बदल केले नाहीत. फक्त वार्षिक खर्चाची मर्यादा ३५ लक्ष पौंड करण्यात आली.

१८७०-७१ च्या दरम्यान भारतात ४,२५५ मैलांच्या रेल्वेमार्गाची निर्मिती झालेली होती. त्यामध्ये १८७८-७९ मध्ये ४,००० मैल रेल्वे मार्गाची वाढ झाली. या एकूण रेल्वे मार्गापैकी २/३ रेल्वेमार्ग खाजगी कंपन्यांकडे होते तर १/३ रेल्वे मार्ग सरकारी मालकीचे होते. हे जरी खरे असले तरी या काळात दुष्काळजन्य परिस्थिती होती. त्यामुळे रेल्वेतील गुंतवणूक कमी-कमी होत गेली. खरेतर ब्रिटिशांचे असे म्हणणे होते की, भारतातील दुष्काळ नाहीसा करावयाचा असेल तर रेल्वेसारख्या उत्तम दळणवळण साधनाची गरज आहे.

### ५) १८७९-१९०० (सरकार व खाजगी कंपन्यांची भागीदारी)

सन १८७९-८० च्या सुरुवातीच्या दशकाच्या प्रारंभी रेल्वे ही शासनाच्या व्यवस्थापनाखाली असावी हा विचार मागे पडला. पुन्हा एकदा रेल्वे बांधणीत खाजगी कंपन्यांचा सहभाग असावा असा विचार पुढे आला. त्याची कारणेही तशीच होती ती खालीलप्रमाणे-

१) रेल्वेमार्गाचा विस्तार करण्यासाठी लागणारा आर्थिक खर्च ब्रिटिश सरकारला पेलवणारा नव्हता परंतु रेल्वे विस्तारांची गरज वाढत होती.

२) भारतातील कच्चा माल इंग्लंडमध्ये जलद गतीने पोहचवणे व तेथे तयार झालेला पक्का माल भारतीय बाजारपेठेत नियमितपणे यावा यासाठी ब्रिटिश कारखानदार व्यापाऱ्यांची मागणी होती.

३) अफगाणिस्तान मार्गे रशिया भारतावर आक्रमण करेल त्यासाठी रेल्वे मार्गाच्या विस्ताराची आवश्यकता वाटत होती.

४) सन १८८० च्या दुष्काळ निवारण आयोगाने दुष्काळ निवारण करण्यासाठी आणखी ५,००० मैल लांबीच्या रेल्वेमार्ग विस्ताराची शिफारस केलेली होती.

वरील सर्व कारणांचा विचार करता ब्रिटिश सरकारकडे रेल्वेच्या विस्तारासाठी पुन्हा एकदा खाजगी कंपन्यांच्या गुंतवणुकीची गरज वाटत होती. नव्या मार्गाच्या निर्मितीबरोबरच सरकारी मालकीच्या रेल्वेमार्गाचे

व्यवस्थापनही खाजगी कंपन्यांकडे द्यावे असा नवा विचार पुढे आला व नवीन हमी पद्धतीचा स्विकार ब्रिटिश सरकारने केला.

### ६) नवीन हमी पद्धती

भारतातील रेल्वेच्या विकासासाठी व विस्तारासाठी सरकारी खर्चावर मर्यादा आल्याने ब्रिटिश सरकारने रेल्वेच्या विकासासाठी खाजगी कंपन्यांची पुन्हा मदत घेण्याचे ठरवले व त्यासाठी नवीन हमी योजना स्विकारली. या नवीन पद्धतीची काही वैशिष्ट्ये होती ती खालीलप्रमाणे

१) खाजगी कंपन्यांनी निर्माण केलेल्या रेल्वेमार्गाची मालकी भारत मंत्र्यांच्या नावे राहील.

२) दर २५ वर्षानी अथवा त्यानंतर दहा वर्षानी कराराचा फेरविचार केला जाईल व सरकारने ते रेल्वेमार्ग स्वतःकडे घेण्याचे ठरविल्यास प्रारंभी कंपन्यांनी गुंतविलेले भांडवल त्यांना परत करण्यात येईल.

३) खाजगी कंपन्यांनी गुंतवलेल्या भांडवलावर ३.५% व्याजाची हमी ब्रिटिश सरकारने घेतली.

४) खाजगी कंपन्यांना मिळणाऱ्या जादा नफ्यातील सरकारचा वाटा सुमारे ३/५ इतका ठरविण्यात आला.

५) ज्या रेल्वेमार्गाच्या माध्यमातून जादा नफा मिळणार नव्हता परंतु ते रेल्वे मार्ग लष्करी दृष्टीकोणातून अतिमहत्त्वाचे होते तेथील रेल्वे विकास सरकारने करावा असे ठरविण्यात आले. अशा रेल्वेमार्गांना 'संरक्षक रेल्वेमार्ग' असे संबोधण्यात आले व ज्या ठिकाणी नफा मिळणारे रेल्वेमार्ग होते त्यांना 'उत्पादक रेल्वेमार्ग' असे संबोधण्यात आले.

रेल्वेमार्गाचा विस्तार व विकास करण्यासाठी पूर्वीच्या जून्या हमी पद्धतीपेक्षा नवीन हमी पद्धती ब्रिटिश सरकारच्या दृष्टीकोणातून फायद्याची होती.

नफा मिळवून देणारे रेल्वेमार्ग खाजगी कंपनीकडे आणि तोट्याचे रेल्वेमार्ग सरकारकडे यामुळे आधिच आर्थिक तोटा सहन करीत असलेल्या सरकारला आर्थिक बोजा सहन होणार नव्हता. म्हणून नफ्याची आणि रेल्वे संरक्षक अशा दोन्ही प्रकारच्या रेल्वे मार्गाचा एक प्रस्ताव भारतमंत्र्यांना पाठवला परंतु तो त्यांना पसंत पडला नाही. उलटपक्षी भारतातील आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यासाठी सन १८८४ मध्ये एक समिती नेमली. या समितीने अभ्यास करून असा अहवाल दिला की, १) नफा व संरक्षक असा फरक करू नये. २) सरकारी व खाजगी असे दोन्ही प्रकारचे रेल्वेमार्ग असावेत, ३) प्रत्येक रेल्वेमार्ग आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावा. अशा स्वरूपाच्या शिफारशी केल्या. याशिवाय आणखी एक संदिग्ध स्वरूपाची शिफारस केली ती अशी की, एखादा रेल्वेमार्ग सरकारकडे असावा की खाजगी कंपनीकडे असावा हे ठरविण्यात यावे आणि खाजगी व सरकारी रेल्वेमार्ग दोन्ही एकाचवेळी अस्तित्वात राहावेत. समितीच्या या संदिग्ध शिफारसीमुळे रेल्वे व्यवस्थापनात धरसोडीचे धोरण दिसून येवू लागले. कारण राजपुताना-माळवा रेल्वे सन १८८० मध्ये सुरू झाल्यावर रेल्वेमार्गात स्पर्धा उद्‌भवली. ती टाळण्यासाठी सरकारने तो लोहमार्ग ताब्यात घेतला. काही वर्षानी हाच मार्ग इ.इ.उ.ख. रेल्वे कंपनीकडे दिला. शिवाय प्रत्येक कंपनीबरोबर वेगवेगळे करार केले, यावरून या काळात ब्रिटिश सरकरकडे निश्चित स्वरूपाचे धोरण नव्हते व व्यवस्थापनाचा अभाव होता असे दिसते. परंतु या काळात रेल्वे मार्गाचा विकास व विस्तार झालेला दिसतो. सन १८५३ मध्ये रेल्वेमार्गाची लांबी फक्त २१ मैल इतकी होती. ती वाढून सन १८६३ मध्ये

२५०७ मैल इतकी झाली तर सन १८८३ मध्ये रेल्वेमार्गांचा विस्तार अधिक झपाट्याने झाला व रेल्वेमार्गांची लांबी १०,४४७ मैल इतकी झाली. विसाव्या शतकाच्या सुरुवातीस म्हणजे सन १९०३ मध्ये २६,९५६ मैल इतकी रेल्वेमार्गाची लांबी झालेली दिसते.

सन १९०० ते १९१४ या काळात रेल्वे मार्गांचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला व रेल्वेला फायदाही प्रचंड प्रमाणात होऊ लागला. त्यामुळे सन १९०५ मध्ये रेल्वेला स्वतंत्र खात्याचा दर्जा देण्यात आला. सन १९१४ पर्यंत भारतात ३४,५५६ मैल लांबीचे रेल्वेमार्ग टाकण्यात आले. सन १९०१ ते सन १९१४ या काळात रेल्वेच्या भांडवली खर्चात ३३० कोटी रुपयापासून ४९५ कोटी रुपयांपर्यंत वाढ झाली. परंतु याकाळात पहिल्या महायुद्धाची सुरुवात झाल्याने याचा ताण भारतीय रेल्वेवर पडलेला दिसतो. त्यामुळे रेल्वेमार्गाची दुरुस्ती व नुतनीकरण याकडे दुर्लक्ष झाले.

**रेल्वेमार्ग विकासाचे आर्थिक परिणाम/प्रभाव :**

भारत हा खंडप्राय देश. या खंडप्राय देशात दळणवळणाचे माध्यम निर्माण करणे फारच जिकीरीचे होते. या पार्श्वभूमीवर रेल्वेमार्गाचा विकास व विस्तार याचा विचार केला असता भारतीय अर्थव्यवस्थेवर याचा निश्चितच प्रभाव पडलेला दिसतो.

**१) प्रवासाचे मोठे साधन**

भारतामधील रेल्वेयंत्रणेचा प्रभाव अर्थव्यवस्थेच्या सर्व बाजूवर पडलेला दिसतो. ब्रिटिश काळात रेल्वेचा वापर अनेक लोक मोठ्या प्रमाणात करू लागलेले होते. सन १८७१ मध्ये १९ दशलक्ष प्रवाशांनी रेल्वेतून प्रवास केलेला होता. तर ही संख्या १९४५-४६ मध्ये १ अब्ज पर्यंत गेलेली दिसते.

**२) औद्योगिक विकासास हातभार**

उद्योग-धंद्यांना अनेक प्रकारच्या कच्चा मालाची आवश्यकता होती. उद्योग-धंद्याची ही गरज रेल्वेने भरून काढली. रेल्वेने हा कच्चा माल औद्योगिक केंद्रापर्यंत पोहचवण्याची व्यवस्था केल्याने औद्योगिकरणास चालना मिळाली. खाणी आणि खनिजांचा वापर करणाऱ्या उद्योगधंद्यासाठी कोळसा, लोखंड, मॅगेनीज इ. भारतातून मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाले. रेल्वेमुळे आधुनिक उद्योगांना चालना दिली परंतु भारतीय कुटिरोद्योगांच्या व लघुउद्योगाच्या ऱ्हासाची प्रक्रिया रेल्वेमुळे जलद झाली. औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंडमध्ये तयार झालेला पक्का माल भारताच्या सर्व भागात जलदगतीने पोहचू लागला त्यामुळे भारतीय पारंपारीक वस्तू बाजारपेठातून नाहीशा झाल्या.

**३) टपाल व्यवस्थेत सुधारणा**

रेल्वेच्या जलद दळणवळण साधनामुळे टपाल व्यवस्थाही अधिक जलद झाली. कमी खर्चात व कमी वेळेत टपाल पोहचवणे शक्य झाले. रेल्वे सेवा येण्या अगोदर घोडेस्वार, सांडणीस्वार, बैलगाड्या व लहान लहान नावा (होड्या) यांच्या माध्यमातून ने-आण केली जात होती. रेल्वेमुळे नियमित, स्वस्त आणि जलद टपालव्यवस्था निर्माण झाली.

### ४) शहरीकरणात वाढ

भारतामध्ये रेल्वेमार्ग निर्माण होण्याअगोदर पारंपारीक दळणवळणांच्या साधनांचा वापर केला जात असे. त्यामुळे मानवी हालचालीचा आकडे फारच कमी होता. पारंपारीक व्यवसायामुळे लोक एका गावातून दुसऱ्या गावात किंवा शहरात फारसे जात नव्हते. परंतु ब्रिटिशांच्या औद्योगिक धोरणामुळे भारतीय लघु व कुटीर उद्योगांचा ऱ्हास झाला व मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढलेली होती. रेल्वेमुळे एक शहर दुसऱ्या शहराशी जोडले गेले व ही शहरे एकप्रकारे औद्योगिक केंद्रे निर्माण झालेली होती व त्यांची सतत वाढ व विस्तार होत होता. कच्चा व पक्क्या मालाची ने-आण करणे याच बरोबर औद्योगिक शहरातील वाढत्या लोकसंख्येला आवश्यक जीवनावश्यक वस्तूचा मोठ्या प्रमाणात पुरवठा होऊ लागल्याने शहरीकरणाला गती मिळाली.

### ५) आयात-निर्यात वाढली

रेल्वेमार्गाच्या विकासामुळे भारतातील मालाची निर्यात कमालीची वाढलेली दिसते. रेल्वेमुळे अंतर्गत बाजारपेठामधील पक्का अथवा कच्चा माल बंदराच्यापर्यंत जलद व कमी खर्चात पोहचवणे शक्य झाले. गहू, भात, ताग, कापूस, तेलबीया, कसलेले चमडे इ. प्रकारच्या कच्चा मालाच्या निर्यातीत वाढ झाली. सन १८६२-१९२४ या काळात २३० पट वाढलेला दिसतो. तर याच काळात आयात माल ३५० पट वाढलेली दिसते. भारतात अंतर्गत भागात निर्माण झालेले रेल्वे जाळे परदेशातून आलेला पक्का माल भारतीय बाजारपेठांच्या कानाकोपऱ्यात पाठवण्याचे प्रभावी साधन होते. एका अर्थाने भारतामधील शेती व्यवस्था आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी रेल्वेच्या माध्यमातून जोडली गेली.

### ६) बिगर शेती क्षेत्रावरील प्रभाव

औद्योगिक क्षेत्रात रेल्वेमुळे कमी किमतीत कच्चा मालाची ने-आण करणे सोपे झाले व त्या वस्तू भारतीय बाजारपेठेत पोहचवण्याची सोय झाली. त्यामुळे काही प्रमाणात भारतीय उद्योगांना चालना मिळण्यास मदत झाली. परंतु उद्योग क्षेत्रातील हा प्रभाव मर्यादीत स्वरूपाचा होता. भारतातील रेल्वे यंत्रणा ही भारताच्या अर्थव्यवस्थेचे वसाहतवादी स्वरूप पालटू शकली नाही. खरेतर रेल्वे व्यवस्था ही त्याच वसाहतवादी शोषण यंत्रणेचा घटक होती. भारतामध्ये रेल्वे बांधणीमध्ये ब्रिटनमधून आयात भांडवल वापरले गेले. रेल्वेसाठीचे तंत्रज्ञान देखील ब्रिटिशच होते. लोखंडापासून तंत्रज्ञानापर्यंत सर्वच परकीय असल्याने भारतीय रेल्वे पूर्णपणे परकीयच होती. त्यामुळे याचा भारतीय बिगरशेती क्षेत्रावर फारसा चांगला परिणाम झाला नाही. भारतातील रेल्वे बांधणीचा फायदा ब्रिटनमधील उद्योगांना झाला. जवळपास ९९% भांडवल ब्रिटनमधून आलेले असल्याने भारतीय भांडवल बाजारपेठेत याचा फारसा परिणाम झाला नाही. खरेतर भारताच्या अर्थव्यवस्थेबरोबर रेल्वे जोडली गेली नाही. हे जरी खरे असले तरी रेल्वेच्या माध्यमातून भारतातील ग्रामीण प्रदेश व्यापारीकरणात पुढे आले.

**संक्षिप्त :**

रेल्वेमुळे भारताला झालेला फायदा

१) स्वस्त जलद दळणवळण साधनाची सोय झाली.

२) भारताचे दळणवळणाच्या माध्यमातून एकीकरण होण्यास मदत झाली.

३) व्यापारासाठी नवीन बाजारपेठा खुल्या झाल्या.

४) रेल्वेमुळे दुष्काळावर मात करण्यास मदत झाली.

५) रेल्वेमुळे शेतकी उत्पादनाला चालना मिळाली.

**रेल्वेमुळे भारतावर झालेला आर्थिक परिणाम/तोटा**

भारतामध्ये जो रेल्वेमार्गाचा विकास व विस्तार झाला त्यांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर बिकट परिणाम झाला असे काही विचारवंतांचे मत आहे. भारतीय रेल्वेचा हा प्रभाव आर्थिक स्वरूपाचा होता. त्यामुळे प्रसिद्ध इतिहासकार रमेशचंद्र दत्त यांनी ब्रिटिश सरकारने रेल्वे विकासावर केलेल्या खर्चास 'वायफळ खर्च' असे संबोधले आहे. सर ॲर्थर कॉटन या अभियंत्यांनी रेल्वेच्या विकासापेक्षा ब्रिटिशानी भारतात जलसिंचन व्यवस्था मजबूत करावयास पाहिजे होती असे मत व्यक्त केले. रेल्वेचा भारतावरील परिणाम हा नकारात्मक स्वरूपाचा होता असे राष्ट्रवादी विचारांच्या विचारवंतांचे म्हणणे होते. रेल्वेमुळे भारतामध्ये औद्योगिक विकासाला खिळ बसली. भारतामध्ये औद्योगिक क्रांती घडून न आल्याने रेल्वेमुळे केवळ व्यापारी विकास झाला. रेल्वेच्या विस्ताराने भारतातील ग्रामीण भागाचे व्यापारीकरण झाले. थोडक्यात सांगावयाचे तर रेल्वेच्या माध्यमातून भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेचे वसाहतीकरण घडून आले. ब्रिटनमधून आयात केलेला पक्का माल भारताच्या कानाकोपऱ्यात पसरल्याने इंग्लंडमधील स्वस्त मालाशी भारतीय माल स्पर्धा करू शकला नाही. त्यामुळे हस्तकला उद्योगांचा ऱ्हास झाला.

**१९ व्या शतकात भारतीय अर्थव्यवस्थेतील रेल्वेचे स्थान**

भारतामध्ये १९ व्या शतकामध्ये रेल्वेचा जो विकास व विस्तार घडून आला त्यांचे १९ व्या शतकातील भारतीय अर्थव्यवस्थेमधील नेमके स्थान काय यासंबंधी भारतीय व पाश्चिमात्त्य विचारवंतांच्यामध्ये मतभेद असलेले आढळतात. भारतातील अनेक इतिहासकारांनी रेल्वेला पाश्चात्य साम्राज्यवादाचे हत्यार या दृष्टीकोणातून संबोधले आहे. रेल्वे उद्योगात गुंतवलेले ब्रिटिश भांडवल व रेल्वेच्या माध्यमातून लावलेले डोईजड भाव इ.चा अभ्यास करून भारतीय इतिहासकारांनी असे मत मांडले आहे की भारतीय रेल्वेचा विकास हा ब्रिटिशांच्या भारतीयांच्या शोषणाचाच एक भाग होता. या विचाराला काही पाश्चात्य विचारवंतांनी छेद दिलेला आहे. त्यांच्या मते भारतीय रेल्वेच्या विकासाने आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रगतीमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडली. या विचारवंतांच्यामध्ये ब्रिटिशांच्या उपकारी धोरणामुळेच त्यांनी भारतीय रेल्वेत आपले भांडवल गुंतवले.

भारतीय रेल्वे बांधणीसंबंधी राष्ट्रवादी विचारांच्या इतिहासकारांनी असे मत मांडले आहे की, भारतातील रेल्वे बांधणीसाठी भारतीय वस्तू व साधनसामग्री उभा करता आली असती तर भारतीय उद्योगाना चालना मिळाली असती. रेल्वे कंपन्यांचे मुख्यालय जरी लंडनमध्ये असले तरी वास्तवात भारतातील ब्रिटिश सरकार ह्या कंपन्यांवर दबाव आणून रेल्वेला लागणारी साधनसामग्री भारतातूनच निर्माण करावी अशी सक्ती करू शकले असते मात्र त्यांनी असे केले नाही. ब्रिटिश सरकारने १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतामध्ये लोखंड पोलाद उद्योग स्थापन्यास प्रोत्साहन दिले नाही. कारण भारतीय रेल्वेला लागणारे सर्व लोखंड व पोलाद इंग्लंडवरून आयात केले. रेल्वेसाठी लागणारे तंत्रज्ञानही इंग्लंडमधूनच आयात केलेले होते. त्यामुळे भारतीय तंत्रज्ञानात काही विकास झाला

नाही. रेल्वेसाठी लागणारे सर्व सुटे भाग इंग्लंडमधून आयात होत असल्याने भारतामध्ये लघुउद्योगांचा विकास अथवा चालना मिळाली नाही. म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये रेल्वेचा फारसा बदल अथवा औद्योगिक दृष्टीकोणातून फारसा फायदा झाला नाही.

**राष्ट्रवादी व साम्राज्यवादी विचारवंतामध्ये उद्योगासंबंधी झालेला वाद :**

१९ व्या शतकात ब्रिटिश सरकारने भारतीय अर्थव्यवस्थेसंबंधी जे धोरण स्विकारले होते. त्यासंबंधी राष्ट्रवादी व साम्राज्यवादी विचारवंतांच्या मध्ये मतभेद असलेले दिसतात. ब्रिटिशानी भारतीय उद्योगासंबंधी खुले व्यापारी धोरण अवलंबिले होते. ॲडम स्मिथसारख्या आर्थिक विचारवंतांच्या प्रभावामुळे इंग्लंडमध्ये आणि वसाहतीमध्ये हे धोरण स्विकारले गेले. खुल्या धोरणाने राज्यसंस्थेला फक्त कायदा व सुव्यवस्था सांभाळण्याची जबाबदारी होती. ॲडम स्मिथ प्रणीत साम्राज्यवादी विचारवंतांच्या मते इतर औद्योगिक क्षेत्रात राज्यसंस्थेने हस्तक्षेप केल्यास त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होतो. थोडक्यात राज्यव्यवस्थेने अर्थव्यवस्थेमध्ये कोणताही हस्तक्षेप करणे गरजेचे नाही. अशा खुल्या धोरणाच्या प्रभावाखाली असणाऱ्या ब्रिटिश सरकारने भारतातील उद्योगाबाबत हेच धोरण अवलंबिले होते. भारतातील उद्योगाची वाढ व्हावी म्हणून कोणताही हस्तक्षेप ब्रिटिश सरकारने करण्याचा प्रयत्न केला नव्हता. भारतामध्ये नैसर्गिकरित्या ज्या उद्योगाची वाढ होईल तीच खरी प्रगती असे ब्रिटिश समजत होते. ब्रिटिश साम्राज्यवादाच्या या विचारांना १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय राष्ट्रवादी विचारवंतानी आव्हान दिले. युरोपमध्ये देखील ॲडम स्मिथच्या खुल्या धोरणाविरोधात अनेक आर्थिक विचारवंत उभे राहिलेले होते.

जर्मन विचारवंत फेड्रीकईस्ट याने स्मिथच्या खुल्या धोरणाविरोधात हस्तक्षेपी धोरणाचा पुरस्कार केला. ईस्टच्या मते राज्यसंस्थेच्या पुढाकारामुळे अर्थव्यवस्था विकसीत होवू शकते. भारतात देखील न्या. महादेव गोविंद रानडे यांनी ब्रिटिशांच्या खुल्या धोरणाविरोधात आवाज उठवण्यास सुरुवात केली. न्या. रानडेनी असे मत मांडले की, भारतात उद्योगाना प्रोत्साहन द्यायचे असेल तर राज्यसंस्थेने अर्थव्यवस्थेमध्ये हस्तक्षेप करणे गरजेचे होते. भारतातील बाल्य अवस्थेत असलेल्या उद्योगांना परदेशी मालापासून संरक्षण देण्यासाठी राज्यसंस्थेने अनुकूल जकात धोरण अवलंबविले पाहिजे होते असे राष्ट्रवादी विचारवंतांचे मत होते. थोडक्यात ब्रिटिश राज्यसंस्थेने पुढाकार घेऊन देशी उद्योगाना मदत केल्याशिवाय भारतात त्यांची वाढ होणार नाही असे न्या. रानडेंचे मत होते. दादाभाई नौरोजी, आर. सी. दत्त, जी. वी. जोशी, लोकमान्य टिळक, लाला लजपतराय यांनी खुल्या धोरणा विरोधात आवाज उठवून भारतीय उद्योगाला संरक्षण देण्याची मागणी केली. मात्र ब्रिटिश सरकारने यांची मागणी मान्य केली नाही.

**❊ स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. बंगालमधील कापड केंद्रांना ......... असे म्हणत.

२. ढाक्याचे ........... प्रकारचे कापड जगप्रसिद्ध होते.

३. कर्नाटक प्रांतात ............... प्रकारच्या कापसाच्या जातीच्या उत्पादनाला प्रोत्साहन दिले.

४. भारतातील पहिली कापड गिरणी ............... मध्ये सुरू झाली.

५. भारतातील रेल्वेचा विकास करण्यासाठी ............... पद्धतीचा स्विकार केला.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. चीनमधील कोणत्या घटनेमुळे भारतातील कापड निर्यात घटली.

२. मुंबईमध्ये कोणत्या वर्षी प्लेगची साथ आली.

३. बंगालमध्ये तागाची पहिली गिरणी कोणी स्थापन केली.

४. राजपुताणा-माळवा रेल्वे मार्ग केव्हा सुरू झाला.

५. कोणत्या इतिहासकाराने ब्रिटिशांनी रेल्वेवर केलेल्या खर्चास 'वायफळ खर्च' असे संबोधले आहे.

### ३.२.३ कामगार चळवळीचा उदय

औद्योगिक क्रांतीमुळे युरोपमध्ये खासकरून इंग्लंडमध्ये उद्योगधंद्यांची भरभराट घडून आली व १८ व्या शतकामध्ये शेवटच्या काही दशकात कामगार वर्गाच्या संघटनातून कामगार चळवळ उदयास आली. १९ व्या शतकाच्या मध्यापर्यंत ती संपूर्ण जगभर पसरलेली दिसते. भारतात १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात कामगारवर्गाचा उदय झाला. कामगारविषयक कायद्याच्या संरक्षणाअभावी भांडवलदारांकडून कामगारांची प्रचंड पिळवणूक केली जावू लागली. कमी मजूरी, कामकाजाचे अधिक तास, कामाच्या ठिकाणचे असुरक्षित व अनारोग्यकारक वातावरण यासंबंधीच्या कारणामुळे कामगार चळवळ विकसित झाली.

औद्योगिक क्रांतीने कामगार वर्ग निर्माण केला. परंतु याचबरोबर कामगारांना विपन्नावस्थेत ठेवणारी एक विषम समाजव्यवस्था निर्माण केली. कामगारवर्गाचा उदय झाला तो या समाजव्यवस्थेला विरोध करण्यासाठी व तिच्या जागी समतेची, वैपुन्याची व मातृभावाची नवीन समाज व्यवस्था निर्माण करण्यासाठी. फ्रेंच राज्यक्रांतीने संपूर्ण जगाला समता, स्वातंत्र्य व बंधुभावाचा संदेश दिलेला होता. यातून संपूर्ण जगभरातील कामगार चळवळीला बळ मिळाले. उत्पादन साधनांची मालकी गमावलेला, केवळ स्वतःचे श्रम विकून जगणारा हा कामगार वर्ग संपूर्ण कारखानदारी पद्धतीचे उत्पादन करणाऱ्या समाजाचे वैशिष्ट्ये होता. कामगार हा समाजातील एक दुबळा घटक असून त्याचे हितसंबंध नेहमीच धोक्यात असतात. साहजिकच आपल्या हितसंबंधाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी संघटित होण्याची प्रवृत्ती कामगारांमध्ये निर्माण झाली व फ्रेंच राज्यक्रांतीने बंदिलेल्या समता, स्वातंत्र्य व बंधुता या तत्त्वाने कामगार चळवळीचा उदय झाला. भारतातील कामगार चळवळीची सुरुवात प्रामुख्याने मुंबई, बंगाल व आसाम प्रांतामध्ये सन १८७५ ते १८९० च्या दरम्यान झाली.

### मुंबईमधील कामगार चळवळीचा उदय

मुंबई हे कापड उद्योगाचे केंद्र असल्याने मुंबईमध्ये खूप मोठ्या प्रमाणात कामगारांची संख्या होती. सन १८५४ मध्ये कावसजी दावर यांनी मुंबईमध्ये पहिली कापडगिरणी सुरू केली. मुंबईमधील कापडगिरण्यांची ही सुरुवात पुढे कापड गिरण्या निर्माण होण्यास प्रेरक ठरली व दिवसेंदिवस गिरण्यांची संख्या वाढत गेली. या काळात मुंबईमधील गिरण्यांचा कारभार मॅनेजिंग एजन्टस् पाहत होते. परंतु दैनंदिन कामकाज व व्यवस्थापन मॅनेजरच्या

(व्यवस्थापक) हातात होते. कार्डिंग, विव्हिंग, स्पिनिंग इ. खात्याची सर्व कामे त्या-त्या खात्याचे तज्ज्ञ व त्यांचे सहाय्यक करीत असत. यांच्यानंतर दलाल (Jobber) निरीक्षक/पर्यवेक्षक (Supervisor) हे दोन घटक महत्त्वाचे होते. यामध्ये गिरणी प्रशासनातील महत्त्वाचा धागा म्हणजे दलाल होय. दलालांना यामध्ये खूप महत्त्व होते. गिरणीमध्ये नोकरी मिळवून देण्यामध्ये या दलालांची भूमिका महत्त्वाची ठरत असे. त्यासाठी त्यांना 'बक्षिस' अथवा 'दस्तुरी' मिळत असे. सन १८९० पर्यंत दलालांना पैसे देण्याची ही प्रथा सुरूच होती. नोकरी मिळवण्यासाठी स्त्री अथवा पुरुष यांना २ रुपये ते ५ रुपयापर्यंत 'दस्तुरी' द्यावी लागत होती. ग्रामीण भागातून कामानिमित्त्य मुंबईत येणाऱ्या कामगारांचे शोषण हे दलाल लोक करीत असत. गिरणी कामगारांच्या चळवळीत शोषण हा महत्त्वाचा मुद्दा होता. गिरणी मालक ते दलाल अशा अनेक टप्प्यामध्ये कामगारांचे शोषण केले जात होते. मुंबईमधील गिरणी कामगारांच्या उदयामागे खालील कारणे होती.

१) सन १८५८ पासून कापडगिरण्या दिवसांच्याबरोबर रात्रीही सुरू राहू लागल्या त्यामुळे कामाचे तास वाढले. उन्हाळ्यात कामाचे तास १३-१४ व हिवाळ्यात १०-१२ तास इतके होते.

२) गिरणीमधील काम सुरू होण्याच्या वेळा निश्चित नव्हत्या त्यामुळे कामगार तिथेच थांबत त्यामुळे त्यांना अनेक प्रकारच्या त्रासाना सामोरे जावे लागत. कारण कामगार उशीर झाल्यास पगार कपात केली जात असे.

३) कामाच्या ठिकाणी स्वच्छता, आरोग्याच्या व सुरक्षेच्या सोयीकडे मालकाचे पूर्णपणे दुर्लक्ष होते.

४) गिरण्यामध्ये काम करणाऱ्या स्त्रिया, पुरुष व मुले या सर्वानाच अल्प मजूरी व जास्तीचे काम दिले जात असे.

५) कामगारांना कामाच्या वेळी मधली सुट्टी दिली जात नव्हती. तसेच आठवड्यातून एक दिवसाची साप्ताहीक सुट्टीही दिली जात नव्हती.

वरील कारणाच्या शिवाय काही सम्राज्यवादी दृष्टीकोणातून राबवलेली धोरणे हेही या चळवळीच्या मुळाशी असलेली दिसतात. मुंबईमधील कापड गिरण्या इंग्लंडमधील कापडगिरण्यांच्या बरोबर स्पर्धा करत आहेत असे ब्रिटिशिंाचे म्हणणे होते. भारतामध्ये स्वस्त मजूर व कामाचे तास अधिक त्यामुळे त्याचा फायदा गिरणी मालकांना होतो अशी त्यांची भूमिका होती. मुंबईमधील कामगार चळवळीची सुरुवात जरी नारायण मेघाजी लोखंडे यांच्या प्रयत्नातून झालेली असली तरी ब्रिटिशांनी मंजूर केलेला फॅक्टरी अॅक्टही तितकाच महत्त्वाचा होता. तो पुढीलप्रमाणे

मुंबईमधील कापड गिरण्यांच्या उत्पादनामुळे मँचेस्टरमधील गिरणी मालकांना धक्का बसलेला होता. मुंबईमधील कापडगिरण्यांचा आपणाला धोका आहे. त्यामुळे त्याला वेळीच आवर घातला पाहिजे यासाठी फॅक्टरी अॅक्ट भारतात लागू करावा यांसाठी मँचेस्टरमधील गिरणी मालकांनी भारत सरकारवर दबाव आणला. त्यांचे असे म्हणणे होते की, यामुळे मुंबईमधील गिरणी उत्पादनावर मर्यादा येतील कारण फॅक्टरी अॅक्टमुळे कामगार वर्गात सजगता येईल.

मुंबईमध्ये कामगारांना संघटित करण्याचा पहिला प्रयत्न सन १८७८ मध्ये सोराबजी सापूरजी बंगाली यांनी केला होता. सोराबजी सापूरजी बंगाली व नारायण मेघाजी लोखंडे यांच्या नेतृत्वाखालील मुंबईमधील गिरणी कामगारांनी कामगार चळवळीला बळ दिले. सन १८७५ मध्ये नेमलेल्या कारखाना आयोगाने (Factory Commission) काही नियंत्रण व बदल सुचवले. यामुळे कामगारांची परिस्थिती सुधारण्यास मदत झाली. परंतु

कापड गिरणी मालक संघाने (Mill Owners Association) ही नियंत्रणे अनावश्यक व जाचक वाटत होती. त्यामुळे त्याला त्यांनी विरोध केला. यावरी सोराबजी बंगाली व नारायण लोखंडे यांनी कामगारांच्या हिताच्या दृष्टीकोणातून एका विधेयकाचा मसुदा मुंबईच्या गव्हर्नरांना पाठवला. त्याचवेळी राघवे सुकाराम या कामगाराने गिरणी कामगारांच्या वतीने बंगाली व लोखंडे यांच्या विधेयकास पाठिंबा देणारे निवेदन गव्हर्नरला दिले. याला काही ब्रिटिश अधिकाऱ्यांचाही पाठिंबा होता. रॉयल मिलमधील अधिकारी ब्राऊन याने स्त्रिया व बारा वर्षाच्या खालील मुलांची पिळवणूक होते तेव्हा मुंबईमधील गिरणी कामगारांच्यासाठी फॅक्टरी ॲक्ट लागू करावा अशी सूचना मुंबई सरकारला केली. मँचेस्टरच्या दबावाखाली भारतातील ब्रिटिश सरकार फॅक्टरी ॲक्ट लागू करेल या भितीने मुंबईमधील गिरणी मालकांनी सन १८७६ मध्ये 'बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन' (Bombay Mill Owners Association) ही संघटना स्थापन केली. या गिरणी मालकांना कामगारांच्यापेक्षा स्वतःचे हित व फायदा महत्त्वाचा वाटत होता. तरीदेखील मँचेस्टरमधील गिरणी मालकांच्या दबावामुळे मुंबईचा कलेक्टर अर्बथ नॉट यांच्या अध्यक्षतेखाली फॅक्टरी ॲक्टच्या निर्मितीसाठी एक कमिशन नेमले. यामध्ये नि. बायथेल, सर मंगलदास नथुभाय, मॅक्सबेल, मोरारजी गोकुळदास, गिरणी मालकांच्या प्रतिनिधीचा समावेश होता. तर डॉ. बलान्नी व रावसाहेब विश्वनाथ मंडलिक हे सामान्यांचे प्रतिनिधी होते यांनी फॅक्टरी ॲक्टला विरोध केला.

या फॅक्टरी ॲक्टच्या संबंधी दोन प्रवाह समोर आले. यामध्ये 'जामे जमशेद' व 'नेटिव ओपिनियन' व 'राफ्फत गोक्तर' या वृत्तपत्रानी फॅक्टरी ॲक्टला विरोध केला तर 'इंदुप्रकाश' ने फॅक्टरी ॲक्टच्या बाजूने उभे राहिलेले दिसतात. या फॅक्टरी ॲक्टच्या पार्श्वभूमीवर भारतातील ब्रिटिश सरकारने अधिनियम १६ चा अवलंब केला व भारतीय सुतावरील निर्यातदर कमी केला व इजिप्त व अमेरिका येथून भारतात आयात केलेल्या लांब धाग्याच्या कापसावर ५% आयात कर बसविला. फॅक्टरी ॲक्टच्या संदर्भात परस्पर मतप्रवाह समोर येत असताना सन १८७८ मध्ये पुणे सार्वजनिक सभेनेही कामगारविषयक कायदा करण्याबद्दल आग्रह धरला होता. परंतु सन १८७९-८० या काळात गिरणी मालकांना मंदीचा फटक बसल्यामुळे त्यांनी कामगारांच्या मजुरीचे दर कमी केले तर काही गिरणी मालकांनी आठवड्यातून २-२ दिवस गिरण्या बंद करण्याचा निर्णय घेतला. या सर्वाचा परिणाम होऊन सन १८८१ मध्ये पहिला कारखाना नियंत्रण कायदा (Factory Act) लागू करण्यात आला. परंतु त्यातील तरतुदी असमाधानकारक व अपुऱ्या असल्यामुळे कामगारांचा असंतोष कायम रहिला. या काळात कामगारांना एकत्र आणण्याचे काम नारायण मेघाजी लोखंडे यांनी केले. या कायद्यातील त्रुटीवर ना. म. लोखंडे यांनी टिका केली व 'इंडियन स्पेक्टेटर' व 'राफ्त गोफ्तर' या वृत्तपत्राच्या माध्यमातून कामगार संघटनांच्या स्थापनेची आवश्यकता प्रतिपादीत केली. ना. म. लोखंडे यांनी कामगारांच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी 'दिनबंधू' मधून लिखाण केले व कामगारांना संघटित करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला. परिणामस्वरूप 'बॉम्बे मिल हॅण्ड असोसिएशन' (Bombay Mill Hand Association) ही भारतातील पहिली कामगार संघटना स्थापन केली. यामध्ये रघू भिकाजी, गेनू बाबाजी, नारायण सुर्कोजी या दलालांनी मदत केली. तर विठ्ठल कोरगांवकर, कृष्णाजी अर्जुन केळुसकर, रामचंद्र शिंदे व नारायण पवार या सत्यशोधक कार्यकर्त्यांनी मोलाचे सहकार्य केले.

मुंबई सरकारने फॅक्टरी ॲक्टमधील त्रुटीचा अभ्यास करण्यासाठी मुंबईचा कलेक्टर डब्ल्यू. बी. मूलक यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती (Factory Commission) नेमली. श्री. नारायण मेघाजी लोखंडे यांनी

कामगारांच्या वस्तूस्थितीकडे लक्ष देण्याची विनंती केली व ५,००० सह्यांचे एक निवेदन समितीला दिले. कामगारांच्यामध्ये जागृती निर्माण करण्यासाठी श्री. ना. म. लोखंडे यांनी २३ सप्टेंबर १८८४ परळ येथे व २२ सप्टेंबर १८८४ भायखळा येथे दोन सभा घेतल्या. या सभांना कामगारांनी उत्फूर्त पाठिंबा दिला व मागण्यांचा एक ठराव १५ ऑक्टोबर १८८४ रोजी फॅक्टरी कमिशनचे अध्यक्ष डब्ल्यू. बी. मूलक यांच्याकडे पाठविला.

१) रविवारचा पूर्ण दिवस गिरणी कामगारांना सुट्टी देण्यात यावी.

२) कामगारांना दुपारी अर्धा तास सुट्टी देण्यात यावी.

३) गिरणीमधील काम सकाळी ६.३० ते सुर्यास्तापर्यंतच असावे.

४) महिन्याचा पगार १५ तारखेपर्यंत द्यावा.

५) एखाद्या कामगाराला कामावर असताना जर दुखापत झाली तर तो बरा होईपर्यंत त्याला पूर्ण पगार देण्यात यावा व एखाद्या कामगाराचा कामावर असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबाला पेन्शन देण्यात यावी.

कामगार संघटनांनी केलेल्या मागण्या व फॅक्टरी ॲक्टसंबंधी विचारविनिमय चालू असताना मुंबईमधील गिरणी कामगारांनी आपली एकजूट दाखविण्यासाठी सन १८८५ मध्ये मुंबईच्या दोन गिरण्यांमध्ये संप केला. संपाचे कारण म्हणजे कामगारांच्या पगारात केलेली कपात व पगार देण्यास केलेला विलंब हे होते. यानंतर सन १८८७ मध्ये कुर्ल्याच्या 'स्वदेशी' मिलमध्ये कामगारांनी संप केला. मराठी कामगारांनी केलेला हा संप मोडण्यासाठी गिरणी मालक असलेले जे. एल. टाटा यांनी उत्तर भारतातून कामगार आणून मराठी कामगारांना शह देण्याचा प्रयत्न केला. परंतु यामध्ये त्यांना फारसे यश आले नाही. नारायण मेघाजी लोखंडे यांनी कामगारांना संघटित करण्याची मोहिम चालूच ठेवली होती. त्यांनी दि. ३ जून १८८९ रोजी मुंबई सरकारला एक पत्र लिहून लवकरात लवकर फॅक्टरी ॲक्ट अंमलात आणावा अशी विनंती केली. परंतु या काळात रविवारच्या साप्ताहिक सुट्टीबाबत कामगारांच्यामध्येच एकजूट नव्हती. यावर ब्रिटिश सरकारने सोयीचा दिवस म्हणून रविवारच हा साप्ताहिक सुट्टीचा दिवस असावा असे मत व्यक्त केले.

श्री लोखंडे यांनी २४ एप्रिल १८९० रोजी महालक्ष्मी रेसकोर्सवर एक जाहीर सभा घेतली व १०,००० लोकांच्या सह्यांचे निवेदन पाठवून आठवड्यातून एक दिवस तोही रविवार असावा अशी मागणी केली. कामगारांच्या प्रश्नांना व अन्यायाला वाचा फोडण्यासाठी 'दीनबंधू' नावाचे भारतातील कामगारविषयक पहिले नियतकालिक सुरू केले. यामधून त्यांनी कामगारांच्या समस्या व होणारा अन्याय या संबंधी लिखाण केले. शेवटी कामगारांच्या लढ्यास यश मिळाले व मुंबई सरकारने दि. १० जून १८९० रोजी रविवार हा सट्टीचा दिवस राहील असे घोषित केले. हा कामगार चळवळीचा मोठा विजय होता.

**फॅक्टरी लेबर कमिशन**

बर्लिन येथे सन १८९० मध्ये पहिली आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न झाली. या परिषदेमध्ये स्त्रिया व बाल कामगार यांच्या स्थितीवर बरीच चर्चा झाली. या पार्श्वभूमिवर मँचेस्टरच्या चेंबर ऑफ कॉमर्सने भारतीय कापड उद्योगात सुधारणा घडवून आणाव्यात याबाबत चर्चा झाली. याला भारतातील गिरणी मालकांनी विरोध केला. याकाळात मुंबई सरकारवर मोठा दबाव होता. अशा बिकट परिस्थितीत मुंबई सरकारने कलेक्टर मूलकचा अहवाल

बाजूला ठेवून दि. १५ सप्टेंबर १८९० रोजी मेजर लेथब्रिज यांच्या अध्यक्षतेखाली फॅक्टरी लेबर कमिशनची नेमणूक केली. यामध्ये महमद हुसेन, सोराबजी शापूरजी बेंगाली, प्यारे मोहन मुखर्जी इ. सदस्यांचा समावेश होता. या कमिशनने विविध क्षेत्रातील कामगार, संघटना, गिरणी मालक संघटना इ.च्या बरोबर चर्चा केली व त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. त्या आधारावर या कमिशन नवीन फॅक्टरी ॲक्ट तयार करून तो लागू करावा अशी शिफारस केली. कमिशनची ही शिफारस मुंबई सरकारने तात्काळ मंजूर करत १ जानेवारी १८९२ पासून या कायद्याची अंमलबजावणी सुरू केली.

**फॅक्टरी ॲक्ट १८९१** (The Factory Act 1891)

१ जानेवारी १८९१ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या फॅक्टरी ॲक्टमध्ये खालील कलमांचा समावेश होता.

१) जेथे चार महिने किंवा अधिक काळ व ५० किंवा ज्यापेक्षा जास्त कामगार काम करतात त्याला 'फॅक्टरी' असे संबोधण्यात यावेत.

२) स्त्रियांसाठी कामाचे ११ तास असावेत व दुपारी १२ ते १२.३० या काळात अर्धा तास सुट्टी असावी.

३) सकाळी ६.०० पूर्वी कोणत्याही स्त्रीला कामावर बोलावू नये व सायंकाळी ६.३० नंतर कामावर थांबवू नये.

४) १४ वर्षापर्यंतची व्यक्ती म्हणजे लहान मुले (कामगार) अशी व्याख्या समजण्यात आली. (यामध्ये त्यांनी कोणत्या वेळेत कामावर यावे व कोणत्या वेळेत शाळेत जावे यांचा समावेश होता.)

५) दुपारी १२ ते २ या वेळेत सर्व गिरण्यांमध्ये अर्धा तासाची विश्रांती असावी व दर रविवारी सुट्टी असावी.

६) सांडपाण्याची व्यवस्था, स्वच्छता, पुरेशी हवापाण्याची सोय व पाणीपुरवठा इ. सेवा सुविधा गिरण्यामध्ये असाव्यात व ही जबाबदारी स्थानिक सरकारने पार पाडावी.

सदरचा फॅक्टरी ॲक्ट तयार करण्यामध्ये नारायण मेघाजी लोखंडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावलेली होती. लोखंडेने ज्या महत्त्वपूर्ण सूचना व सहकार्य केले त्याबद्दल फॅक्टरी कमिशनने त्याचा यथोचित सन्मान केला. त्याचबरोबर मुंबई गिरणी मालक संघानेही त्याचा सत्कार केला व त्यांच्या कार्याची दखल घेतली. सन १८९२ मध्ये जरी फॅक्टरी ॲक्ट लागू केलेला असला तरी या कामगारांची वस्तूस्थिती जाणून घेण्यासाठी ब्रिटिश सरकारने 'रॉयल कमिशन ऑन लेबर'ची स्थापना केली. याही कमिशनपुढे नारायण मेघाजी लोखंडेंची विशेष साक्ष झालेली होती.

कामगार आपल्या हक्कासंबंधी अज्ञानी होते. कारण हे कामगार निरक्षर होते. केवळ आर्थिक परिस्थितीमुळे मिळेल ते काम करण्याच्या उद्देशाने ते या क्षेत्रात येत. त्यामुळे सन १८७५ ते १८८२ च्या काळात मुंबईमधील गिरणी कामगारांची संख्या १३५% इतकी वाढलेली होती. परंतु त्या प्रमाणात पगार मात्र वाढले नाहीत. पगार मात्र ९.४% इतका वाढलेला होता. यानंतर कामगारांची संख्या वाढतच गेली. सन १८७५ ते १८९० या काळात गिरणी कामगारांची संख्या ३३६% नी वाढलेली होती व पगार १७.६% नी वाढला. कामगारांच्या वाढत्या प्रमाणात पगार मात्र वाढलेले दिसत नाहीत. स्वस्तात कामगार मिळत असल्याने गिरणी मालकांनी गिरणीचे यांत्रिकीकरण मात्र केले नाही. गिरण्यामध्ये महिला कामगारांची संख्याही लक्षणीय होती. सन १८८४ मध्ये २२.२% इतके प्रमाण होते तर सन १८९७ मध्ये ते प्रमाण २३.३% इतके होते. परंतु गिरणी मालकानी महिला

कामगारांच्या समस्यांकडे मात्र पूर्णतः दुर्लक्ष केलेले होते. महिलांच्या प्रमाणे या काळात बाल कामगारांचे प्रमाणही लक्षणीय होते. सन १८७० मध्ये गिरणी कामगार म्हणून एकूण कामगारांच्या १०% कामगार हे बाल वयातील होते. मुंबईमधील गिरणी कामगारांची संख्या जस-जशी वाढत गेली तस-तसी कामगारांच्यामध्ये जाणीव जागृतीही होत गेली. कामगार आपल्या हक्काबद्दल अधिक जागृत होवू लागले. सन १८९२-९३ या काळात मुंबईमध्ये अनेक संप घडून आले. गिरणी कामगारांच्या संपामुळे मुंबईमधील कामगार संघटना अधिकच मजबूत झाली. गिरणी कामगारांच्या बरोबर इतर क्षेत्रातील कामगारांच्यामध्ये जागृती निर्माण होवू लागलेली होती. सन १८९७ मध्ये मुंबई मध्ये 'अमालगमेटेड सोसायटी ऑफ रेल्वे सर्व्हेंटस् ऑफ इंडिया' ही संघटना स्थापन झाली. यानंतर कामगार संघटनांची लाट अनेक क्षेत्रात गेली व सन १९०७ मध्ये 'बॉम्बे पोस्टल युनियन' स्थापन झाली. विविध क्षेत्रातील कामगार संघटनांमुळे थोड्याफार प्रमाणात चैतन्य निर्माण होण्यास मदत झाली.

**नारायण मेघाजी लोखंडे यांचे कामगार चळवळीत स्थान (१८४८-१८९७)**

भारतीय कामगार चळवळीचे एक अग्रगण्य नेते व समाजसुधारक म्हणून नारायण मेघाजी लोखंडे ओळखले जातात. त्यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील कन्हेरसर येथे सन १८४८ मध्ये झाला. फुलमाळी समाजात जन्मलेल्या लोखंडेनी अतिशय गरीब परिस्थितीतून त्यांनी ठाणे येथे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण घेतले. परिस्थितीमुळे पुढील शिक्षण त्यांना घेता आले नाही. त्यामुळे त्यांनी रेल्वेमध्ये 'लोकोमोटिव्ह' खात्यात कारकून म्हणून नोकरी पत्करली. रेल्वेतील नोकरीही त्यांनी सोडिली व पोस्ट खात्यात नोकरीस लागले. पोस्ट खात्यात काही काळ नोकरी केल्यानंतर ते मुंबईमधील मांडवी भागात एका कापड गिरणीत भांडारपालाची नोकरी स्विकारली. तेथे त्यांनी दहशतीच्या वातावरणात कामगार दिवसातील १३-१४ तास काम करतात, मध्ये सुट्टी नाही, साप्ताहीक सुट्टी नाही, या घटनांचा त्यांच्यावर खूप परिणाम झाला व नोकरी सोडून स्वतःस कामगार चळवळीस वाहून घेतले. कामगारांचे जीवनमान समजावून घेण्यासाठी ते स्वतः कामगाराच्या वस्तीत राहण्यास गेले.

नारायण लोखंडे यांच्यावर महात्मा फुलेंच्या विचारांचा व कार्याचा प्रभाव होता. शिवाय ते फुल्यांचे निष्ठावंत सहकारी व सत्यशोधक समाजाचे कार्यकर्तेही होते. सन १८७७ मध्ये ब्राह्मणेतरांचे पहिले वर्तमानपत्र असलेले 'दीनबंधू' लोखंडे यांनी सन १८८० पासून मुंबईमधून काढण्यास सुरुवात केली. याशिवाय त्यांनी 'गुराखी' नावाचे एक दैनिकही चालू केले होते. लोखंडेनी 'दिनबंधू'च्या माध्यमातून कामगारांच्या दुःखाना वाचा फोडण्याचे काम केले. मुंबई सरकारने याची दखल घेत सन १८८१ मध्ये फॅक्टरी ॲक्टमध्ये सुधारणा केली. परंतु कामगारांच्या स्थितीत फारसी सुधारणा झाली नाही. त्यामुळे त्यांनी सन १८८४ मध्ये डब्ल्यू. बी. मूलक यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमला. या आयोगापुढे लोखंडे यांनी कामगारांच्यासाठी अनेक मागण्या मांडल्या. परंतु याचा फारसा फायदा झाला नाही म्हणून लोखंडेनी सन १८८४ मध्ये मुंबई येथे कामगार परिषद भरवून ५,५०० सह्यांचे एक निवेदन आयोगाला दिले.

नारायण लोखंडे यांनी कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी सन १८९० मध्ये 'मुंबई गिरणी कामगार संघ' नावाची भारतातील पहिली कामगार संघटना स्थापन केली. या संघाच्या माध्यमातून लोखंडेनी कामगारांच्या हक्कासाठी सन १८९० मध्ये १०,००० कामगारांची एक परिषद घेतली. ही परिषद मुंबईमधील औद्योगिक संघटनांच्या चळवळीतील एक महत्त्वाची संघटना मानली जाते. लोखंडेनी उभ्या केलेल्या कामगार संघटनेच्या

चळवळीला अधिक बळ मिळत होते. परिणाम स्वरूप मुंबई सरकारने १० जून १८९० कामगारांना साप्ताहीक सुट्टी देण्याचा निर्णय घेतला व सन १८९१ मध्ये कामगार कायदा मंजूर करण्यात आला. या कायद्यामध्ये लोखंडेची महत्त्वाची भूमिका होती. त्यांच्या या योगदानाबद्दल मुंबई सरकारने त्यांना जे. पी. हा किताब दिला. (जस्टीस ऑफ पीस)

नारायण लोखंडे यांनी मुंबईमधील कामगार संघटनेमध्ये चैतन्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्याच बरोबर सन १८९३ मध्ये मुंबईमध्ये झालेल्या हिंदू मुस्लिम दंगलीत शांतता निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली म्हणून मुंबई सरकारने त्यांना 'रावबहादूर' हा किताब दिला. लोखंडे हे निर्भिड वक्ते, झुंझार लेखक, संपादक व मुद्रक होते. 'शिक्षणाद्वारे समाजसुधारणा' हे त्यांच्या विचाराचे ध्येय होते. मुंबईमध्ये सन १८९६ मध्ये प्लेगची मोठी साथ आली. यामध्ये अनेक लोकांचा मृत्यू झाला. याही वेळी पुढाकार घेऊन लोखंडे यांनी मुंबई सरकारच्या मदतीने प्लेगग्रस्तांसाठी 'मराठा इस्पितळ' नावाचा दवाखाना काढला. परंतु दुर्दैवाने लोखंडे यांचा प्लेगने मृत्यू झाला. (९ फेब्रुवारी १८९७)

**आसाम व बंगालमधील कामगार चळवळ**

मुंबईमधील कामगार चळवळीप्रमाणेच आसाम व बंगालमध्येही १९ व्या शतकात चहाच्या मळ्यातील कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात निर्माण झालेली होती. आसाम मधील चहामळेवाल्यांचे प्रतिनिधी परप्रांतातील मजुरांना प्रलोभने दाखवून कायम कराराने नोकरी करण्यासाठी आसाममध्ये घेऊन येत असत. कराराने बांधले गेल्यामुळे ते आपल्या प्रांतात परत जाऊ शकत नसत. ही एक प्रकारची गुलामगिरीच होती. या कामगारांच्या हलाखीची वर्णने कलकत्ता व इतरत्र पोहोचू लागली तेव्हा ब्राह्मोसमाजाचे एक प्रमुख सुधारक श्री द्वारकानाथ गंगोपाध्याय यांनी मजूराच्या वेशात आसाममध्ये जावून तेथील कामगारांचे शोचनीय परिस्थितीची माहिती घेतली व ती श्री कृष्णकुमार यांच्या संपादकत्वाखाली प्रसिद्ध होणाऱ्या 'संजीवनी' या बंगाली नियतकालीकातून व श्री सुरेंद्रनाथ बॅनर्जी यांच्या 'द बेगाली' या इंग्रजी नियतकालीकातून जनपेपुढे मांडली. परिणामी सन १८८८ मध्ये बंगालच्या प्रांतिक परिषदेने चहामळ्यावरील गुलामगीरीच्या पद्धतीचे उच्चाटन झाले पाहिजे अशी मागणी केली. श्री. शशीधर बॅनर्जी यांनी बंगालमधील ताग गिरण्यामधील कामगारांचे प्रश्न मांडण्यास प्रारंभ केला. कामगारामध्ये काम करण्यासाठी त्यांनी 'गरानगर संस्था' व एक 'बचत बँक' स्थापन केली. कामगारांच्या प्रश्नासंबंधी लिखाण करण्यासाठी त्यांनी 'भारत श्रमजीवी' हे नियतकालिक सुरू केले.

**✲ स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३**

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१) .............. ला औद्योगिक क्रांतीचे अपत्य मानले जाते.

२) भारतात ........... शहरापासून कामगार चळवळीची सुरुवात झाली असे मानले जाते.

३) मुंबईमध्ये ............... यांनी पहिली कापड गिरणी स्थापन केली.

४) कामगारांना काम देण्याच्या बदल्यात दलालांना ............. मिळत होती.

५) पहिला फॅक्टरी ॲक्ट ................ मध्ये मंजूर झाला.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) मुंबईमध्ये कामगारांना संघटित करण्याचा पहिला प्रयत्न कोणी केला.

२) बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन ही संघटना केव्हा स्थापन झाली.

३) नागपूरमध्ये कोणत्या उद्योगपतीने कापड गिरणी सुरू केली.

४) नारायण मेघाजी लोखंडे हे कोणत्या वृत्तपत्राचे संपादक होते.

५) ना. मे. लोखंडे यांनी प्लेगग्रस्तासाठी मुंबई येथे कोणते हॉस्पिटल सुरू केले.

### ३.२.४ वसाहतिक राज्य आणि औद्योगिक विकास :

१९व्या शतकामध्ये भारतात औद्योगिक विकास झाला की ऱ्हास या संदर्भात इतिहास अभ्यासकांच्या मध्ये मतमत्तांतरे आहेत. वास्तविक पाहता या काळात ब्रिटिशांचे धोरण भारताच्या व्यापारी व औद्योगिक हितसंबंधाच्या विरोधात होते. इंग्लंडमधील औद्योगिकरण व भांडवलदारांचा दबाव यामुळे ब्रिटिश सरकारने विविध धोरणांच्या माध्यमातून भारतीय उद्योगधंद्यांचा बळी दिला. कारण १८ व्या शतकाच्या पूर्वार्धात भारताच्या अनेक भागात विविध उद्योगधंदे भरभराटीला आलेले होते. १९व्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झपाट्याने चालू होती आणि इंग्लंडला कच्चा मालाची खूप मोठ्या प्रमाणात आवश्यकता होती तर तयार झालेल्या पक्क्या मालासाठी मोठी बाजारपेठ हवी होती. त्यासाठी त्यांनी या काळात भारतीय उद्योगधंद्याच्या विकासासाठी कोणतेही विशेष प्रयत्न केले नाही. विशेषत: मोठे उद्योग, आणि उद्योगाच्या या काळात विकास झालेले सर्व उद्योग ब्रिटिशांच्या उद्योगाला पूरक असे होते.

प्रस्तुत उपघटकांचा अभ्यास करत असताना आपणांस ब्रिटिशांचे औद्योगिक धोरण व या काळात कोणते उद्योग उदयास आले त्यांचा विकास झाला याचा अभ्यास करावयाचा आहे.

**ब्रिटिशांची धोरणे : उद्योग विकासाला मारक :**

**१) व्यापारी मक्तेदारी :**

भारतामध्ये इ.स. १७५७ ते १८१३ पर्यंतच्या कालखंडात ईस्ट इंडिया कंपनीने व्यापारी मक्तेदारी स्थापन केली. त्याचबरोबर युरोपीय व्यापारी कंपन्यांचे भारतातील व्यापारी स्थान नाहीसे केले. कारण त्यांना भारतीय व्यापारामध्ये स्पर्धक नको होता. भारतातून कच्चा माल स्वस्तात खरेदी करावयाचा आणि जागतिक बाजारपेठेत स्वस्तात विकायचा हा त्यांचा प्राथमिक उद्देश होता. नंतरच्या काळात व्यापारी मक्तेदारीबरोबर राजकीय सत्ता स्थान मजबूत केल्यानंतर राजकीय सत्तेचा वापर करुन मोठ्या प्रमाणात महसूल जमा करणे हा दुसरा उद्देश बनला. कारण कंपनीला भारतातून कच्चा माल व युध्दखर्चासाठी मोठ्या प्रमाणात पैशाची गरज होती. ती गरज त्यांनी भारतीय शेतकरी व व्यापाऱ्यांच्या महसूलातून भरुन काढली. यासाठी त्यांनी उत्तम महसूल प्रशासन व लष्करी

प्रशासन व्यवस्था निर्माण केली. या काळात कंपनी सरकारने खूप मोठ्या प्रमाणात कच्चा माल इंग्लंडमध्ये निर्यात केला. इंग्लंडमध्ये या काळात औद्योगिक क्रांतीने झपाट्याने विस्तार केलेला होता व त्यांना कच्च्या मालाची आवश्यकता होती. भारतात कंपनीची व्यापारी मक्तेदारी असल्याने भारत कच्चा मालाचा निर्यातदार झाला.

**२) पारंपारिक कृषिव्यवस्थेत बदल :**

इ.स. १८१३ च्या कायद्यानंतर भारतीय आर्थिक क्षेत्रात खूप मोठया प्रमाणात बदल घडून आले. यामध्ये सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे ब्रिटिश भांडवलदारांना भारतीय कृषी क्षेत्रात उद्योग उभारण्याची संधी दिली. या भांडवलदारांनी इंग्लंडमधील उद्योगधंद्यांना पूरक ठरतील अशा पिक पध्दतीचा अवलंब केला. त्यांचे स्वरुप व्यापारी होते. उदा. मीठ, ताग, कापूस इत्यादी.

**३) दळणवळण व्यवस्थेत सुधारणा :**

ब्रिटिशांनी भारतात दळणवळण व्यवस्थेत सुधारणा केल्या. भारतातील कच्चा माल युरोपीय अर्थात इंग्लंडपर्यंत पोहचवण्यासाठी भारतातील दूरदूरच्या भागामध्ये रस्ते, रेल्वेचे जाळे निर्माण केले. नद्या, कालव्यावर आगबोटीची व्यवस्था केली. या दळणवळणाच्या माध्यमातून भारतातील कच्चा माल इंग्लंडपर्यंत पोहचवणे . इंग्लंडमधील पक्का माल भारतीय बाजारपेठांपर्यंत पोहचवणे सोयीचे केले. याचबरोबर याला पूरक ठरतील असे प्रशासकीय व शैक्षणिक बदल घडवून आणले.

**४) इंग्लंडमधील भांडवलदारांची भारतात आर्थिक गुंतवणूक :**

१९व्या शतकाच्या मध्यापर्यंत इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचा पहिला टप्पा पूर्ण झालेला होता. इंग्लंडची प्रचंड औद्योगिक भरभराट झाली होती. अतिरिक्त भांडवल देशातल्या देशात गुंतवण्यापेक्षा परदेशात गुंतवणे फायदेशीर ठरणार होते. भारतावर ब्रिटिशांची राजकीय सत्ता असल्यामुळे ब्रिटिश भांडवलदारांना संरक्षण देणेही शक्य होते. इंग्लंडमधील भांडवलदारांनी या काळात भारतात खूप मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली. चहा, मीठ, इत्यादी पिकांच्या व्यवसायावर त्यांनी विशेष लक्ष केंद्रीत केले. ब्रिटिश सरकारने या भांडवलदारांच्याप्रती अतिशय अनुकूल धोरण राबविले. एकमार्गी संरक्षक जकात, विविध व्यापारी सवलती, रेल्वेच्या सुविधा यामुळे परकीय भांडवलदार व उद्योग सुरक्षित झाले.

**मुक्त व्यापाराचे धोरण**

इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीनंतर एका नव्या वर्गाचा उदय झाला. यामध्ये भांडवलदार व उद्योगपती यांचा भरणा होता. १९ व्या शतकाच्या प्रारंभी ईस्ट इंडिया कंपनी व या नवीन भांडवलदार वर्गात संघर्ष निर्माण झाला. त्याचे प्रमुख कारण म्हणजे भारतीय वसाहतीचा उपयोग कंपनीच्या हितासाठी करावयाचा की, भांडवलदारांच्या फायद्यासाठी इंग्लंडमधील नवीन भांडवलदार उद्योजकांना भारतीय वसाहतीचा उपयोग इंग्लंडमध्ये तयार झालेला पक्का माल विकण्यासाठी करायचा होता. विशेषत: कापड त्याच बरोबर हा नविन भांडवलदार वर्ग भारतातून कच्चा माल व अन्नधान्याची अपेक्षा करत होता. कंपनी सरकार व भांडवलदार यांच्यातील संघर्षामध्ये इंग्लंडमधील भांडवलदारांचा विजय झाला. इ.स. १८१३ नंतर भारत हा इंग्लंडचा दुय्यम स्थान असलेला भागीदार झाला. कच्चा माल पुरवणारा व पक्का माल खरेदी करणारी हक्काची बाजारपेठ या अर्थाने इंग्लंडमधील भांडवलदार वर्गाचे

हितसंबंध संरक्षित करण्यासाठी अनेक बदल करण्यात आले. विशेषतः १८१३ व १८३३च्या चार्टर ॲक्टने ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतातील राजकीय व आर्थिक सत्तेवर निर्बध घालण्यात आले. १८१३ चा बदल फक्त इंग्लंडमधील भांडवलदार वर्गाचे हितसंबंध जपण्यासाठी होता.

भारताच्या वसाहती अर्थव्यवस्थेला इंग्लंड आणि जागतिक भांडवलदारी अर्थव्यवस्थेबरोबर एकत्रित केले आणि त्यासाठी मुक्त व्यापार निर्यातीचे धोरणाने भारतामधील सर्व प्रकारचे करार रद्द करण्यात आले. अथवा कमी –कमी केले. याच काळात ॲडम स्मिथ यासारख्या अर्थतज्ञानी इंग्लंडमधील कारखानदारीच्या वाढीसाठी मुक्त व्यापाराचे धोरण लाभदायक आहे अशी मांडणी केलेली होती. यातून मुक्त व्यापाराचे धोरण पुढे आले. या मुक्त व्यापार धोरणामुळे इंग्लंडमधील यंत्रनिर्मित पक्का माल मोठ्या प्रमाणात भारतात येवू लागला. यंत्रनिर्मित मालाचे उत्पादन हाताने विणलेल्या मालापेक्षा कमी असल्याने व इंग्लंडमधील यंत्रनिर्मित मालापेक्षा महाग असल्याने तुलनेत भारतीय माल टिकू शकला नाही. परिणामी भारतीय उद्योगधंदे या काळात वाढू शकले नाहीत.

**संरक्षक जकातीचे धोरण : भारतीय उद्योगांवर मारक**

इंग्लंड भारताकडे एक वसाहत व हक्काची मोठी बाजारपेठ या दृष्टीकोनातून पाहत होते. औद्योगिक क्रांतीचा परिणाम स्वरूप इंग्लंडमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात पक्क्या मालाची निर्मिती होत होती. त्यासाठी त्यांना बाजारपेठेची आवश्यकता होती. इंग्लंडमधील मालाची भारतात विक्री वाढविण्यासाठी त्यांनी संरक्षक जकातीचे धोरण स्विकारले. इंग्लंडमधून भारतात येणाऱ्या मालावर एकतर जकातच बंद केली अथवा नाममात्र आकारण्यास सुरूवात केली व भारतातून इंग्लंडमध्ये तो माल निर्यात होत होता. त्यावर जबर आयात कर बसविली. इ.स. १८४० मध्ये इंग्लंडमधील आयात कापडावर ३.५% आयातकर होता. तर भारताच्या कापडावर इंग्लंडमध्ये हाच कर १०% होता. परिणामी भारतीय कापडाची निर्यात हळूहळू बंद झाली. यासंबंधी इंग्रज इतिहासकार एच. एच. विल्सन म्हणतो की, ''एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या चतुर्थातही इंग्लंडच्या सुती कापडापेक्षा भारताचे सुती व रेशमी कापड इंग्लंडच्या सुती बाजारात ५०% ते ६०% कमी किंमतीला विकले जाई. यामुळे इंग्लंडच्या मालाला संरक्षण द्यावयाचे तर, भारतीय मालावर जबर जकात बसविणे अगर विक्रीवर बंदी घालणे गरजेचे झाले. तसे केले नसते तर पेस्ली व मॅचेस्टरच्या गिरण्या बंद पडल्या असत्या. तसे होऊ नये म्हणून भारतीय उद्योगांचा बळी घेतला गेला. भारत स्वतंत्र असता तर इंग्लंडच्या मालाविरूद्ध असेच धोरण भारताला घेता आले असते. व आपल्या उद्योगाचे रक्षण करता आले असते. परंतु परकीयांच्या दडपणाखाली असल्यामुळे स्वसंरक्षणाचे हे पाऊल भारताला उचलायला आले नाही. करमुक्त इंग्लिश माल भारतावर लादला गेला. परकीय कारखानदारी व उत्पादकांनी आपल्या भारतीय स्पर्धकांचा राजकीय सत्तेचा उपयोग करून गळचेपी केली. कारण समान पातळीवरून भारतीय उत्पादकांशी स्पर्धा करण्याची, त्यांचा यशस्वीरित्या सामना करण्याची क्षमता यावेळी त्यांच्यात नव्हती.''

**भारत कच्चा माल पुरवणारा देश**

इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीने मोठ्या प्रमाणात गती घेतलेली होती. त्यासाठी त्यांना कच्च्या मालाची मोठी गरज होती. विशेषत: अमेरिकन वसाहती इंग्लंडच्या हातून गेल्यानंतर इंग्लंडची भिस्त भारतीय वसाहतीवर

होती. त्यामुळे ते भारताकडे एक कच्चा माल पुरवणारा देश या दृष्टीकोणातून पाहत होते. कापूस, नीळ, ज्यूट आदीचे उत्पादन वाढविण्यास सरकारने उत्तेजन दिले त्याचबरोबर येथील शेतकऱ्यावर सक्ती केली. इंग्लंडमधील भांडवलदारांना भारतात स्वस्तात जमिनी दिल्या. परिणामी भारतात औद्योगिक विकास होण्याऐवजी युरोपीय मळेवाल्याचे प्रस्थ वाढले. या संदर्भात दुर्गा प्रसाद म्हणतात की, " Indian trade was stimulated in a unnatural way its growth and development being treated as an 'end' rather than as a 'mens' of the economic welfare of the country " थोडक्यात आर्थिकदृष्ट्या कृषीप्रधान भारताला उद्योगप्रधान इंग्लंडने आपली आर्थिक वसाहत बनविले. इंग्लंडचा कच्चा माल पुरवणारा व पक्क्या मालाची हुकमी बाजारपेठ असलेला देश असे भारताच्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप बनविले.

वसाहतवादी शासनाने भारताच्या औद्योगिकीकरणाची योजना बनविणे तर दूरच पण त्याविषयी विचार देखिल केला नाही. याउलट वसाहतवादी शासकांनी भारतीय हस्तोद्योगांचा ऱ्हास घडवून आणला आणि भारताला ब्रिटिश उद्योगांना कच्चा माल पुरविणारी आणि ब्रिटिश उद्योगातून उत्पादित पक्का माल खरेदी करणारी हक्काची बाजारपेठ बनविली. त्यामुळे वसाहतवादी शासनकाळात भारताचा औद्योगिक विकास झाला नाहीच उलट भारतीय अर्थव्यवस्थेचे अनुद्योगिकीकरण झाले.

ईस्ट इंडिया कंपनी भारतात व्यापार करणे आणि व्यापार व्यवहारातून भरपूर नफा कमविण्याच्या उद्देशाने भारतात आली. म्हणूनच ईस्ट इंडिया कंपनीने भारतीय राज्यकारभार आपल्या हाती घेतल्यानंतर आपल्या निर्यात व्यापाराला ज्यामुळे मदत होईल अशा भारतीय वस्तूंच्या उत्पादनाला प्रोत्साहन दिले. या भारतीय हस्तकला उद्योगांना वेगवेगळ्या मार्गानी आर्थिक व इतर सहाय्य कंपनीकडून मिळत असे. कारण भारतीय वस्तू युरोपात निर्यात करूनच कंपनीला मोठ्या प्रमाणावर फायदा मिळत असे. परंतु १७५० नंतर इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीला सुरूवात झाली. त्यामुळे इंग्लंडमधील उद्योगपती कारखानदारांनी कंपनीच्या वरील धोरणावर टिका करण्यास सुरूवात केली. कारण त्यांना भारतातून वस्तू आयात करून नव्हे तर भारतामध्ये आपल्या उत्पादित वस्तू निर्यात करून फायदा मिळवायचा होता. त्यासाठी त्यांनी ब्रिटिश संसदेवर वारंवार दबाव निर्माण केला. त्यामुळे ब्रिटिश संसदेने कंपनीची भारतातील व्यापारी मक्तेदारी (१८१३,१८३३ मध्ये) नष्ट केली. त्यामुळे ब्रिटिश उत्पादकांना भारतीय बाजारपेठेत कोणत्याही अडथळ्याविना मुक्तपणे आपल्या वस्तूंची विक्री करणे शक्य झाले. या धोरणाचे समर्थन करण्यासाठी ॲडम स्मिथसारख्या सनातनवाद्यांनी सुचविलेल्या मुक्त व्यापारी धोरणाचा आधार वसाहतवादी शासनाने घेतला.

ब्रिटनमध्ये यंत्रावर उत्पादित पक्क्या वस्तू भारतात विकल्या जाव्या आणि भारतातील कच्चा माल ब्रिटनमधील उद्योगधंद्यांना उपलब्ध व्हावा हे वसाहतवादी शासनाच्या धोरणाचे मुख्य सूत्र होते. त्यामुळे ब्रिटिशांनी भारतातील कच्च्या मालाच्या उत्पादनाला प्रोत्साहन दिले. पण त्याचवेळी भारतीय उत्पादित हस्तकला वस्तूंच्या उत्पादनावर निर्बंध घातले. ब्रिटनमधून आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर भारतात नाममात्र आयात कर बसविले. परंतु भारतातून निर्यात होणाऱ्या उत्पादित वस्तूंवर ब्रिटनमध्ये जास्त आयातकर बसवून त्यांच्या निर्यातीला पायबंद घातला. (Endeavours were made, which were fatally successful to repress Indian manufactures and to extend British manufactures. The import of Indian goods to Europe

was expressed by prohibitive duties, the export of British goods to India was encouraged by almost nominal duties. R.C.Datt.) याचा परिणाम भारतातील हस्तोद्योगांचा ऱ्हास झाला. ईस्ट इंडिया कंपनीकडून ब्रिटिश संसदेच्या हाती भारतीय प्रशासन गेल्यानंतरही तेच धोरण पुढे चालू राहिले.

ब्रिटिश काळात भारतातील लघुउद्योगांचा ऱ्हास होण्यास सुरूवात झाली होती. पण त्याचवेळी मोठ्या प्रमाणावर उत्पादन क्षमता असलेले उद्योग म्हणजेच आधुनिक उद्योग भारतात स्थापन करण्याची प्रक्रिया वसाहतवादी शासनाने सुरू केली नाही. आधुनिक उद्योगाचे घटक असलेल्या तंत्रज्ञान, संघटन आणि शासकिय नियमन या प्रमुख तीन बाबींकडे वसाहतवादी शासनाने हेतूपरस्पर दुर्लक्ष केले. किंबहुना त्यांना भारताच्या औद्योगिक क्षेत्रात आधुनिकीकरण करावयाचे नव्हते. भारतामध्ये शेतीप्रधान व्यवस्थाच ठेवावयाची होती. तरीही ब्रिटिशांनी काही उद्योग व्यवस्थापनात आधुनिकीकरण आणले ते त्यांच्या साम्राज्यवादी आकांक्षेसाठी, शोषणासाठी आणि अशा साम्राज्यावर सुलभपणे व सुकरतेने नियंत्रण ठेवणे शक्य व्हावे म्हणून. त्यासाठी ब्रिटिशांनी भारतात रस्तेबांधणी, रेल्वेउभारणी, पोस्ट, तारायंत्रे, कालवे, पाटबंधारे, बँकव्यवस्था, चलनविनिमय केंद्रे, विमा इत्यादी पायाभूत तांत्रिक सोयी निर्माण केल्या. अशा तंत्रज्ञानावर आधारलेल्या सोयी भारतात आधुनिक उद्योगांची पायाभरणी करण्यास सहाय्यभूत ठरल्या. रेल्वेची योजना तत्कालीन गर्व्हनर- जनरल लॉर्ड हार्डिंगने १८४६ मध्ये आखली. त्यापाठीमागील उद्देश सांगताना तो म्हणतो, जर उठाव झाला आणि ब्रिटिश सत्तेला धोका निर्माण झाला तर शिघ्रता शिघ्र दडपून टाकता यावा. (The railway were planned for the prevention of insurrection, the speedy termination of war or the safety of the empire ) सन १८५३ साली रेल्वेउभारणीविषयी लॉर्ड डलहौसी म्हणाला होता कि, इंग्लंडला मोठ्या प्रमाणावर कापसाची नितांत गरज आहे आणि भारतात दळणवळण व्यवस्था निर्माण झाली तर येथून कापूस पाठविता येणे शक्य आहे. (Every increase of facilities for trade has been attended with an increased demand for articles of European produce in the most distants markets in India. ) शिवाय भारतीय बाजारपेठांमध्ये युरोपियन वस्तूंची मागणी वाढत असल्याने व्यापाराला प्रोत्साहन देणे. सोईसवलती पुरविणे आवश्यक आहे. ब्रिटिशांच्या भारतातील रेल्वे उभारणी पाठीमागे जरी साम्राज्यवादी दृष्टीकोन असला तरी रेल्वे बांधणीमुळे भारतातील औद्योगिकीकरणास चालना मिळाली आणि अनेक उद्योग उभारण्याच्या कामी गती आली. रेल्वेबांधणीसंबंधी डलहौसीने निर्णय घेतला त्यावेळी कार्ल मार्क्सने २३ जुलै १८५३ च्या न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून मध्ये लिहिले. (The railway system will become in India truly the force runner of modern Industry)

देशाच्या आर्थिक विकासाला गतिमान करण्यासाठी आजच्या युगात परकिय वित्त, भांडवल, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन ह्यांचे उत्साहाने स्वागत केले जाते. पण वसाहतकाळात भारतात परकिय भांडवलाच्या प्रवेशाचा उद्देश भारताचा विकास नसून भारतीय सामग्रीचे अधिकाधिक शोषण करण्याचा होता. दुसऱ्या अर्थाने विदेश भांडवल हे विकासाचे नव्हे तर शोषणाचे साधन बनले. ब्रिटिशांच्या काळात परकीय (इंग्लंडचे) भांडवल, तंत्रज्ञान भारतात आले. पण त्याचा उपयोग ब्रिटिशांनी भारताची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी न करता आपले साम्राज्य वाढावे आणि भारतातील आपल्या प्रशासनाची पकड मजबूत व्हावी यासाठीच केला. ईस्ट इंडिया कंपनीची भारतात व्यापाराची मक्तेदारी होती. तोपर्यंत भारतात ब्रिटिश भांडवल फारसे गुंतविले गेले नाही.

त्यानंतर ब्रिटिश भांडवल भारतात गुंतविण्यास सुरूवात झाली. सन १८५८ मध्ये कंपनीकडून ब्रिटिश संसदेकडे भारताचा राज्यकारभार आला. तेव्हापासून ब्रिटिश भांडवल भारतात मोठ्या प्रमाणावर येण्यास सुरूवात झाली. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकातही भांडवलाचा हा ओघ अव्याहतपणे चालू होता.

सन १९१४ पूर्वी ब्रिटिशांनी भारतातील आपली भांडवली गुंतवणूक ही प्रामुख्याने भारतातील विविध आर्थिक प्रकल्प आणि उद्योग यांची उभारणी करण्यासाठी केली होती. हे भांडवल रेल्वे, रस्ते वाहतूक, व्यापारी जहाजबांधणी, कोळसा व खाण उद्योग, बँका, विमा अशा आर्थिक बाबींमध्ये प्रामुख्याने गुंतविले गेले. ब्रिटिशांची भारतातील ही संपूर्ण भांडवली गुंतवणूक ब्रिटनमधील त्यांच्या उद्योगधंद्याच्या वाढीस पूरक ठरणारी होती. कोणत्याही दृष्टीने ही गुंतवणूक भारतातील उद्योग व्यवसाय वृद्धींगत व्हावा या अनुषंगाने करण्यात आली नव्हती.

परंपरागत हस्तोद्योगांचा ऱ्हास झाल्यामुळे आणि त्याचवेळी आधुनिक उद्योगांची सुरूवात झाली नसल्यामुळे शेती व्यवसायाकडे परंपरागत हस्तकला कारागीर वळले. त्यामुळे शेतीवर जास्त लोक अवलंबून राहू लागले. त्यातच दुष्काळ. अवर्षण यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे ब्रिटिश संसदेला आपल्या भारतविषयक धोरणात बदल करावा लागला. सन १८८० मध्ये स्थापन झालेल्या फॅमिन कमिशनने (Famine Commission) दुष्काळाला प्रतिबंध करण्यासाठी नवे उद्योग सुरू करावेत व जुन्या उद्योगांची पुर्नरचना करावी असे सुचविले. या कमिशनने तपशिलवार शिफारशी केल्या होत्या. या शिफारशींचा परिणाम असा झाला कि, १८८३ साली सरकारने असा हुकूम काढला कि, भारतात ज्या वस्तूंचे औद्योगिक उत्पादन केले जात नाही केवळ अशाच वस्तूंकरिता युरोपिय बाजारपेठांमध्ये मागणी नोंदवली जावी. परंतु त्या बाबतीत फारशी प्रगती होऊ शकली नाही. असे असले तरी सरकारने कलकत्ता येथे व्यापारी वस्तूंचे संग्रहालय (कलकत्ता कमर्शिअल म्युझियम) ची स्थापना करणे, औद्योगिक प्रदर्शने भरविणे, तांत्रिक व औद्योगिक शिक्षणाची सोय करणे. अशा प्रकारचे थोडेफार कार्य केलेले आढळून येते. अर्थात हे कार्य अतिशय लहान प्रमाणात केले गेले होते. आणि सरकारचे धोरण त्यादृष्टीने महत्वाचे नव्हते. कारण काही उत्साही अधिकाऱ्यांनी त्याबाबतीत पुढाकार घेऊन ते केलेले होते. परंतु विसाव्या शतकाच्या सुरूवातीपासून सरकारच्या औद्योगिक धोरणात थोडाफार बदल होऊ लागला. सन १९०५ मध्ये लॉर्ड कर्झनने व्यापार व उद्योग खात्याची स्थापना केली. त्याचबरोबर प्रादेशिक सरकारांनी आपापल्या प्रातांत उद्योगांना प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबिले. अर्थात २०व्या शतकाच्या सुरूवातीला सरकारने भारतीय उद्योगांना प्रोत्साहन दिल्यामुळे भारतात २०व्या शतकात उद्योगांची मोठ्या प्रमाणावर स्थापना होऊ लागली.

भारतातील औद्यागिक प्रगतीसाठी रेल्वे वाहतूक निश्चितपणे फायदेशीर ठरली. परंतु रेल्वेची उभारणी ब्रिटिशांनी आपल्या प्रशासकीय व लष्करी सोयीसाठी केली होती. हिंदी उद्योगांची उभारणी व्हावी व देशाची आर्थिक प्रगति व्हावी असे उद्दिष्ट ब्रिटिश सत्तेपुढे दुरान्वयानेही नव्हते. हिंदुस्थानचा व्यापार वाढावा, आर्थिक प्रगती व्हावी किंवा औद्योगिक विकास व्हावा असे त्यांना कधीच वाटले नव्हते. थोडक्यात पहिल्या महायुद्धाच्या अखेरपर्यंत भारताच्या औद्योगिक वाढीस ब्रिटिश वसाहतवादी शासनाचा फारसा संबंध नव्हता. तसेच वसाहतवादी शासनाने भारतीय उद्योगांना चालना देण्यासाठी फारसे सहकार्य केले नाही किंवा दिर्घकालीन औद्योगिक धोरण आखले नाही. वसाहतवादी शासनाने जकात धोरण खुल्या अर्थव्यवस्थेवर आधारलेले असल्याचा कांगावा केला. परंतु प्रत्यक्षात मात्र इंग्लंडमधील उद्योगधंद्यांना पोषक असे धोरण अवलंबिले.

भारतीय मालकीच्या उद्योगास ब्रिटिश मालकीच्या उद्योगांशी जिवघेणी स्पर्धा करावी लागत होती. ब्रिटिश मालकीच्या उद्योगांकडे सरस तंत्रज्ञान होते. त्यांना भांडवलाचा भरपूर पुरवठा होत होता. आणि विशेष सवलती देणारे पक्षपाती हिंदुस्थान सरकारही होते. अशी विजोड स्पर्धा हिंदी उद्योगास मारक ठरत होती. शिवाय हिंदी उद्योग व ब्रिटिश मालकीचे उद्योग यामध्ये काही वाद निर्माण झाल्यास सरकार तातडीने हस्तक्षेप न करता सरकारकडून कमालीची दिरंगाई केली जात होती. याचा फायदा सर्व दृष्टींनी सामर्थ्यसंपन्न असलेल्या ब्रिटिश उद्योगपतींनाच मिळत असे.

भारतातील उद्योगाचे धोरण कसे असावे, ज्या उद्योगात मक्तेदारी आहे त्यावर कशा प्रकारचे नियंत्रण असावे, उत्पादीत वस्तूंच्या किंमती कशा निश्चित केल्या जाव्यात, अशा अनेक बाबतीत भारतात कोणताही कायदा अस्तित्वात नव्हता आणि तसा कायदा करण्याचा सरकारचा मनोदय असल्याचे दिसत नव्हते. त्यामुळे बाजारात आलेल्या औद्योगिक मालाची किंमत खाजगी उद्योजक आपल्या मर्जीप्रमाणे ठरवित असत. दोन महायुद्धाच्या दरम्यानच्या काळात औद्योगिक धोरण राबविण्यासाठी कायदे करण्याचा मनसुबा सरकारने जाहीर केला. पण त्याचा फारसा काही उपयोग होईल अशी परिस्थिती नव्हती. कारण कायदे करण्यास फारच उशिर झाला होता.

थोडक्यात भारत स्वतंत्र असता किंवा ब्रिटिश वसाहतवादाचे भूत भारतीयांच्या मानगुटीवर नसते तर ज्या प्रमाणात उद्योगांची वाढ झाली होती. त्यापेक्षा अधिक वेगाने हिंदी उद्योगाने आघाडी घेतली असती.

१८५० च्या दशकात भारतात विशेषत: मुंबई, अहमदाबाद येथे कापड उद्योगाची सुरूवात झाली. उत्तरोत्तर कापड गिरण्यांची संख्या वाढत गेली. या देशी उद्योगाला सरकारने सहाय्य केले नाहीच उलट सरकारकडून बऱ्याचवेळा या उद्योगाला अडवणूकीचे प्रयत्न झाले. सरकारच्या विभेदात्मक जकात धोरणामुळे भारतीय कापड उद्योगाला मँचेस्टर, लॅकेशायरमधील कापड उद्योगाशी जिवघेणी स्पर्धा करावी लागली. पण अशा असमान स्पर्धेमध्येही भारतीय कापड उद्योगाने आपले अस्तित्व टिकवून ठेवले. पुढे २० व्या शतकात स्वदेशी चळवळ व सरकारच्या बदललेल्या धोरणामुळे या उद्योगाला चांगले दिवस आले.

१८५० च्या दशकातच भारतात ताग (ज्यूट) उद्योगाची सुरूवात प्रामुख्याने बंगाल, बिहार मध्ये झाली. १८८० च्या दशकात जवळपास २० ताग गिरण्या सुरू झाल्या. या उद्योगाची सुरूवात परकिय भांडवलदारांनी परकिय भांडवलावर केली. हा उद्योग ब्रिटिश उद्योगांना पूरक असल्याने या उद्योगाला सरकारने सहाय्य केले.

१८५० व १८६० च्या दशकात बंगाल, बिहारमध्ये कोळसा खाण उद्योगांचीही सुरूवात झाली. सन १८८० पर्यंत जवळपास १२३ कोळसा खाणी खोदल्या जाऊन त्यातून कोळसा बाहेर काढला जाऊ लागला.

त्याचबरोबर या काळात ब्रिटिश उद्योगांना पूरक असे नीळ, चहा, कॉफी, रबर इत्यादी नगदी पिके देणारे मळे उभारण्याचा उद्योग (Plantation Industry) विकसित होऊ लागला. हे मळे उद्योग परकियांनी परकिय भांडवलावर सुरू केले होते. याबरोबर रेल्वे उद्योगही १८५० च्या दशकात सुरू झाला.

एकंदरीत १९ व्या शतकात भारतात सुरू झालेले कापड उद्योग वगळता इतर बहुतांशी उद्योग परकीय भांडवलदारांनी परकिय भांडवलाच्या सहाय्याने भारत सरकारच्या भरपूर सवलती घेऊन सुरू केले होते.

१८५० च्या दशकापर्यंत भारतात कोणत्याही प्रकारच्या आधुनिक उद्योगांची सुरूवात झाली नाही. उलट ब्रिटिश वसाहतवादी धोरणामुळे भारतातील हस्तोद्योगांचा ऱ्हास झाला. पण १८५० नंतर बदललेल्या जागतिक परिस्थितीमुळे, प्रशासनाच्या सोयीसाठी भारतात १८५० च्या दशकात आधुनिक उद्योगांची सुरूवात झाली. पण त्यामध्ये फारशी प्रगती झाली नाही. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारताच्या व्यापारात इंग्लंडबरोबरच जपान, जर्मनी, इटली, ऑस्ट्रिया, बेल्जीयम यासारख्या नवऔद्योगिक राष्ट्रांचा सहभाग वाढला. त्यामुळे ब्रिटिशांनी भारतात आधुनिक उद्योगधंद्यास वाढीस चालना दिली. त्यासाठी ब्रिटिश भांडवलाच्या गुंतवणूकीस प्रोत्साहन दिले. कारण आता व्यापारात स्पर्धा वाढल्यामुळे इंग्लंडचा नफा कमी होऊ लागला. शिवाय भारतासारख्या वसाहतींचे अनेक वर्षे आर्थिक शोषण केल्यामुळे ब्रिटनमध्ये भांडवलाचे केंद्रीकरण झाले होते. त्याचबरोबर आधुनिक उद्योगधंद्यातून मोठ्या प्रमाणावर नफा मिळाल्याने भांडवलाचे संचय झाले होते. त्यामुळे ब्रिटनमध्ये व्याजदर फार कमी होते. त्यामुळे ब्रिटिश गुंतवणुकदारांनी हे भांडवल ज्यादा व्याजदराने भारतात गुंतविले. भारत सरकारने त्यांना परताव्याची हमी दिली. या भांडवलाच्या उपलब्धतेमुळे २० व्या शतकाच्या सुरूवातीला भारतात मोठेमोठे उद्योग सुरू झाले.

वस्तुतः भारतात आधुनिक उद्योगाच्या उभारणीची जी प्रक्रिया सुरू झाली. त्याला राष्ट्रवादी विचारसरणी देखिल कारणीभूत होती.

**१९ व्या शतकात उदयास आलेले उद्योग :**

**१) नीळ उद्योग :**

भारतामधून इंग्लंडमध्ये होणारी सुती कापडाची निर्यात बंद झाली, त्याचबरोबर इतर देशात निर्यात होणाऱ्या मालावरही बंधणे आणल्याने ईस्ट इंडिया कंपनीला सुती कापडाच्या व्यापाराची पोकळी भरून काढायची होती. औद्योगिक क्रांतीने इंग्लंडमध्ये अतिरिक्त भांडवलाचा संचय झालेला होता. १८३३ च्या कायद्याने युरोपियनांना जमिनीची मालकी मिळविण्याचा हक्क दिला. त्यामुळे या भांडवलदारांनी भारतात मोठ्या प्रमाणात जमिनी खरेदी केल्या. बंगाल, बिहार या भागात मोठ्या प्रमाणात भांडवली गुंतवणूक केली व नीळची मोठ्या प्रमाणात लागवड केली. बिहारमध्ये नीळ उद्योगाने भरारी घेतली. हा नीळ उद्योग मात्र खाजगी भांडवलदारांच्या हाती होता व भारतीय शेतकरी मजूर होता.

**२) चहा – कॉफी उद्योग :**

इ.स. १८३३ च्या कायद्याने कंपनीची व्यापारी मक्तेदारी संपुष्टात आली. त्यामुळे चहा उद्योगाबाबत कंपनीने गांभीर्याने प्रयत्न केले. अॅन्ड्यू चार्मटन यास आसाममध्ये चहाचे झाड आढळून आले. विल्यम बेटिकने त्यांचे महत्व ओळखून १८३४ मध्ये चहा समितीची स्थापना केली. व १८३९ मध्ये आसाम टी कंपनीची स्थापना केली. चहा लागवड अत्यंत उपयुक्त ठरली. पुढे अनेक कंपन्या चहा उद्योगात आल्या. चहा उद्योगात प्रचंड नफा मिळत असल्याने १८५९ ते ६५ या काळात भारतात २० कंपन्या नोंदणीकृत झाल्या. या भागात रेल्वेचा विकास

झाल्याने चहा उद्योगाला चालना मिळाली. चहा लागवडी बरोबरच कॉफी लागवडही सुरू झाली. चहा उद्योगाचे केंद्र पूर्व भारत होते तर कॉफी उद्योगाचे केंद्र दक्षिण भारत होते.

### ३) ज्यूट उद्योग

ज्यूट उद्योगाने भारतीय कारखानदारीला जन्म दिला असे मानले जाते. भारतातील हा महत्वाचा उद्योग होता. विशेषत: ब्रिटिश भांडवलदार वर्गाचे हा व्यवसाय खास आकर्षण केंद्र होते. अमेरिका, वेनांग, सिंगापूर इत्यादी देशात निर्यात होणारी वस्तू म्हणून ज्यूटची ख्याती होती. या उद्योगात प्रथम पासूनच कंपनीचे निवृत्त नोकर आणि तत्ससंबंधित लोकांची मालकी व व्यवस्थापनावर नियंत्रण होते. कारण यामध्ये नफ्याचे प्रमाण अधिक होते. मात्र ज्यूट वगळता इतर मळे लागवडीच्या संदर्भात उद्योग न सुरू झाल्याने त्यांचे उत्पादन हे कच्च्या मालाच्या स्वरूपात निर्यात होत होते.

### ४) इतर उद्योग :

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीच्या पार्श्वभूमीवर भारतात कोणताही मुलभूत स्वरूपाचा उद्योगधंदा स्थापन झाला नाही, तसे कंपनीचे धोरण होते. इंग्लंडमधील उद्योगधंद्यात पूरक कच्चा माल तयार होवू शकेल अशाप्रकारच्या उद्योग व्यवसायाला ब्रिटिशांनी विशेष प्राधान्य दिले. त्यांचा विकास झाला. मात्र खणकाम, जहाजबांधणी, पोलाद, लोखंड इत्यादी सारखे उद्योग मोठे होवू शकले नाहीत. त्याचे स्वरूप मर्यादीत ठेवले.

### १९ व्या शतकात उद्योगांचा विकास झाला काय ?

ब्रिटिश सरकारने स्वीकारलेल्या व्यापारी धोरणाचा परिणाम स्वरूप भारतीय उद्योगधंद्याचा विकासा होण्याऐवजी बुडाले. ब्रिटिश भारतात आले तेव्हा भारतीय हस्तोद्योगाची भरभराट झालेली होती. विशेषत: सुती व रेशमी कापडाचा उद्योग तेजीत होता. यासाठी भारत जगभर प्रसिद्ध होता. ब्रिटिशांनी हेतुपुरस्सर येथील उद्योग नष्ट करण्याचे धोरण स्विकारले. कारण या काळात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती आपल्या उच्च स्तरावर होती. लॅकेशायर, मॅचेस्टर येथे तयार होणाऱ्या मालासाठी मोठी बाजारपेठ म्हणून ते भारताकडे पाहत होते. यासाठी त्यांनी भारतीय मालावर जबर जकात लावली व इंग्लंडमधील माल जकातमुक्त केला. परिणामी जकातमुक्त स्वस्त मालाशी भारतीय उद्योग अथवा व्यापारी स्पर्धा करू शकले नाहीत. त्यांचा हळूहळू ऱ्हास घडून आला. नविन उद्योगधंदे भारतात वाढू नयेत याची खबरदारी ब्रिटिशांनी जाणीवपूर्वक घेतली. आपल्या वसाहतीत उद्योग विकसित होऊ न देणे हे वसाहत वादाचे प्रमुख वैशिष्ट्य होते. ढाका, मुर्शिदाबाद, पाटणा यासारखी शहरे नावाजलेली होती. ती या काळात ओस पडली. या संदर्भात चार्मास ट्रिंव्हेलियन म्हणतो की, '' भारताचे मॅचेस्टर मानल्या गेलेला ढाका या समृद्ध शहराचे रूपांतर लहान व दरिद्री शहरात झाले. ही खरोखरीच मोठी शोकांतिका होती.''

व्यापारी भांडवलशाहीकडून औद्योगिक भांडवलशाहीकडे झालेल्या इंग्लंडच्या वाटचालीचे भारतावर अनिष्ठ परिणाम झाले. भारताची अर्थव्यवस्था ब्रिटिश उद्योगधंद्याशी जोडली गेली. पक्का माल निर्यात करणारा भारत इंग्लंडचा पक्का माल आयात करणारा देश झाला व इंग्लंडला लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठादार झाला. ब्रिटिशांच्या उद्योग व्यापार संरक्षणाच्या धोरणामुळे भारत या काळात औद्योगिकदृष्ट्या अविकसित

अवस्थेत राहीला. या संदर्भात रोमेश दत्त म्हणतात की, " The East India company and the British parliament following the selfish commercial policy of a hundred years ago discouraged Indian manufacturers in the early years of British rule in order to encourage the rising manufacturers of England. This policy pursued during the last decade of the eighteenth century and the first decades of the nineteenth, was to make the Indian subservient to the industries of great Britain, and to make the Indian people grow raw materrial only in order to supply material for the looms and manufacturies of Great Britain. This policy was pursued with unwavering resolution and fatal success, orders were sent out to force Indian artisans to work in the company's factories commarcial resident were largaly vested with extensive powers over villages and communities of Indian weavers. Prohibitive tariffs excluded Indian silk and cotton goods from England. English goods were admitted in to India free of duty or on Payment of nominal duty."

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ४**

**(अ) रिकाम्या जागा भरा.**

१. ------ कायद्याने ईस्ट इंडिया कंपनीची व्यापारी मक्तेदारी संपुष्टात आली.

२. ------ कायद्याने युरोपीय भांडवलदारांना जमिनीचा मालकी हक्क मिळविण्याची मुभा मिळाली.

३. ------ याने भारतात चहाचा प्रयोग प्रथम केला.

४. ------ उद्योगाने भारतीय कारखानदारीला जन्म दिला.

५. विल्यम बेटिकने ------ उद्योगाला चालना दिली.

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. ईस्ट इंडिया कंपनीचा व्यापारी मक्तेदारीचा कालखंड कोणता.

२. मुक्त व्यापार धोरणाची मांडणी कोणत्या अर्थतज्ञाने केली आहे.

३. भारतीय मालाच्या निर्यातीवर प्रतिबंध घालण्यासाठी ब्रिटिशांनी कोणते धोरण स्वीकारले.

४. कोणत्या वर्षी आसाम टी कंपनीची स्थापना झाली.

५. भारतात कॉफीसाठी कोणता प्रदेश प्रसिद्ध होता.

**३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ**

❊ **कॅलिको :** स्वच्छ, पांढरे शुभ्र सूती कापड

❊ **दडणी पद्धती :** विणकराला व्यवसायासाठी हात उसने पैसे देण्याची पद्धती.

❊ **पटणी :** दडणी पद्धतीने पैसे देऊन जो माल व्यापाऱ्याकडे येतो, त्यास पटनी असे म्हणत.

❊ **साम्राज्यवाद :** एका देशाने दुसऱ्या देशाचा प्रदेश जिंकून घेऊन, त्यावर आपले राजकीय, सामाजिक व

सांस्कृतिक वर्चस्व निर्माण करणे.

✻ **वाणिज्यवाद :** ही संकल्पना युरोपमध्ये १५ व्या शतकात उदयास आली. वाणिज्यवाद हा ब्रिटिशांच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग होता. प्रारंभी वाणिज्यवाद अंतर्गत अर्थव्यवस्था एका सुत्रात बांधण्यापुरता मर्यादित होता. पुढील काळात त्याची व्याप्ती वाढून आयात-निर्यात व्यापाराच्या क्षेत्रात वाणिज्यवाद प्रभावी ठरला. भारत हा ब्रिटिशांची वसाहत असल्याने वाणिज्यवादाची संकल्पना येथील अर्थव्यवस्थेत प्रभावी ठरली.

✻ **कुटीरउद्योग :** कुटुंबातील सदस्यांच्या मदतीने घरगुती स्वरूपात चालविलेल्या व्यवसायाला कुटीर उद्योग असे म्हणतात.

✻ **आर्थिक शोषण :** आपल्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी व प्रगतीसाठी एका व्यक्तीने अथवा व्यक्तिसमूहाने अथवा देशाने दुसऱ्या व्यक्तीची अथवा व्यक्तिसमुहाची अथवा देशाची संपत्ती हरप्रकारे शोषून घेण्याची प्रक्रिया. या प्रक्रियेत स्वार्थी शोषक दुर्बल शोषितावर अन्याय करतात.

✻ **निःसारण :** निचरा होणे, वाहून जाणे, संपत्तीच्या निःसारणाला आर्थिक निःसारण अथवा आर्थिक धूप असे म्हणतात.

✻ **अनुद्योगीकरण :** विविध उद्योगांच्या ऱ्हासाची प्रक्रिया. ब्रिटिश कालखंडात अनेक पारंपारीक उद्योगधंद्यांचा जो ऱ्हास घडून आला त्याचा निर्देश या संज्ञेद्वारे केला जातो.

✻ **संरक्षक जकातीचे धोरण :** देशात आयात केल्या जाणाऱ्या मालावरील जकातकर हा निर्यात होणाऱ्या मालावरील जकातकरापेक्षा खूपच जास्त असतो आणि त्याद्वारे व्यापारी स्पर्धेमध्ये परकीय मालापेक्षा स्वदेशी माल स्वस्त मिळू शकतो. स्वदेशाच्या व्यापारी हितसंबंधाचे रक्षण करणाऱ्या अशा जकातविषयक धोरणाला संरक्षण जकातीचे धोरण असे म्हणतात.

**३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :**

✻ **स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

अ) १) ढाक्का २) मॉरिस-डी-मॉरिस ३) इंग्लंड ४) शबनम ५) सन १८१३

ब) १) दि इंडस्ट्रियल इव्हील्यूशन ऑफ इंडिया इन रिसेन्ट टाइम्स २) २०० पौंड ३) सन १८१३
४) लॉकेशायर व मँचेस्टर ५) सन १८३३

✻ **स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

अ) १) गारा/गटा २) मलमल ३) ब्यूरबान ४) सन १८५४ ५) हमी पद्धत

ब) १) बॉक्सर बंड २) सन १८९६ ३) जॉर्ज ॲक्लंड ४) सन १८८० ५) रमेशचंद्र दत्त

✻ **स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३**

अ) १) कामगार २) मुंबई ३) कावाराजी दावर ४) दस्तुरी ५) सन १८८१

ब) १) नारायण मेघाजी लोखंडे २) १८७६ ३) टाटा ४) दिनबंधू ५) मराठा इस्पितळ

**✲ स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ४**

अ) १) १८१३ २) १८३३ ३) अॅड्र्यू चार्मटन ४) ज्यूट ५) चहा

ब) १) इ.स. १७५७ ते १८१३ २) अॅडम स्मिथ ३) संरक्षक जकात ४) इ.स. १८३४ ५) दक्षिण भारत

## ३.५ सारांश

भारतात ब्रिटिश सत्ता स्थापन झाल्यानंतर ब्रिटिश शासकांनी स्विकारलेल्या व्यापारी धोरणाचा परिणाम येथील उद्योगधंद्यावर झाला व भारतीय हस्तोद्योगाचा ऱ्हास घडून आला. ब्रिटिशांनी भारतातील हे उद्योग हेतूपुरस्करपणे नष्ट केले. कारण त्यांना इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीतून तयार झालेल्या मालास प्रचंड लोकसंख्येची बाजारपेठ पाहिजे होती. पारंपारिक उद्योगाचा ऱ्हास होत असताना नवीन उद्योग मात्र सुरू होवू दिले नाही अथवा तशा प्रकारचे वातावरण तयार केले नाही. परंतु १९ व्या शतकाच्या मध्यानंतर भारतात भारतीय भांडवलदारांनी काही उद्योग स्थापन करण्यास सुरूवात केली. यामध्ये कापड उद्योग हा महत्वाचा उद्योग होता. त्याखालोखाल तागाचा उद्योग. ब्रिटिशांनी सत्ता वर्चस्वाचे साधन म्हणून स्थापन केलेल्या रेल्वेचा मात्र यासाठी फायदा झाला. यातून भारतात रेल्वेचा विकास घडून आला. १९ व्या शतकातील वाढते उद्योगधंदे याचबरोबर काही नवीन समस्याही निर्माण झाल्या. भांडवलदारी वर्ग कधीही कामगारांच्या हिताचा नसतो त्यामुळे भारतात कामगार चळवळही उदयास आली व त्याचा विकास झाला. कामगार वर्गाच्या चळवळीच्या पार्श्वभूमीवर भारतात एका नव्या मध्यम वर्गाचा उदय झाला.

१९ व्या शतकामध्ये इंग्लंडमध्ये खूप मोठ्या प्रमाणावर औद्योगिक क्रांतीने विकास झाला. उत्पादन पद्धतीत बदल होवून तांत्रिक पद्धतीचा अवलंब झाला. यातून प्रचंड मोठे उत्पादन व नफा इंग्लंडमधील भांडवलदारांना मिळू लागला. या मोठ्या प्रमाणावरील उत्पादनासाठी त्यांना मोठी बाजारपेठ आवश्यक होती आणि त्यांनी यासाठी भारतीय वसाहतीचा उपयोग करून घेतला. परिणाम भारतीय बाजारपेठेमध्ये इंग्लंडमधील स्वस्त माल येवू लागल्याने भारतीय मालाला उठाव राहीला नाही. त्याचा परिणाम भारतीय उद्योगावर झाला. ब्रिटिश सरकारने इंग्लंडमधील भांडवलदार व उद्योजकांच्या दबावामुळे खुल्या बाजाराचे व संरक्षित जकातीचे धोरण स्विकारून भारतीय उद्योगांची वसाहत केली. खुल्या व्यापार व जकातीच्या धोरणामुळे भारतीय मालाची निर्यात खुंटत गेली. परिणामी येथील उद्योग बंद पडले. या कालखंडात भारतात इंग्लंडमधील उद्योगांना पूरक असे कृषी उत्पादन व उद्योग सुरू झाल्याने मोठ्या उद्योगाची स्थापना होवू शकली नाही.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१) औद्योगिक ऱ्हासाची कारणमिमांसा करा.

२) औद्योगिक ऱ्हासाचे परिणाम विशद करा.

३) १९ व्या शतकातील भारतातील कापड उद्योगाचा विकास कसा झाला ते स्पष्ट करा.

४) १९ व्या शतकातील रेल्वेचा विकास स्पष्ट करा.

५) नारायण मेघाजी लोखंडे यांचे कामगार चळवळीतील योगदान स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा.**

१) खुल्या व्यापाराचे धोरण

२) ज्यूट उद्योग

३) हमी पद्धत

४) रेल्वेचा परिणाम

५) सन १८९२ चा फॅक्टरी ॲक्ट

**३.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके**


१. जावडेकर श. द., आधुनिक भारत, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७९.

२. दत्त र. पा. (अनु. य. ना. देवधर), आजकालाचा भारत, डायमंड पब्लिकेशन पुणे, २००६.

३. ग्रोवर बी.एल. (अनु डॉ. एन.के.बेल्हेकर) आधुनिक भारताचा इतिहास,एस. चांद आणि कंपनी नवी दिल्ली, २००३.

४. राय. सत्या, एम., भारत मे उपनिवेशवाद और राष्ट्रवाद,हिंदी माध्यम कार्यान्वय, निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय,२००२.

५. सरदेसाई बी.एन. व नलावडे व्ही.एन. आधुनिक भारताचा इतिहास,फडके प्रकाशन, कोल्हापूर,२००४.

६. सरदेसाई बी. एन. आधुनिक महाराष्ट्र,फडके प्रकाशन,कोल्हापूर,२०००

७. गोखले आर.एम. भारताचा आर्थिक इतिहास ओरिएंट लाँगमन, जि.पुणे १९७७

८. माडगावकर गो.ना. मुंबईचे वर्णन, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय,१९६१

९. कदम मनोहर, कामगार चळवळीचे आद्य प्रवर्तक नारायण मेघाजी लोखंडे, असर प्रकाशन मुंबई.

१०. Gadgil D.R the industrial Evolution of India in Recent times, oxford University, Calcutta, 1959

११. Sarkar Sumit Modern India 1855-1947 Macmillan India Ltd. Madras 1986.

१२. Dharma Kumar(Ed.) the cambridge Economic History of India Roll Orient Longman New Delhi,1984

१३. Roy Tirthankar,the Economic History of India, 1887-1947 Oxford University Press, New Delhi, 2000

१४. Chokey R.D Economic Life in Bombay Deccan 1818-1934 Asian Publishing House 1955.


***

# घटक क्र. ४
# व्यापार
# Trade

अ) परराष्ट्रीय व्यापाराचे बदलते स्वरूप - वाणिज्यवादाचा काळ,
औद्योगिक भांडवलाचा काळ आणि वित्तीय गुंतवणूकीचा काळ
(Changing nature of external Trade - Stages of Mercantilism,
Industrial Capital and Finance Capital)

ब) वसाहतीक जकात धोरण ( Colonial Tariff Policy )

क) संपत्तीचे निःसारण आणि ब्रिटिश समुद्रपार व्यापार (Drain of wealth and british overseas trade)

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्टे
४.१ प्रास्ताविक
४.२ विषय विवेचन
४.२.१ परराष्ट्रीय व्यापाराचे बदलते स्वरूप- वाणिज्यवादाचा काळ, औद्योगिक भांडवलाचा काळ आणि वित्तीय गुंतवणूकिचा काळ
४.२.२ वसाहतीक जकात धोरण
४.२.३ संपत्तीचे निःसारण आणि ब्रिटिश समुद्रपार व्यापार
४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
४.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे
४.५ सारांश
४.६ सरावासाठी स्वाध्याय
४.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ

## ४.० उद्दिष्ट्ये :

या घटकाचा अभ्यासाची उद्दिष्टये -

* १९ व्या शतकातील भारतीय व्यापाराचे स्वरूप जाणून घेणे.
* ब्रिटीश भारतातील जकात धोरण जाणून घेणे.
* ब्रिटीश भारतातील जकात धोरणाचा व्यापारावर पडलेला प्रभाव जाणून घेणे.
* संपत्ती निःसारण सिद्धांत आणि त्याचे परिणाम अभ्यासणे.
* ब्रिटीश समुद्रपार व्यापाराची माहिती करून घेणे.
* विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक दृष्टीकोन निर्माण करणे.

## ४.१ प्रास्ताविक :

व्यापार म्हणजे वस्तू व सेवांची खरेदी-विक्री होय. व्यापाराद्वारे एखाद्या देशाच्या प्रगतीची, समृद्धीची कल्पना येते. प्राचीन काळापासून भारत हा आशिया खंडातील एक महत्वाचा व्यापारी देश होता. प्राचीन कालखंडापासून म्हणजे अगदी सिंधू संस्कृतीच्या काळापासून भारताचा जगभरातील देशांशी व्यापार चालत आलेला दिसून येतो. प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडात भारताचा व्यापार मोठ्या प्रमाणावर प्रामुख्याने युरोपशी खुष्कीच्या मार्गाने चालत होता. पण सन १४५३ नंतर जलमार्गचा शोध लागल्यावर तो जलमार्गेही सुरू झाला. १७ व्या, १८ व्या शतकात युरोपातील व्यापारी स्वरूपाच्या कंपन्यांनी भारताबरोबरच्या परकीय व्यापारात भाग घेऊन भारताची निर्यात वाढविली. त्यामुळे हा व्यापार भारताला अनुकूल होता. कारण भारतीय मालाच्या निर्यातीच्या मोबदल्यात भारतात सोने-चांदी, मौल्यवान धातू आयात होत असत. त्यामुळे भारत या काळात समृद्ध देश होता.

ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनी ही व्यापारी उद्देशाने भारतात आली. पण भारतातील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन व्यापाराबरोबरच भारतातील राजकीय सत्ताही आपल्या हाती घेतली. कंपनीने भारतातील स्थानिक सत्ताधिशांचा पराभव केला, त्याचवेळी पोर्तुगीज, डच व फ्रेंच या व्यापारी स्पर्धकांना आपल्या व्यापारी मार्गातून दूर केले. त्यामुळे भारतातील व्यापारी व राजकीय क्षेत्रात ब्रिटीशांना स्पर्धक राहिला नाही. भारतातील राजकीय सत्ता आपल्या ताब्यात घेतल्यानंतर त्या राजकीय सत्तेचा वापर ब्रिटीशांनी आपल्या व्यापारवाढीसाठी केला.

सुरूवातीला ईस्ट इंडिया कंपनीने भारतीय व्यापारावर आपली मक्तेदारी निर्माण करून भारतीय वस्तूंच्या निर्यातीला प्रोत्साहन दिले. सन १८१३ च्या चार्टर ॲक्टने कंपनीची भारतातील व्यापारी मक्तेदारी नष्ट करून ब्रिटीशांनी भारतात मुक्त व्यापारी धोरणाचा अवलंब केला. पण ब्रिटीशांनी जकात धोरणाच्या माध्यमातून सामाज्य पसंतीचे भेदात्मक व्यापारी धोरण अवलंबिल्यामुळे भारताचा परकीय व्यापार ब्रिटन केंद्रीय बनला. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती आणि त्याचा भारतीय व्यापारावर पडलेला प्रभाव यामुळे भारतीय व्यापाराचे स्वरूप बदलले. भारत हा कच्च्या मालाची निर्यात करणारी आणि पक्क्या मालाची आयात करणारी इंग्लंडची हक्काची बाजारपेठ बनली. त्यामुळे भारतीय हस्तोद्योगांचा ऱ्हास होऊन उत्पादक (Creditor) असणारा भारत कर्जबाजारी (Debitor) बनला. ब्रिटीशांच्या शोषणकारी स्वरूपामुळे भारतीय संपत्तीचे अपहरण होऊ लागले.

याचा परिणाम भारत दरिद्री बनला आणि भारतात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली.

### ४.२ विषय विवेचन :

### ४.२.१ परराष्ट्रीय व्यापाराचे बदलते स्वरूप

भारताचा परराष्ट्रीय व्यापार प्राचीन काळापासून म्हणजे अगदी ग्रीक संस्कृतीच्या काळापासून मुख्यत्वे युरोपियन देशांशी चालत आलेला दिसून येतो. मध्ययुगातही भारताचा व्यापार युरोप आणि आग्नेय आशियाशी विशेषतः भूमार्ग चालत असे. आशियाबरोबरचा भारताचा व्यापार अरब व्यापारी आणि नाविक यांच्या हाती केंद्रीत होता. तर युरोपशी चालणाऱ्या व्यापारावर इटालीयन व्यापाऱ्यांची जवळपास संपूर्ण मक्तेदारी होती. भारतातून आशियामार्गे युरोपात निर्यात केला जाणारा माल मुख्यत्वे खुष्कीच्या मार्गाने अनेक देशातून जात असे.

पण १४५३ मध्ये आशिया मायनर आणि कॉन्स्टॅन्टिनोपल ऑटोमन तुर्कांनी जिंकून घेतल्यामुळे पूर्व आणि पश्चिम दरम्यानचे सर्व मार्ग तुर्कांच्या नियंत्रणाखाली आले. युरोप व आशिया दरम्यानच्या व्यापारावर व्हेनिस व जीनिव्हा व्यापाऱ्यांनी आपली मक्तेदारी निर्माण केली. म्हणून पश्चिम युरोपातील राष्ट्रांनी भारत व इंडोनेशियन मसाल्यांच्या बेटाकडे जाणाऱ्या नव्या आणि सुरक्षित सागरी मार्गाचा शोध घेण्यास सुरूवात केली. कारण युरोपियन व्यापाऱ्यांना प्रत्यक्ष अरब व व्हेनेशियन व्यापाऱ्यांशी संघर्ष टाळून पूर्वेशी थेट व्यापारी संबंध प्रस्थापित करावयाचे होते. त्यामुळे नवीन जलमार्गाच्या शोधाची गरज निर्माण झाली. याचाच एक भाग म्हणून पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा केप ऑफ गुड होप मार्गे सन १४९८ मध्ये भारताच्या कालिकत बंदरात आला. तेव्हापासून युरोपचा सागरी मार्गाने मोठ्या प्रमाणावर दक्षिण-पूर्व आशिया व भारताबरोबर व्यापार सुरू झाला.

सुरूवातीला पोर्तुगीजांनी पूर्वेकडील व्यापारावर आपली व्यापारी मक्तेदारी निर्माण केली. पण सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात हॉलंड, इंग्लंड आणि नंतर फ्रान्स या व्यापारी व आरमारी सत्तांनी पोर्तुगीज व स्पेनच्या जागतिक व्यापारी मक्तेदारीविरूद्ध जोरदार मोहिम राबविली. यामध्ये पोर्तुगीजांना हार पत्करावी लागली. त्यामुळे इंग्रज, डच व फ्रेंच व्यापाऱ्यांना केप ऑफ गुड होपमार्गे भारतात येऊन पूर्वेकडील साम्राज्यस्पर्धेमध्ये सहभागी होणे शक्य झाले. अखेर डचांनी इंडोनशियावर (मसाल्याची बेटे) आणि इंग्रजांनी भारत, श्रीलंका आणि मलायावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. इंग्रजांनी डच व फ्रेंचांना भारतीय सत्तास्पर्धेतून बाजूला सारून भारतावर आपले निर्विवाद साम्राज्य प्रस्थापित केले.

ब्रिटिशांनी भारताची एकहाती सत्ता ताब्यात घेण्यापूर्वी युरोपियन व्यापारी भारत व इंडोनेशियन मसाल्यांच्या बेटाकडे आकर्षित झाले होते. कारण या काळात युरोपियन देशात मसाल्यांचे पदार्थ आणि सुती कापडाला फार मोठी मागणी होती. या काळात व्यापारांचे स्वरूप त्रिकोणी होते. इंडोनेशिया व मसाल्यांच्या बेटावर मसाल्यांच्या पदार्थांचे प्रचंड उत्पादन होत होते. तसेच या मसाल्यांच्या बेटांना भारतीय सुती कापडाची गरज होती. त्यामुळे युरोपियन व्यापारी भारतातील सुती कापड खरेदी करून ते इंडोनेशियन मसाल्यांच्या बेटामध्ये विकून त्या मोबदल्यात मसाल्यांच्या पदार्थांची खरेदी करत. ते खरेदी केलेले मसाल्याचे पदार्थ युरोपात विकून भारतातील सुती कापड आणि मसाल्याचे पदार्थ खरेदी करण्यासाठी युरोपातून मौल्यवान धातू (सोने, चांदी) भारतात आणत. कारण भारत या काळात स्वयंपूर्ण होता. तसेच भारतीयांना पूर्वीपासून सोने, चांदीसारख्या मौल्यवान धातूंची

आवड होती. म्हणजेच भारत या काळात या त्रिवेणी व्यापारातील शेवटचा घटक होता. त्यामुळे हा व्यापार भारताच्या दृष्टीने किफायतशीर होता.

ब्रिटिश सत्तेच्या स्थापनेमुळे भारतातील फक्त सामाजिक व राजकीय जीवनच प्रभावित झाले असे नाही तर आर्थिक जीवनदेखील प्रभावित झाले. भारताच्या या विशाल साम्राज्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि प्रशासन सुव्यवस्थितपणे चालविण्यासाठी ब्रिटिशांनी भारतातील आपल्या धोरणांमध्ये वारंवार बदल केले. त्यामुळे ब्रिटिश काळात भारतीय प्रशासननिती सतत बदलत राहिली. असे असले तरी ब्रिटिशांनी आपल्या आर्थिक उद्देशांना कधीही नजरेआड केले नाही. किंबहुना आपले आर्थिक उद्देश साध्य करण्यासाठी त्यांनी प्रशासकीय ढांचा बनविला व विकसीत केला. ज्यामुळे कोणत्याही अडथळ्याशिवाय भारताबरोबर व्यापार केला जाऊ शकेल आणि संपत्तीचे अपहरण निर्वेधपणे करता येईल.

ब्रिटिशांनी सन १८५८ पर्यंत ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिपत्याखाली आणि सन १८५८ ते सन १९४७ पर्यंत प्रत्यक्ष ब्रिटिश संसदेच्या नियंत्रणाखाली भारतावर राज्य केले. आर. पी. दत्त यांनी पहिल्यांदा भारताच्या संदर्भात वसाहतवादी आर्थिक शोषणाचा सिद्धांत मांडला. त्यांनी ब्रिटिश वसाहतवादाच्या संपूर्ण काळाची विभागणी तीन टप्प्यामध्ये केली. तेच हे तीन टप्पे भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे निदर्शक होते.

१. वाणिज्यवादाचा काळ (१७५७-१८१३) (Stage of Marcantilism)

२. औद्योगिक भांडवलाचा काळ (१८१३-१८६०) (Stage of Industrial Capital)

३. वित्तीय भांडवलाचा काळ (१८६०-१९४७) (Stage of Finance Capital)

अभ्यासक भारतातील ब्रिटिश वसाहतवादाची तीन वेगवेगळ्या टप्प्यामध्ये विभागणी करतात. प्रत्येक टप्प्यामध्ये ब्रिटिशांनी वेगवेगळ्या शोषणपद्धती व मार्ग अवलंबिले. विशेष म्हणजे प्रत्येक टप्प्यातील शोषणपद्धती व मार्ग त्याच्या पूर्वीच्या परिस्थितीतून विकसित झाले. पहिल्या टप्प्यातूनच दुसऱ्या टप्प्याचा विकास होत गेला. पण पहिला टप्पा समाप्त होण्यापूर्वीच दुसरा शोषणाचा टप्पा सुरू झाला. कि ज्यामुळे सुरूवातीच्या शोषण टप्प्यामध्ये अस्तित्वात असलेल्या शोषणपद्धती नवीन टप्प्यामध्ये नवीन शोषणपद्धतीबरोबर चालूच होत्या. पण प्रत्येक टप्प्याची काही खास वैशिष्ट्ये होती.

**१) वाणिज्यवादाचा काळ :** (१७५७-१८१३) (Stage of Marcantilism)

१७५७-१८१३ हा पहिला कालखंड प्रामुख्याने वाणिज्यवादाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. हा असा कालखंड होता कि, ज्या काळात ईस्ट इंडिया कंपनीची भारतीय उपखंडात आपले राजकीय प्रभुत्व स्थापन करून भारतीय व्यापारावर आपली मक्तेदारी निर्माण करण्याचा प्रयत्न चालला होता. या काळात कंपनीने आपले राजकीय प्रभुत्व निर्माण करून भारतीय व्यापारावर आपली मक्तेदारी निर्माण केली. १७५७ पर्यंत ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची भूमिका एका व्यापारी संघटनेची होती. कंपनी भारतामध्ये विविध प्रकारच्या मालाची व मौल्यवान धातूंची आयात आणि त्या बदल्यात प्रामुख्याने सुती कापड व मसाल्यांच्या पदार्थांची परदेशात निर्यात करित असे. प्रामुख्याने भारतीय उत्पादित मालाची परदेशात विक्री करूनच कंपनीला नफा मिळत असे. त्यामुळे या काळात कंपनीने भारतातील उत्पादित वस्तूंची निर्यात वाढविली आणि या वस्तूंच्या भारतातील उत्पादनास प्रोत्साहन दिले.

१८ व्या शतकाच्या मध्यास भारताचा परकीय व्यापार प्रामुख्याने युरोपियन कंपन्या, मध्य आशियातील आर्मेनियम व अरब आणि स्थानिक भारतीय व्यापारी या तीन गटांच्या हातात होता. पण १७५७ नंतर कंपनीने आपल्या भारतातील राजकीय सत्तेचा वापर व्यापारासाठी केला आणि आपल्या व्यापारी प्रतिस्पर्धकांना म्हणजेच इतर युरोपियन व्यापारी कंपन्या,मध्य आशियन व्यापारी आणि भारतीय स्थानिक व्यापारी यांना भारतीय व्यापारातून बाहेर फेकले आणि भारतीय व्यापारावर आपले निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित करून भारतीय व्यापारावर आपली व्यापारी मक्तेदारी निर्माण केली. सुरूवातीला एजन्सी हाऊसमार्फत बंगालमध्ये कंपनी व्यापारी वस्तू खरेदी करून त्यांची युरोपात विक्री करत. त्या विक्रीतून मिळालेल्या नफ्यावर सुरूवातीला ईस्ट इंडिया कंपनी चाले. त्याशिवाय कंपनीचा नोकरदार वर्ग खाजगी व्यापार बेकायदेशीर मार्गाने करीत होते.

या काळात कंपनी भारतातून सुती व रेशमी कापड,मसाल्याचे पदार्थ, सोरा व इतर कलाकुसरीच्या वस्तू युरोपात निर्यात करत. त्या मोबदल्यात भारतात मोठ्या प्रमाणात मौल्यवान वस्तू आणल्या जात. त्यामुळे युरोपातून विशेषतः ब्रिटनमधून मोठ्या प्रमाणावर संपत्ती भारताकडे येत. त्यामुळे ब्रिटनमध्ये हा एक चिंतेचा विषय बनलेला होता की, भारताला द्याव्या लागणाऱ्या मौल्यवान वस्तू कशा थांबविता येतील. याला पर्याय म्हणून ईस्ट इंडिया कंपनीने जपान व चिनशी कातडी वस्तू व इतर साहित्य यांचा व्यापार भारताबरोबर केला. पण त्यात कंपनीला यश आले नाही. त्यामुळे युरोपला विशेषतः इंग्लंडला भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी ईस्ट इंडिया कंपनी आपल्या राजकीय वर्चस्वाखाली आलेल्या बंगालमधील महसुलाचा उपयोग करू लागली. या काळात भारतीय वस्तूंची निर्यात वाढली असली तरी कंपनीने भारतीय उत्पादकांना प्रोत्साहन देण्याऐवजी त्यांच्यावर जास्तीत जास्त निर्बंध लादण्याचा प्रयत्न केला. त्यांना आपला माल अगदी कमी किंमतीत विकावयास भाग पाडले. तसेच कच्चा मालावर, कापसावर कंपनीने आपली मक्तेदारी निर्माण करून तो कापूस बंगाली विणकरांना अतिशय चढ्या दराने विकण्यात येई. अशा पद्धतीने बंगाली विणकरांचे खरेदीत व विक्रीत असे दुहेरी नुकसान होत. तरीही भारतीय उत्पादने आपला खप युरोपियन बाजारपेठेत अद्याप टिकवून होती. यातून कंपनीला आणि कंपनीच्या नोकरांना मोठ्या प्रमाणात फायदा होत होता.

या काळात ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतातील एकूण व्यापारापैकी जवळ पास ९/१० व्यापार सुती कापड व रेशिम ह्या दोन वस्तूंचा होता. सन १७७४ मध्ये ११ सभासदांचे एक बोर्ड ऑफ ट्रेड नेमण्यात आल्यानंतर कंपनीकडून होणाऱ्या खरेदीवर जास्त नियंत्रण ठेवता येणे शक्य झाले असले तरी कंपनीच्या नोकरांनी चालू ठेवलेल्या खाजगी व्यापारामुळे कंपनीला मिळणाऱ्या फायद्यावर मर्यादा पडत होत्या. लॉर्ड कॉर्नव्हालीसने अशी खरेदी करण्यासाठी पगारी दलाल नेमण्याचे धोरण स्विकारल्यामुळे नोकरांच्या खाजगी व्यापाराला काही प्रमाणात पायबंद बसला.

ईस्ट इंडिया कंपनीबरोबर डच व फेंच व्यापाऱ्यांची चाललेली स्पर्धा सन १७८० सालानंतर कमी होत गेली. ईस्ट इंडिया कंपनीची भारतातील सत्ता वाढत गेल्यानंतर कंपनीने भारतातील सुती कापडाच्या खरेदी बाबतचे नियम जास्त कडक केले. विणकरी लोकांना व इतर कारागिरांना विशिष्ट माल कंपनीला देण्याच्या अटीवर कंपनीकडून आगाऊ रक्कमा दिल्या जाऊ लागल्या आणि ठरलेला माल वेळेत न पूरविल्यास कायदेशिर कारवाई केली जात. शिवाय मालही जप्त केला जात असे. त्यामुळे कापडाचा दर्जा कमी होत गेला आणि विणकरी लोक सर्वस्वी

कंपनीवर अवलंबून राहू लागले. कंपनीला सुती कापड मोठ्या प्रमाणावर युरोपला निर्यात करता येत असले तरी कच्चा रेशमाच्या हलक्या दर्जामुळे रेशमाला मागणी येणे कठीण होत असे. त्यासाठी कंपनीने इटालीमधून तज्ञ आणून रेशमाचा दर्जा सुधारण्याचे धोरण अवलंबिले. कंपनीकडून दरवर्षी साधारणतः २५ लाख रूपयाचे कच्चे रेशिम खरेदी केले जात असे.

सन १८१३ पर्यंत ईस्ट इंडिया कंपनीने भारताबरोबरच्या परकिय व्यापारावर आपली मक्तेदारी टिकवून ठेवली होती. त्यामुळे या काळात भारताचा परकिय व्यापार प्रामुख्याने ईस्ट इंडिया कंपनीच्या जहाजाद्वारे युरोपियन राष्ट्रांशी होत असे. या काळात भारताच्या परकिय व्यापारातील ब्रिटनचा वाटा जवळपास ६०% हून अधिक होता. त्याचबरोबर फान्स,चीन, पोर्तुगाल, जावा-सुमात्रा, बह्मदेश, जपान व मध्य आशिया या देशांशीही भारताचा व्यापार चालत होता. पण तो ब्रिटनच्या तुलनेत फारच अल्प होता.

अशाप्रकारे १८१३ पर्यंत कंपनीने जवळपास संपूर्ण भारतावर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष आपल्या राजकीय प्रभुत्वाच्या आधारावर भारतीय व्यापारावर आपली व्यापारी मक्तेदारी निर्माण केली. आपल्या परकीय व स्थानिक व्यापारी प्रतिस्पर्धकांचा भल्या-बुऱ्या मार्गाचा अवलंब करून आपल्या व्यापारी मार्गातून दूर ठेवले. या काळात कलकत्ता, बॉम्बे, मद्रास, कराची यासारखी व्यापारी केंद्रे उदयास आली. काही भारतीयांनी भारत आणि चीन या दरम्यानच्या व्यापारामध्ये अनेक संकटांचा सामना करत चीनबरोबरचा अफूचा व्यापार चालू ठेवला.

असे असले तरी या काळात भारतीय व्यापाराचे स्वरूप (Traditionally) पारंपारिक होते.कारण भारतातील उत्पादित वस्तू युरोप व इंग्लंडला निर्यात होत. आणि त्यातूनच कंपनीला नफा मिळत असे. त्यामुळे या काळात भारतातील निर्याती या आयातीपेक्षा जास्त होत्या.

### २) **औद्योगिक भांडवलाचा काळ (१८१३-१८६०)** Stage of Industrial Capital

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंडची अर्थव्यवस्था आणि इंग्लंडचे भारताबरोबरचे आर्थिक संबंध यामध्ये मूलभूत परिवर्तन घडून आले. याचा प्रभाव भारतीय व्यापाराच्या स्वरूपावर झाल्याशिवाय राहिला नाही. इंग्लंडमध्ये औद्योगिकीकरण झाल्याने इंग्लंडमध्ये उद्योगपतींचा प्रभावी वर्ग उदयास आला. या वर्गाची इंग्लंडमध्ये शक्ती, संख्या व राजकीय प्रभाव जसजसा वाढू लागला तसतसा तो वर्ग कंपनीच्या भारतातील मक्तेदारीवर हल्ला करू लागला. या वर्गास व्यापारामधून नव्हे तर उत्पादनामधून फायदा होत असल्याने त्यांना भारतीय उत्पादनाच्या इंग्लंडमधील आयातीला नव्हे तर आपल्या स्वतःच्या भारतात होणाऱ्या निर्यातीला तसेच भारतातून इंग्लंडमध्ये केल्या जाणाऱ्या कापसारख्या कच्चा मालाच्या आयातीला प्रोत्साहन द्यावयाचे होते. या वर्गाच्या प्रभावामुळे कंपनीवर ब्रिटिश संसदेने अनेक अटी लादण्यास सुरूवात केली होती.

सुरूवातीपासून ब्रिटीश उत्पादक व विचारवंतांना भारतीय वस्तूंना इंग्लंडमध्ये असलेल्या लोकप्रियतेची चिंता वाटत होती. त्यातच कंपनीला मिळणारा भरमसाठ नफा आणि कंपनीच्या अधिकाऱ्यांची अगणित संपत्ती यामुळे इंग्रज समाजातील अन्य वर्ग त्यांचा हेवा करू लागले. त्याचबरोबर उदयोन्मुख व्यापारी उद्योगापती वर्गाला या किफायतशीर व्यापारामध्ये आपला वाटा हवा होता. हा वर्ग मुक्त/खुल्या व्यापारी धोरणाचे समर्थन करणारा असून तो कंपनीच्या भारतातील व्यापारी मक्तेदारीवर हल्ला करू लागला. मुक्त व्यापाराचे समर्थन करणाऱ्या

उत्पादक भांडवलदारांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या अर्थशास्त्राच्या विचारधारेने देखिल फक्त ईस्ट इंडिया कंपनीलाच देण्यात आलेल्या खास अधिकारावर टीका केली. 'The Wealth of Nations' या आपल्या ग्रंथामध्ये कंपनीच्या व्यापारी मक्तेदारीवर टिका करता अॅडम स्मिथ म्हणतो,''म्हणून अशा निवडक कंपन्या अनेक प्रकारे उपद्रवी असतात. ज्या देशात त्या स्थापन होतात त्यांना त्या कमी अधिक अडचणीच्या ठरतात आणि त्यांच्या प्रशासनाखाली येणाऱ्या कमनशिबी लोकांसाठी त्या विध्वंसक असतात.''

या सर्व परिस्थितीचा परिणाम म्हणजे १८१३ च्या चार्टर अॅक्टने कंपनीची भारतातील व्यापारी मक्तेदारी संपुष्ठात आणली. आणि भारताबरोबरचा व्यापार सर्व ब्रिटिश जनतेसाठी खुला करण्यात आला. नंतर १८३३ च्या चार्टर अॅक्टने कंपनीची चहाची व चीनबरोबरची व्यापाराची मक्तेदारीही संपुष्ठात आणली गेली. त्याचबरोबर यावेळेपर्यंत नेपोलियन बोनापार्टबरोबरच्या युद्धांचा शेवट झाला होता. त्यामुळे युरोपात शांततामय कालखंड निर्माण झाला होता.

या सर्व परिस्थितीचा परिणाम भारताच्या व्यापारी स्वरूपावर झाला. कारण कंपनीची भारतातील व्यापारी मक्तेदारी संपुष्ठात आल्यावर औद्योगिक क्रांतीनंतर कारखान्यात उत्पादित ब्रिटीश माल भारतात मोठ्या प्रमाणात येऊ लागला. यामुळे भारतीय व्यापाराचे स्वरूप बदलले. कारण सन १८१३ पूर्वी भारतातील हस्तकला उद्योगातील उत्पादीत माल कंपनी युरोपात विशेषत: इंग्लंडमध्ये निर्यात करीत होती. पण सन १८१३ नंतर भारत ही ब्रिटिश उत्पादित मालाची हक्काची बाजारपेठ बनली. त्यामुळे १८१३ पूर्वीचे भारतीय व्यापाराचे पारंपारिक स्वरूप बदलले गेले. भारतीय व्यापारात आता भारतातील तयार उत्पादित वस्तूंची निर्यातीतील जागा कच्चा मालाने घेतली. तर आयातीमध्ये बदल होऊन आता ब्रिटीश यंत्रावर उत्पादित पक्का माल भारतात आयात होऊ लागला. म्हणजेच भारत आता कच्च्या मालाची निर्यात आणि पक्क्या मालाची आयात करणारा देश बनला. भारत हा जागतिक बाजारपेठेशी जोडला गेला.

ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतातील व्यापारी मक्तेदारीवर सन १८१३ च्या पूर्वीपासून इंग्लंडमध्ये टिका होत होती. त्यामुळे सन १८१३ च्या पूर्वीपासूनच कंपनीच्या भारतातील कारभारावर अंकुश ठेवण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटने वेळोवेळी कायदे करून कंपनीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर कंपनीकडून भारतातील औद्योगिक वस्तूंची निर्यात करण्यात येत असल्यामुळे सन १७८० नंतर इंग्लंडमधील उद्योगपतींनी त्याच्यावर टिका करण्यास सुरूवात केली होती. सन १७८२ नंतर तर सुती कापड व मलमल या भारतीय उत्पादित वस्तूंवर इंग्लंडमध्ये काही काळ बंदी घालण्यात आली होती. परंतु त्यानंतरच्या काळात मॅचेंस्टर येथील गिरण्यात उत्कृष्ठ कापड कमी खर्चात तयार करता येऊ लागल्यामुळे कंपनीला भारतातून सुती कापड व मलमलीची निर्यात बंद करणे आवश्यक वाटू लागले.

इंग्लंडमधील उद्योगधंद्याकरिता आवश्यक असणारा कच्चा माल आणि अन्नधान्य या वस्तू भारतातून निर्यात केल्या जाऊ लागल्या. भारताच्या निर्यातीत प्रामुख्याने कच्चा कापूस, कच्चे रेशीम, ताग, अफू, चामडी व कातडी, तेलबिया आणि निळ या वस्तू समाविष्ठ झाल्या. तर भारत इंग्लंडकडून कारखानदारी वस्तूंची आयात करू लागला. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास भारताच्या एकूण आयातीत लॅंकेशायरहून भारतात आयात केल्या जाणाऱ्या सुती कापडाचा हिस्सा जवळपास ५०% होता.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात असमान व्यापारी स्पर्धेमुळे आणि इंग्लंडच्या यंत्राधारित उत्पादनामुळे भारतीय कापड परकीय बाजारपेठेतून बाहेर फेकले गेले. युनायटेड स्टेट आणि कॅरिबियन बेटातील उत्पादनामुळे भारतातील युरोपियन एजन्सी हाऊस सन १८२० च्या सुमारास बंद पडू लागल्या.याच काळात चिनशी भारताचा अफूचा व्यापार सुरू झाला. भारतात ब्रिटिशांनी अफूच्या लावडीसाठी प्रोत्साहन देऊन उत्पादित अफू चिनला निर्यात केली जावू लागली. त्या मोबदल्यात चिनकडून चहा आणि कच्चे रेशीम खरेदी करून ते इंग्लंडला पाठविले जात असत. म्हणजेच भारत, चीन आणि इंग्लंड यांच्यात या काळात त्रिकोणी (Triangular) स्वरूपाचा व्यापार सुरू होता. कारण चिनकडून इंग्लडला चहा व कच्चे रेशीम निर्यात केले जाऊ लागल्यामुळे व्यापारी संतुलन चिनच्या बाजूने चालले होते. त्याला पर्याय म्हणून ब्रिटिशांनी चिनी लोकांना अफूचे व्यसन लावून भारतात अफूची लागवड करून, उत्पादीत अफू चिनला निर्यात केली जात असत. चिनने ज्यावेळी चिनमध्ये अफूच्या खरेदी-विक्रीवर निर्बंध लादले. त्यावेळी ब्रिटिशांनी चिनबरोबर दोन अफूची युद्धे (१८४०-४२ आणि १८५६-६०) केली.

१९ व्या शतकाच्या सुरूवातीला भारताच्या आयात-निर्यात व्यापारामध्ये लक्षणीय वाढ झाली. ती पहिल्या महायुद्धापर्यंत चालू होती. या काळात व्यापाराच्या स्वरूपात आश्चर्यकारक बदल झाला. त्याची महत्वाची चार वैशिष्ट्ये किंवा परिणाम होते.

१. परकीय व्यापारातील बदलामुळे भारतातील स्थानिक बाजारपेठ विस्तारली.

२. १८ व्या शतकात भारत हा जागतिक बाजारपेठेचा मोठा निर्यातदार होता. पण १९व्या शतकात त्यामध्ये हळूवार बदल होऊन त्यामध्ये गतिरोधक निर्माण झाला.

३. भारतीय व्यापाराच्या रचनेत बदल झाला. म्हणजेच भारतीय व्यापाराच्या आयात-निर्यातीत बदल झाले.

४. भारतीय व्यापारात मोठ्या प्रमाणात चढ-उतार झाल्याने भारतीय व्यापारी स्वरूपातही बदल झाला.

सन १८१३ च्या चॉर्टर ॲक्टने ईस्ट इंडिया कंपनीची भारतातील व्यापारी मक्तेदारी नष्ट केल्याने ब्रिटनमधील व इतर सर्वच देशातील व्यापाऱ्यांना भारताबरोबर व्यापार करणे शक्य झाले. या काळात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाल्याने इंग्लंडलाही उद्योगधंद्यांसाठी कच्च्या मालाची गरज होती. तसेच यंत्रोत्पादीत पक्का माल खपविण्यासाठी हक्काची बाजारपेठ हवी होती. तसेच हा काळ मुक्त व्यापारी धोरणाचा असल्याने या काळात भारताचा ब्रिटनबरोबरचा व्यापारातील सहभाग वाढला. याचा परिणाम म्हणजे भारतातील हस्तोद्योगांचा ऱ्हास झाला आणि भारत ही प्रामुख्याने कच्च्या मालाची निर्यात करणारी आणि पक्क्या मालाची आयात करणारी इंग्लंडची हक्काची बाजारपेठ बनली. भारततील बहुतांशी बंदरे करमुक्त केल्याने आणि हस्तोद्योगांचा ऱ्हास झाल्याने भारताला आता उत्पादक पदार्थांची गरज वाढू लागल्यामुळे भारताचा युरोपबरोबरचा व्यापार वाढला. सन १८१३ नंतर भारतातून मोठ्या प्रमाणावर इंग्लंडला कच्च्या मालाची निर्यात आणि इंग्लंडहून भारतात पक्क्या मालाची आयात होऊ लागली. त्याचबरोबर चीन, जपान, सयाम, जावा-सुमात्रा, ब्रम्हदेश, अफगाणिस्तान, पर्शिया, फ्रान्स, पोर्तुगाल, इ. देशांबरोबरही भारताचा व्यापार सुरू होता. ब्रिटिशांनी भारतीय व्यापारात भेदात्मक व्यापारी धोरण स्विकारल्याने भारताचा इंग्लंडबरोबरचा व्यापारातील हिस्सा सन १८६० पर्यंत जवळपास ६०%

पेक्षाही जास्त होता. १९ व्या शतकाच्या सुरूवातीपासून भारताचा इंग्लंडबरोबरचा व्यापारातील हिस्सा इतर देशांच्या तुलनेत नेहमीच जास्त होता. ज्यावेळी भारतातून इंग्लंडला निर्यात मालाची टक्केवारी जवळपास ४९ % होती. त्यावेळी इंग्लंडमधून भारतात आयात मालाची टक्केवारी जवळपास ६५ ते ७०% पर्यंत होती. त्यामुळे इतर देशांचा भारतीय व्यापारातील सहभाग नगण्य होता.

ईस्ट इंडिया कंपनीची भारतातील व्यापारी मक्तेदारी संपुष्टात आल्यानंतर इतर अनेक व्यापारी संस्थांनी व व्यापाऱ्यांनी भारताबरोबर व्यापार करण्यास सुरूवात केली. परंतु त्यापैकी ब्रिटिश व्यापारी संस्थांचे व व्यापाऱ्यांचे वर्चस्व टिकून राहू शकले याचे मुख्य कारण म्हणजे सागरी वाहतूकीच्या बाबतीत इंग्लंडचे अजूनही वर्चस्व टिकून राहिले होते. आणि भारतात ब्रिटिशांची राजकीय सत्ता प्रस्थापित झालेली होती. त्यामुळे भारतीय व्यापाराची मक्तेदारी प्रत्यक्षात इंग्लंडकडेच होती.

व्यापार व करवसुली सुरळीत चालू ठेवण्यासाठी ब्रिटिशांकडून भारताची प्रशासनव्यवस्था अधिक व्यापक व सुव्यवस्थित करण्यात आली. तसेच भारतीयांना नैतिक बंधनात अडकविण्यासाठी इतर अनेक संस्थाबरोबरच न्यायव्यवस्था निर्माण करण्यात आली. अंतर्गत वाहतूक-दळणवळणाच्या सुविधा निर्माण केल्या. त्यामुळे भारतीय खेड्यांचा स्वयंपूर्णपणा भंग पावून खेड्यापर्यंत व्यापाराचे जाळे विणले गेले.

असे असले तरी भारतावर लादलेली मुक्त व्यापारपद्धती एकतरर्फी होती. कारण विदेशी मालासाठी भारतीय दरवाजे नेहमी खुले करण्यात आले होते. पण जो भारतीय माल ब्रिटिश मालाला स्पर्धा करू शकत होता. त्यावर इंग्लंडमध्ये भारी दराने जकात कर लादण्यात आला होता. हा जकात कर भारतीय मालाची निर्यात बंद होईपर्यंत लादण्यात आला होता. उदाहरणार्थ १८२४ साली इंग्लंडमध्ये गेलेल्या भारतीय कापडावर ३० ते ७० टक्के आयात जकात कर लादण्यात आला होता. भारतीय साखरेवरील आयात कर तिच्या मूळ किमतीच्या तिप्पट होता. काही भारतीय मालावर तर चौपाट आयात कर दयावा लागत होता.

एकंदरीत, कंपनीच्या व्यापारी मक्तेदारीचा अंत, इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती, नेपोलियनबरोबरच्या युद्धांचा अंत, युरोपातील शांततामय काळ, मुक्त व्यापार धोरण यामुळे भारताच्या परकीय व्यापारात बरेच चढउतार झाले. यामुळे पक्क्या मालाची निर्यात आणि मौल्यवान धातूंची आयात करणारा भारत १९ व्या शतकात पक्क्या मालाची आयात आणि कच्च्या मालाची निर्यात करू लागल्याने भारतीय व्यापाराचे पारंपारिक स्वरूप बदलले.

### ३. वित्तीय भांडवलाचा काळ (१८६० – १९४७) Stage of Financial Capital

मूल्य व संख्येतील चढउतार आणि बहुपक्षीय व्यापार (Multilateral Trade) हे या काळातील भारतीय व्यापाराचे वैशिष्ट्य होते. हा काळ भारतातील वित्तीय भांडवल गुंतवणूकीचा काळ होता. या काळात भारतात युरोपियनांनी विशेषतः इंग्लंडमधील भांडवलदारांनी मोठ्या प्रमाणावर वेगवेगळ्या क्षेत्रात गुंतवणूक करण्यास सुरूवात केली. कारण १८६० नंतर फ्रान्स, जर्मनी, बेल्जियम, रशिया, अमेरिका व जपान या देशांतही इंग्लंडप्रमाणेच औद्योगिकीकरण झाले. या नवऔद्योगिक देशांनी व्यापार व भांडवलदारीच्या क्षेत्रात इंग्लंडच्या जगभरातील वर्चस्वाला सुरूंग लावण्यास सुरूवात केली. हे नवऔद्योगिक देश आपला उत्पादित माल निर्यात

करण्यासाठी जगभरातील बाजारपेठा शोधू लागले. याचाच एक भाग म्हणून हे नवऔद्योगिक देश भारतीय व्यापारातही सहभागी झाले. त्यामुळे भारताच्या व्यापारातील इंग्लंडचा वाटा कमी होऊ लागला.

विज्ञानाच्या क्षेत्रातही अनेक नवनवीन शोध लागल्यामुळे त्याचा वापर करून वेगवेगळे उद्योगधंदे उभारण्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली. या उद्योगधंद्यासाठी आवश्यक कच्चा मालाचा देखिल शोध घेण्यात आला त्यामुळे भारतातही उदयोगधंद्यांच्या उभारणीसाठी प्रयत्न होऊ लागले.

तसेच पश्चिम युरोपातील औद्योगिक राष्ट्रांमध्ये व्यापार व उदयोगधंद्यांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाल्यामुळे त्यातून त्यांना मिळालेल्या प्रचंड नफ्यामुळे आणि या साम्राज्यवादी देशांनी आपल्या वसाहतींचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक शोषण केल्यामुळे अगणित संपत्ती मिळाली. या अगणित संपत्तीला भांडवल म्हणून वापरण्यास या देशांमध्ये फारसा वाव नव्हता. त्यामुळे भारतासारख्या अविकसित वसाहतीमध्ये ज्यादा व्याजदराने या अतिरिक्त संपत्तीचा भांडवल म्हणून गुंतवणूक करून अतिरिक्त नफा मिळविण्याची संधी असल्याने शिवाय भारतावर ब्रिटिशांची भक्कम सत्ता होती. तसेच ब्रिटिश भारतीय सरकारने युरोपातील विशेषतः इंग्लंडमधील भांडवल भारतात गुंतविण्यासाठी प्रोत्साहन दिले. शिवाय परताव्याची हमी भारतीय सरकारने दिल्याने युरोपियन भांडवलदार भारतात भांडवल गुंतवणूक करण्यासाठी आकर्षित झाले. त्यामुळे सन १८५० नंतर बरेचसे ब्रिटिश भांडवल हे मुख्यतः भारतीय रेल्वे, भारत सरकारला कर्ज त्याचबरोबर चहाचे मळे, तागाच्या गिरण्या, कोळशाच्या खाणी, जहाज वाहतूक, व्यापार, विमा व बँका यामध्ये गुंतविले गेले. कारण भारतावर ब्रिटिशांची पकड मजबूत असल्याने गुंतविलेले भांडवल सुरक्षित होते.

या काळात भारताच्या परकिय व्यापारात झपाट्याने बदल झाले. कारण १८५० नंतर दळणवळणाची साधने विकसित झाली. १८५३ नंतर भारतात रेल्वेचे जाळे पसरले. ज्यामुळे दळणवळणात प्रगती होऊन भारताच्या ग्रामीण भागापर्यंत ब्रिटनमधील उत्पादित पक्का माल पोहचविणे व भारताच्या कानाकोपऱ्यातील कच्चा माल खरेदी करणे व तो बंदरापर्यंत पोहचविणे सहज शक्य झाले. त्याचबरोबर रस्त्यांचा विकास, टपाल व तार खात्याची स्थापना, वाफेवर चालणाऱ्या जहाजांच्या वापरास सुरूवात यामुळे व्यापारात सुलभता आली. त्याचबरोबर १८६९ मध्ये सुएझ कालवा वाहतुकीसाठी खुला झाल्यानंतर युरोप आणि भारत यांच्यातील अंतर जवळपास १/३ कमी झाले. त्यामुळे कच्च्या मालाची विशेषतः अन्नधान्यांची भारतातून निर्यात वाढली. यामुळे भारतीय परकीय व्यापाराच्या रचनेत आणि आकारात आमुलाग्र बदल झाला.

सन १८६१-६५ या काळात अमेरिकेत झालेले यादवी युद्ध व त्यामुळे भारतीय कापसाची युरोपात वाढलेली किंमत याचाही प्रभाव भारतीय व्यापारावर पडला. तसेच क्रिमीयन युद्धामुळे भारतीय तागाला युरोपातून विशेषतः इंग्लंडमधून आलेली मागणी यामुळे भारतीय व्यापारात बदल झाला. याचवेळी भारतीय शेतीमध्ये पाणीपुरवठ्याच्या सुविधा उपलब्ध झाल्यामुळे आणि भारतीय शेतीचे व्यापारीकरण घडून आल्याने इंग्लंडला कच्चा मालाचा तसेच अन्नधान्याचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर होऊ लागला.

खुल्या व्यापारी धोरणाचा भारतात अवलंब केल्यामुळे भारतीय व्यापारात वाढ झाली. कारण या धोरणामुळे इंग्लंडबरोबरच बेल्जीयम, ऑस्ट्रिया, जपान, जर्मनी इ. देशही भारतीय व्यापारात सहभागी झाले. १८७४ च्या

दरम्यान भारतातील सर्व निर्यात जकाती आणि १८८२ ते १८९४ या काळात संपूर्ण आयात-निर्यात जकाती रद्द केल्याने भारतीय परकीय व्यापारात दूरगामी परिवर्तन झाले.

सन १८५० नंतर भारतात कापड व ताग उदयोग सुरू झाले. त्यामुळे कापड व तागाच्या वस्तूंची निर्यात इतर देशांना होऊ लागली. युरोपियन लोकांनी भारतात गुंतवणूक करण्यास सुरूवात केली. याचवेळी युरोपातील इतर देश, संयुक्त संस्थाने आणि जपानही भारताच्या व्यापारामध्ये सहभागी झाले. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात दुष्काळी परिस्थिती,रूपयाचे घसरलेले मूल्य, जागतिक मंदी याचाही प्रभाव भारतीय व्यापारावर पडला.

सन १८६० नंतर भारताच्या निर्यातीत अफू, निळ, कापूस आणि कच्चे रेशीम या पूर्वीच्या वस्तूंबरोबरच फळधान्ये, चहा, ताग, चमडे आणि कातडे, तयार कापड यांचीही निर्यात होऊ लागली. त्याचबरोबर भारताच्या आयातीमध्ये ब्रिटनशिवाय इतर देशांच्या वस्तू भारतात येऊ लागल्या. ब्रिटनशिवाय सन १८५० नंतर भारतीय व्यापारात जपान, जर्मनी, इटली, ऑस्ट्रिया, बेल्जीअम, हंगेरी, ऑस्ट्रेलिया, संयुक्त संस्थाने (अमेरिका), स्पेन, फ्रान्स हे देशही सहभागी झाले.

पुढे २० व्या शतकात भारतीय व्यापारात आमुलाग्र बदल झाला. कारण पहिले महायुद्ध,त्यामुळे उत्पादनावर झालेला परिणाम,जागतिक महामंदी आणि भारतात उद्योगधंद्यांची उभारणी यामुळे भारतीय व्यापारात सतत चढउतार होत राहिले.

१९ व्या शतकात भारतीय व्यापाराची चार महत्त्वाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे होती.

१) १९ व्या शतकात विस्तारलेला अवलंबित व्यापार

२) प्राथमिक स्वरूपाच्या कृषिउत्पादनाची निर्यात

३) ब्रिटिश केंद्रीत व्यापार

४) जागतिक बाजारमूल्यांचा प्रभाव व बहुपक्षीय व्यापार.

सन १८६० पूर्वी भारतीय व्यापार बऱ्याच अंशी मर्यादित स्वरूपाचा आणि ब्रिटिशांच्या नियंत्रणाखाली होता. पण १८६० नंतर तो विस्तारित होऊ लागला, त्यामध्ये अनेक देश समाविष्ठ झाले. १९ व्या शतकात भारताच्या संपूर्ण व्यापाराची रचना आणि स्वरूप वेळोवेळी बदलले. म्हणजेच भारताचा आयात-निर्यात व्यापार कायमस्वरूपी स्थिर नव्हता, त्यात अस्थिरता होती. भारतातील निर्यात वस्तू या जवळपास परकीय बाजारपेठेतील मागणीवर अवलंबून होत्या. त्यामुळे भारतीय निर्यात वस्तूंच्या मूल्यात आणि संख्येत सतत चढउतार होत राहिले.

एकंदरीत भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप पाहता ब्रिटिश आगमनापूर्वी भारताचा असणारा व्यापार पुढे तसाच चालू राहिला. पण त्यामुळे गुणात्मक आणि संख्यात्मक बदल झाला. १९ व्या शतकात भारताची निर्यात ही नेहमी आयातीपेक्षा जास्तच होती. पण भारत एका परकीय राजवटीखाली असल्याने, भारताच्या व्यापाराच्या गतीची चक्रे एका दुसऱ्या देशाच्या हातात असल्याने भारताची निर्यात आयातीपेक्षा जास्त असताना म्हणजे भारताच्या बाजूने व्यापारशेष असताना भारत हा दरिद्री, अविकसित देशच राहिला. एकेकाळी निर्माता असणारा भारत दुसऱ्या देशांचा ग्राहक बनला.

**स्वयं- अध्ययन प्रश्न-१**

**अ) योग्य पर्याय लिहा**

१. ........ कायद्याने कंपनीची चहाची व चिनबरोबर व्यापार करण्याची मक्तेदारी संपुष्टात आणली.

अ) १८१३ चा चार्टर ॲक्ट  ब) १७७३ चा रेग्युलेटिंग ॲक्ट

क) १९०९ चा मोर्ले- मिंटो ॲक्ट  ड) १८३३ चा चार्टर ॲक्ट

२. ....... साली अमेरिकन यादवी युद्ध सुरू झाले.

अ) १८५०  ब) १८६१  क) १८६५  ड) १८७०

३. ..... साली सुएझ कालवा वाहतुकीसाठी खुला झाला.

अ) १८६९  ब) १८७९  क) १८६१  ड) १८५७

४. ॲडम स्मिथने .... ... हा ग्रंथ लिहिला.

अ) Poverty of India  ब) Wealth of Nations

क) Economics History of India  ड) Principle of poulations

५. ..... या काळात भारतातील संपूर्ण आयात-निर्यात जकाती रद्द केल्या.

अ) १८८२ ते १८९४  ब) १८५० ते १८५५

क) १८७२ ते १८८२  ड) १८८४ ते १८९२

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. कोणत्या कायद्याने कंपनीची भारतातील व्यापारी मक्तेदारी संपुष्टात आणली?

२. १९ व्या शतकात चीनला कोणती महत्त्वाची वस्तू भारतातून निर्यात होत होती?

३. ब्रिटीशांनी कोणाबरोबर दोन अफूची युद्धे केली?

४. अमेरिकन यादवी युद्ध कधी झाले?

### ४.२.२ वसाहतीक जकात धोरण :- Colonial Tariff Policy :

आयात -निर्यातीवरील कर म्हणजे जकात होय.(A tariff is a tax on Imports or Exports) जकात कर सरकारकडून देशी उद्योगांच्या संरक्षणाच्या हेतूने, व्यापार संतुलनाच्या हेतूने किंवा महसूल वाढीसाठी आयातीवर प्रसंगी निर्यातीवर आकारला जातो. (A tariff tax levied by a government on imports or occasionally exports for purpose of protection, support of the balance of payments or the rising of payments or the rising of revenue.) देशी उद्योगांसाठी एक महत्त्वाचा घटक म्हणून जकात धोरणाकडे पाहिले जाते. पण भारत हा इंग्लंडची वसाहत असल्यामुळे एकोणिसाव्या शतकातील भारताचे जकात धोरण हे भारतीयांच्या कल्याणाच्या दृष्टीने ठरविले गेले नसून ते इंग्लंडमधील उद्योगपतींच्या, लोकांच्या हिताच्या दृष्टीने ठरविण्यात आले.

भारतातील राजकर्ते उत्पन्न मिळविण्याच्या हेतूने भारताच्या परराष्ट्रीय व्यापारावर आणि देशांतर्गत व्यापारावर फार पूर्वीपासून जकाती आकारत होते. मुघल काळातही महसूलाचे एक साधन म्हणून २.५% ते ५% पर्यंत

वेगवेगळ्या मालावर जकाती आकारल्या जात. भारताचा परराष्ट्रीय व्यापार वाढविण्यासाठी काही भारतीय राज्यकर्त्यांनी व्यापारावरील तसेच वाहतुकीवरील जकाती माफ केलेल्या दिसून येतात. अंतर्गत आणि परराष्ट्रीय व्यापारावर मुघल राज्यकर्त्यांनी लावलेल्या जकातीचा वारसा १८ व्या शतकामध्ये ईस्ट इंडिया कंपनीला मिळाला.

व्यापार करणे आणि व्यापार - व्यवहारातून भरपूर नफा मिळविणे हा ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा प्रमुख हेतू होता. म्हणूनच ईस्ट इंडिया कंपनीने भारतीय राज्यकारभार आपल्या हाती घेतल्यानंतर आपल्या निर्यात व्यापाराला ज्यामुळे मदत होईल अशा भारतीय वस्तूंच्या उत्पादनाला कंपनी सुरूवातीला मदत करत होती. सुती आणि रेशमी कापडांच्या धाग्यांना आणि वस्तूंना इंग्लंडमध्ये किफायतशीर बाजारपेठा उपलब्ध होत्या. म्हणून या वस्तूंच्या उत्पादनाला आणि निर्यातीला ईस्ट इंडिया कंपनीने सुरूवातीला प्रोत्साहन दिले. पण अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडमध्ये लॅकेशायर व मँचेस्टर येथे सुती कापड उद्योग नव्याने विकसित होत होता. त्यामुळे भारतातील कापड उद्योगाला प्रोत्साहन देण्याच्या कंपनीच्या धोरणाला लॅकेशायर व मँचेस्टरमधील उद्योगपतींनी विरोध केला.त्यामुळे भारतातून इंग्लंडमध्ये येणाऱ्या कापडावर संरक्षक आयात जकाती बसविण्याचे आणि काही बाबतीत भारताकडून येणाऱ्या सुती कापडाच्या आयातीस बंदी घालण्याचे धोरण इंग्लंडने या काळात अवलंबिले.याचाच एक परिणाम म्हणजे भारताबरोबर व्यापार करण्याची ईस्ट इंडिया कंपनीची व्यापारी मक्तेदारी नष्ट केल्यावर (१८१३ आणि १८३३ चा चार्टर ॲक्ट) भारताशी व्यापार करण्यास सर्व इंग्रजांना स्वातंत्र्य देण्यात आले. १८१५ नंतर इंग्लंडमधील कारखानदारी वस्तूंची भारतात मुक्त आयात करण्यात येऊ लागली. अशा वस्तूंच्या भारतातील आयातीवर अल्पदराने आयात जकाती आकारण्यात येत असत. पण त्याचवेळी भारतातील सुती कापड व अन्य तयार उत्पादित वस्तूंवर इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणावर आयात जकाती आकारल्या जात होत्या. ज्या बऱ्याचवेळा उतपादन खर्चापेक्षाही जास्त होत्या. त्याचबरोबर भारतातून इंग्लंडमध्ये आयात केल्या जाणाऱ्या उत्पादित वस्तूंवर संरक्षक आयात जकाती आकारण्यात आल्या होत्या. तसेच काही वस्तूंच्या आयातीला बंदी घालण्यात आली होती. पण इंग्लंडच्या उद्योगधंद्यासाठी आवश्यक असणाऱ्या कच्च्या मालाच्या भारतातील निर्यातीला प्रोत्साहन दिले जात असत.

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीमुळे कारखानदारी वस्तूंचा उत्पादक या दृष्टीने इंग्लंडचे सामर्थ्य वाढू लागले. इंग्लंडने मोठ्या प्रमाणावर उत्पादनाची कारखानदारी पद्धत अवलंबिल्यामुळे उत्पादन खर्च कमी होऊन तयार वस्तू स्वस्त किंमतीला विकता येणे इंग्लंडला शक्य होऊ लागले.तसतशी इंग्लंडमधून खुल्या व्यापाराच्या धोरणाची मागणी केली जाऊ लागली. त्यापूर्वी म्हणजे अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात व्यापारविषयक संरक्षणाच्या धोरणाचा अंगिकार केला जाण्याची इंग्लंडला गरज होती.पण आता मात्र संरक्षणाचे धोरण अंगीकारण्याची इंग्लंडला गरज राहिली नाही. इंग्लंडचा व्यापारविषयक दृष्टिकोनात घडून आलेला हा बदल भारताच्या जकातविषयक धोरणात प्रतिबिंबित होऊ लागला. म्हणजेच भारताचे जकातविषयक धोरण इंग्लंडच्या व्यापारी व औद्योगिक हिताशी जोडले गेल्याने भारताचे जकातविषयक धोरण ठरविताना इंग्लंडच्या कल्याणाचा विचार केल्याचे प्रकर्षाने जाणवते.

कंपनीच्या काळात वेगवेगळ्या वस्तूनुसार जकातीचे दर वेगवेगळे होते. तसेच प्रदेशाभिन्नतेनुसारही त्याच्यामध्ये बदल होता. एकोणिसाव्या शतकाच्या सुरूवातीच्या वर्षामध्ये ७.५% दराने मुल्यानुसारी आयात

जकाती आकारल्या जात. चैनीच्या वस्तूंवरील जकातीचा दर १०% होता. तर अनेक निवडक वस्तूंवर ५% दराने जकाती आकारल्या जात. कंपनीच्या काळात ब्रिटनमधून भारतात आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर जकातकर इतर देशातून आयात केल्या जाणाऱ्या आयातशुल्काच्या तुलनेत जवळपास निम्म्या होत्या. म्हणजेच ब्रिटीश वस्तूंना पसंतीदर्शक वागणूक दिली जात होती. सन १८२५ मध्ये भारतात आयात करण्यात येत असलेल्या ब्रिटीश वस्तूंवर २.५ % आयातशुल्क आकारले जात तर काही ब्रिटिश वस्तूंना आयात शुल्कात सवलत दिली जात असे. यावेळी युरोप,अमेरिका किंवा इतर देशातून भारतात आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर ५% दराने आयात शुल्क आकारले जात असत. ज्या वस्तूंची वाहतूक परकीय म्हणजेच बिगर-ब्रिटिश जहाजातून केली जात असे अशा वस्तूंवरील जकातीचा दर सन १८११ मध्ये दुप्पट करण्यात आला. पण ज्या वस्तूंची वाहतूक ब्रिटिश जहाजातून केली जात असे अशा वस्तूंच्या बाबतीत अल्प दरानेच जकाती आकारल्या जात होत्या.त्याचबरोबर भारताचा किनाऱ्यावरील व्यापार करण्यास बिगर- ब्रिटिश जहाजाना प्रतिबंध करण्यात आला. सन १८४६ च्या सुधारणेपूर्वी प्रत्येक प्रांतात जकातीचे वेगवेगळे दर अस्तित्वात होते. म्हणजेच त्यांच्यात एकसूत्रता नव्हती. तसेच १८१४ नंतर भेदात्मक धोरणामुळे इतर युरोपियन देशाबरोबरचा भारताचा व्यापार कमी झाला होता. सन १८४६ मध्ये, कंपनीच्या कोर्ट ऑफ डायरेक्टर्सने (court of Directors) भारत सरकारला जकात खात्याची संस्थात्मक सुधारणा करण्याचे सुचविले तसेच त्यानंतर खालील तीन तत्वे निर्धारित करण्याची शिफारस केली.

१) निळ वगळता भारतीय वस्तूंवरील निर्यात जकाती माफ कराव्यात.

२) बिगर- ब्रिटिश जहाजाबाबतचा भेदभाव नष्ट करावा. म्हणजेच बिगर- ब्रिटिश जहाजावर दुप्पट जकात आकारणी करू नये.

३) संपूर्ण भारतासाठी जकात धोरण प्रमाणबद्ध करावे. तसेच कोर्ट ऑफ डायरेक्टर्सनी भारतातील संपूर्ण अंतर्गत जकात कर माफ करण्याची शिफारसही केली.

सन १८३३ ते १८४४ या कालावधीत केवळ महसूल मिळविण्याच्या हेतूने आयात-निर्यात जकातीची अल्प दराने आकारणी सुरू ठेवण्यात आली. १८३३ ते १८५३ या काळात कंपनी सरकारने वेळोवेळी व्यापारी धोरण ठरविण्यासाठी आणि जकातविषयक निश्चित धोरणासाठी वेगवेगळे कायदे पास केले.

सन १८५२ मध्ये खालील महत्त्वाच्या वस्तूंवर वेगवेगळ्या दराने आयात शुल्क होते.

सन १८५९ पूर्वी म्हणजे कंपनीच्या काळात भारतातील वेगवेगळ्या प्रांतात जकातीमध्ये भिन्नता असलेली दिसून येते. पण प्रत्यक्ष ब्रिटिश राजमध्ये भारतात जकाती धोरणात एकसुत्रीपणा आणण्यात आला. सन १८५७ नंतर भारताच्या जकाती धोरणाचा दुसरा टप्पा सुरू होतो.

**१८५७ नंतरचे जकात धोरण :**

१८५७ चा उठाव मोडून काढण्यासाठी आणि भारतात अधिक ब्रिटिश सैन्य ठेवण्यासाठी फार मोठा खर्च झाल्याने तो खर्च भरून काढण्यासाठी अधिक महसूल मिळविणे गरजेचे होते. त्यामुळे जकातीमध्ये वाढ करण्यात आली. सन १८५९ पूर्वी, ब्रिटिशमालावर आयातकर सर्वसाधारणपणे ५%होता. तसेच तो ब्रिटिश कापडाच्या गाठी आणि सुतावर २.५% होता. बिगर-ब्रिटिश वस्तूंवर हा आयातकर ब्रिटिश वस्तूंच्या दुप्पट होता. पण सन

१८५७ नंतरच्या बिकट आर्थिक परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आतापर्यंत अवलंबिण्यात आलेले विभेदकारी धोरण रद्द केले गेले. चैनीच्या बऱ्याच वस्तूंवर मुल्यानुसारी २०% आयात जकात आकारण्यात आली. सुती कापडाच्या तागांसारख्या वस्तूंवर १०% दराने आयात जकात आकारण्यात आली. पण कच्चा कापूस, सोने, चांदी, बहुतेक प्रकारची यंत्रसामुग्री या वस्तूंवर मात्र कोणत्याही आयात जकाती आकारण्यात आल्या नाहीत.

निर्यात जकातीमध्ये मात्र फारसे बदल करण्यात आले नाहीत. याला अपवाद म्हणजे, अन्नाधान्यावरील निर्यात जकात दर मणाला १/२ आण्यावरून दर मणाला २ आण्यापर्यंत वाढविण्यात आली. पण रेशीम आणि तंबाखू या वस्तूंच्या बाबतीत निर्यात जकाती माफ करण्यात आल्या. १८५९ च्या या जकात कायद्याने कलकत्ता,मद्रास व मुंबई येथे निरनिराळ्या दरांनी जकाती आकारण्याऐवजी या सर्व ठिकाणी म्हणजे संपूर्ण भारतभर जकातीचे दर समान करण्यात आले.

आयात जकातीतील वाढीमुळे इंग्लंडहून भारतात येणाऱ्या सुती कापडांच्या ताग्यांची/ धाग्यांची आयात घटू लागली. आयात जकातीत वाढ केल्याने ब्रिटिश कापड उत्पादकांनी भारत सरकारच्या आयात जकात वाढीच्या धोरणावर टिका केली. तसेच याविरोधी इंग्लंडमध्ये चळवळ सुरू केली.या इंग्लंडमधील उत्पादक टिकाकारांनी असे प्रतिपादन केले की, भारतात सुती कापड उद्योग विकसित होत असताना इंग्लंडहून भारतात आयात केल्या जाणाऱ्या सुती कापडांच्या धाग्यांवर उच्च दराने आयात- जकाती आकारल्यामुळे इंग्लंडच्या दृष्टीने अनिष्ठ स्पर्धा निर्माण होईल. या परिस्थितीत भारत सरकारने सन १८६० मध्ये, जकातीमध्ये थोडा बदल करून चैनीच्या वस्तू, कापडाच्या गाठी,व सुतासहित सर्व मालावर १०% आयात जकाती आकारल्या. यामध्ये दारू,बिअर, उत्तेजीत द्रव्य आणि तंबाखू यांच्यावर मात्र वेगळी आयात जकाती होती. पण सोरा (sultpetre) या वस्तूवरील निर्यात जकात मात्र वाढविण्यात आली. कारण सोरा या वस्तूच्या बाबतीत परकीय बाजारपेठांमध्ये भारताची मक्तेदारी होती. तसेच आयात जकाती कमी केल्यामुळे झालेले आर्थिक नुकसान भरून काढावयाचे होते. या आयात-निर्यात जकात वाढीमुळे १८६०-६१ मध्ये सरकारच्या महसूल उत्पादनात १०% वाढ झाली.

याचवेळी सुती कापडावर असलेल्या जास्त आयात जकातीमुळे लॅंकेशायरमधील उत्पादकांनी सुती कापडावरील आयात जकातीत बदल करण्यासाठी लंडनमधील भारतमंत्र्यावर सतत दबाव आणण्यास सुरूवात केली.कारण या आयात- जकातीमुळे भारतीय सुती कापड उद्योगाला काही अंशी संरक्षण मिळत होते. त्यामुळे लवकरच भारत सरकारने आयात जकातीमध्ये बदल केला. सन १८६१ मध्ये सुती कापडाच्या धाग्यावर व सुतावरील आयात जकात १०% वरून ५% आणि १८६२ मध्ये ती ३.५ % करण्यात आली. सुती कापडाच्या धाग्यावरील व सुतावरील आयात शुल्क कमी केल्यामुळे उत्पन्नात जी घट घडून आली ती भरून काढण्यासाठी मिठावरील जकात वाढविण्यात आली. १८६३ मध्ये, लोखंड उत्पादनांना वेगळे करून त्यावरील आयात कर कमी केला.१८६४ मध्ये, इतर वस्तूंवरील आयात शुल्क ७.५% कमी केले. १८६७ मध्ये, मशिनरी वस्तूंना मुक्त यादीत घातल्याने त्यावरील आयात शुल्क माफ झाले. सन १८७१ च्या जकात (tariff) कायद्याने त्यावर शिक्कामोर्तब केले.

सन १८७४ मध्ये, भारत सरकारने जकात धोरण मूल्यमापनासाठी एक समिती नेमली पण या समितीच्या शिफारशीवर लॅंकेशायरमधील उत्पादक नाराज होते. सन १८७५ ला भारत सरकारने नवा जकात कायदा (Tariff

Act 1875)पास करून जकात धोरणातील महत्वांच्या तत्वांचे निर्धारण केले. या कायद्याने तांदूळ,नीळ आणि लाख या वस्तूंशिवाय इतर वस्तूंवरील निर्यात जकाती माफ केल्या. या काळात राज्यसचिव लॉर्ड सैलिसबरीने व्हाईसरॉय लॉर्ड नॉर्थब्रुकवर दबाव टाकून आयात धोरणात बदल करण्याची शिफारस केली. पण नॉर्थब्रुकने त्यास फारसे महत्व दिले नाही.लॅकेशायरच्या उद्योगपतींना भारतात स्थापन होत असलेल्या सुती कापडगिरण्यांविषयी मत्सर वाटत होता. त्यामुळेच भारतात सुती कापडावर लावलेल्या आयात जकातीवर ह्या उद्योगपतींची टिका होत होती. इंग्लंडमधील पुराणमतवादी पक्षाला लॅकेशायर, मँचेस्टरचे मतदाता हे अतिशय महत्वपूर्ण होते. म्हणून ब्रिटिश सरकारने ११ जुलै १८७७ मध्ये सभागृहात एक ठराव मांडला की, ''ह्या सभागृहाच्या मते, भारतात सुती मालाच्या आयातीवर लावण्यात आलेले शुल्क संरक्षणात्मक असले तरी चांगल्या वाणिज्य धोरणाविरूद्ध आहे. आणि भारताची आर्थिक परिस्थिती पाहून हे शुल्क शिघ्रातीशिघ्र समाप्त केले पाहिजे.'' हा ठराव राज्यसचिव सॅलिसबरीने भारत सरकारकडे पाठविला आणि सुती कापडावरील आयात शुल्क समाप्त करावयास सांगितले. दुष्काळामुळे भारताची परिस्थिती हालाखीची झाली असतानाही लॉर्ड लिटनने साखर, विशिष्ट प्रकारचे कापड, इ. २९ वस्तूंवरील आयात जकाती हटविल्या.लिटनच्या ह्या निर्णयाला व्हाईसरॉय कौन्सिलच्या सर्व सदस्यांनी विरोध केला होता. परंतु लॅकेशायर, मँचेस्टरमधील व्यापारी मंडळ अद्यापही खूश नव्हते. कारण किंमतीच्या आधारावर लावलेले ५% आयात शुल्कही हटविण्यात यावे अशी त्यांची मागणी होती. त्याला लॉर्ड लिटनने तत्त्वतः मान्यता दिली. पण भारतातील आर्थिक संकट समाप्त होईपर्यंत थांबण्याची सूचना केली. सन १८७९ मध्ये, विदेशी कापडावरील शुल्क समाप्त करण्यात आले.त्यासाठी आपल्या कौन्सिलच्या बहुमताला बाजूला सारण्याकरिता लॉर्ड लिटनला आपल्या घटनात्मक अधिकाराचा वापर करावा लागला.

सन १८८० च्या काळात इंग्लंडने खुल्या व्यापाराचे धोरण अवलंबिले होते. त्यामुळे जगभरात खुल्या व्यापार धोरणाचे पडसाद उमटत होते, ॲडम स्मिथने १७७६ मध्ये, प्रकाशित झालेल्या आपल्या 'Wealth of Nations या ग्रंथात व्यापारासंबंधीच्या संरक्षक धोरणावर टिका करताना खुल्या व्यापारी धोरणाचा पुरस्कार केला. खुल्या व्यापाराचे धोरण म्हणजे परदेशातून आयात होणाऱ्या मालावर बंधने व जकाती न लादणे, तसेच देशातून निर्यात होणाऱ्या वस्तूंवरही जकाती न लादणे. थोडक्यात आयात निर्यातीमध्ये कोणतेही अडथळे निर्माण न करणे होय.

खुल्या व्यापाराचे धोरण इंग्लंडच्या तत्कालीन परिस्थितीचा विचार करता योग्यच होते.कारण वाढत्या उद्योगधंद्यांना बाजारपेठ व स्वस्त कच्चा मालाची गरज होती. इंग्लंडच्या या गरजा खुल्या व्यापारानेच भागण्याजोग्या होत्या. पण इतर अविकसित देशांना या खुल्या व्यापाराच्या धोरणामुळे फायद्यापेक्षा तोटाच जास्त होण्याचा धोका होता.

फ्रेडरिक लिस्ट (Friedric List) या जर्मन आर्थिक विचारवंताने सन १८४१ मध्ये, "Das National System der politischen" हा ग्रंथ लिहिला. त्यामध्ये लिस्टने खुल्या व्यापारी धोरणावर टीका करून संरक्षणाच्या धोरणाचा जोरदार पुरस्कार केला. लिस्टच्या मते, समान आर्थिक पातळीवर असणाऱ्या राष्ट्रांना मुक्त व्यापार फायदेशीर ठरतो. परंतु मुक्त व्यापारी धोरणामुळे मागासलेल्या देशांना नेहमी तोटा होतो. व प्रगत देशांना भरपूर फायदा होतो.परिणामी मागासलेल्या देशांच्या विकासावर प्रतिकूल परिणाम होतो. म्हणजे लिस्टने मागासलेल्या

किंवा अविकसित देशांबाबत संरक्षणाच्या धोरणाचा अवलंब केला जावा असे मत मांडले. म्हणजेच तो म्हणतो,बाल्यावस्थेतील उद्योगधंदे स्पर्धेत टिकू शकतील. लिस्टच्या मते,प्रत्येक राष्ट्राने आपल्या आर्थिक परिस्थितीचा व प्रश्नांचा आढावा घेऊन स्वतंत्र आर्थिक धोरण स्विकारावे जेणेकरून त्यांचा आर्थिक विकास होईल.

पण इंग्लंडने १८८० च्या दशकात भारतात खुल्या व्यापाराच्या धोरणाचा अवलंब केला.कारण भारतातील व्यापारी धोरण हे इंग्लंडच्या कल्याणाचा विचार करून ठरविले जात असत. कारण भारत हा इंग्लंडची वसाहत होता. इंग्लंडमधील उत्पादक भारतातील आयात जकातीच्या धोरणावर नाराज होते. त्यांनी खुल्या व्यापाराच्या धोरणाचा भारत सरकारने अवलंब करावा यासाठी वेळोवेळी भारत सरकारवर दबाव टाकला. याचाच एक भाग म्हणून सन १८७९ मध्ये उच्च दर्जाच्या सुती धाग्यासहित संपूर्ण सुती कापडाच्या वस्तूवरील आयात जकातीत सूट देण्यात आली.सन १८८० मध्ये तांदळावरील निर्यात जकाती वगळता इतर सर्व निर्यात जकाती रद्द केल्या.

खुल्या व्यापारी धोरणाच्या प्रभावामुळे सन १८८२ मध्ये,दारू, अफू व मीठ या वस्तूंवरील आयात जकाती वगळता इतर सर्व वस्तूवरील आयात जकाती माफ केल्या. आणि १८८२ मध्ये भारत सरकारने भारतीय अर्थव्यवस्थेत खुल्या व्यापारी धोरणाचा तसेच निर्हस्तक्षेपाच्या धोरणाचा (Laissez-faire pollicy) अवलंब केला. सरकारने अर्थव्यवहारात हस्तक्षेप न करणे म्हणजेच अलिप्ततेचे किंवा निर्हस्तक्षेपाचे धोरण होय. म्हणजेच सरकारने लोकांच्या व्यवहारात हस्तक्षेप करू नये. कारण अर्थव्यवस्थेतील बदल हे आपोआप होत असतात. भारत सरकारने सन १८८२ ते१८९४ पर्यंत म्हणजे जवळपास १२ वर्षे निर्हस्तक्षेप धोरणाचा अलवंब केला. सन १८८८ मध्ये फक्त पेट्रोलियम पदार्थाचा अपवाद वगळता या १२ वर्षात सरकारने जकातीत कोणताच बदल केला नाही. म्हणजेच भारतावर खुल्या व्यापाराचे धोरण लादण्यात इंग्लंडला यश आले. या जकात माफ धोरणामुळे, भारतीय महसुलातील जकात शुल्काचा सहभाग सन १८६०-६१ मध्ये ९.७% होता. तो १८८० च्या दशकात १.५% पर्यंत घसरला.

दरम्यान, सन १८९४ मध्ये सरकारचा लष्करावर वाढलेला खर्च, प्लेगच्या साथी आणि रूपयाचे घसरलेले मूल्य, यामुळे सरकारला तुटीच्या अंदाजपत्रकाला सामोरे जावे लागले. सन १८९३ पासूनच आयात जकाती आकारण्याशिवाय सरकारला पर्याय उरला नव्हता. अशी परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे प्रथम डिसेंबर १८९४ मध्ये, जकात कायदा (Tariff Act) करून भारत सरकारने सुती कापड धागा व सुत आणि इतर मशिनरी वस्तू वगळून इतर आयात वस्तूंवर ५ %आयात जकाती बसविल्या. नंतर लगेच सुती कापडी धागा आणि गाठीवरही (सूत) ५% आयात जकाती आकारल्या. त्याचबरोबरच भारतीय सुती धाग्यावरही प्रतितोलनात्मक ५% अबकारी कर (Excise Tax) आकारण्यात आला.पण लॅकेशायर व मँचेस्टरमधील उत्पादकांच्या सतत दबावामुळे व्हाईसरॉयच्या सल्लागार मंडळाने सन १८९६ मध्ये, Cotton Duties Act पास करून सुती धाग्यावरील आयात जकाती माफ केल्या. आणि विणलेल्या यंत्रावरील वस्तूंवर ३.५% आयात जकाती आकारल्या.

ज्यावेळी भारतीय आधुनिक उद्योग विस्तारले जात होते. त्यावेळी सरकारने प्रतितोलनात्मक अबकारी करामध्ये वाढ केली की, जो विनाकष्ट (easier) गोळा केला जात होता. १८९४ ते १८९६ या काळात त्यात प्रकर्षाने वाढ केली. १९१०-११ मध्ये,अबकारी कर हा संपूर्ण वसूल झालेल्या कराच्या ८.७% होता. तर त्यावेळी जकात (tariff) ८.२% होती. यावरून असे स्पष्ट होते की, भारत सरकारचे १९ व्या शतकापर्यंतचे जकातविषयक

धोरण भारतीय उद्योगांना प्रेरणा व चालना देण्याच्या हेतूने प्रभावित झाले नव्हते तर ते ब्रिटिशांचे हितसंबंध जपण्याच्या हेतूने प्रभावित झाले होते.

पुढे विसाव्या शतकात जकातविषयक धोरणात १९ व्या शतकाच्या तुलनेत विरोधी दिशेने होणाऱ्या वाटचालीची चिन्हे दिसू लागली. कारण भारतामध्ये ब्रिटनबरोबरच इतर देशही व्यापारामध्ये मोठ्याप्रमाणावर सहभागी झाले. याचा प्रभाव जकातविषयक धोरणावर पडला. पुढे तर भारतीय उद्योगांना संरक्षण देण्यासाठी संरक्षक जकातीचे धोरण अवलंबिण्यात आले.

थोडक्यात औद्योगिकीकरणातून पुढे येत असलेल्या इंग्लंडच्या उद्योगपतींना भारतीय बाजारपेठेवर कब्जा करण्यासाठी मदत करणे ही या जकात धोरणाच्या पाठीमागील व्यापारनिती होती. या जकातविरोधी धोरणामुळे भारत औद्योगिकदृष्ट्या पाठीमागे राहत आहे म्हणून रोमेशचंद दत्त, मदनमोहन मालवीय यांनी या जाचक जकात धोरणाला विरोध केला. ब्रिटिश सरकारने या जकात धोरणाला एवढे महत्व का दिले ? याचे पहिले कारण म्हणजे इंग्लंडच्या भारतातील व्यापारी हितामुळे आपणास हवे तसे जकात धोरण ठरविण्यासाठी इंग्लंडमधून राजकीय दबाव टाकण्यात येत होता. दुसरे म्हणजे भारत ही ब्रिटिशांची हक्काची बाजारपेठ होती. जिथे इंग्रज हे निरंकुश होते. तिसरे म्हणजे २० व्या शतकाच्या सुरूवातीपर्यंत इंग्लंडचा भारताशी जवळपास ६०% व्यापार चालत होता.

देशी उद्योगासाठी एक महत्वाचा घटक म्हणून जकात धोरण महत्वाचे होते. पण भारत हा ब्रिटिशांची एक वसाहत असल्यामुळे जकातीचे धोरण ठरविताना भारतीय हिताचा विचार केला नाही, तर इंग्लंडमधील लोकांच्या विशेषकरून उद्योगपतींच्या हिताच्या दृष्टीने भारतीय जकात धोरण ठरविले गेले. म्हणजेच ब्रिटिश वस्तूंच्या आयातीला प्रोत्साहन देणे आणि महसूल वाढीसाठी एक घटक म्हणून भारत सरकारने जकात धोरणाकडे पाहिले. त्यामुळे खुल्या व्यापारी धोरणाचा अवलंब करून ब्रिटिश वस्तूंच्या आयातीला प्रोत्साहन दिले. त्यामुळे भारतीय हस्तोद्योगांचा ऱ्हास झाला आणि भारत हा दरिद्री देश बनला.

**स्वयं अध्ययनसाठी प्रश्न- २**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. सन १८२५ मध्ये भारतात आयात करण्यात येत असलेल्या ब्रिटिश वस्तुवर ....... टक्के आयात शुल्क आकारण्यात येत होते.

अ) ५% ब) १०% क) २.५% ड) ७%

२. खुल्या व्यापारी धोरणाचा पुरस्कार ....... ने केला.

अ) ॲडम स्मिथ ब) फेडरिक लिस्ट क) दादाभाई नौरोजी ड) रोमेश दत्त

३. खुल्या व्यापारी धोरणावर धोरणावर ....... ने टीका केली.

अ) ॲडम स्मिथ ब) लॉर्ड लिटन क) फेडरिक लिस्ट ड) सॅलिसबॅरी

४. सन १८४६ साली कंपनीच्या ....... नी भारत सरकारला जकात खात्याची संस्थात्मक सुधारणा करण्याचे सुचविले.

अ) कोर्ट ऑफ डायरेक्टर्स ब) कोर्ट ऑफ प्रोपरायटर्स क) कंपनीचे भागधारक ड) सेवक

५. सन १८५७ नंतर आयात जकात ....... आली.

अ) कमी करण्यात ब) वाढविण्यात क) नष्ट करण्यात ड) सॅलिसबॅरी

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१. फेडरिक लिस्टने कोणता ग्रंथ लिहिला ?

२. कोणत्या कायद्याने संपूर्ण भारतभर जकातीचे दर समान केले ?

३. सन १८९६ मध्ये Cotton duties Act पास करून भारत सरकारने कोणत्या मालावरील आयात जकाती माफ केल्या ?

### ४.२.३ अ) संपत्तीचे द्रव्यापहरण/ वहन किंवा आर्थिक नि:सारण ( Drain of Wealth)

व्यापाराच्या निमित्ताने भारतात आलेल्या ईस्ट इंडिया कंपनीने भारतात ब्रिटीश साम्राज्याचा पाया घातला. ब्रिटिशांनी भारतावर आपली राजकीय सत्ता स्थापन केल्यावर भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात आमुलाग्र बदल घडून आले, त्यामुळे भारतीय समाज सर्वांगाने ढवळून निघाला. ब्रिटीश राजवटीमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामांपैकी संपत्तीचे वहन किंवा आर्थिक नि:सारण हा एक महत्त्वाचा भारतीय अर्थव्यवस्थेला प्रभावित करणारा परिणाम होता. ब्रिटिश शासन आपले शोषण करीत आहे. आपली संपत्ती वेगवेगळ्या मार्गांनी इंग्लंडला नेत आहे. असा विचार भारतीयांच्या मनात येऊ लागला. भारताचे दारिद्र्य, दु:ख, दैन्य याला सर्वस्वी ब्रिटिश राजवट जबाबदार आहे असा मतप्रवाह भारतामध्ये निर्माण झाला. या मतप्रवाहातूनच आर्थिक नि:सारणाचा किंवा संपत्ती वहनाचा सिद्धांत मांडला जाऊ लागला.

या परिस्थितीकडे सर्वप्रथम लक्ष वेधून दादाभाई नौरोजी यांनी प्रथमत: आर्थिक नि:सारणाचा सिद्धांत सन १८६७ मध्ये Poverty of India व नंतर १९०१ मध्ये प्रकाशित झालेल्या Poverty and Un-British Rule in India या ग्रंथात सविस्तरपणे मांडला. त्यानंतर रोमेशचंद्र दत्त, न्या. रानडे, ना. गोखले, विल्यम डिग्बी, एस. एन. बॅनर्जी, जी. व्ही. जोशी, लाला लजपतराय, वाय. एस. पंडित, एस. बी. सॉल, तपन मुखर्जी, इरफान हबीब यांनी आपापल्या शैलीत संपत्तीवहनाचे विवेचन केले. संपत्ती वहन सिद्धांतालाच द्रव्यापहरण, आर्थिक नि:सारण किंवा संपत्तीचे अपहरण ( Drain of Wealth ) म्हणून ओळखले जाते.

**आर्थिक नि:सारण किंवा संपत्तीचे अपहरणाची संकल्पना :**

भारतातून इंग्लंडकडे होणारे संपत्तीचे हस्तांतरण, भारतातून इंग्लंडकडे जाणारा साधनसंपत्तीचा ओघ आणि त्या मोबदल्यात कोणताही भौतिक परतावा भारताला न मिळणे म्हणजेच संपत्तीचे अपहरण किंवा आर्थिक नि:सारण होय. ( Drain of Wealth) थोडक्यात, भारतातून इंग्लंडला वेगवेगळ्या मार्गांनी संपत्ती पाठविली गेली. त्या बदल्यात भारताला कोणताही मोबदला मिळाला नाही. हा एकमार्गी संपत्तीचा प्रवाह म्हणजेच आर्थिक नि:सारण किंवा संपत्तीचे वहन होय. एकंदरीत भारतातून वेगवेगळ्या मार्गांनी इंग्लंडला संपत्तीचे वहन होत होते. त्याचा भारताला कोणत्याही प्रकारचा लाभ होत नव्हता. [According to the Economic Drain Theory

there is t Countinous flow of wealth from one nation to another without any returns, be it material or money, to the nation which is being drained.]

दादाभाई नौरोजींनी ब्रिटीशांनी भारतातून शोषून नेलेल्या संपत्तीची तुलना पाण्याच्या निःस्सारणाशी केली, म्हणजेच दादाभाई नौरोजींच्या मते, एका ठिकाणचे पाणी जसे दुसऱ्या ठिकाणी पाटाच्या सहाय्याने नेले जाते. त्याप्रमाणे ब्रिटिशांनी भारताची संपत्ती इंग्लंडकडे वाहून नेली. ही संपत्ती ब्रिटिशांनी हेतु पुरस्कर वेगवेगळ्या मार्गांनी इंग्लंडला नेली. त्यामुळे एकेकाळचा संपन्न भारत दरिद्र्याच्या खाईत लोटला गेला.

दादाभाई नारोजींनी आपल्या ग्रंथात आर्थिक निः स्सारण सिद्धांताची चिकित्सा करून त्याची कारणमीमासा देण्याचा प्रयत्न केला. तसेच आर्थिक निः स्सारणामुळे भारताची किती संपत्ती इंग्लंडकडे गेली यासंबंधी अंदाज बांधला असून या आर्थिक निः सारणाच्या परिणामांचे विश्लेषण केले आहे. दादाभाई नौरोजींच्या मते, ब्रिटिशांनी विविध मार्गांनी भारतातून संपत्ती, भांडवल इंग्लंडमध्ये नेऊन भारताच्या विकासात अडथळे निर्माण केले. भारत भांडवलाच्या उपलब्धतेबाबत दरिद्री बनला व त्यामुळे भारताचा विकास खुंटला. ब्रिटीशांनी फक्त स्वतःच्या फायद्यासाठी भारताचा उपयोग करून घेतला. त्यांनी भारताचा विकास व्हावा यादृष्टीने फारसे प्रयत्न केले नाहीत. केवळ व्यापारी दृष्टीकोनातून व आपल्या हक्काची बाजारपेठ म्हणून इंग्रजांनी भारताचा उपयोग करून घेतला. भारतातून कच्चा माल अतिशय कमी किंमतीला खरेदी करून तो इंग्लंडमधील उद्योगांना पुरविणे व तयार झालेला पक्का माल भारतात आणून तो भरमसाठ किंमतीला विकणे असे धोरण ब्रिटीशांनी राबविले. त्यामुळे भारतीय संपत्तीचे हस्तांतरण इंग्लंडला झाले. भारतातील उद्योगधंदे नष्ट झाले व एकेकाळचा समृद्ध देश दरिद्री बनला.

भारतातील बरीचशी साधनसंपत्ती ब्रिटीशांनी वाहून नेली असली तरी त्या मोबदल्यात भारताला कोणताही आर्थिक किंवा भौतिक लाभ झाला नाही. भारतातील पूर्वीच्या राज्यकर्त्यांपैकी अगदी निष्ठूर राज्यकर्त्यांनीही प्रजेकडून उकळलेला महसूल या देशातच खर्च केला होता. कालवे, हमरस्ते, महाल, मंदिरे,मशिदी, युद्ध व मुलुखगिरी यावर किंवा अगदी व्यक्तीगत ऐषोआराम यावर हा महसूल खर्च केला असला तरी त्यामुळे अखेरीस भारतीय व्यापार व उद्योगानांच उत्तेजन मिळाले आणि भारतीयांनाच रोजगार मिळाला. मुघलांसारख्या परकीय राज्यकर्त्यांच्या बाबतीतही ही बाब खरी होती, कारण भारत काबीज केल्यांनतर ते अल्पावधीतच येथे स्थायिक झाले आणि भारतालाच त्यांनी आपली मातृभूमी मानली. याउलट ब्रिटीश राज्यकर्ते मात्र कायम परकीयच राहिले. भारतामध्ये काम किंवा व्यापार करणारे इंग्रज नेहमीच इंग्लंडमध्ये परत जाण्याचा विचार करीत. त्यांनी भारताला कधीच आपली भूमी मानली नाही. याकाळात भारत सरकारवर परकीय इंग्लंडच्या सरकारचे नियंत्रण होते.फलस्वरूप भारतीय लोकांवर आकारलेला कर व उत्पन्नाचा फार मोठा भाग त्यांनी भारतात नव्हे तर इंग्लंडमध्ये खर्च केला. परिणामतः भारताची संपत्ती हस्तांतरित झाली.

प्लासीच्या लढाईपूर्वीच्या ५० वर्षात भारतातील आयात-निर्यात व्यापारात संतुलन राखण्यासाठी कंपनीने जवळजवळ २ कोटी पौंड किंमतीचे सोने-चांदी भारतात आयात केले होते. पण इंग्लंडच्या मुत्सद्यांनी, आर्थिक तज्ञांनी यावर जोरदार टीका केली. इंग्लंडनेही भारतातून येणारा माल कमी व्हावा यासाठी अनेक कायदे करून भारतीय मालावर निर्बंध लावले. सन १७२० मध्ये तर इंग्लंडच्या संसदेने कायदा करून इंग्लंडमध्ये भारतीय रेशमी व सुती कापड वापरण्यावर दंड आकारला.

प्लासीच्या लढाईनंतर (इ.स. १७५७) भारतीय व्यापाराची स्थिती पूर्णत: बदलली. जसजसा भारतीय प्रदेश कंपनीच्या वर्चस्वाखाली येऊ लागला. तसे तेथील अतिरिक्त राजस्व कंपनीच्या हातात येऊ लागले. राजकीय सत्ताप्राप्तीमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेवर इंग्लंडचा एकाधीकार प्रस्थापित होऊन भारतातून संपत्तीचा प्रवाह इंग्लंडकडे वाहणे सुरू झाले. संपत्तीच्या या प्रवाहाने एक वेगळे स्वरूप धारण केले. जमीन महसूलातून मिळणारा नफा, भारतीय बाजारपेठेवरील एकाधिकारामुळे मिळणारा नफा, ब्रिटीश लष्करी व मुलकी अधिकाऱ्यांना असलेले अतिरिक्त वेतन, आणि कंपनीच्या अधिकाऱ्यांनी भारतात अप्रत्यक्ष मिळविलेला पैसा या वेगवेगळ्या मार्गांनी कंपनीकडे प्रचंड पैसा येऊ लागला.

या अतिरिक्त पैशातून कंपनी निर्यात करण्यायोग्य माल खरेदी करून तो युरोपियन बाजारपेठेत विकला जाई व या व्यापारातील शेवटचा वाढावा इंग्लंडमध्येच संचय होत. त्या बदल्यात भारताला काहीच मिळत नव्हते. ही व्यवस्था सन १८१३ च्या चॉर्टर ॲक्टने समाप्त झाल्यानंतर संपत्तीच्या या प्रवाहाने फलहिन (Unrequired) निर्यातीचे रूप धारण केले. काही वर्षाचा अपवाद वगळता भारताचा इंग्लंडबरोबर द्वितीय महायुद्धापर्यंतचा व्यापार असंतुलीत होता. तसेच या काळात भारताच्या परकीय व्यापारात आयातीपेक्षा जास्त होणाऱ्या निर्यातीच्या माध्यमातून भारतीय संपत्तीचे वहन होत होते. ह्या द्रव्यापहरणातील किंवा आर्थिक नि:सारणातील मुख्य तत्व म्हणजे भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा थोडाही अंश येथील जनतेच्या उपयोगासाठी या भांडवलनिर्मितीसाठी उपलब्ध होत नव्हता. कारण संपत्तीचा प्रवाह सातत्याने राजकीय कारणांनी इंग्लंडकडे वाहत होता. दादाभाई नौरोजींच्या मते, भारतातील ब्रिटीश अधिकाऱ्यांचे वेतन व निवृत्तीवेतन आणि या व्यतिरिक्त वेगवेगळ्या मार्गांनी युरोपियांनी मायदेशात पाठविलेला पैसा या दोन मार्गांनी भारतीय संपत्तीचा ओघ इंग्लंडकडे वहात होता. त्यामुळेच भारतीय लोकांना दारिद्र्याच्या दृष्टचक्रात ढकलले जात होते.

**आर्थिक नि:सारणाचे किंवा द्रव्यापहरणाचे मार्ग :**

**(Sources of Economic Drain or Drain of Wealth)**

ब्रिटीशांनी भारतातील आपल्या राजवटीत भारताची वेगवेगळ्या मार्गाने अमाफ लूट केली. ब्रिटीश भारतात व्यापारी म्हणून आले व भारतीय राज्यकर्ते बनले. व्यापारी धोरणाचा अवलंब करून ब्रिटीशांनी भारताचा एक साधन म्हणून वापर करून इंग्लंडला संपन्न केले. साम्राज्यवादी शासकांनी भारताची पिळवणूक करण्याचे वेगवेगळे मार्ग शोधून काढले. इ.स. १७५७ मध्ये कंपनीच्या सेवकांनी भारतीय राजे, संस्थानिक, जमिनदार, व्यापारी, जनसामान्य यांच्याकडून उकळलेली भलीमोठी संपत्ती इंग्लंडमध्ये नेण्यास सुरूवात केली. तेव्हापासून भारतीय संपत्तीचे वहन सुरू झाले. खालील मार्गांनी भारतातील संपत्तीचे निःसारण होत असल्याचे दिसून येते.

**१) गृहखर्च (Home Charges)**

गृहखर्च हा भारताच्या आर्थिक शोषणाचा मुख्य मार्ग होता. त्यामध्ये ब्रिटीश अधिकीऱ्यांचे वेतन व निवृत्तीवेतन, भारतातील ब्रिटीश सैन्यावरील खर्च, ब्रिटीश भांडवलावरील लाभांश आणि भारतमंत्र्यांच्या ऑफीसवर किंवा भारतमंत्र्याने इंग्लंडमध्ये केलेला खर्च यांचा समावेश होतो. त्यानंतर १८३७ ते १९०१ या काळात

गृहखर्चाची आकडेवारी प्रतिवर्षी ३ दशलक्ष पौंड इतकी होती. त्यानंतर ती प्रतिवर्षी १६ दशलक्ष पौंड इतकी वाढली. सन १९३० नंतर ती आकडेवारी प्रतिवर्षी ३० दशलक्ष पौंड इतकी वाढली. प्रा.सी.एन. वकील यांनी सन १८३४ ते १९३९ या काळात भारताचे आर्थिक शोषण हे जवळजवळ ८५० दशलक्ष पौंड इतके झाल्याचे मत व्यक्त केले आहे.

**२) युद्धखर्च : (War Expenditure)**

ब्रिटीशांनी भारतात व भारताशेजावरील देशाबरोबर ब्रिटीश साम्राज्यवादासाठी केलेल्या विविध युद्धांचा खर्च भारतावरच लादण्यात आला. ब्रिटीशांनी केलेल्या युद्धामध्ये म्हैसूर युद्ध, मराठा –इंग्रज युद्ध, शिख – इंग्रज युद्ध, अफगाणीस्तानबरोबरचे युद्ध, ब्राह्मी युद्ध, आणि नेपाळ, तिबेटबरोबरचे युद्ध इ. चा समावेश होतो. ही युद्धे ब्रिटीश साम्राज्य वाढीसाठी ब्रिटीशांनी केली पण त्याचा खर्च ब्रिटीशांनी भारतातून वसूल केल्याने भारताचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. वेरा अॅन्स्टीने असे लिहिले आहे की,''भारत जिंकण्यासाठी करावा लागलेला लष्करी खर्च आणि सन १८५७ चे बंड झाल्यानंतर राजाने आपल्याकडे घेतलेल्या,ईस्ट इंडिया कंपनीच्या कर्जरोख्यावरील व्याज हे खर्च भारताच्या महसुलातून कधीही खर्च करावयास नको होते, असा युक्तीवाद करणे योग्य ठरते.''

**३) ब्रिटीश अधिकाऱ्यांनी इंग्लंडला पाठविलेली संपत्ती (Wealth Transfered by British Officers to England)**

भारतामध्ये प्रमुख व महत्त्वाच्या जागी काम करणाऱ्या ब्रिटीश अधिकाऱ्यांकडून त्यांच्या कुटुंबाच्या पालनपोषणासाठी व मुलांच्या शिक्षणाच्या खर्चासाठी भारतातून पैसे पाठविले जात होते. हे उच्च पगाराचे ब्रिटीश अधिकारी आपली बचत इंग्लंडला पाठवत असत. त्यामुळे संपत्तीचे अपहरण इंग्लंडला होत होते.

**४) कर्जावरील व्याज (Interest on Loan)**

भारतात ब्रिटीश सत्तेचा विस्तार करण्यासाठी केलेल्या युद्धापायी तसेच अफगाण,ब्रम्हदेश, नेपाळ, इ. देशांशी झालेल्या युद्धांमुळे ईस्ट इंडिया कंपनीला ७ कोटी पौंड कर्ज झाले होते. इ.स.१९०० मध्ये हे सार्वजनिक कर्ज २२ कोटी ४० लाख पौंड इतके होते. यातील काही कर्ज रेल्वे, सिंचाई अशा उत्पादक कार्यावर खर्च केले होते. हे कर्ज भारत सरकारने इंग्लंडमधून घेतले. होते. त्या कर्जावरील भरमसाठ व्याज भारताच्या तिजोरीतून द्यावे लागत होते.

थिओडर मॉरिससने आपल्या एका भाषणात म्हटले होते की, रेल्वेतील भांडवल गुंतवणुकीमुळे भारत एका नव्या उद्योगाकडे अग्रेसर झाला. ज्यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन भारत आर्थिक समृद्धीकडे वाटचाल करू लागला . तसेच सिंचाई योजनांच्या विस्तारीकरणामुळे येथील अधिकाधिक जमीन ओलिताखाली आल्याने उत्पादनात वाढ झाली व भारताचा फायदा झाला.'मॉरिसस म्हणतो की, 'हे कर्ज भारताला फार कमी व्याजावर मिळाले.' मात्र रेल्वे किंवा सिंचाई विकासामागील ब्रिटीशांचा उद्देश भारताचा विकास हा नसून इंग्लंडच्या उद्योगांचे हितरक्षण हा होता. त्यामुळे भारताचा औद्योगिक विकास झाला नाही.कारण भारतीय अर्थव्यवस्थेवर इंग्रजांचे वर्चस्व होते.

### ५) ब्रिटीश भांडवल गुंतवणूक (Capital Investment)

भारतातील कच्चा माल बंदराच्या ठिकाणी एकत्र करणे आणि ब्रिटीश पक्का माल भारतीय खेड्यांपर्यंत पोहचविण्यासाठी ब्रिटीशांनी भारतामध्ये वाहतूक -दळणवळणाच्या सोयी निर्माण केल्या. त्यासाठी ब्रिटीश भांडवलदारांनी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली. ब्रिटीशांनी केलेल्या या भांडवल गुंतवणुकीवरील लाभांश,व्याज व नफ्याच्या स्वरूपात भारतातील पैसा इंग्लंडमध्ये पाठविण्यात आला.

त्याचबरोबरच ब्रिटीशांनी कोळसा,साखर,कागद,काड्यापेट्या,शेतमाल,चहा,कॉफी,रबर, तंबाखू, इ. क्षेत्रातही गुंतवणूक केली. या गुंतवणुकीमुळे भारताच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचेही मोठ्या प्रमाणात हस्तांतरण झाले. १९४८ मध्ये रिझर्व्ह बँकेने केलेल्या पाहणीनुसार भारतातील एकूण ३०२ कोटी रूपये परकीय गुंतवणुकीपैकी २३० कोटी रूपये म्हणजे ७२% गुंतवणूक ब्रिटीशांनी केली होती.

### ६) सेवा खर्च (Service Expenditure)

परकीय बँका, विमा व जहाज कंपन्यांनी भारतात कोट्यावधी रू.चा नफा मिळविला. या बहुतांशी कंपन्या ब्रिटीश मालकीच्या असल्याने त्यांनी मिळविलेला प्रचंड नफा इंग्लंडला जात होता. तसेच भारतातील व्यापार हा प्रामुख्याने ब्रिटीश मालकीच्या वाहतुक साधनाद्वारे होत असल्याने त्या भाड्यापोटी इंग्लंडला मोठ्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त होत असे. तसेच इंग्लंडपासून भारतापर्यंत संदेशवहनासाठी टाकलेल्या तारांचा खर्चही भारताच्या तिजोरीतून वसूल केला.

### ७) व्यापारी धोरण (Trade policy)

औद्योगिक क्रांतीमुळे इंग्लंडमध्ये मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे उदयास आले होते. या उद्योगधंद्यांना भारतातून कच्चा माल कमी किंमतीत पुरविणे आणि ब्रिटीश उद्योगधंद्यांतून उत्पादित मालाला भारतीय बाजारपेठ पुरविणे या दृष्टीकोनातून ब्रिटीशांनी भारताचे व्यापारी धोरण ठरविले. म्हणजेच भारतीय जकातीचे दर इंग्लंडमधील उद्योगधंद्यांच्या फायद्याच्या दृष्टीने ठरविले. ब्रिटीश व्यापाऱ्यांनी भारताच्या आयात-निर्यात व्यापारातून प्रचंड नफा कमाविला. ब्रिटीशांच्या या भेदात्मक साम्राज्य पसंतीच्या व्यापारी धोरणामुळे भारताची मोठ्या प्रमाणात लयलूट झाली.

### ८) इतर कारणे (Other Reasons)

भारत सचिव व भारत सरकार कोट्यावधी रूपयांचा माल लष्करी ,मुलकी व सागरी विभागासाठी खरेदी इंग्लंडमध्ये खरेदी करत असत. सन १८६१ ते १९२० या काळात हा खर्च गृहव्ययाच्या १०.२% प्रतिवर्ष होता. १८३३ च्या चार्टर ॲक्टनुसार, १८७४ पर्यंत कंपनीच्या भागधारकांना भारतीय उत्पन्नातून लाभांश दिला जात होता. तो दरवर्षी ६ लाख ३० हजार पौंड होता.

शिवाय ब्रिटीशांनी भारतात वारंवार राज्यकर्ते व नवाब बदलून त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात पैसा (देणगी) वसूल केला. त्याशिवाय कंपनीच्या अधिकारी व नोकरांनी भ्रष्टाचार तसेच खाजगी व्यापारातून मोठ्या प्रमाणात पैसा लुबाडून तो इंग्लंडला पाठविला.

वरील विविध मार्गांनी इंग्रजांनी भारतातील संपत्ती जास्तीत जास्त हस्तांतारित करण्याचा प्रयत्न केला. ज्यामुळे भारतीय भांडवलनिर्मितीचा वेग मंदावून भारत दारिद्र्याकडे वाटचाल करू लागला.

**आर्थिक निःस्सारणासंबंधी अंदाज (Estimates of Drain of wealth)**

भारतातून इंग्लंडकडे जे वेगवेगळ्या मार्गांनी द्रव्यापहरण किंवा आर्थिक निःस्सारण होत होते किंवा साधनसंपत्तीचा ओघ विनाप्रतिफल वाहत होता. त्यासंबंधी अंदाज व्यक्त करण्याचे प्रयत्न निरनिराळ्या विचारवंतांनी केले. या अंदाजामध्ये व्यक्तीपरत्वे तफावत दिसून येते.कारण आर्थिक निःस्सारणासंबंधी अंदाज व्यक्त करताना वेगवेगळ्या विचारवंतांनी वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब केलेला दिसून येतो. तसेच भारताच्या आयात वाढाव्यात सातत्याने वाढ घडून येत होती. त्यामुळे तफावत दिसून येते.

भारताचा भावी गव्हर्नर जनरल व तत्कालीन लॉर्डस सभेच्या चिकित्सक समितीचे अध्यक्ष लॉर्ड एलेनबरो यांनी इ.स. १८४० मध्ये मान्य केले की, भारताला दरवर्षी २० ते ३० लाख पौंडाची रक्कम इंग्लंडला पाठवावी लागत असावी.

इ.स. १८५९ मध्ये लिहिताना जॉर्ज विनगेटने असा अंदाज बांधला की, इ.स. १८३५ ते १८५१ या काळात दरवर्षी ४२,२१६११ पौंडस भारताबाहेर जात होते आणि ही रक्कम एकूण ७,१७,६७३८७ पौंड एवढी आहे.

दादाभाई नौरोजीनी द्रव्यापहरणासंबंधी वेगवेगळे अंदाज व्यक्त केले. त्यांच्या मते,इंग्रज सत्तेच्या स्थापनेपासून सन १८६५- ६६ पर्यंत १५० कोटी पौंड संपत्ती भारताबाहेर गेली. सन १८९७ मध्ये, दादाभाईंनी सन १८८३ ते १८९२ या काळात ३५ कोटी ९० लाख पौंड भारताबाहेर गेल्याचे स्पष्ट केले. सन १९०५ मध्ये, भारतातून इंग्लंडकडे ५१.५ कोटी रू. निचरा झाल्याचे दादाभाई सांगतात.

विलियम डिग्बीनी १९०१ मध्ये अंदाज वर्तविला की, सन १७५७ ते १८१५ या काळात भारताबाहेर गेलेली संपत्ती ५० कोटी ते १०० कोटी होती.

सन १९०१ मध्ये, रोमोशचंद्र दत्तनी २ कोटी २० लाख पौंड दरवर्षी भारताबाहेर गेले असा अंदाज व्यक्त केला.

दिनशा वाच्छा (D.E.वाच्छा) यांनी सन १९०१ मध्ये असा अंदाज व्यक्त केला की, इ.स. १८६० ते १९०० या कालखंडात दरवर्षी ३० ते ४० कोटी रू.चे अपहरण भारतातून होत होते.

अमेरिकन विद्वान होल्डन फर्बरने १९४८ मध्ये, लिहिताना असे स्पष्ट केले की,सन १७८३ ते १७९३ या काळात १९ लाख पौंड प्रतिवर्षी एवढी रक्कम भारतातून इंग्लंडला जात होती. या काळात कंपनीची सत्ता थोड्या प्रदेशावर होती हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

जी. व्ही. जोशी यांनी केलेल्या अंदाजानुसार सन १८३४ ते १८३८ या कालावधीत भारतातून इंग्लंडकडे जवळजवळ ६०० दशलक्ष पौंड किमतीची संपत्ती पाठविली गेली.

एस.एन. बॅनजी यांच्या अंदाजानुसार एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या ३० वर्षाच्या काळात आर्थिक निःस्सारणाचे वार्षिक सरासरी मूल्य सुमारे ३० दशलक्ष पौंड होते.

व्ही.आय. पॉवलोव्ह यांनी १९६३ मध्ये म्हटले, १९३० च्या सुमारास इंग्रज साम्राज्यवाद्यांनी भारतातून फक्त शुल्कापोटी १३ कोटी ते १४ कोटी पौंड पळविले. ह्या रक्कमेतून भारत दरवर्षी भिलाईसारखे तीन पोलाद कारखाने सुरू करू शकत होता आणि त्यातील प्रत्येक कारखाना भारताची लोखंड व पोलादाजी गरज भागवू शकत होता. (with this amount india could annually construct three plants of the bhilai type each of which would exceed in capacity the country's iron & steel industry in the colonial period.)

बिपीन चंदांच्या मते, १८ व्या शतकाच्या अखेरीस भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा जवळजवळ ९% हिस्सा निचरा होत असे.

भारतातील संपत्तीचे झालेले वहन वास्तवात यापेक्षाही कितीतरी अधिक होते. कारण इंग्रज अधिकाऱ्यांचे गडगंज पगार व इतर उत्पन्न आणि इंग्रज व्यापाऱ्यांचा गडगंज नफा यातील फार मोठा भाग इंग्लंडला पाठविला जात असत.

परकीय ब्रिटीश सत्तेमुळे भारतातून आर्थिक निःसारणाच्या स्वरूपात किती अमाप संपत्ती भारताबाहेर गेली याचा स्थूल अंदाज वरील आकडेवारीवरून येतो.

**आर्थिक निः सारणाचे परिणाम : (Consequences of Economic Drain)**

विशेषतः प्लासीच्या लढाईनंतर (इ.स. १७५७ नंतर) मोठ्या प्रमाणावर आर्थिक नि:सारणामुळे भारतातून इंग्लंडकडे अमाप संपत्ती गेली. या आर्थिक नि:सारणाचे इंग्लंड आणि भारताच्या अर्थव्यवस्थेवर वेगवेगळे परिणाम झाले.

**१) आर्थिक नि:सारणाचे भारतातील परिणाम :**

भारतीय साधनसंपत्तीचे वेगवेगळ्या मार्गांनी द्रव्यापहरण होत होते. त्यातून भारताच्या पदरात काहीच पडत नव्हते. त्यामुळे संपत्तीवहनाचे भारतीय अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम झाले. भारतीय राष्ट्रवादी नेत्यांनी आणि विचारवंतांनी या धन नि:सारणाच्या वेगवेगळ्या घातक परिणामांवर जोर दिला.

दादाभाई नौरोजींना या द्रव्यापहरणाला 'वाईटातले वाईट' (evil of all evils) असे म्हटले आणि भारतीय दारिद्र्याचे ते मुख्य कारण असल्याचे प्रतिपादन केले. त्यांच्या मते, एकेकाळी सधन असलेल्या भारताला निर्धन व दारिद्र्याच्या खाईट टाकून भारतातील संपत्तीचे द्रव्यापहरण केले. दादाभाईंनी असे मत व्यक्त केले की, इंग्लंड भारताचे रक्त शोषण करून त्याला समाप्त करीत आहे. सन १९०५ मध्ये संडरलॅडला (sunderland) लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात.'' भारताची स्थिती अतिशय वाईट आहे. मालक आणि गुलाम यापेक्षाही वाईट संबंध भारत आणि इंग्लंडमध्ये आहेत. एका लुटल्या जाणाऱ्या राष्ट्राची ही अशी अवस्था आहे ज्यात लुटारू अव्याहतपणे लूट करीत आहे आणि तरीही सहीसलमात निसटून जातो. भारतात इंग्रजांच्या आधी लुटारू येत होते. पण मध्ययुगीन काळातील लुटारू फक्त श्रीमंतांनाच लुटत असत. लहान खेड्यांना किंवा झोपड्यांना धक्का लावत नसत. त्यांच्या तुलनेत हे साम्राज्यवादी लुटारू अतिशय गरीब, दूर प्रदेशापर्यंत जाऊन पोहचले आणि अशाप्रकारे

इंग्रजांची शोषण पद्धती त्रासदायक भासत नसली तरी खोलवर पाहिल्यास ती रक्तशोषक आहे.''

सन १९०१ मध्ये, रोमेशचंद दत्त यांनी असे म्हटले की, ''भारतातून इंग्लंडकडे जे धन निःसारण झाले त्याचे उदाहरण या भूतलावरील कोणत्याही देशात आढळत नाही. निव्वळ महसुलाचा निम्मा हिस्सा प्रतिवर्षी भारताबाहेर जातो, खरोखरच भारतीय जमिनीचा ओलावा अन्य देशांना सुपीक व सुखी बनवतो. देशाच्या साधनसंपत्तीचे इतके मोठे आर्थिक निःसारण या भूतलावरील सर्वाधिक संपन्न देशानाही निर्धन करील; या निःसारणामुळे भारत देश, हा दुष्काळाचा देश झाला आहे, भारताच्या किंवा जगाच्या लिखित इतिहासातील कोणत्याही दुष्काळपेक्षा भारतातील दुष्काळ अधिक घातक स्वरूपाचे झाले आहेत.''

आर्थिक निःसारणामुळे भारताला संपत्तीच नव्हे तर भांडवलही गमवावे लागले. भारतीय राष्ट्रवादी नेत्यांना याची जाणीव होती. आर्थिक निःसारण म्हणजे भारताच्या दृष्टीने भांडवलहानी होय, असे जी.व्ही. जोशी यांनी प्रतिपादन केले. त्यांच्या मते, स्थूल वार्षिक राष्ट्रीय उत्पन्नाचा काही एक हिस्सा यादृष्टीने नव्हे तर वार्षिक निव्वळ संभाव्य वाढाव्याचा आणि बचतीचा काही एक हिस्सा यादृष्टीनेच आर्थिक निःस्सारणाकडे पाहिले पाहिजे. त्यांच्या मते,आर्थिक निःसारणाच्या मोबदल्यात भारताला कोणताही लाभ मिळत नव्हता. आणि म्हणूनच भारतातील भांडवलनिर्मिती अल्यल्प राहण्यास आर्थिक निःसारण कारणीभूत ठरले. बिपनचंदांच्या मते, एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा सुमारे ६% आणि राष्ट्रीय बचतीच्या एक तृतीयांश इतक्या संपत्तीचे वहन इंग्लंडला होत होते. परिणामतः भारतातील बचत इंग्लंडकडे जाऊ लागल्याने भारतात भांडवलनिर्मिती होऊ शकली नाही.

द्रव्यापहरणामुळे देशात भांडवल जमा होऊ शकले नाही व त्याचा परिणाम म्हणजे औद्योगिक विकासाचा वेग मंदावला. मात्र त्याचा फायदा इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीला झाला. त्यातील अधिक वाईट भाग म्हणजे भारतीय हस्तोद्योगांचा ऱ्हास झाला. म्हणजेच भारतात भांडवल टंचाई निर्माण झाल्याने औद्योगिक विकास झाला नाही. जी.व्ही. जोशी यासंदर्भात लिहितात,''कोणतेही राष्ट्र असे निःसारण सहन करून त्याचबरोबर प्रगतीपथावर राहू शकत नाही.''

द्रव्यापहरणामुळे भारतातील रोजगारावर आणि भारताच्या उत्पन्नावर घडून आलेल्या अनिष्ट परिणामाबाबत दादाभाई नौरोजी, रोमेशचंद दत्त, आणि एस.एन. बॅनर्जी यांना जाणीव झाली होती. त्यांनी असे दाखवून दिले की, भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा काही भाग ब्रिटीश लोक भारताबाहेर खर्च करीत होते की,जे धननिः सारण होते. ती रक्कम जर भारतात खर्च केली असती तर भारतात रोजगारनिर्मिती व उत्पन्न निर्मिती शक्य झाली असती. पण धन निःसारणामुळे ती भारताला गमवावी लागली. रोमेशचंद्र दत्त या संदर्भात म्हणतात, ''जेव्हा देशात कर बसविले जातात आणि त्या करापासून मिळणारे उत्पन्न देशातच खर्च केले जाते,तेव्हा तो पैसा देशातच परिचलनात राहतो, त्यामुळे व्यापार, उद्योग आणि शेती या क्षेत्रांना उर्जितावस्था प्राप्त होते. आणि ही समृद्धी या ना त्या प्रकारे जनतेपर्यंत पोहचते. पण देशांतील करांपासून मिळणारे उत्पन्न देशाबाहेर पाठविले जाते तेव्हा तो पैसा किंवा उत्पन्न कायमचा गमावला जातो, त्यामुळे त्या देशाच्या विकासाला किंवा उद्योगांना चालना मिळत नाही किंवा तो पैसा देशातील लोकांपर्यंत कोणत्याही मार्गाने पोहचत नाही.''द्रव्यापहरणामुळे रोजगारनिर्मितीवर झालेल्या

परिणामाबाबत रोमेशचंद दत्त एका भारतीय कवीने दिलेल्या उपमेचा उल्लेख करून म्हणतात की, ''राजा आपल्या प्रजेकडून जास्तीचे कर घेतो आणि सूर्य जसा पृथ्वीकडून वाफेच्या स्वरूपात पाणी घेऊन पुन्हा पावसाच्या रूपाने परत करतो, तसा व्यवहार करतो. पण येथे सूर्य भारताकडून पाणी (वाफेच्या रूपात) घेतो आणि पाऊस मात्र इंग्लंडला देतो.''

द्रव्यापहरणामुळे भारतातील संपत्ती देशाबाहेर गेल्याने भारतीय अर्थव्यवस्थेवर त्याचा विपरित परिणाम होऊन भारत कर्जबाजरी झाला. दादाभाई नौरोजीनी म्हटले होते की, भारतातील संपत्ती द्रव्यापहरणामुळे भारताबाहेर जाते आणि कर्जाच्या रूपाने परत येते. मग त्या कर्जावरील व्याज पुन्हा बाहेर जाते आणि अशाप्रकारे कर्जाचे हे कुचक्र चालू राहते.

आर्थिक निःसारणामुळे भारतीय शेतकऱ्यांची निर्धनता वाढून तो दुष्काळाच्या चक्रात अडकला. द्रव्यापहरण हे प्रामुख्याने जमीन महसुलाच्या रक्कमेतून होत असल्याने भारतीय शेतकऱ्यांना महसुलाच्या मोबदल्यात कोणत्याही प्रकारच्या दीर्घकालीन सवलती मिळाल्या नाहीत. त्यामुळे तो कर्जबाजारी बनून दरिद्री झाला.

भारतातून इंग्लंडकडे जे एकतर्फी संपत्तीचे हस्तांतरण होत होते त्यामुळे झालेल्या प्रत्यक्ष नुकसानीखेरीज अन्य काही परिणामही भारतावर झाले. त्यामध्ये आर्थिक निःसारणामुळे भारतीय व्यापाराच्या शर्ती भारताच्या दृष्टीने अधिकाधिक प्रतिकूल होऊ लागल्या. याचे कारण असे की, आवश्यक तेवढा निर्यात वाढावा निर्माण करण्याच्या दृष्टीने निर्यात वाढविणे भाग पडले. मग त्या निर्यातीला कोणती किंमत मिळते याचा विचार केला गेला नाही. यामुळे भारताचे आणखीनच नुकसान झाले.

दादाभाई नौरोजींनी द्रव्यापहरणाची आणखी एक वाईट बाजू समोर आणली. ती म्हणजे नैतिक अपहरण होय. भारतातील जनतेवर त्यांच्याच देशात विश्वास न ठेवता भारतीयांना जबाबदारीच्या पदापासून दूर ठेवले जात होते. दादाभाई म्हणतात, ''आत्मा, बुद्धीचातुर्य, विद्वत्ता निसर्ग सर्वच देशांना बहाल करतो, पण भारतात मात्र ती बाब इतिहासजमा होत आहे.''

दादाभाई नौरोजींची आर्थिक निःसारण या संकल्पनेत भारतातून झालेल्या संपत्तीच्या निःसारणाबरोबरच भारतीय हस्तोदयोगांचा ऱ्हास झाल्यामुळे अप्रत्यक्षात मानवी कौशल्याचाही निचरा झाला आणि भारत हा प्राथमिक उदयोगांचा शेतीप्रधान देश बनला असे म्हटले ब्रिटिशांनी भारतीय शेतीचे व्यापारीकरण करून काही सुधारणा केल्या. ज्यामुळे निर्यात वाढली पण दादाभाई नौरोजींच्या मते, शेतकी उत्पादनाची निर्यात हा भारतातून इंग्लंडकडे निचरा होणाऱ्या संपत्तीचे एक साधन होते.

अशा रितीने द्रव्यापहरणामुळे भारताच्या उत्पन्नावर आणि संपत्तीवर, भांडवल निर्मितीवर, औद्योगिक विकासावर, जमिन महसुलावर तसेच व्यापाराच्या शर्तीवर आणि भारतीय जनतेच्या आर्थिक स्थितीवर झालेल्या परिणामांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न भारतीय राष्ट्रवादी नेत्यांनी केला. ब्रिटिशांची भारतातील राजवट अत्यंत शोषक स्वरूपाची होती, हे भारतीय राष्ट्रवादी नेत्यांनी द्रव्यापहरणाच्या सिद्धांताद्वारे परिणामकारक रितीने दाखवून दिले.

## २) आर्थिक निःसारणाचे इंग्लंडवरील परिणाम

भारतीय साधनसंपत्तीचा ओघ इंग्लंडकडे फार मोठ्या प्रमाणावर वाहू लागल्याने इंग्लंडमधील लोकांना अधिक उच्च दर्जाचे राहणीमान प्राप्त झाले. आर्थिक निःसारणामुळे सन १७५० नंतर इंग्लंडमधील उद्योगात आणि शेतीत वाढत्या प्रमाणावर गुंतवणूक करता येणे शक्य झाले. अठराव्या शतकात इंग्लंडमध्ये शेतकी क्रांती आणि सन १७५० नंतर औद्योगिक क्रांती घडून येण्यास ही गुंतवणूक फार मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरली. उड्डाणावस्था प्राप्त करून घेणारा आणि आर्थिक प्रगती घडवून आणणारा इंग्लंड हा युरोपमध्ये आणि संपूर्ण जगात पहिला देश ठरला, याला जी अनेक कारणे कारणीभूत होती त्यापैकी एक महत्वाचे कारण म्हणजे भारताकडून इंग्लंडकडे फार मोठ्या प्रमाणावर गेलेली साधनसंपत्ती आणि आर्थिक निःसारणामुळे किंवा विनाप्रतिफल संपत्ती निर्यातीमुळे इंग्लंडमधील शेतीत व औद्योगिक क्षेत्रात शक्य झालेली वाढत्या प्रमाणावरील गुंतवणूक हे होय. भारतात नोकरी व्यवसाय केल्यानंतर जे श्रीमंत अधिकारी आणि व्यापारी यांच्याजवळ सेवानिवृत्तीवेळी अमाप संपत्ती साठलेली होती. ती गुंतवणूक म्हणून त्यांनी इंग्लंडमध्ये गुंतविली. त्यामुळे रस्ते, कालवे, उद्योग,रेल्वे वगैर क्षेत्रांत गुंतवणूक करून इंग्लंडचा जलद विकास घडवून आणता येणे तसेच नवनवे शोध लावण्यावर लक्ष केंद्रीत करणे शक्य झाले. या काळातील इंग्लंडच्या राष्ट्रीय उत्पन्नाचा २% भाग भारतातून वहन झालेल्या किंवा वाहून आणलेल्या संपत्तीचा होता असा अंदाज करण्यात येतो. या काळात इंग्लंड आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाचा ७% भाग उद्योग व कृषी क्षेत्रात गुंतवित होता. सारांश आर्थिक निःसारणाने इंग्लंडच्या आर्थिक प्रगतीचा आणि भरभराटीचा पाया घालण्याचे कार्य केले.

आर्थिक निःसारण हा भारतीय आर्थिक इतिहासातील महत्वाचा विचार आहे. ब्रिटीशांनी भारतामध्ये आपली सत्ता प्रस्थापित केल्यानंतर भारतातील संपत्ती कशाप्रकारे लुटून भारताबाहेर नेली हे या सिद्धांतात भारतीय राष्ट्रवादी नेत्यांनी स्पष्ट करून या द्रव्यापहरण सिद्धांताद्वारे ब्रिटीशांचे शोषणात्मक स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आणि द्रव्यापहरणामुळे भारत हा मागासलेला आणि गरिबी कसा बनला हे राष्ट्रवादी विचारवंतांनी स्पष्ट केले.

सुरूवातीला १८६० च्या दशकात दादाभाई नौरोजीनी आणि १९०१ ला रोमेश दत्तांनी द्रव्यापहरणाचा सिद्धांत सविस्तरपणे मांडला. नंतर अलिकडे त्याच दृष्टीकोनातून इरफान हबीब,एन् के. सिन्हा यांनी १७५७ च्या प्लासीच्या लढाईनंतर वेगवेगळ्या मार्गांनी भारतीय संपत्ती कशाप्रकारे भारताबाहेर गेली हे स्पष्ट करून द्रव्यापहरणाच्या सिद्धांताला भक्कम आधार दिला.

दादाभाई नौरोजीनी मे, १८६७ मध्ये भारतीय संपत्तीचा ब्रिटनकडून अपहार होत असल्याचा आणि ब्रिटन भारताचे रक्तशोषण करीत असल्याचा विचार प्रथम मांडून त्यांनी द्रव्यापहरणाचे वेगवेगळे मार्ग सांगितले. आणि तेच भारतीय दारिद्र्याचे प्रमुख कारण असल्याचे स्पष्ट केले. दादाभाई नौरोजींच्या मते, संपत्तीचे वहन हे भारतीयांच्या दारिद्र्याचे प्रमुख कारण होते, तसेच तो ब्रिटीश राजवटीतील मूलभूत दोषही होता.''आर्थिक नियमांच्या कर्तव्यकठोर अंमलबजावणीमुळे नव्हे तर हृदयशून्यरित्या भारतीय संपत्ती गिळंकृत करण्याच्या आणि इंग्लंडला वाहून नेण्याच्या ब्रिटीश राजवटीच्या धोरणामुळे किंबहुना अर्थशास्त्रीय नियमांचा विपर्यास्त व निर्दय वापर करून ब्रिटीश शासन या देशाचे रक्त शोषण करीत राहिल्यामुळे या देशाचा सर्वनाश होऊ घातला आहे.'' असे दादाभाईनी सन १८८० च्या दशकात म्हटले.

रोमेशचंद्र दत्त या राष्ट्रवादी विचारवंतांनेही आपल्या "Economic history of India in the victorian Age" या ग्रंथात संपत्ती वहनाचा सिद्धांत मांडला. रोमेशचंद्र दत्त म्हणतात, ''राजाने जमा केलेला महसूल सूर्याने शोषून घेतलेल्या जमिनीतील ओलाव्याप्रमाणे असतो; तो सुपीक बनवणाऱ्या पावसाच्या रूपात जमिनीला परत करावयाचा असतो. असे एका कवीने म्हटले आहे. परंतू या देशातून शोषला गेलेला ओलावा पावसाच्या रूपात या देशाच्या भूमीवर नव्हे तर दुसऱ्याच देशाच्या भूमीवर पडत आहे. साधनसंपत्तीचे इतक्या मोठ्या प्रमाणात वहन होत राहिले तर पृथ्वीवरील संपन्न देशही दरिद्री होईल.''

राष्ट्रवादी विचारवंतांनी द्रव्यापहरणाच्या सिद्धांताचे स्पष्टीकरण करून त्यामुळे भारतावर झालेल्या परिणामांचीही मिमांसा केली. द्रव्यापहरणामुळे भारतातील संपत्ती,बचत भारताबाहेर गेली. त्यामुळे भारतात भांडवल निर्मिती होऊ शकली नाही. त्याचा परिणाम भारतात उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात उभे राहू शकले नाहीत. त्यामुळे बेरोजगारी आणि दारिद्र्य भारतात निर्माण झाले. राष्ट्रवाद्यांनी संपत्तीवहनामुळे झालेल्या परिणामांची एक शृंखला मांडून त्यास तात्वीक अधिष्ठान दिले. आणि वसाहतवादी शासनाचे शोषणकारी स्वरूप उघडे करण्याचा प्रयत्न केला.

मार्क्सवादी इतिहासकारांनी आपल्या चौकटीमध्ये संपत्तीवहन सिद्धांताचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न केला. खुद्द कार्ल मार्क्सने ब्रिटीशांच्या भारतातील शोषणकारी स्वरूपाचे विवेचन केले होते.Paul Baran यांनी आपल्या Political Economy of growth (१९५७) या ग्रंथात म्हटले आहे की, भारतीय अर्थव्यवस्थेचे स्थलांतरण करणे हे इंग्लंडच्या अर्थव्यवस्थेची गरज होती.पण भारतीय अर्थव्यवस्थेवर त्याचा विपरित परिणाम झाला. त्यांच्या मते, राष्ट्रवादी विचारवंत म्हणतात त्यापेक्षाही भारतीय संपत्तीचे अपहरण हे जास्त होते. त्यांच्या मते, जवळपास भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या १०% भारतीय संपत्तीचे वहन होते.

इरफान हबीब यांच्या मते, १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतीय संपत्तीचे वहन भारताच्या निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नाच्या एकतृतीयांश होते. त्यामुळे भारतात भांडवलनिर्मिती होऊ शकली नाही. पण भारतातून अपहरण झालेल्या संपत्तीमुळे इंग्लंडच्या औद्योगिक क्रांतीला भांडवलपुरवठा झाला. वसाहतीकडून मिळालेल्या संपत्ती व व्यापाराच्या माध्यमातून झालेल्या फायद्यामुळे इंग्लंडमधील उद्योगधंद्याला भांडवल पुरवठा झाल्याने इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाल्याचे इरफान हबीब म्हणतात.

सुरूवातीपासूनच राष्ट्रवादी विचारवंतांनी मांडलेल्या द्रव्यापहरणाच्या सिद्धांतावर टीका होऊ लागली. द्रव्यापहरणाच्या गोष्टीला राष्ट्रवादी विचारवंतांनी अतिरिक्त महत्त्व दिले, त्याचे आकडे वाढवून दिले,अशी टिका केली जाते. कारण टिकाकारांच्या मते, भारताचा विदेशी व्यापार किंवा निर्यात झालेल्या वस्तूंचे मूल्य हे भारतीय राष्ट्रीय उत्पन्नाचा फार कमी हिस्सा होता. त्यामुळे याचा इंग्लंड व भारतावर फार फरक पडत नव्हता. अशा प्रकारचा युक्तीवाद वसाहतवादी विचारवंतांनी केलेला दिसून येता. परंतू सन १८९५ साली वेल्बी कमिशनसमोर दादाभाई नौरोजींनी असा युक्तीवाद केला की,जरी द्रव्यापहरण झालेली रक्कम भारतीय राष्ट्रीय उत्पन्नाच्या कमी असली तरी ही रक्कम भारताने कमावलेले अतिरिक्त उत्पन्न होते. ही रक्कम भारताबाहेर गेली नसती आणि ही रक्कम भारतीय अर्थव्यवस्थेत पुन्हा गुंतवली असती तर भारताची प्रगती साधली असती, राष्ट्रीय उत्पन्न वाढले असते. मात्र ब्रिटीशांनी ही अतिरिक्त रक्कम भारताबाहेर नेल्यामुळे भारताला आर्थिक प्रगतीपासून वंचित रहावे लागले.

त्या प्रगतीतून ब्रिटीशांनी इंग्लंडची औद्योगिक प्रगती साधली.

भारतीय संपत्तीचे वहन किंवा निचरा झाला आहे,हे वास्तव तत्कालीन ब्रिटीश अधिकाऱ्यांनी मान्य केले आहे. तत्कालीन लॉर्डस सभेच्या चिकित्सक समितीचे अध्यक्ष व भारताचे भावी गव्हर्नर जनरल लॉर्ड एलेनबरो यांनी इ.स.१८४० मध्ये मान्य केले की,''भारताला या देशाला (इंग्लंडला) पाठवावी लागणारी रक्कम २० ते ३० लाख पौंडाची असावी; त्याच्या बदल्यात काही मोजकी शस्त्रास्त्रे वगळता भारताला काहीच मिळत नाही!'' मद्रास इलाख्याच्या महसूल मंडळाचे अध्यक्ष जॉन सुलिव्हान म्हणतात की,'' आपली व्यवस्था एखाद्या स्पंजप्रमाणे आहे, ती गंगेच्या काठावरील सर्व चांगल्या वस्तू शोषून त्या थेम्स नदीच्या काठावर रिकाम्या करते!''(our sysetm acts very much like a sponge, drawing up all the good things from the bank of the ganges, and Squeezing them down on the bank of the thames.) ज्यावेळी वसाहतवादी इतिहासकार भारताच्या सांस्कृतिक बाबींवर आक्रमण करण्याच्या मागे लागले होते त्यावेळी वसाहतवादी अर्थशास्त्रज्ञही काही पाठीमागे नव्हते त्यांनी वसाहतवादी दृष्टीकोनातून भारताच्या खालावत चाललेल्या आर्थिक परिस्थितीचे विवेचन केले. त्यांच्या मते, भारतातून बाहेर चाललेल्या संपत्तामुळे भारताची गरिबी वाढलेली नसून भारतातील वाढत जाणारी लोकसंख्या त्यासाठी कारणीभूत आहे म्हणजेच भारतीय विकासाच्या गतीहिनतेला त्यांनी भारतातील अंतर्गत कारणे कारणीभूत मानली.

वसाहतवादी इतिहासकारांनी सुरूवातीपासूनच द्रव्यापहरणाच्या सिद्धांताला विरोध केला. त्यामध्ये सर जॉन स्ट्रेची,वेरा ॲन्स्टे, (vera Anstey) गोल्डस्मिथ,(Goldsmith) टॉम्लीन्सन (Tomlinson)आणि मॉरीस डी.मॉरीस हे प्रमुख आहेत. सर जॉन स्ट्रेची म्हणतो, '' इंग्लंडला भारतातून काही मिळत नाही. जे काही मिळते ते इंग्रजांनी केलेल्या सेवेबद्दल आणि त्यांनी गुंतविलेल्या भांडवलाच्या मोबदल्यात मिळते.'' थोडक्यात, भारतातून इंग्लंडला मिळणारी संपत्ती ही इंग्रजांनी भारताला पुरविलेल्या सेवांचा मोबदला आणि भारतामध्ये ब्रिटीश भांडवल गुंतविल्याबद्दलचे व्याज आहे. स्ट्रेचीच्या या युक्तीवादामध्ये ब्रिटीशांनी भारतात पुरविलेल्या. सेवा, भारतात निर्माण केलेली प्रशासनयंत्रणा, कायदा व सुव्यवस्था इ.चा मोबदला होता. तसेच ब्रिटीशांनी अनेक वेळेला भारतात विशेषकरून रेल्वे, मळे, खाणी इ. साठी ब्रिटनमध्ये कर्ज उभे करून भारतात भांडवल गुंतवले होते. त्याचे व्याज ब्रिटनला मिळत होते. यालाच भारतीय राष्ट्रवादी विचारवंत संपत्तीचे अपहरण म्हणतात असा स्ट्रेचीचा युक्तिवाद होता. स्ट्रेचीच्या मते हे सर्व भारताला विकसित करण्याच्या हेतूने किंवा आधुनिक बनविण्याच्या हेतूने केले जात होते. त्यामुळे ते अपहरण नव्हते. सर जॉन स्ट्रेचीच्या मताचे समर्थन इतर वसाहतवादी इतिहासकार करतात.

सर जॉन स्ट्रेची आणि वसाहतवादी इतिहासकारांची संपत्तीच्या अपहरणाबाबतची मांडणी चुकीची वाटते. कारण ज्या सेवा इंग्लंडने भारताला पुरविल्या किंवा ज्यामध्ये भांडवल गुंतविले, की ज्याद्वारे ब्रिटनने भारताचा विकास केला त्याने भारताचे भले झाले नाही. उलट ब्रिटनच्या भारतातील धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचे आंध्र गुंदर फ्रॅंक यांच्या शब्दात अविकसितेसाठी विकास (Development for undevelopment) झाला.

गोल्ड स्मिथनेही वसाहतवादी दृष्टीकोन स्विकारून भारतातील ब्रिटीशांच्या धोरणांची पाठराखण केली. गोल्ड स्मिथ (Goldsmith) च्या मते, १८६० पूर्वीच्या दोन शतकात भारतीय अर्थव्यवस्थेत बंदिस्तपणा किंवा गतीहिनता आली असल्याने, राष्ट्रवादी विचारवंत म्हणतात त्याप्रमाणे संपन्न अर्थव्यवस्था ब्रिटीशांच्या हातात

आली नव्हती, तर ब्रिटीशांनी सत्ता ताब्यात घेतल्यानंतर भारतीय अर्थव्यवस्था विकासाकडे वाटचाल करू लागली. उदा- रेल्वे, बँका, दळणवळण इ. क्षेत्रात ब्रिटीश काळात भारताचा विकास झाला.

टॉम्लीन्सन (Tomlinson) म्हणतात, राष्ट्रवाद्यांनी सांगितलेली खंडणी अतिरंजीत आहे. कारण राष्ट्रवाद्यांनी प्रत्यक्षापेक्षा जादा आकडेवारी सांगितली आहे. त्यांच्या मते, दुष्काळ आणि दारिद्र्यासाठी राष्ट्रवादी म्हणतात तसे संपत्तीवहन कारणीभूत नाही, कारण १९ व्या शतकात महसुलातील वाढ ही इतर गैर-कृषि क्षेत्राच्या म्हणजेच जकात, प्राप्तीकर, अबकारी कर यांच्या वाढीच्या तुलनेत फारच कमी आहे. भारतीय अर्थव्यवस्थेवर दबाव निर्माण झाला तो १९ व्या शतकातील रूपयाच्या घसरणीमुळे.

अलिकडच्या काळात म्हणजे १९६० च्या दशकात मॉरीस-डी-मॉरीसने संपत्तीवहनाच्या सिद्धांताला विरोध केला. त्यांनी आपल्या मांडणीमध्ये भारतातील राष्ट्रीय विचारवंतांनी केलेली मांडणी खोडून काढण्याचा प्रयत्न केला. जवाहरलाल नेहरूंनी आपल्या (Discovery of India) या ग्रंथात ब्रिटीशांच्या आगमणामुळे भारतामध्ये दारिद्र्य व मागासलेपणा निर्माण झाला. आणि त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामांचे विवेचन केले. तसेच न्या. रानडेंनी भारताच्या मागासलेपणाची शास्त्रीय मिमांसा केली.

राष्ट्रवादी विचारवंतांनी केलेल्या मांडणी विरोधी मॉरीस-डी-मॉरीसने यांनी मांडणी करून भारतातून इंग्लंडला द्रव्यापहरण झाले नसल्याचे स्पष्ट केले. त्यांनी असा युक्तीवाद केला की, ब्रिटीश सत्तास्थापनेपूर्वी राजकीय अस्थिरता, तुटपुंजा व्यापार, मर्यादीत उत्पादन, प्रगतीला प्रोत्साहन न देणारे वातावरण अशी भारताची अवस्था होती. ब्रिटीश सत्ता भारतात स्थापन झाल्यानंतर राजकीय अस्थिरता संपली, शेती उत्पादनात वाढ झाली. हस्तोद्योगाचा ऱ्हास न होता त्यास प्रोत्साहन मिळाले, आधुनिक उद्योग व व्यापाराचा विस्तार झाला. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था भरभराटीला आली. त्यामुळे लोकांचे उत्पन्न वाढले. मॉरीस यांच्या मते, भारतातून इंग्लंडला संपत्तीचे नि:सारण झाले नाही. याउलट भारतीयांना इंग्लंडबरोबरच्या संबंधाचा फायदाच झाला. एकंदरीत, त्यांच्या मते, इंग्लंडची भूमिका पहारेकऱ्यांची होती. त्याने एक सुसंबद्ध प्रशासन दिले व सामाजिक अनुरूपता निर्माण केली. ज्यामुळे भारतात आर्थिक विकासाची शक्यता निर्माण झाली.

मॉरीस-डी-मॉरीस यांनी आपल्या मांडणीला सांख्यिकी पाठिंबा दिला असला तरी अनेक वेळेला अंदाजाने विधाने केलेली आहेत. तसेच बऱ्याच बाबी हेतूपुरस्कृत टाळल्या आहेत. त्यामुळे त्यांनी केलेल्या द्रव्याहरणाच्या विरोधाला फारसे तात्विक महत्व नाही.

भारतीय राष्ट्रवादी विचारवंतांनी मांडलेल्या संपत्तीवहनाच्या सिद्धांतावर टीका होत असली तरी त्याचे महत्व कमी होत नाही. कारण या सिद्धांताद्वारे ब्रिटीश शासनाचे शोषक स्वरूप उघडे करण्याचा प्रयत्न याद्वारे राष्ट्रवादी विचारवंतांनी केला. आणि भारताच्या दारिद्र्याला व मागासलेपणाला द्रव्यापहरण म्हणजेच ब्रिटीश शासन जबाबदार असल्याची जाणीव भारतीयांमध्ये निर्माण केली. खरे तर द्रव्यापहरणाच्या सिद्धांताचे महत्व आर्थिकपेक्षा राजकीय जास्त आहे. या सिद्धांताद्वारे भारतीय राष्ट्रवाद्यांनी भारतात आर्थिक राष्ट्रवादाचा पाया घातला. भारतीय लोकांना ब्रिटीश सत्तेच्या चांगुलपणावर असलेल्या विश्वासाला तडा गेला. भारतीयांना ब्रिटीश साम्राज्यवादाची खरी ओळख झाली. ब्रिटीश अमलाखाली भारताची प्रगती होत आहे. अर्थव्यवस्था विकसित होत आहे. या

प्रकारच्या भावनांना तडा गेला. ब्रिटीशांनी भारतात राबविलेल्या सुसंस्कृतीकरणाच्या मोहिमेला (Civilization Mission) तडा गेला. भारतीय जनमाणसावर ब्रिटीश शासनाचा पडलेला प्रभाव नष्ट करून लोकांना मानसिकदृष्ट्या समर्थ बनविण्यासाठी या द्रव्यापहरणाच्या सिद्धांताचा राष्ट्रवाद्यांनी उपयोग करून घेतला.

राष्ट्रीय नेत्यांनी वसाहतवादावर व वसाहतवादी शासनावर केलेल्या टीकेतील सर्व सूत्रे वहनाच्या सिद्धांतात एकत्र आली होती. कारण उद्योगधंदे व शेती यांना अत्यावश्यक असलेल्या उत्पादक भांडवलाचे देशामधून वहन होत असे. संपत्तीवहनाचा हा सिद्धांत वसाहतवादी व्यवस्थेच्या सर्वकष, एकसंघ व परस्पर संबंधीत आर्थिक विश्लेषणाचा एक मानबिंदू होता. या सिद्धांतामुळेच ब्रिटीश राजवटीच्या शोषक स्वरूपाचे विदारक दर्शन घडून आले. भारतातून इंग्लंडला होत असलेल्या संपत्तीच्या वहनाला आपला प्रमुख टिकाविषय बनवून राष्ट्रीय चळवळीत या सिद्धांताला मुख्य आधार बनवून लोकांपर्यंत ब्रिटीशांच्या शोषक स्वरूपाची जाणीव निर्माण केली.

### ४.२.३ ब) ब्रिटिश समुद्रपार व्यापार (British Overseas Trade) :

भारताचा प्राचीन काळापासून समुद्रपार व्यापार चालत आलेला आहे. अगदी प्राचीन हडप्पा संस्कृतीच्या काळात लोथल व सुतकेंगदेर यासारख्या बंदरातून व्यापार चालू असल्याचे उत्खननातील पुराव्यावरून स्पष्ट होते. मध्ययुगातही मोठ्या प्रमाणावर भारताचा समुद्रपार व्यापार चालू होता. भारतीय उत्पादीत वस्तुंना परदेशात मोठी मागणी होती. ब्रिटिशपूर्व भारताच्या समुद्रपार व्यापारामध्ये पोर्तुगीज, डच, ब्रिटिश, फ्रेंच या युरोपियनांबरोबरच अरब लोक देखील सहभागी होते. याकाळात भारतातील उत्पादीत वस्तूंना जगभर असलेल्या मागणीमुळे भारताबरोबरच्या किफायतशीर व्यापारामधून आपला फायदा मिळविण्यासाठी वरील लोकांमध्ये स्पर्धा निर्माण झाली होती. या काळात भारतातील वस्तू व मसाल्याच्या पदार्थांची परदेशात निर्यात व मौल्यवान धातुंची भारतात आयात करून वरील व्यापारी लोकांना फायदा मिळत असे. त्यामुळे भारतीय उत्पादकाला या काळात प्रोत्साहन मिळत गेले. हा व्यापार भारताला अनुकूल बनत गेला.

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची स्थापना (इ.स. १६००) झाल्यानंतर कंपनीने पूर्वेकडील किफायतशीर व्यापारावर आपले लक्ष केंद्रित करून भारताशी व्यापार चालू केला. थोड्याच काळात इतर व्यापारी स्पर्धकांना भारतीय व्यापारातून दूर करून भारतीय व्यापारावर आपली मक्तेदारी निर्माण केली. यासाठी कंपनीला इतर युरोपियन व्यापाऱ्यांशी तसेच भारतातील वेगवेगळ्या सत्ताधिशांशी संघर्ष करावा लागला. सन १७५७ पर्यंत ईस्ट इंडिया कंपनीची भूमिका एका व्यापारी संघटनेची होती. कंपनी भारतामध्ये विविध प्रकारच्या व्यापारी मालाची व मौल्यवान धातुंची आयात आणि त्या बदल्यात भारतातून प्रामुख्याने सुती कापड व मसाल्यांच्या पदार्थांची परदेशात निर्यात करीत असे. प्रामुख्याने भारतीय मालाची परदेशात विक्री करूनच कंपनीला फायदा मिळत असे. त्यामुळे भारतीय उत्पादनाला कंपनीने प्रोत्साहन दिले.

ब्रिटिशांनी भारतात आपल्या सत्तेची स्थापना केल्यानंतर भारताचा समुद्रपारीय व्यापार आपल्या हाती घेतला. त्यावेळी भारतीय समुद्रपार व्यापाराचे स्वरूप बदलले गेले. कारण प्राचीन काळापासून भारताचा समुद्रपार व्यापार ज्या देशांच्याबरोबर चालत होता त्याचे पारडे नेहमी भारताच्या बाजूने होते. त्यामुळे हा व्यापार भारताला अनुकूल होता. परंतु ब्रिटिशांची भारतावर सत्ता स्थापन झाल्यानंतर ब्रिटिशांनी या व्यापाराचे स्वरूप बदलले आणि या व्यापाराचे पारडे आपल्या बाजूने फिरविले. त्यामुळे भारताला अनुकूल असणारा समुद्रपार व्यापार ब्रिटिशकाळात प्रतिकूल बनत गेला.

सर्वसामान्यपणे व्यापाराचे दोन पक्ष असतात. दोन्ही पक्ष तेव्हा व्यापारिक संबंध वाढवितात जेव्हा त्यातून दोघांनाही फायदा होतो. परंतु ब्रिटिश काळात भारतामध्ये ब्रिटिशांनी या सिद्धांताला बदलून टाकले. या व्यापारामध्ये फक्त ईस्ट इंडिया कंपनी म्हणजेच ब्रिटिश हा एकच पक्ष होता. ब्रिटिशांनी भारतातील सत्ता आपल्या हाती घेतल्यानंतर भारतातील कच्चा माल भारतीय जमिन महसूलातून ईस्ट इंडिया कंपनी खरेदी करित.तो कच्चा माल इंग्लंडमधील उद्योगधंद्यांना पुरविला जात आणि इंग्लंडमधील उद्योग धंद्यातून उत्पादित पक्का माल विक्रीसाठी भारतीय बाजारपेठेत पाठविला जात. म्हणजेच ब्रिटिशांनी भारताला कच्चा माल पूरविणारी व पक्का माल खरेदी करणारी आपली हक्काची बाजारपेठ बनविली.

ब्रिटिशांच्या हाती भारतातील राजकीय सत्ता आल्यानंतर या राजकिय सत्तेचा वापर ब्रिटिशांनी आपल्या व्यापार वाढीसाठी केला. सन१७५७ पासून १८१३ पर्यंतचा काळ हा ईस्ट इंडिया कंपनीचा भारतातील व्यापारी मक्तेदारीचा काळ होता. या काळात कंपनीने भारतीय व्यापारावर एकाधिकार प्रस्थापित करून जास्त नफा कमविण्याचा प्रयत्न केला. यासाठी कंपनीने भारतीय वस्तू भारतातील महसूलातून कमी किमतीत खरेदी करून त्या चढ्या दराने युरोपात विकी केल्या. या काळात भारतातून प्रामुख्याने सुती व रेशमी कापड मसाल्याचे पदार्थ निळ, अफू, तंबाखू, मलमल, अन्नधान्य व इतर कलाकसुरीच्या वस्तू युरोपात निर्यात केल्या जात. तर युरोपातून मदय, सोने-चांदी मौल्यवान धातू व आरामदायी वस्तूंची युरोपातून भारतात आयात होत. हा संपूर्ण आयात-निर्यात व्यापारातील वस्तूंची ने आण ही ब्रिटिश जहाजांतून समुद्रमार्गे चालत असे.

इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाल्याने आणि युरोपात खुल्या व्यापारी धोरणाचा प्रसार झाल्याने कंपनीच्या भारतातील व्यापारी मक्तेदारीवर टीका होऊ लागली. त्यामुळे सन १८१३ च्या चार्टर ॲक्टने कंपनीची भारतातील व्यापारी मक्तेदारी नष्ट होऊन भारताबरोबरचा व्यापार सर्वांसाठी खुला करण्यात आला. त्यामुळे ब्रिटिश समुद्रपार व्यापारात अचानक वाढ झाली. कारण मोठ्या प्रमाणात ब्रिटिश उत्पादित माल भारतात येऊ लागला. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीमुळे भारतीय हस्तोद्योग उत्पादित माल विशेषतः सुती व रेशमी कापड युरोपियन व भारतीय बाजारपेठेतून बाहेर फेकेले गेले. भारतीय हस्तोद्योगातील उत्पादित सुती व रेशमी कापडाची जागा इंग्लंडमधील उद्योगातून यंत्रावर आधारित कापडाने घेतली. त्यामुळे भारतीय हस्तोद्योगांचा ऱ्हास होऊन इंग्लंडमधील उद्योगांना भारतातील कच्चा माल पुरविला जाऊ लागला.

**ब्रिटिश भारताचा इंग्लंडशी निर्यात व्यापार (सन- १८२९ - १८३८) (मिलीयन रूपयात)**

| वर्ष | निर्यात | वर्ष | निर्यात |
|---|---|---|---|
| १८२९ | ६० | १८३४ | ४२ |
| १८३० | ४६ | १८३५ | ५२ |
| १८३१ | ३५ | १८३६ | ६२ |
| १८३२ | ४३ | १८३७ | ४७ |
| १८३३ | ३९ | १८३८ | ५१ |

(Source : K. N. Chaudhari, Bibliography )

हा काळ खुल्या व्यापारी धोरणाचा असल्याने ब्रिटिशांनी भारतातही खुल्या व्यापाराचे धोरण स्विकारले. कारण इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाल्याने उत्पादीत मालाला भारतीय बाजारपेठेची गरज होती. पण भारतात औद्योगिक क्रांती झाली नसल्याने भारतासाठी खुल्या व्यापाराचे धोरण हानीकारक होते. त्याचबरोबर ब्रिटिशांनी खुल्या व्यापाराचे धोरण भारतात पूर्णत: एकतर्फी अवलंबल्याने भारतीय हस्तोद्योगांचा ऱ्हास झाला. त्यामुळे भारतातून उत्पादीत पक्क्या मालाचे प्रमाण कमी झाले. त्याचवेळी मोठ्या प्रमाणावर भारतातून इंग्लंडला कच्च्या मालाची निर्यात होऊ लागली.

सन १८५० नंतर भारतीय समुद्रपार व्यापार बहुपक्षीय (Multilateral) झाला. कारण इंग्लंडबरोबरच नवऔद्योगिक देशही भारतीय व्यापारामध्ये महत्वाची भूमिका पार पाडू लागले. सन १८५० नंतर भारतातील दळणवळणाच्या साधनामध्ये झालेली प्रगती, भारतीय शेतीचे व्यापारीकरण, क्रिमीयन युद्ध, अमेरिकन यादवी युद्ध, सुएझ कालव्याची निर्मिती, सन १८८२ ते १८९४ या काळातील भारतीय अर्थव्यवस्थेतील अहस्तक्षेप निती (Laissez Faire) १८९३ चे सिनो-जपान युद्ध, तसेच वारंवार पडणारे दुष्काळ व अवर्षण या घटनांचा प्रभाव भारतीय ब्रिटिश समुद्रपार व्यापारावर झाला. कारण भारतीय बाजारपेठ ही जागतिक बाजारपेठेशी जोडली गेली होती. त्यामुळे या काळात ब्रिटिश समुद्रपार व्यापार अस्थिर होता.

**ब्रिटिश समुद्रपार व्यापाराचा भारतावर पडलेला प्रभाव :**

निसंदेहपणे व्यापारामुळे देशाचा नेहमीच फायदा होतो. पण ब्रिटिश काळात ब्रिटिश समुद्रपार व्यापारामुळे भारताचा फायदा होण्याऐवजी तोटाच जास्त झाला. ब्रिटिश समुद्रपार व्यापारामुळे भारतीय अर्थव्यवस्था खऱ्या अर्थाने वसाहतवादी अर्थव्यवस्था बनली. वसाहतवादी अर्थव्यवस्थेमध्ये साम्राज्यवादी राष्ट्र आपणास पोषक असे बदल वसाहती अर्थव्यवस्थेमध्ये करून वसाहतीमधील सर्व उत्पादन साधनांवर आपले नियंत्रण प्रस्थापित करून त्याचा वापर आपल्या राष्ट्राच्या प्रगतीसाठी केला जातो. भारतातही ब्रिटिशांनी असेच केले आणि भारताचे आर्थिक शोषण केले. त्यामुळे भारत दरिद्री देश बनला.

सुरूवातीला ईस्ट इंडिया कंपनीने भारतीय उत्पादीत वस्तूंना परदेशी बाजारपेठेत विकून नफा कमविला. पण इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीनंतर भारतातील कच्चा माल इंग्लंडमधील उद्योगांना पूरवून इंग्लंडमधील यंत्रावर उत्पादीत पक्का माल भारतीय बाजारपेठेत आयात केला जाऊ लागला. त्यामुळे भारतीय हस्तोद्योगांचा ऱ्हास झाला. हस्तोद्योगांचा ऱ्हास झाल्याने लोकांचा भार शेतीवर वाढला. त्यामुळे भारताचे ग्रामीणीकरण होऊन गरीबी वाढली.

भारतीय खेडी प्राचीन काळापासून स्वयंपूर्ण होती. पण ब्रिटिश समुद्रपार व्यापारामुळे ती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेशी जोडली गेली. त्यामुळे ग्रामांचा स्वयंपूर्णपणा नष्ट होऊन स्वयंपूर्ण अर्थव्यवस्थेचा ऱ्हास झाला. कारण ब्रिटिश काळात वाहतूक दळणवळणाच्या साधनांचा विकास झाल्याने खेडेगावापर्यंत व्यापाराचे जाळे विणले गेले. ग्रामीण भागातील कच्चा माल बंदरापर्यंत व पुढे जागतिक बाजारपेठेपर्यंत निर्यात होऊ लागला व परकीय माल आयात होऊ लागला.

१९ व्या शतकात भारताचा ब्रिटिश समुद्रपार व्यापार मोठ्या प्रमाणात विस्तारला होता. १८ व्या शतकातील पारंपारिक व्यापारी स्वरूपाऐवजी १९ व्या शतकात भारतीय व्यापाराने आधुनिक स्वरूप घेतले. भारताच्या निर्यात व्यापारामध्ये वाढ झाली. पण हा काळ वसाहतवादी शासनाचा असल्याने म्हणजेच भारतावर एका परकीय देशाची सत्ता असल्याने त्याचा भारताला फायदा होण्याऐवजी तोटाच जास्त झाला. कारण आयातीपेक्षा निर्यातीचे प्रमाण जास्त असतानाही भारत या काळात मागासच राहीला. वसाहतवादी शासनामुळे यातून भारताचे शोषणच झाले.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

१. दादाभाई नौरोजींनी....... हा ग्रंथ लिहिला.

अ) Wealth of Nations ब) Rise of Maratha Power

क) Poverty and Un-British Rule in India

ड) Economic History of India

२. चिनमधून इंग्लंडला........ पदार्थांची निर्यात होत होती.

अ) चहा व रेशीम ब) अफू क) मद्य ड)कापूस

३. रोमेशचंद्र दत्तांनी ....... ग्रंथ लिहिला.

अ) Discovery of India ब) Poverty of India

क) The Economic History of India in the victorian Age ड) History of India

४) दादाभाई नौरोजीनी द्रव्यापहरणाला ....... म्हटले आहे.

अ) चांगल्यातले चांगले ब) वाईटातले वाईट

क) प्रगतीदायक ड) विकासात्मक

५) पंडित नेहरूंनी ...... ग्रंथ लिहिला

अ) Discovery of India ब) indian Economy

क) An Economic History of India ड) Modern India

**ब) एका वाक्यात उत्तरे**

१. द्रव्यापहरणाचा सिद्धांत सर्वप्रथम कोणी मांडला?

२. भारताच्या आर्थिक शोषणाचा मुख्य मार्ग कोणता होता?

३. दादाभाई नौरोजींनी भारतीय दारिद्र्याचे प्रमुख कारण काय मानले?

४. द्रव्यापहरणाच्या सिद्धांताला कोणी विरोध केला?

५. सन १८९३ ला कोणते युद्ध झाले?

**४.३ पारिभाषिक शब्द शब्दार्थ**

- ✼ साम्राज्यवाद : दुसऱ्या प्रदेशावर वर्चस्व स्थापन करण्याची वृत्ती
- ✼ व्यापार : वस्तुंची खरेदी -विक्री म्हणजे व्यापार
- ✼ खुले व्यापारी धोरण : अर्थशास्त्रीय संकल्पना. खुल्या व्यापाराचे धोरण म्हणजे परदेशातून आयात होणाऱ्या मालावर बंधने व जकाती न लादणे तसेच देशातून निर्यात होणाऱ्या वस्तूंवरही जकात न लादणे

. **निहस्तक्षेप निती** (Laissez Faire) : एक अर्थशास्त्रीय संकल्पना. सरकारने अर्थव्यवहारात हस्ताक्षेप न करणे म्हणजे निहस्तक्षेप निती.

. **एजन्सी हाऊस :** कंपनीच्या नोकरांनी खाजगी व्यापार व बंगालच्या महसूलातून जो अफाट पैसा जमविला, या जमा झालेल्या पैशामधूनच बँकिंग व्यवसाय करणारी जी संस्था उभी राहिली ती म्हणजे एजन्सी हाऊस.

. **द्रव्यापरहण / आर्थिक निः सारण** : एका देशाकडून दुसऱ्या देशाकडे होत असलेले संपत्तीचे वहन म्हणजेच आर्थिक निःसारण किंवा द्रव्यापहरण होय.

**१.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**स्वयं अध्ययन प्रश्न-१**

अ) १) ड २) ब ३) अ ४) ब ५) अ

ब) १) १८१३ चा चार्टर ॲक्ट

२) अफू

३) चिनबरोबर

४) सन १८६१ ते १८६५

**स्वयं अध्ययन प्रश्न-२**

अ) १) क - २.५% २) अ- ॲडम स्मिथ ३) क- फेडरिक लिस्ट

४) अ -कोर्ट ऑफ डायरेक्टर्स ५) ब- वाढविण्यात

ब) १) Das National System der politischen

२) सन १८५९ चा जकात कायदा

३) सुती कापड व धागा

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -३**

**अ)** १) क २) अ ३) क ४) ब ५) अ

**ब)** १) दादाभाई नौरोजी

२) गृहखर्च

३) संपत्ती वहन

४) सन जॉन स्ट्रेची, मॉरीस-डी-मॉरीस इ. नी

५) सिनो-जपान युद्ध

**४.५ सारांश**

ब्रिटीशकाळात भारत हा आशियातील निर्विवादपणे एक महत्त्वाचा व्यापारी देश होता. १९ व्या शतकातील भारतीय व्यापाराचे स्वरूप पाहत असताना त्यामध्ये सतत बदल झालेला दिसून येतो. ब्रिटीशकाळात भारताची निर्यात ही आयातीपेक्षा जास्त होती. पण तरीही भारत मागासलेलाच देश राहिला. कारण भारत हा परकीय राजवटीखाली असल्याने भारताचा व्यापार एका साम्राज्यवादी शक्तीकडून नियंत्रित केला जात होता. तसेच भारतीय व्यापाराच्या गतीचे चक्र हे संपूर्णपणे एका दुसऱ्या देशाच्या हातात होते. बिपिनचंद्र म्हणतात त्याप्रमाणे भारत ब्रिटिश काळात आंतरराष्ट्रीय बाजारपेठेला जोडला गेला पण तो दुय्यम स्थितीत जोडला गेला. त्यामुळे भारतीय व्यापाराच्या तसेच अर्थव्यवस्थेच्या स्वरूपात बदल होऊन भारत हा इंग्लंडला कच्चा माल पुरविणारी आणि पक्का माल खरेदी करणारी इंग्लंडची हक्काची बाजारपेठ बनली.

देशी उद्योगांच्या संरक्षणासाठी एक महत्त्वाचा घटक म्हणून जकात धोरण महत्त्वाचे होते. पण भारत हा ब्रिटीशांची एक वसाहत असल्याने भारतीय जकातीचे धोरण ठरविताना भारतीय लोकांच्या हिताचा विचार केला नाही तर इंग्लंडमधील लोकांच्या हिताचा विचार केल्याने म्हणजेच ब्रिटीश वस्तूंच्या आयातीला प्रोत्साहन दिल्याने भारतीय हस्तोद्योगांचा ऱ्हास झाला. त्यामुळे एकेकाळी भारताची उत्पादक म्हणून असणारी प्रतिमा बदलून ती ब्रिटीश काळात कर्जदार व खरेदीदार बनली. पुढे १८६० नंतर इंग्लंडची भारतातील आयात कमी कमी होऊ लागल्याने आणि इतर देशांच्या आयाती वाढू लागल्याने १९२० च्या दशकात देशी उद्योगांना काही प्रमाणात सरंक्षणाचे धोरण सरकारने स्विकारले.

ब्रिटीशांनी भारत ताब्यात घेतल्यांतर भारतीय संपत्ती अनेक मार्गांनी इंग्लंडला नेली. त्यामुळे भारताचे दारिद्रय वाढून दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. आर्थिक निः सारण किंवा द्रव्यापहरण सिद्धांत सर्वप्रथम दादाभाई नौरोजींनी मांडला. त्यानंतर राष्ट्रवाद्यांनी त्यास आर्थिक राष्ट्रवादाचे एक साधन बनविल्यामुळे या सिद्धांतास आर्थिक महत्त्वापेक्षा राजकीय महत्त्व जास्त प्राप्त झाले. या सिद्धांताद्वारे ब्रिटीश शासनाचे स्वरूप राष्ट्रवाद्यांनी उघडे करून ब्रिटीश साम्राज्यवादाच्या आर्थिक गाभ्यालाच स्पष्टपणे व निर्भिडपणे हात घातला. राष्ट्रीय चळवळीत या सिद्धांताला राष्ट्रवादी नेत्यांनी मुख्य आधार बनवून लोकापर्यंत ब्रिटीशांच्या शोषक स्वरूपाची जाणीव निर्माण केली.

१९ व्या शतकात ब्रिटीश समुद्रपार व्यापार प्रचंड प्रमाणात विस्तारला. पण हा काळ वसाहतवादी शासनाचा असल्याने म्हणजे भारतावर ब्रिटिशांचे राज्य असल्याने त्याचा भारताला फायदा होण्याऐवजी त्यातून भारताचे शोषणच जास्त झाले.

एकंदरीत १९ व्या शतकात भारतीय व्यापार विस्तारला गेला.पण त्याचा फायदा भारताला झाला नाही.

व्यापार हा देशाच्या सुबत्तेसाठी कारणीभूत असतो.पण वसाहतकाळात तो सुबत्तेचा आकडा दर्शवित नसून शोषणाचा आकडा दर्शवितो.

**४.६ सरावासाठी स्वाध्याय**

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) १९ व्या शतकातील भारताच्या व्यापारी स्वरूपाची माहिती द्या.

२) १९ व्या शतकातील जकातीचे धोरण स्पष्ट करा.

३) द्रव्यापहरण सिद्धांताची माहिती द्या.

४) द्रव्यापहरण सिद्धांताचे/ आर्थिक निःसारणाचे वेगवेगळे मार्ग स्पष्ट करा.

५) आर्थिक निः सारणाचे परिणाम आणि त्यासंबंधी निर्माण झालेला वाद- विवाद थोडक्यात स्पष्ट करा.

६) ब्रिटिश समुद्रपार व्यापाराची माहिती लिहा.

**ब) टीपा लिहा.**

१) खुले व्यापारी धोरण

२) निहस्तक्षेप निती

३) १८५७ नंतरचे जकात धोरण

४) द्रव्यापहरणाचा सिद्धांत

५) द्रव्यापहरणाच्या सिद्धांताचे इंग्लंडवरील परिणाम

**४.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ**


1. Tirthankar Roy, the Economic History of India (1857-1947), OUP-2000
2. Dharma Kumar (ed.) The Cambridge Economic History of India, Vol-II (1757-1970) Orient Longman, Hyderabad,1982.
3. Irfan Habib, Indian Economy, (1858-1914), Tulika Books 2006.
4. Romesh Dutt, the economic history of India in the victorian Age, Kegan paul Trench, Trubner & Co,Ltd. 1908
5. Dietmar Rothermund, An Economic history of India Manohar pub, 1989

६. सुमित सरकार आधुनिक भारत (१८८५- १९४७), राजकमल प्रकाशन,१९९३.

७. डॉ. बी. एल. ग्रोव्हर, डॉ. एन. के. बेल्हेकर, आधुनिक भारताचा इतिहास एस. चन्द, २००२

८. बिपीन चंद्र, आधुनिक भारत, के. सागर प्रकाशन २००६.


***